21-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

RDB/ 13:00

21-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

RDB/ MAP/ KGS/ 13:00 वा.

( सभापतीस्थानी माननीय सभापती )

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे.

**जडचिरोली जिल्ह्याप्रमाजे विदर्भातील यवतमाळ व बुलढाजा**

**या दो जिल्ह्यांत येजाऱ्या उद्योजां ज रातू वजळज्याबाबत**

**(1) * 5605 डॉ. ए पी. हिराजी, प्रा. बी. टी. देशमुज , श्री. व्ही. यू. डायजव्हाजे, श्री. वसंतराव जोटरे , श्री. साहेब बोरस्ते , श्री. जी. एल. ऐपूरे : ता.प्र.ज. 2996 ला दिांज 4 एप्रिल, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** स-मा-ा-ीय उद्यो मंत्री पुढील ोष्टींचा ुलासा रतील ाय :-

(1) मुज्यत्वे विदर्भ, मराठवाड्यामध्ये व एजूजच राज्यामध्ये औद्योजिज दृष्ट्या माजासलेल्या जिल्ह्यांत उद्योजजां-ी उद्योज उभे जरावेत म्हजू-ा "प्रतिलज लोजसंज्येमाजे उपलब्ध जारजा-यातील रोजजार" या सत्यशोध-ा समितीच्या -िजषाप्रमाजे जिल्हा जेवढा जास्त माजासलेला असेल तेवढया जास्त सवलती उद्योजजां-ा देज्याच्या विचाराधी-ा प्रस्तावावरील शास-ाचा विचार पूर्ज झालेला आहे जाय,

(2) असल्यास, याबाबत शास-ा-ो घेतलेल्या -िर्जयाचे स्वरुप जाय आहे,

(3) -ासल्यास, याबाबत होजाऱ्या विलंबाची जारजे जाय आहेत ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री.अशोज चव्हाज यांच्याकरिता :** (1) होय.

(2) सामूहिज प्रोत्साह-ा योज-ोअंतर्जत राज्यातील तालुक्यांचे पु-ा:वर्जीजरज जरज्यात आले असू-ा त्या संबंधीचे आदेश दि-ांज 18.10.2002 रोजी -िर्जमित जरज्यात आले आहेत.

(3) प्रश्-ा उद्‌भवत -ाही.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा आणि महाराष्ट्रातील उर्वरित भागामध्ये लघू आणि मध्यम उद्योगांची काय स्थिती आहे हे सगळयांना माहीत आहे. पहिल्या प्रश्नामध्ये असे विचारले आहे की, सत्यशोधन समितीच्या निकषाप्रमाणे जिल्हा जेवढा जास्त मागासलेला असेल तेवढया जास्त सवलती उद्योजकांना देण्याच्या विचाराधीन प्रस्तावावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय ? या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिलेले आहे. गडचिरोली या मागासलेल्या जिल्हयाला जादा सवलती दिलेल्या आहेत. यामध्ये प्रश्न असा होता

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, या जिल्हयाच्या तुलनेत इतर जिल्हयांमध्ये म्हणजे यवतमाळचा काही भाग मागासलेला आहे तसेच बुलढाणा जिल्हयातील भाग मागासलेला आहे म्हणून गडचिरोली जिल्हयाच्या तुलनेत यवतमाळ आणि बुलढाणा जिल्हयातील औद्योगिकदृष्टया मागासलेला जो भाग आहे त्या ठिकाणी कोणकोणत्या जादा सुविधा दिलेल्या आहेत ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, यवतमाळ जिल्हयाचे डी प्लस असे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे यवतमाळ जिल्हयाला जी गुंतवणूक आहे त्याच्या 35 टक्के विशेष भांडवली अनुदान देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्याची कमाल मर्यादा 25 लाख रुपयांपर्यन्त आहे. व्याज अनुदान योजना यवतमाळ जिल्हयाला लागू आहे. त्याची मर्यादा 25 लाख रुपयांपर्यन्त आहे. जकात परतावा सुध्दा 100 टक्के देण्यात आलेला आहे. 15 वर्षाकरिता विद्युत शुल्क माफी देण्यात आलेली आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : 18.10.2002 ला जी. आर. काढलेला आहे त्याला दोन वर्षे झालेली आहेत. विचाराधीन प्रस्तावावरील विचार केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री. अशोक चव्हाण : विचाराधीन प्रस्तावावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय असा प्रश्न विचारलेला आहे त्याला "होय" असे उत्तर दिलेले आहे. म्हणजे आता प्रश्न विचाराधीन नाही तर प्रश्न मार्गी लागलेला आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, दिनांक 18.10.2002 ला आदेश निर्गमित झालेले आहेत. गडचिरोली जिल्हा हा मागासलेला , दुर्गम आणि आदिवासी भाग आहे म्हणून त्या ठिकाणी जादा सवलती दिलेल्या आहेत. त्याच्या तुलनेत इतर ठिकाणीही आदिवासी भाग आहे. गोंदिया जिल्हयात, यवतमाळ जिल्हयात आदिवासी भाग आहे. यामध्ये विचाराधीन आहे असे म्हटले आहे. शासनाच्या काय विचाराधीन आहे ?

श्री. अशोक चव्हाण : यामध्ये जिल्हयाचे वर्गीकरण करताना ए, बी, सी, डी, डी प्लस आणि नो इंडस्ट्री डिस्ट्रीक्ट असे पाच-सहा प्रकारे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. याला आधार म्हणजे दांडेकर समितीने औद्योगिकीकरणाच्या संदर्भात जे निकष ठरविले होते ते निकष डोळयासमोर ठेवून तसेच खान समिती होती त्या दोघाच्या मिळून ज्या गोष्टी वेळोवेळी निदर्शनास आलेल्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

ता. प्र. क्र. 5605.... श्री. अशोक चव्हाण ....

आहेत आणि जिल्हयामध्ये जी औद्योगिक परिस्थिती आहे ती लक्षात घेऊन हे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्हयाला जे वर्गीकरण आहे त्याप्रमाणे गडचिरोली जिल्हयाला फायदा मिळतो.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : गडचिरोली जिल्हयाला वर्गीकरण आहे की तालुक्याला ?

श्री. अशोक चव्हाण : तालुक्याला आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयामध्ये डी प्लस वर्गीकरण झ ााल्यानंतर त्या ठिकाणी किती उद्योग सुरु झाले ? त्या ठिकाणी आतापर्यन्त सुरु झालेले किती उद्योगधंदे आता सुरु आहेत आणि किती बंद आहेत ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, याची यादी माझ्याकडे नाही. ती पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाडयामध्ये उद्योगीकदृष्टया मागासलेले जिल्हे आहेत. त्यामध्ये मराठवाडयातील परभणी, हिंगोली, उस्मानाबाद हे जिल्हे तसेच विदर्भातील गडचिरोली, यवतमाळ, बुलढाणा यासारखे जिल्हे आहेत. त्या निकषाप्रमाणे अशा प्रकारच्या विशेष सोयी सवलती देण्यासंबंधीचा प्रश्न आहे. यामध्ये दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले आहे की,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ श्री.बरवडनंतर 13:05

ता.प्र.क्र.5605...... प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत राज्यातील तालुक्यांचे पुन:वर्गीकरण करण्यात आले असून त्यासंबंधीचे आदेश दिनांक 18.10.2002 रोजी निर्गमित करण्यात आले आहेत असे म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, या तालुक्यांना सोयी सवलती दिल्यानंतर मागासलेल्या जिल्हयात आणि तालुक्यात उद्योग यावेत यासाठी शासनाकडून काही विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत काय आणि प्रयत्न करण्यात आले असतील तर त्याचे स्वरुप काय आहे आणि त्या प्रयत्नांना कितपत यश आले आहे त्याची माहिती द्यावी.

श्री.अशोक चव्हाण : वर्गीकरणासाठी जिल्हा हा घटक न समजता तालुक्याच्या परिस्थितीनुसार हे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या जिल्हयामध्ये जशी उद्योगधंद्याची परिस्थिती आहे त्याला विभागीय स्वरुप न देता संपूर्ण महाराष्ट्रातील ज्या काही तालुक्यांमध्ये उद्योगाची परिस्थिती आहे त्यानुसार ते वर्गीकरण केलेले आहे. मग कोठे ड, ड+ असे केलेले आहे. शासनाने यामध्ये वर्गीकरण केल्यानंतर काय परिस्थिती आहे असा दुसरा प्रश्न विचारण्यात आला आहे. सुरुवातीला लायसंसिंग पध्दतीमुळे शासनाकडे एक प्रकारची सोय होती की, एखाद्या अविकसित भागामध्ये उद्योगधंदा नेण्याकरिता एखाद्या उद्योगपतीला किंवा समुहाला सांगितले जात होते. आता डीलायसंसिंगमुळे आमुलाग्र बदल झालेला आहे. त्यामुळे इंटेसिव्ह कशाप्रकारे देवू शकू हाच खरा प्रश्न आपल्यासमोर आहे. त्यासाठी वेळोवेळी "स्कीम ऑफ इंटेसिव्ह" जाहीर केले आहे. सध्या 2001 ची पॅकेज स्कीम ऑफ इंटेसिव्ह अस्तित्वात आहे. त्यामध्ये विशेष भांडवल देतो, अनुदान देतो, व्याज अनुदान देतो, वीज शुल्क माफी देतो, जकात परतावा देतो. या त्याच्यातील सोयी आहेत. त्याच्या व्यतिरिक्त जे प्रश्न आहेत त्याच्यासाठी आणखी करणे शक्य आहे काय यावर विचार होऊन नुकताच मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला असून सुरुवातीच्या मेगा प्रोजेक्टच्या व्याख्येत बदल करण्यात आला आहे. सुरुवातीला उर्वरित महाराष्ट्रात 1 कोटी आणि विदर्भ, मराठवाडयात 750 कोटी अशी मेगा प्रोजेक्टची व्याख्या होती. त्यात बदल करुन ज्या तालुक्यांचे वर्गीकरण अ व ब मध्ये करण्यात आलेले आहे त्याठिकाणी 500 कोटी किंवा 1 हजार कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे. म्हणजे 1 हजार कोटीऐवजी 500 कोटी इतकी मर्यादा करण्यात आलेली आहे. तसेच क, ड व

2...

NTK/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र.5605....                                        श्री.अशोक चव्हाण....

ड+ आणि विना उद्योग या भागामध्ये सुरुवातीची मर्यादा 750 कोटीची होती त्याऐवजी आता 250 कोटी इतकी करण्यात आलेली आहे. 500 लोकांना रोजगार दिला तरी चालेल इतकी ही मर्यादा कमी केल्यामुळे या भागामध्ये प्रकल्प येऊ शकतील. अशा स्वरुपाचे उद्योग त्या जिल्हयामध्ये येऊ इच्छित असतील आणि त्यांची विशेष मागणी असेल त्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक समिती गठित करण्यात आलेली असून तिला मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. उद्योगधंदे येतच असतात, त्यांच्या मागण्या आहेत, जमिनीच्या सवलतीच्या अपेक्षा असतात, जकातीच्या तक्रारी आहेत. तेथील गुंतवणूक मोठी असेल आणि चांगला रोजगार मिळणार असेल आणि एखादा उद्योगधंदा क, ड व ड+ भागामध्ये जाण्यास तयार असेल अशा उद्योगासाठी वेगळा निर्णय घेण्यात यावा यासाठी मुख्य सचिवांना पूर्ण अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्यात येईल. जसजसे प्रस्ताव येतील त्याप्रमाण निर्णय घेण्यात येईल.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, 2002 साली तालुक्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे त्यापूर्वीचे ड व ड+ तालुके आहेत ते तालुके तसेच ठेवले आहेत की त्यात बदल झाला आहे ? राज्यामध्ये ड वर्ग किती तालुके आहेत आणि ज्या तालुक्यांना ड दर्जा मिळाला आहे त्यामध्ये छोटे छोटे व्यावसायिक आहेत त्यांना या सर्व सवलती मिळणार आहेत काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, पूर्ण राज्याची मोठी यादी असल्यामुळे ती पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, मागासलेल्या भागामध्ये जर उद्योगपतींनी विशेष सोयी सवलतींची मागणी केली तर जरुर विचार करु. माझा प्रश्न असा आहे की, आपल्या राज्यामध्ये विदेशातील उद्योग यावेत यासाठी आपल्या राज्याचे मा.मुख्यमंत्री व मा.उद्योगमंत्री अमेरिकेमध्ये गेले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.शिगम.....

(ता.प्र.क्र.5605.... (प्रा. जोगेंद्र कवाडे...)

आपल्या राज्यामध्ये उद्योगधंदे यावेत यासाठी मा.मुख्यमंत्री आणि मा. उद्योग मंत्र्यांकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. मा. मंत्री महोदयांनी असे सांगितले की, जर उद्योगपतींनी उद्योग सुरु करण्याबाबत विचारणा केली तर त्यांना सवलती देण्याचा विचार करु, असे म्हणणे कितपत योगय आहे ? माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, अशा मागासलेल्या भागामध्ये शासनाने स्वत: पुढाकार घेऊन उद्योगपतींना उद्योग काढण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या संदर्भात शासन ठोस कारवाई करणार आहे काय ?

श्री. अशोक चव्हाण : उद्योजकांनी शासनाकडे यावे आणि त्यांच्या मागणी नुसार आम्ही त्यांना परवानगी देऊ अशी राज्य शासनाची भूमिका नाही. राज्यामध्ये उद्योग वाढावेत यासाठी शासनाकडून प्रयत्न सुरु आहेत. मा.मुख्यमंत्र्यांबरोबर एक डेलिगेशन अमेरिकेच्या दौ-यावर जाऊन आले. त्यावेळी साडेबाराशे कोटी रु.चे प्रस्ताव प्राप्त झाले. मायक्रोसॉफ्ट इत्यादी क्षेत्रातील सात-आठ लोकांशी चर्चा होऊन त्यांची पत्रे देखील प्रत्यक्ष प्राप्त झालेली आहेत. अविकसित भागामध्ये उद्योग यावेत यासाठी कोणत्या अधिक सवलती देता येतील, उद्योजकांना कशा प्रकारे आकर्षित करता येईल यादृष्टीने शासनाचे प्रयत्न आहेत. तालुक्यांची वर्गवारी केलेली आहे. 2001साली राज्यामध्ये पॅकेज स्कीम ऑफ इन्सेन्टीव्हज् ही योजना लागू केली होती. त्या योजनेची मुदत 2006मध्ये संपत आहे. त्यामुळे अविकसित भागामध्ये उद्योगधंद्यांना आकर्षित करण्यासाठी राज्य शासन नवीन धोरण आखत आहे. त्यादृष्टीने फिक्की बरोबर, औद्योगिक संस्थांबरोबर राज्य शासनाची चर्चा सुरु आहे. अविकसित भागामध्ये कोणकोणती मदत दिली पाहिजे, कामगार कायद्याच्या संदर्भात वेगळया पध्दतीने विचार झाला पाहिजे इत्यादी 10 प्रकारच्या मागण्या औद्योगिक संस्थांनी केलेल्या आहेत. सध्या अस्तित्वात असलेल्या पॅकेज इन्सेन्टिव्हज् स्कीमची मुदत संपल्यानंतर अविकसित भागामध्ये अधिक उद्योग यावेत यादृष्टीने शासनाने नवीन धोरण आखण्याचे ठरविलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर :विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित राज्याचा सर्व्हे केला असे मंत्री महोदयांनी सांगितले. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित राज्यामध्ये किती तालुक्यांचा समावेश आहे याची माहिती मंत्री महोदय पटलावर ठेवतील काय ?

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.5605....

श्री. अशोक चव्हाण : मा. विरोधी पक्ष नेत्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : विदर्भ, मराठवाड्यामध्ये व एकूणच राज्यामध्ये ओद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या जिल्ह्यांत उद्योजकांनी उद्योग उभे करावेत यादृष्टीने तालुक्यांचे पुन:वर्गीकरण करण्यात आलेले आहे. यामध्ये किती तालुक्यांचा समावेश करण्यात आलेला आहे याची यादी मंत्री महोदय पटलावर ठेवतील काय ?

श्री. अशोक चव्हाण : अ,ब,क,ड आणि ड प्लस आणि 9 इंडस्ट्री डिस्ट्रिक्ट यासाठी रोजगाराचे निकष लावलेले आहेत. तालुक्याची जी वर्गवारी केलेली आहे त्याची यादी पटलावर ठेवण्यात येईल.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**मुंबईतील राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाच्या गिरण्यांचे पुनरुज्जीवन करणेबाबत**

**(२) *  ७७५१    श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ : ता.प्र.क्र. २४२८ ला दिनांक २८ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** स-मा-न-नीय वस्त्रोद्यो मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या बंद असलेल्या १० गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) उक्त प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी बंद असलेल्या गिरण्या लवकरात लवकर सुरु व्हाव्यात यासाठी कोणते प्रयत्न केले आहेत वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर**, **श्री.सतिश चतुर्वेदी यांच्याकरिता** : (१), (२) व (३) राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ हे केंद्र शासनाच्या अखत्यारित असून या संबंधीची सर्व कार्यवाही केंद्र शासन करते. औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाने राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मान्य केलेल्या पुनरुज्जीवन योजनेनुसार जीवनक्षम गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे व अजीवनक्षम गिरण्या बंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

----------

श्री. जितेंद्र आव्हाड : मुंबईच्या वैभवामध्ये गिरण्यांमुळे भर पडली. 1980मध्ये 3 लाख गिरणी कामगार असलेली मुंबई आज 18 हजार गिरणी कामगारांवर आलेली आहे. आश्चर्य वाटते की, डब्ल्यूटीओ करार झाले. येणा-या 10 वर्षामध्ये कापड उद्योग हा भरभराटीला येणार आहे. असे असताना कापड उद्योगामध्ये आघाडीवर असलेल्या मुंबई शहराची आज काय अवस्था आहे याचा अभ्यास आणि चाचपणी शासन करत नाही ही खेदजनक बाब आहे. मा.मंत्री महोदयांनी या प्रश्नाला "ही केन्द्राच्या अखत्यारितील बाब आहे" असे उत्तर दिलेले आहे. ह्या गिरण्यांच्या जमिनी महाराष्ट्रामध्ये, मुंबईमध्ये आहेत. ह्या गिरण्या विकल्या जात आहेत. कोहिनूर मिलची जमीन घेण्यासाठी कोणी मातोश्री रियाल्टिज येणार, कोणी दिल्लीचा बिल्डर येणार आणि 700 कोटीला जमीन धेणार अशा बातम्या वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेल्या आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7751... श्री.जितेंद्र आव्हाड...

अशा परिस्थितीमध्ये शासन जर लक्ष देणार नसेल आणि शासन अतिशय थंड डोक्याने उत्तर देणार असेल की, आमच्याकडे काहीच नाही. तर मग कामगारांनी कोणाकडे बघावयाचे. शासन कामगारांसाठी स्पेसिफीक प्लॅन तयार करणार आहे काय ? या गिरण्यांच्या जमिनी वाचाव्यात म्हणून त्या जमिनींवर काही उद्योग सुरु करण्याचे शासनाचे प्रयोजन आहे काय ?या संपूर्ण गिरण्या उध्वस्त होत असताना मुंबई शहरात एखादे टेक्सटाईल सेंटर येण्याची शक्यता आहे काय ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, या ठिकाणी एन.टी.सी.च्या गिरण्यासंदर्भातील प्रश्न विचारण्यात आलेला आहे. एन.टी.सी.हे केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. यासंबंधी बी.आय.एफ.आर.कडे सुनावणी झाली त्यावेळी कामगारांचे आणि गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्यासंदर्भात राज्य शासनाने आपली बाजू मांडलेली आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : या गिरण्याच्या जागा आपल्या आहेत. आपल्या जागेवर या गिरण्या उभ्या आहेत..

श्री. सतीश चतुर्वेदी : या गिरण्यांची जागा आपली असली तर या गिरण्या एन.टी.सी.च्या ताब्यात आहेत. यासंदर्भात क्लोजर केंद्र शासनाचे कामगार आयुक्त देतात. क्लोजर महाराष्ट्र शासनाचे कामगार आयुक्त देत नाहीत. केंद्र शासनाच्या कामगार आयुक्तांनी त्यांना क्लोजर दिलेला आहे. आपण आपली एक बाजू त्या ठिकाणी मांडली आहे की, या गिरण्याच्या जमिनी विकून जो काही निधी उपलब्ध होईल तो सर्व निधी गिरण्यांचे पुनरुज्जीवन आणि डेव्हलपमेंट करण्यासाठी खर्च केला पाहिजे अशी आम्ही शर्त त्यांच्यासमोर ठेवलेली आहे. यासंदर्भात जेवढा निधी येणार आहे तो पुनरुज्जीवन करण्यासाठी ज्या 70 गिरण्या निवडल्या आहेत. त्यांच्यासाठी खर्च होणार आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय मंत्र्यांनी उत्तरात नमूद केले आहे की, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ हे केंद्र शासनाच्या अखत्यारित असून यासंबंधीची सर्व कार्यवाही केंद्र शासन करते. औद्योगिक व वित्तीय पुरर्रचना मंडळाने राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मान्य केलेल्या योजनेनुसार जीवनक्षम गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे व अजीवनक्षम गिरण्या बंद करण्याची कार्यवाही सुरु आहे. औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळ हे कोणाच्या अखत्यारित आहे ? अजीवनक्षम गिरण्या किती आहेत ? जीवनक्षम गिरण्या किती आहे ?

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7751..

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, दोन्ही बोर्ड ही केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहेत. आपल्याला पुनरुज्जीवन योजनेनुसार जीवनक्षम गिरण्याची संख्या 70 एवढी आहे. आवश्यकता असेल तर त्या गिरण्यांची नावे मी वाचून दाखविण्यास तयार आहे. सभापती महोदय, इंडिया युनायटेड मिल नं.1, इंडिया युनायटेड मिल नं.5, इंडिया युनायटेड मिल नं.6,कोहिनूर मिल, मुंबई, टाटा मिल, मुंबई, पोद्दार मिल, मुंबई, सावकराम मिल,अकोला, आर.बी.ए.मिल,हिंगणघाट हया गिरण्या राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या माध्यमातून व राज्य शासनाच्या माध्यमातून पुनरुज्जीवीत करतो आहोत. ज्या गिरण्या बंद करावयाच्या आहेत त्यांची नावे सांगतो. इंडिया युनायटेड मिल नं.2, इंडिया युनायटेड मिल नं.3, इंडिया युनायटेड मिल नं.4, कोहिनूर मिल नं.2, कोहिनूर मिल नं.3, जाम मॅन्यूफॅक्चरींग कंपनी, मुंबई, सिताराम मिल,मुंबई, विदर्भ मिल्, अचलपूर, मॉडर्न मिल, नागपूर, आर.जे मिल, अकोला अशा नॉर्थ महाराष्ट्रातील मिल्स आहेत. एन.टी.सी.दक्षिण महाराष्ट्रात काही गिरण्या पुनरुज्जीवीत करणार आहे त्याची नावे सांगतो. ॲपोलो टेक्सटाईन मिल, मुंबई, न्यू सिटी मिल, मुंबई, गोल्ड मोहर मिल,मुंबई, बार्शी टेक्सटाई मिल, बार्शी, धुळे टेक्सटाईल मिल, धुळे, चाळीसगाव टेक्सटाईल मिल, चाळीसगाव, नांदेड टेक्सटाईल मिल, नांदेड, औरंगाबद टेक्सटाईल मिल, औरंगाबाद. या जवळपास 17 गिरण्या पुनरुज्जीवीत होणार आहेत. या गिरण्याच्या संदर्भात 1200 कोटी रुपयांची योजना तयार झाली आहे. या गिरण्यांची काही जमीन विक्री करुन 1200 कोटी रुपये या गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्याची योजना शासनाने आखली आहे. दक्षिण महाराष्ट्रात ज्या गिरण्या बंद करावयाच्या आहेत त्यांची नावे अशी आहेत की, भारत टेक्सटाईल मिल,मुंबई, दिग्विजय टेक्सटाईल मिल,मुंबई, ज्युपीटर टेक्सटाईल मिल, मुंबई, मुंबई टेक्सटाईल मिल, मुंबई, हिंद टेक्सटाईल मिल, मुंबई,एलिफिस्टन टेक्सटाईल मिल, मुंबई, मधूसुदन टेक्सटाईल मिल, मुंबई,पोद्दार मिल, मुंबई.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 13:20

ता.प्र.क्र. 7751 पुढे सुरु..

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना मुंबई शहरातील गिरण्या या केंद्राच्या अखत्यारित येतात असे सांगितले. या गिरण्यांच्या जमिनी विक्रीसाठी काढलेल्या आहेत. ज्या गिरण्या विक्रीसाठी काढलेल्या आहेत त्यामध्ये कोहिनूर नं.1 ही गिरणी नायगांव येथे आहे आणि कोहिनूर नं.2 ही गिरणी शिवाजी पार्क येथे सेनाभवनजवळ आहे. वर्तमानपत्रामध्ये आम्ही वाचले आहे की, या गिरण्यांच्या जमीन विक्रीमध्ये शिवसेनेच्या दोन प्रमुख नेत्यांनी टेंडर भरले आहेत. एक नेते हे सर आहेत आणि दुसरे शिवसेनेचे प्रमुख नेते आहेत. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, मुंबई शहरामध्ये निरनिराळया गिरण्या विक्रीला काढलेल्या आहेत त्याची टेंडर कोणी कोणी भरली आहेत याची माहिती मंत्रीमहोदय याठिकाणी देऊ शकतील काय ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, गिरण्यांच्या विक्री व्यवहारामध्ये कोणी कोणी टेंडर भरली आहेत यासंबंधीची माहिती घेऊन मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, गिरण्यांच्या जमिनी विकून येणा-या पैशातून काही गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे ठरले आहे. ही जमीन महाराष्ट्र शासनाची आहे आणि ती शासनाने एनटीसीला लीजवर दिलेली आहे म्हणजे जमीन विकून आलेल्या पैशावर शासनाचा अधिकार राहणार आहे वा कंपनीची मालकी राहणार आहे ? महाराष्ट्र सरकारचा यामध्ये शेअर राहणार आहे काय ? तसेच गिरण्यांचे पुनरुज्जीवन त्याच जागेवर होणार आहे किंवा अन्य ठिकाणी होणार आहे ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, गिरण्यांचे पुनरुज्जीवन त्याच मिलच्या जागेवर होणार आहे. एनटीसीच्या मालकीची जागा आहे. त्यांना लीजवर दिलेली आहे ती लीज अजूनही चालू आहे. डेव्हलपमेंटसाठी परवानगी महाराष्ट्र शासन देणार आहे. सध्या जी अरेंजमेंट आहे तीच पुढे चालू राहणार आहे. 1200 कोटी इक्विटी महाराष्ट्र शासनाची आहे. मशीन विक्री करुन,जमीन विक्री करुन गिरण्यांचे पुनरुज्जीवन करावयाचे अशी ही योजना आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुंबईतील गिरण्यांविषयी फार पोटतिडिकीने काही ढोंगी लोक याठिकाणी प्रश्न विचारत आहेत. या गिरण्यांची परिस्थिती ज्या कारणांमुळे निर्माण झाली ही कारणे ढोंगी लोक ओळखतात. परंतु प्रश्न शिवसेनेविषयीचा उल्लेख केला जातो

....2



SSK/ KGS/ MAP/ 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7751 पुढे सुरु...

श्री. मधुकर सरपोतदार....

तेव्हा निर्माण होतो. असा प्रकार सुरु ठेवायचा असेल तर शिवसेनेचेच नव्हगे तर कॉग्रेस,राष्ट्रवादी कॉँग्रेस सगळया पक्षाचेच लोक यामध्ये येतील. कोणीही असे समजू नये की प्रश्न तुमच्याजवळ आहेत आणि आमच्याकडे नाहीत. तुमच्याकडील प्रश्नांना आम्ही उत्तरे देऊ शकू पण आम्ही प्रश्न विचारले तर तुमच्याजवळ उत्तर नसेल ...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा.सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी ढोंगी हा शब्द याठिकाणी मा.सदस्यांच्या बाबतीत वापरला ही अत्यंत आक्षेपार्ह गोष्ट आहे. अनेक सदस्य भावनेने प्रश्न विचारतात. ज्यांना भावना कळणार नाहीत ते ढोंगी असे होता कामा नये. हे बरोबर नाही. त्यांच्याबद्दल बोलू लागतो तर ते महाढोंगी असू शकतील.

**सभापती** : ढोंगी या शब्दाऐवजी अन्य एखादा शब्द असेल तर तो मा.सदस्यांनी वापरावा. ढोंगी हा शब्द मी सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ढोंगी हा शब्द वापरलेला आहे तो पार्लमेंटरी आहे. मा.सदस्यांना जर भाषेबद्दलच चर्चा करावयाची असेल तर आमची तयारी आहे ढोंगी हा शब्द मी कामगारांच्या बाबतीत ढोंग माजवणारे अशा अर्थाने वापरला होता......

**सभापती** : ढोंगी हा शब्द मी कामकाजातून काढून टाकला आहे. आता तो शब्द पुन्हा वापरण्याची तसदी कशाला घेता ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7751..

श्री.मधुकर सरपोतदार :या गिरण्यांच्या विक्रीतून पैसे मिळणार आहेत. गिरणीची विक्री करीत असतांना तीन भाग करण्यात यावे असे ठरलेले आहे. त्यानुसार या गिरण्यांच्या जागेपैकी 1/3 जागा महानगरपालिकेला दिली जाणार आहे, 1/3 जागा म्हाडाला या कामगारांसाठी घरे बांधण्यासाठी दिली जाणार आहे व 1/3 जागेच्या निधीतून पुनर्वसन करण्यात येणार आहे. या गिरण्यांची विक्री जरी केन्द्र सरकार करणार असले तरी मूळ अंडरस्टॅन्डीगच्या अनुषंगाने पुढचे डेव्हलपमेन्ट केले जाणार आहे काय ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे.एन.टी.सी.चा असा आग्रह होता की, केन्द्र सरकार या गिरण्याची विक्री करणार असल्यामुळे व एन.टी.सी. तर्फे ही विक्री होणार असल्यामुळे 1/3 ची योजना आम्हाला लागू करता येणार नाही.त्यामुळे राज्य सरकारने बी.आय.एफ.आर.कडून कमिटमेन्ट करुन घेतले आहे की, राज्य सरकार ज्याप्रमाणे त्यांच्या गिरणीच्या विक्रीसाठी 1/3 ची अट लावते त्याप्रमाणे एन.टी.सी.ला सुध्दा ही अट लागू होईल .त्यामुळे आता गिरणी विक्रीची प्रक्रिया सुरु झाली असून एन.टी.सी.च्या गिरण्याची विक्री होत असतांना 1/3 ची योजना लागू करण्यासबंधी कमिटमेन्ट करुन घेण्यात आले आहे आणि त्या शर्तीसह डेव्हलपमेन्टला परवानगी देण्यात येणार आहे.

श्री.विलास अवचट : या गिरण्या जरी केन्द्र सरकारच्या अखत्यारातील असल्या तरी त्या गिरण्याची जमीन ही महाराष्ट्रातील आहे,मुंबईतील आहे.विकास नियंत्रण नियमावली लागू करण्याच्या बाबतीत येथे सांगण्यात आले होते. तेव्हा त्यांनासुध्दा विकास नियंत्रण नियमावली लागू होणे आवश्यक आहे.ही नियमावली त्यांना लागू करण्यात येणार आहे काय ? तसेच ज्या आजारी गिरण्या आहेत त्या गिरण्याच्या जमिनीची विक्री करण्यास परवानगी देण्यात येणार आहे परंतु ही परवानगी देत असतांना, त्या गिरण्यामध्ये काम करणारे जे कामगार असतील, त्यांची देणी देण्याच्या बाबतीतसुध्दा काही अटी आणि शर्ती टाकण्यात आल्या आहेत काय ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सन्माननीय सदस्य श्री.अवचट यांनी जो पहिला प्रश्न विचारला आहे तो प्रश्न केन्द्र सरकारच्या अखत्यारातील आहे आणि त्या प्रश्नाचे उत्तर मी अगोदर दिलेले आहे.महाराष्ट्रातील विकास नियंत्रण नियमावली त्यांना लागू होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री मधुकर सरपोतदार यांनी जो प्रश्न विचारला होता तोच प्रश्न पुन्हा सन्माननीय सदस्य

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7751..श्री.चतुर्वेदी..

श्री.विलास अवचट यांनी विचारलेला आहे . त्या जमिनीचे डेव्हलपमेन्ट करण्यासाठी राज्य सरकार परवानगी देणार आहे आणि. ही परवानगी देत असतांना कामगारांच्या थकबाकीसबधी सुध्दा विचार केला जाणार आहे.एन.टी.सी.ने आपल्या कामगारांना व्ही.आर.एस. देण्याचे प्रपोज केलेले आहे. व्ही.आर.एस. द्यावयाच्या कामगारांची एकूण संख्या 28 हजार एवढी आहे त्यापैकी 13 हजार कामगार पुनरुज्जीवित गिरण्यांमध्ये काम करणार आहेत.राज्य सरकारने आपल्या कामगारांना व्ही.आर.एस. ची जी रक्कम दिली. त्यापेक्षा दुप्पट व्ही.आर.एस.ची रक्कम त्यांनी दिलेली आहे. एन.टी.सी.ने 1800 कोटी रुपयांचे बॉन्डस काढून वेगळा निधी उभा केलेला आहे.राज्य सरकारने आपल्या कामगारांना जी व्ही.आर.एस.ची रक्कम दिली होती, त्यापेक्षा दुप्पट तर काही वेळा दीड पट जास्त रक्कमेचे चुकारे त्यांनी आपल्या कामगारांना दिलेले आहेत .गुजराथ पॅटर्न पेक्षा जास्त रक्कम त्यांनी दिलेली आहे. तसेच काही गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्या संबंधीची कार्यवाही सुरु आहे.

श्री.जितेन्द्र आव्हाड : परळ भागातील एक गिरणी तीन महिन्यापूर्वी विकली गेली असून मुंबईच्या इतिहासात सर्वात जास्त भाव या गिरणीच्या जमिनीला मिळाला आहे. 763 कोटी रुपये एवढी किंमत त्या गिरणीच्या जमिनीची आली होती. बी.आय.एफ.आर.कडून कमिटमेन्ट घेण्यात आलेले आहे असे येथे सांगण्यात आलेले आहे तसेच आता 1/3 च्या योजनेसंबंधी सुध्दा माननीय मत्रिमहोदयांनी खुलासा केला आहे. परंतु ही योजना शासन मान्य करणार आहे किंवा नाही याबद्दल कामगारांच्या मनात शंका आहे. तेव्हा या गिरणीमध्ये काम करणा-या कामगारांच्या मनात विश्वासार्हता निर्माण होणे आवश्यक आहे. या गिरणीच्या बाबतीत जो प्रस्ताव देण्यात आला आहे त्या बाबतीत आपण सविस्तर खुलासा केला तर कामगारांच्या मनात विश्वासार्हता निर्माण होईल....

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आव्हाड (पुढे चालू...) ता.प्र.क्र.7751 ...

जरी या जमिनी विकल्या जात असल्या तरी कामगारांना जीवंत ठेवण्यासाठी, येथील उद्योग जीवंत ठेवण्यासाठी हे शासन प्रयत्नशील आहे. तेव्हा जी गिरणी विकली गेली आहे तिचा प्रस्ताव काय आहे ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, तेथे विक्रीची प्रक्रिया अजून पूर्ण व्हावयाची आहे. प्रथम त्यांनी तो निधी डिपॉझिट करावयाचा आहे नंतर ज्या माणसाने ती जमीन खरेदी केली आहे त्याने आपल्याकडे म्हणजे राज्य सरकारकडे किंवा महापालिकेकडे विकासासाठी अर्ज करावयाचा आहे. तसा अर्ज आल्यानंतरच मग तेथे नियमावलीचा प्रश्न येणार आहे. पण अजून त्यांनी तेथे अर्जच केलेला नाही. तो केल्यानंतर नगरविकासाचे नियम लागू करण्याचा प्रश्न येणार आहे.

*****

........ जी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शेतज-यांना 7 वर्षापासून जमिनीचा मोबदला न मिळणे**

**(3) * 6227 श्री. व्ही.यू. डायजव्हाजे, प्रा. बी.टी. देशमुज, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. जी. एल. औरापूरे, श्री. वसंतराव जोटरे** : स-मा-न-नीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) निम्न वर्धा प्रज-ल्पाअंतर्जत जमि-ीी अधिग्रहीत जरज्यात आलेल्या ध-गोडी (बु.), पिंपरी, मुबारजपूर, भादोड (ता.आर्वी, जि.वर्धा) आदी जावातील शेतज-यां-ाा जमि-ीचा मोबदला माजील 7 वर्षापासू-ा मिळाला -ााही हे जरे आहे जाय,
(2) असल्यास, प्रज-ल्प परिसरातील प्रज-ल्प बाधित शेतज-यां-ाा सेक्श-ा 4(1) ची -ोटीस स-ा 1996 व सेक्श-ा 9(1) ची -ोटीस स-ा 1998 ला देज्यात आली हेही जरे आहे जाय,
(3) असल्यास, याबाबत शास-ाा-ो जाय जारवाई जेली आहे,
(4) अद्याप जारवाई जेलेली -ासल्यास, होजाऱ्या विलंबाची जारजे जाय आहेत ?

**श्री.अजित पवार** : (1) -ााही.
(2) -ााही, प्रज-ल्प परिसरातील प्रज-ल्प बाधित शेतज-यां-ाा सेक्श-ा-4(1) ची -ोटीस स-ा 1998 व 2000 मध्ये देज्यात आली आहे. तसेच सेक्श-ा 9(1) ची -ोटीस ही स-ा 2000 व 2001 मध्ये देज्यात आली आहे.
(3) मौजे पिंपरी, मुबारजपूर व भादोड येथील संपादित जमि-ीचा मोबदला देज्यात आला असू-ा मौजे ध-गोडी (बु) येथील मोबदला देजेबाबत जार्यवाही चालू आहे.
(4) प्रश्-ा उद्भवत -ााही.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, 20-25 वर्षापूर्वी प्रशासकीय मान्यता मिळालेला हा प्रकल्प आहे. 6-7 वर्षांपासून येथील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनींचा मोबदला मिळालेला नव्हता. आता या ठिकाणी उत्तरात म्हटलेले आहे की, पिंपरी, मुबारकपूर येथील संपादित जमिनींचा मोबदला दिलेला आहे, पण तो सगळ्या लाभार्थींना दिलेला आहे काय ? आणि धनोडीच्या बाबतीत मोबदला देण्याची कार्यवाही सुरू आहे असे म्हटले आहे तर ही कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करणार काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, धनोडी बाबतीतील कार्यवाही एक महिन्यात पूर्ण केली जाईल. बाकी पिंपरी, मुबारकपूर या गावातील ज्यांची जमीन संपादित केलेली आहे त्या सर्वांना मोबदला देण्यात आलेला आहे. त्यांना 18 एप्रिल, 2005 आणि 9 मे 2005 या काळात म्हणजे एप्रिल ते जून 2005 पर्यंत म्हणजेच हे आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर जवळपास 38 कोटी 32 लाख रुपये शेतकऱ्यांना मोबदला दिलेला आहे.

...... जी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6227 ...

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : त्याचे पुनर्वसन पूर्ण झालेले आहे काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, यासाठी निधीची उपलब्धता झालेली असल्यामुळे हे सर्व काम व्यवस्थितपणे झालेले आहे. केवळ एकाच गावातील लोकांना मोबदला देण्याचे राहिले आहे तेही काम एक महिन्यात पूर्ण केले जाईल, त्यात काही अडचण राहिलेली नाही.

****

...... जी 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भिवंडी तालुक्यात राह□ाळ हलवेपाडा येथील आदिवासी दलित, भटजे विमुक्त यांच्या पु□र्वस□ासाठी श्रमजीवी संघट□ि□ जेलेले मोर्चाचे आयोज□**

**(4) * 8790 श्री. राम□ाथ मोते, डॉ. अशोज मोडज** : स-मा-ा-नीय पु-ार्वस-ा व मदत □ार्य मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) भिवंडी तालुक्यातील राह-ााळ हलवेपाडा येथील आदिवासी, दलित, भटजे विमुक्त इ. जरीब लोजां-ाा प्रशास-ाा-ो जोजतीही पूर्वसूच-ाा -ा देता तसेच सर्व जायदेशीर जाजदपुरावे असता-ाही त्यांच्या झोपडया तोडल्याच्या -िषेधार्थ श्रमजीवी संघट-ो-ो दि-ाांज 2 जू-ा, 2005 वा त्या सुमारास एजा मोर्चाचे आयोज-ा भिवंडी तहसिल जचेरीवर जेले होते हे जरे आहे जाय,
(2) असल्यास, भिवंडीचे तहसिलदार जोष्टी यां-ाी झोपडपट्टीवासीयांच्या पु-ार्वस-ाासाठी चार दिवसात प्रस्ताव दाजल जरु-ा पु-ार्वस-ा जरज्याचे आश्वास-ा दिले होते हे जरे आहे जाय,
(3) असल्यास, झोपडपट्टीवासीयांच्या पु-ार्वस-ाासंबंधी शास-ाा-ो जोजती जार्यवाही जेली वा जरज्यात येत आहे,
(4) -ासल्यास, विलंबाची जारजे जाय आहेत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे, **डॉ. पतंजराव जदम यांच्याकरिता** : (1) होय.
(2) -ााही.
(3) व (4) प्रश्-ा उद्‌भवत -ााही.

श्री. रामनाथ मोते : ता.प्र.क्र. 8790

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या लेखी उत्तरात मला एक छोटीशी दुरूस्ती करावयाची आहे. येथे पहिल्या प्रश्नाला 'होय' असे उत्तर दिले आहे. त्याच्या पुढे "30 मे 2005 रोजी मोर्चा काढला होता आणि निवेदन दिले आहे." असे वाचावे. याप्रमाणे उत्तर दुरूस्त करून छापल्याप्रमाणे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, वास्तविक पाहता पावसाळा तोंडावर असताना ही झोपडपट्टी पाडली गेली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे तेथै राहणाऱ्या रहिवाशांकडे रेशनकार्ड आहेत, त्यांची नावे मतदार यादीमध्ये देखील आहेत. तसेच त्यांना रितसर इतर सोयी-सुविधा देखील नगरपालिकेकडून मिळत आहेत. अशा वेळी त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता, त्यांच्या झोपड्या पाडून त्यांना बेघर करणे हे माणुसकीला धरून आहे काय ? दुसरे असे की, आमच्या माहिती प्रमाणे तेथील मामलेदारांनी लोकांचा क्रोध पाहून सांगितले होते की, 4 दिवसात त्यांचे पुनर्वसन करू म्हणून. परंतु येथे आपण 'नाही' असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा नेमकी वस्तुस्थिती काय आहे?

...... जी 5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8790 ...

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, हा जो राहनाळ गावाचा प्रश्न आहे त्याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, वस्तुत: ही जी जागा आहे सर्व्हे नं.131 आणि 135, ती रेल्वेची जागा आहे आणि रेल्वेच्या जागेवर ही झोपडपट्टी होती. तेथील रहिवाशांकडे रेशनकार्ड होते तसेच तेथे इतरही नागरी सोयी-सुविधा दिल्या गेल्या होत्या हे खरे असले तरी मूळात ही रेल्वेची जागा असल्याने महाराष्ट्र शासनाने त्यामध्ये कोणताही हस्तक्षेप केलेला नाही. रेल्वे प्रशासनानेच त्यांना नोटीसा देऊन तेथून हटविण्याची कार्यवाही केलेली असल्याने महाराष्ट्र शासनाचा त्यात काही संबंध येत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी ज्या 350 लोकांची झोपडपट्टी पाडली आहे ते सारे लोक आदिवासी आहेत, दलित आहेत आणि अशा आदिवासी, दलित गरीब लोकांच्या झोपड्या पाडण्यात आलेल्या आहेत. पण त्यांच्याच बाजूला काही व्यापाऱ्यांची गोदामे आहेत तेही अनधिकृत होती, तर ती का पाडण्यात आली नाहीत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ती झोपडपट्टी अनधिकृत होती आणि ती रेल्वेच्या जागेवर होती म्हणून रेल्वे प्रशासनाने ती हटविण्याची कारवाई केलेली आहे. आता जो गोदामांचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे त्या गोदामांची माहिती माझ्याकडे नाही की, .....

( यानंतर श्री.जागडे .... एच 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ KGS/ MAP/ 13:35

8790....

डॉ. राजेंद्र शिंगणे....

ती अधिकृत जागेवर होती की अनधिकृत जागेवर होती, हे सुध्दा तपासले जाईल. आपण रेल्वे प्रशासनाला ऑर्डर करु शकत नाही. ही रेल्वे प्रशासनाची जागा असल्यामुळे रेल्वे प्रशासनाला आपण विनंती करु शकतो. या लोकांना त्याच ठिकाणी राहू द्यावे, अशी विनंती राज्य सरकारच्या वतीने रेल्वे प्रशासनाला करण्यात येईल.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, ही जागा रेल्वे प्रशासनाची असली तरी ही जागा महाराष्ट्रात आहे. त्या जागेचा विकास करण्यासाठी किंवा रुंदीकरण करावयाचे असेल तरी त्या ठिकाणच्या झोपडपट्टीवासियांना पर्यायी जागा दिल्याशिवाय त्यांचे कायम स्वरुपाच स्ट्रक्चर आपणाला हलविता येणार नाही, तोडता येणार नाही. महाराष्ट्र शासनाचे हे धोरण आहे. या कायदेशीर झोपड्या असल्यामुळे त्या बाबत रेल्वे प्रशासनाला विनंती करण्याचा प्रश्नच येत नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी हे मान्य केले आहे की, या बाबतची सर्व कागदपत्रे झोपडपट्टीवासियांकडे आहेत. त्यामुळे या लोकांना पर्यायी जागा द्यावी लागेल. 26 मे ला या झोपड्या तोडल्यामुळे 26 मे पासून येथील सर्व लोक रस्त्यावर आले आहेत. म्हणून माननीय मंत्रिमहोदय या बाबत माननीय मुख्यमंत्र्याबरोबर चर्चा करुन या बाबत काही ठोस उपाययोजना करतील काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करण्यात येईल. या झोपडपट्टीवासियांना वेगळी जागा देता येऊ शकते काय, याचा माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करुन निश्चित विचार करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ही रेल्वेची जागा असल्यामुळे त्या ठिकाणी आदिवासी, दलित, विमुक्त आणि भटक्या जमातीतील लोक राहत आहेत. त्यांच्या झोपड्या तोडल्यामुळे ते विस्थापित झाले आहेत. केंद सरकारच्या यूपीए सरकारने समान कार्यक्रम आखलेला आहे. त्याचा विचार करता या झोपड्या तोडता येणार नाहीत. या लोकांना उध्वस्त करता येणार नाही. या गोरगरीब माणसाना या ठिकाणाहून हटविण्याची कृती यूपीए सरकारच्या समान कार्यक्रमाच्या विरोधात आहे. यूपीए सरकारच्या या समान कार्यक्रमाचा फायदा घेऊन या झ ोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन शासन ताबडतोबीने करील काय ?

..2..

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी या बाबत अगोदरच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे. आता या झोपडपट्टीवासियांना पर्यायी जागा देण्याबाबतचा विचार करण्यात येईल. परंतु या बाबत या बाबत मला ठोस आश्वासन देता येणार नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या भूमिकेत आणि महाराष्ट्र शासनाच्या भूमिकेत विरोधाभास आहे. मुंबईतील एअरपोर्ट ॲथोरिटीच्या हद्दीत ज्या झोपड्या आहेत, त्या हटविण्याच्या बाबत आणि चांगलें विमानतळ करण्याबाबतची एअरपोर्ट ॲथोरिटीची इच्छा असली तरी तेथील झोपड्या हटविल्या जात नाहीत. आता या ठिकाणी झोपडपट्टीत राहणारे लोक फक्त गरीब काय ? आणि या ठिकाणी ज्यांच्या झोपड्या आपण हटविल्या आहेत, त्या झोपडपट्टीत राहणारे लोक गरीब नाहीत काय ? भिवंडी येथे राहणारे लोक गरीब नाहीत काय ? या ठिकाणी सरकार वेगळी भूमिका का घेत आहे? महाराश्ट्र शासनाने 10 ते 15 वर्षापूर्वी एक जी. आर काढला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने असे प्रत्येक वेळी जाहीर केले आहे की, पावसाळ्यापूवी कोणत्याही झोपड्या पाडण्यात येणार नाहीत. तेव्हा या जी. आर. ची माहिती रेल्वे प्रशासनाला झोपड्या पाडत असताना नव्हती काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या झोपड्या 26 मे रोजी पाडण्यात आल्या आहेत. त्यानंतर पावसाळ सुरु झाला आहे. पावसाळ्यात या झोपड्या पाडल्या हे खरे नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा या ठिकाणी वेगळाच प्रश्न आहे. या झ ोपड्या रेल्वेच्या जागेवर केव्हापासून होत्या. या झोपडपट्टीधारकांना आपण मतदान कार्ड दिले आहे, रेशनकार्ड दिले आहे. या बाबतचे सर्वेक्षण रेल्वेने केल्यानंतर या झोपड्या रेल्वे प्रशासन पाडणार आहे, अशा प्रकारची सूचना महाराष्ट्र सरकारला देण्यात आली होती काय ?

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 8790....

श्री. मधुकर सरपोतदार....

दुसरा प्रश्न असा की, पावसाळा मे अखेर येतो तेव्हा माणुसकीच्या नात्याने या झोपडया निष्कासित करु नये असा जी.आर. काढला आहे. त्याची अंमलबजावणी करावयाची या सरकारला जाणीव होती. ती जाणीव आपण रेल्वे खात्याला दिली होती काय? या संबंधात आपण त्यांच्याबरोबर चर्चा केली आहे काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, त्या ठिकाणी गेल्या 20 वर्षापासून झोपडया आहेत.आणि माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना सर्वप्रकारच्या सुविधा देण्याचे ठरविले आहे. 1 ते 9 हेक्टर इतक्या जागेच्या परिसरामध्ये या सर्व झोपडपट्टया होत्या. पावसाळयापूर्वी 26 मे ला रेल्वे प्रशासनाने या सर्व झोपडया पाडल्या. रेल्वेच्या जागेमध्ये या झोपडया असल्यामुळे आम्ही त्या पाडणार आहोत असे महाराष्ट्र शासनाला रेल्वे प्रशासनाने कळविले नव्हते. मघाशी सांगितल्याप्रमाणे हे झोपडपट्टीवासीय आज पावसाळयामध्ये उघडयावर जरी असले तरी ते तात्पुरत्या शेड उभारुन त्यामध्ये रहात आहेत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाची त्या परिसरात जागा असल्यास त्या जागेवर त्यांचे पुर्नवसन करण्याबाबत विचार केला जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तापी खोऱ्याच्या पाणी वाटपाच्या बृहत आराखडयानुसार विदर्भाला पाणी उपलब्ध न होणे**

**(5) * 5686 श्री. रमेश गजबे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. ऐनापूरे** : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तापी खोऱ्यातील जललेख्याच्या अंतिम प्रारुपास शासनस्तरावर मान्यता देण्यापूर्वी विदर्भातील लोकप्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(2) खरे असल्यास या बैठकीमध्ये कोणते निर्णय घेण्यात आले,

(3) बैठक झालेली नसल्यास याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार** : (1) नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर "नाही" आणि इतर प्रश्नांना "प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर दिले आहे.माझा प्रश्न एवढाच आहे की, अशाप्रकारची बैठक आयोजित करण्याची शासनाला आवश्यकता आहे कां? माननीय जलसंपदा मंत्र्यांना विदर्भ आणि अकोल्याच्या पाणी पुरवठयाच्या प्रश्नाची चांगली जाण आहे. त्यांनी त्याठिकाणी चांगली उपाय योजना केली आहे.म्हणून त्या भागाला पाणी मिळण्याच्या दृष्टीने हा महत्वाचा प्रश्न आहे. त्या दृष्टीने या पुढील बैठक केव्हा आयोजित केली जाईल? एक महिन्याच्या आत ती आयोजित केली जाईल काय ?

श्री. अजित पवार : दीड महिन्याच्या आत बैठक घेतली जाईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, तापी खोऱ्यातील पाणी मराठवाडयाला देण्याचे निश्चित झाले आहे काय? असल्यास, ते किती टी.एम.सी. आहे? तसेच, त्या प्रकल्पाच्या मंजुरीची सद्यस्थिती काय आहे?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मराठवाडयासाठी पाणी वाटप करीत असतांना पूर्ण झालेले प्रकल्प, बांधकामाधीन प्रकल्प आणि प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेले प्रकल्प डोळयासमोर ठेऊन तशापध्दतीने पाणी वाटप करावयाचे त्यावेळी ठरविले. व त्याप्रमाणे मराठवाडयाला 2.06 टी.एम.सी. पाणी उपलब्ध केले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड शहरातील माजल □ावाहू□पा□ी पुरवठा □र□ाऱ्या**

**बॅ□ वॉटर योज□तील पाईप लाई□चे □ाम □ि□ृष्ट असल्याबाबत**

**(6) * 8297 श्री. वसंतराव □ाळे** : स□मा□ी□य पाजीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) बीड शहरातील माजल जावाहू□पाजी पुरवठा जरजाऱ्या बॅज वॉटर योज□तील पाईप लाई□च्या जोटींजचे जाम □ि□ृष्ट दर्जाचे जरु□जोटयावधी रुपये उज्ळज्याचे जाम चालू आहे असे शास□चे □िदर्श□ास आले वा आजज्यात आले हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, याबाबत संबंधित विभाजा□चौजशी जेली आहे जाय,

(3) असल्यास, चौजशीचे □िष्जर्ष जाय आहेत व त्या□ुसार पुढे जोजती जार्यवाही जरज्यात आली आहे वा जरज्यात येजार आहे ?

**श्री. अजित पवार** : (1) □ाही.

(2) प्रश्□उद्‌भवत □ाही.

(3) प्रश्□उद्‌भवत □ाही.

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, माजलगाव धरणातून बीड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी जी योजना केली आहे त्यासाठी ज्यावेळी पाईपलाईन टाकली गेली त्यावेळी कोणतेही कोटींग करण्यात आले नव्हते. ही तातडीची पाणी पुरवठा योजना होती व ती सुरु झाल्यानंतर पाईपलाईनच्या आतील भागाला आणि बाहय भागाला कोटींग करण्यासाठी टेंडर काढले गेले व त्याचे काम केले गेले. ते करीत असतांना पाईपलाईनच्या आतील कोटींग हे सल्फर रेझिस्टन्स सिमेंट आणि वाळूंचे प्रमाण समान असले पाहिजे. आणि ती वाळू 16 नंबरच्या चाळणीतून चाळलेली असली पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8297. . . .

श्री.वसंतराव काळे . . . .

अशा प्रकारचे निकष असताना, यामध्येच घोटाळा झाला आहे. वाळूच्या प्रमाणाबाबत सांगावयाचे तर ज्या दर्जाची वाळू पाहिजे, त्या दर्जाची वाळू वापरली गेली नाही आणि सल्फररेजीटन्सचे प्रमाण आणि वाळूचे प्रमाणात सिमेंट कमी वापरले गेले. अशी तक्रार असताना त्याची चौकशी झाली आहे का ? यासंबंधी उत्तरात "नाही" असे म्हटलेले आहे. कदाचित त्या पातळीवर गुणचाचणी झाली असेल. तरी देखील तक्रारीची दखल घेऊन गुणचाचणी झाली आहे का ? ती चाचणी कोणी केली आणि त्याचे निष्कर्ष काय आहेत ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव काळे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, आजपर्यंत आमच्या विभागाकडे कसल्याही प्रकारची तक्रार आलेली नाही. तेथील लोकल पेपरमध्ये बातमी आली की, "बॅकवॉटर कोटींगमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार." पेपरमध्ये ही बातमी आल्यानंतर तेथील जिल्हाधिका-यांनी जाऊन संपूर्ण पाहणी केली. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, सिमेंटच्या आस्तरीकरणाच्या कामाची जी स्पेसीफीकेशन्स् आहेत, त्यापध्दतीने काम झाले आहे की नाही ? म्हणून याची पाहणी केली. त्यात काही शर्ती आणि कामाचा दर्जा पाहण्यासाठी ज्या आवश्यक चाचण्या आहेत, उदाहरणार्थ सी.ओ.ॲनलेसिस, सिमेंट टेस्ट, जॉर्ज टेस्ट, मॉरटर टयुब टेस्ट, स्लम टेस्ट इ.सर्व चाचण्या घेण्यात आल्या आणि या चाचण्यांचे निष्कर्ष भारतीय मापदंडाप्रमाणेच आलेले आहेत. हे सर्व केल्या नंतर जिल्हाधिकारी, बीड यांनी प्रत्यक्ष सिमेंटच्या आस्तरीकरणाच्या कामाची पाहणी केली आहे. त्यावेळी त्यांच्याबरोबर नगर परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर कार्यकारी सदस्य गेले होते. हे सर्व काम पाहिल्यानंतर काही चुकीचे झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. उलट काम चांगल्या पध्दतीनेच झाले आहे असे लक्षात आले आहे आणि अद्यापपर्यंत म्हणजे आज सकाळपर्यंत तरी कोणत्याही प्रकारची तक्रार आमच्याकडे आलेली नाही. तरी स्थानिक पेपरमध्ये बातमी आल्यानंतर ही सर्व पाहणी करण्याचे काम विभागाने केलेले आहे.

श्री.वसंतराव काळे : सभापती महोदय, या पाईप लाईनचा व्यास आणि लांबी किती आहे ? टेस्ट पध्दती . . . .

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांच्या सहाही प्रश्नाचे उत्तर

. . . .जे-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8297. . . .

सभापती . . . .

दिलेले आहे. खरे म्हणजे मी माननीय मंत्री महोदयांना सांगणार होतो की, त्यांनी पहिल्या दोन प्रश्नांचीच उत्तरे द्यावीत. सन्माननीय सदस्यांनी एकावेळी सहा प्रश्न विचारले. अशा वेळी दुसरे सन्माननीय सदस्य नऊ प्रश्न देखील विचारण्यास कमी करणार नाहीत.

श्री.वसंतराव काळे : सभापती महोदय, मुख्य मुद्दा असा आहे की . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

-----

. . . .जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साजर ि□र्यात घोटाळ्यातील तपास अधिज ाऱ्यां□ा ि□लंबित ज रण्याचे आदेश ज ाढल्याबाबत

(7) * 5740 श्री. पांडुरंज फुंडज र , श्री. ि□ती□ जडज री , श्री. जजदिश जुप्ता , श्री. वि□ोद तावडे : स□मा□ीय सहज ार मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) ती□ वर्षापूर्वी राज्यभर जाजलेल्या साजर ि□र्यात घोटाळा प्रज रजी जंजापूर सहज ारी साजर ज ारजा□याi□ ज ेलेल्या ि□र्यात घोटाळ्यातील तपास अधिज ारी आजि तेरजा सहज ारी साजर ज ारजा□याच्या घोटाळ्यातील तपास अधिज ारी यां□ी तपासात उजीवा ठेवल्यामुळे त्यां□ा ि□लंबित ज रण्याचे आदेश पोलिस महासंचालज ां□ी दि□ांज 16 मे, 2005 रोजी दिले हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, या दो□ अधिज ाऱ्यां□ी तपासात ज ोजत्या उजीवा ठेवल्या आहेत,

(3) साजर ि□र्यात घोटाळ्यातील ज ोजज ोजत्या साजर ज ारजा□यांची चौज शी आतापर्यंत पूर्ज झाली आहे, त्यात ज ोजज ोजत्या व्यक्तीं□ा दोषी ठरविज्यात आले आहे व त्यां□ी ज ेलेला जैरव्यवहार जि ती रज मेचा आहे,

(4) अद्याप ज ोजज ोजत्या साजर ज ारजा□यांची चौज शी अपूर्जावस्थेत आहे व ती जि ती ज ालावधीत पूर्ज ज रज्यात येजार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर, डॉ. पतंजराव ज दम यांच्याकरिता : (1) □ाही.

(2) सदर जु□्ह्याच्या तपासात उजीवा राहिलेल्या □ाहीत.

(3) साजर ि□र्यात घोटाळ्यातील एज ू ज 18 सहज ारी साजर ज ारजा□यांवर महाराष्ट्र सहज ारी संस्था अधि□ियम 1960 चे ज लम 83 व 88 अ□्वये ज ारवाई ज रज्यात आल्या होत्या. त्यापैज ी □्यायालयी□ आदेशाप्रमाजे 5 सहज ारी साजर ज ारजा□यांचे चौज शी अहवाल □्यायालयात सादर ज ेलेले आहेत. त्यावर अद्याप अंतिम ि□र्जय प्राप्त झाले □ाहीत. तेरजा सहज ारी साजर ज ारजा□याच्या चौज शी अहवालास □्यायालयाची स्थजिती आहे. वसंतदादा सहज ारी साजर ज ारजा□ा, सांजली ज ारजा□याच्या चौज शी अहवालावर मा. मुज्यमंत्री/मंत्री (सहज ार) यांचेज डे अपिल प्रज्रिया सुरु आहे. 5 सहज ारी साजर ज ारजा□यांची चौज शी पूर्ज झाली असू□ पैज ी 4 सहज ारी साजर ज ारजा□यांचे बाबतीत ि□र्यातदारां□ा जबाबदार धरजेत आल्या□ त्यां□ी ज ारजा□यां□ा झालेल्या □ुज सा□ीची रज्ज म रु. 79,65,494/- ज ारजा□याज डे भरजा ज ेलेला आहे. ज ृष्जा सहज ारी साजर ज ारजा□याचे बाबत झ ाालेल्या □ुज सा□ीची रज्ज म 3 ि□र्यातदारांज डू□ रु. 90,91,154/- इतज ी रज्ज म वसुल ज रज्याचे आदेश ि□र्जमित ज रज्यात आले आहेत. ि□फाड सहज ारी साजर ज ारजा□याचे बाबत ज ारजा□याचे रु. 1,33,64,215/- इतक्या रज मेचे □ुज सा□ झाले असू□ त्यासाठी ज ारजा□याचे ज ार्यज ारी संचालज व तत्ज ाली□ संचालज मंडळातील चेअरम□ व इतर 10 संचालज असे एज ू ज 12 सदस्यां□ा जबाबदार धरजेत आले आहे. जि स□वीर सहज ारी साजर ज ारजा□याचा अहवाल मा. मुज्यमंत्री यां□ी जारीज ज ेला आहे. संत तुज ाराम सहज ारी साजर ज ारजा□याचे प्रफ ऑफ एक्सपोर्ट मा□्य ज रजेत आले आहे.

(4) अद्यापी वसंतदादा -□ाशिज , जंजापूर -औरंजाबाद, जयभवा□ी -बीड व संत दामाजी - सोलापूर या 4 साजर ज ारजा□यांची चौज शी अपूर्ज अवस्थेत आहे व ती लवज रात लवज र पूर्ज ज रु□ घेज्यात येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . .जे-4

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तीन वर्षापूर्वी राज्यात झालेल्या घोटाळयांमध्ये सर्वात मोठा घोटाळा साखर उद्योगात झाला. एकूण 18 सहकारी साखर कारखान्यां मध्ये हा घोटाळा झाल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये पहिला प्रश्न विचारला होता की, साधारण पणे दोन महिन्यापूर्वी एक बातमी आली होती की, साखर कारखान्यांची चौकशी करणा-या गुन्हा अन्वेषण विभागाच्या दोन तपास अधिका-यांना, त्यांनी चौकशी बरोबर केली नाही म्हणून निलंबित करण्यात आले असे पोलीस महासंचालकांचे निवेदन आहे. पण याठिकाणी उत्तरामध्ये "नाही" असे म्हटले आहे. याबाबतीत काय खरे आहे ? हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, 18 साखर कारखाने असून त्यापैकी 5 साखर कारखान्यांची चौकशी पूर्ण झाली आहे असे उत्तरात सांगितले आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5740 (पुढे सुरु...

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे चालू....

त्यापैकी चार साखर कारखान्यांच्याबाबतीत संचालक मंडळाला जबाबदार धरले नाही तर निर्यातदाराला जबाबदार धरले. या निर्यातदारांकडून वसुली करण्याबाबतचे आदेश दिले. एका सहकारी साखर कारखान्याच्याबाबतीत संचालक मंडळाला जबाबदार धरले. निफाड सहकारी साखर कारखान्याच्याबाबतीत कारखान्याचे रु.1,33,64,215 इतक्या रकमेच्या नुकसानीबाबत कार्यकारी संचालक व तत्कालिन संचालक मंडळातील चेअरमन व इतर 10 संचालक अशा एकूण 12 सदस्यांना जबाबदार धरुन त्यांच्याकडून रक्कम वसूल करण्याबाबत आदेश झाले. उर्वरित चार कारखान्याच्या बाबतीत संचालक मंडळाला जबाबदार धरण्यात आले नाही तर निर्यातदाराला जबाबदार धरलेले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की,या प्रकरणी संचालक मंडळाला जबाबदार का धरण्यात आले नाही, निर्यातदारांना जबाबदार का धरण्यात आले ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, प्रश्नाच्या चौथ्या भागाच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे की, "अद्यापी वसंतदादा सहकारी साखर कारखाना, नाशिक, गंगापूर सहकारी साखरकारखाना, औरंगाबाद, जयभवानी सहकारी साखर कारखाना, बीड व संत दामाजी सहकारी साखर कारखाना, सोलापूर या 4 साखर कारखान्यांची चौकशी अपूर्ण अवस्थेत आहे व ती लवकरात लवकर पूर्ण करुन घेण्यात येईल." ही चौकशी आपण केव्हा सुरु केली आणि ती कधीपर्यन्त पूर्ण होणार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, 3 महिन्यापूर्वी पोलीस महासंचालक यांनी निवेदन केले, त्याचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. 2 अधिकारी या प्रकरणी निलंबित झालले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : यामध्ये पोलीस अधिकारी निलंबित झालेले आहेत काय,असे विचारले होते.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : त्याला मी उत्तर दिलेले आहे. आपण 16 मे 2005 रोजी निलंबित झाले आहेत काय, असे विचारले. त्यांची तारीख वेगळी आहे, कारण वेगळे आहे. माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : तारीख कदाचित चुकली असेल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आपण मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे. मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर आपल्याला काही शंका असेल तर प्रश्न विचारण्यासाठी पुन्हा परवानगी देईन.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : गंगापूर पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी श्री. ओ.डी.माने यांना आरोपीकडून लाच घेताना पकडल्यामुळे ते निलंबित झालेले आहेत. दुसरे पोलीस उप निरीक्षक यांना ॲड. गायको यांच्याशी बेदरकार, बेजबाबदार वर्तन केल्याबाबत, गैरवर्तणुकीबद्दल निलंबित केलेले आहे. श्री. अंधुरकर म्हणून आहेत, त्यांनी औरंगाबाद येथील न्यायालयामध्ये रिट पि.2699/2004 बाबत पोलीस उप निरीक्षक यांच्या दबावामुळे आरोप केले, असे प्रतिज्ञापत्र केल्याने, वरिष्ठांचे आदेश झुगारुन आरोपीला मदत होईल असे वर्तन केल्याने त्यांना 9-05-2005 रोजी निलंबित केलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न विचारला की,चार साखर कारखान्यांच्या निर्यातदारांना जबाबदार धरले, एका कारखान्याच्या संचालक, चेअरमन आणि एम.डी.ना जबाबदार धरलेले आहे. प्रत्येक साखर कारखान्याची चौकशी झाल्यानंतर त्या चौकशीमध्ये जे जे दोषी होते, त्यांना जबाबदार धरण्यात आलेले आहे. चार साखरकारखान्यांची चौकशी करण्यात आली. त्यामध्ये संचालक मंडळ कोठेही दोषी आढळून आले नाही, म्हणून निर्यातदारांना जबाबदार धरुन त्यांच्याकडून वसुलीची कारवाई सुरु केलेली आहे. पाचव्या साखर कारखान्याच्याबाबतीत संचालक मंडळ दोषी असल्याचे आढळून आले. हे करत असतांना मला सभागृहाला विनंती करावयाची आहे की, निर्यातदारांच्या संबंधात प्रोसिजर आहे. महाराष्ट्रामधील साखर कारखान्याच्या उद्योगामध्ये काम करणारी मंडळी आहेत, त्यांची बदनामी करण्यात येत आहे. एक्स्पोर्टचे प्रोसिजर आपण समजून घेत नाही, तोपर्यन्त अशीच चर्चा चालू राहील. जी अतिरिक्त साखर होती, तिचा दर 10 रुपयापर्यन्त खाली आलेला होता.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. संपूर्ण साखर उद्योग बदनाम करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे मंत्री महोदय सांगतात. परंतु मी 3 वर्षामध्ये साखर उद्योगातील घोटाळे निदर्शनास आणून दिलेले आहेत, त्याबद्दल मला गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने रिवॉर्ड दिलेला आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5740...

श्री. कन्हैयालाल गिडवाणी..

यामध्ये बदनामी करण्याचा प्रश्न कुठे आहे? यामध्ये बदनामी करण्याचा प्रयत्न आहे, असे जे मंत्री महोदय म्हणत आहेत ते साफ चुकीचे आहे, असे माझे म्हणणे आहे.

**सभापती** :बदनामी म्हणण्याऐवजी गैरसमज होण्याची प्रक्रिया आहे असे म्हणावे.

श्री. जयप्रकाश दाडेंगावकर : सभापती महोदय, पार्लमेंटरी, जो योग्य शब्द असेल, तो शब्द वापरण्यात यावा. माझ्या म्हणण्याचा उद्देश एवढाच आहे की, ही महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील चळवळ आहे. ग्रामीण लोकांच्या माध्यमातून चालविणारी ही चळवळ आहे. मधल्याकाळात साखरेचे कमी झालेले भाव, साखर साठवणूकीच्या अडचणी, यामुळे अनेक साखर कारखान्यांनी गोदामाच्या बाहेर साखर ठेवली होती. त्यामुळे शासनाने एक्सपोर्टसाठी रीलिजची अट शिथिल केली. 50 हजार पोती, 1 लाख पोती साखर बाहेर पाठविली तर त्याला काही मर्यादा नाही.त्याप्रमाणे आपण साखर बाहेर पाठवू शकता. देशातंर्गत विक्रीसाठी रीलिजची अट होती.शेतक-यांची ही कारखानदारी असल्यामुळे व शेतक-यांच्या पध्दती प्रमाणे मला काहीही भाव मिळो, माझे काहीही होवो, एकदाची साखर पाठवून स्वस्थ व्हायचे, यादृष्टीने विचार करुन, भाव कमी असतांना सुध्दा साखर कारखान्यांनी एक्सपोर्टचे धोरण स्वीकारले. देशातंर्गत मार्केट जास्त होते.साधारणत: 1300 च्या जवळपास साखरेचा भाव होता. तरी सुध्दा 1100 आणि काही साखर कारखान्यांनी 1050 रुपयांनी साखर एक्सपोर्ट करण्याची तयारी दर्शविली. एक्सपोर्टची पध्दती अशी आहे की, साखर कारखाना एक्सपोर्टसाठी जाहीरात देतो. जे पात्र मर्चंट एक्सपोर्टर आहेत आणि केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे ज्यांचे लायसन्स आहे, अशा लोकांसाठी एक्सपोर्टसाठी जाहिरात दिली जाते.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी सविस्तर उत्तर देत आहेत.

**सभापती** : तुम्ही 8 मिनिटे प्रश्न विचारतां. त्यावेळी तुमच्या प्रश्नाला सविस्तर उत्तर देण्यासाठी मंत्रिमहोदयाना लागेल तेवढा वेळ घेऊ द्यावा.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर :वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली जाते. त्यानंतर जे दर पत्रक येतील त्यातील हायेस्ट दरपत्रकाला 50 हजार पोती, 1 लाख पोती, त्या त्या कारखान्याप्रमाणे





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲलॉटमेंट दिली जाते. कारखाना या ॲलॉटमेंटचे संमतीपत्र देतो. काही केसेसमध्ये कारखाना केंद्र सरकारला संमतीपत्रक पाठवतो, काही केसेसमध्ये कारखाना स्वत: ॲप्रोच होतो. काही केसेसमध्ये मर्चंट एक्सपोर्टर हे पत्र घेऊन केंद्र सरकारकडे जातात. त्यानंतर केंद्र सरकार R.O. ऑर्डर देते. R.O.means the Release Order. जी काही क्वान्टीटी असेल ती एवढी, एवढी कॉन्टीटी या साखर कारखान्याने या मर्चंट एक्सपोर्टरला एक्सपोर्ट हेतू सुपुर्द करावी. त्याप्रमाणे कारखाने पैसे स्वीकारतो आणि मर्चंट एक्सपोर्टरला साखर देतो. इथपर्यंतची जबाबदारी कारखान्याची आहे. एकदा एक्सपोर्टरला साखर दिल्या नंतर तेथून पुढचा पार्ट हा एक्सपोर्टरचा येतो. एक्सपोर्टरने सहा महिन्याच्या आत ती साखर एक्सपोर्ट करुन प्रुफ ऑफ एक्सपोर्ट कारखान्याला आणि केंद्र सरकारला द्यायला पाहिजे. या सगळया केसेसमध्ये साखर कारखान्याची ही पहिली एक्सपोर्टची वेळ असल्यामुळे अनेक कारखान्यांनी जाहिराती दिल्या. त्याप्रमाणे वेगवेगळया निविदा-दारांकडून निविदा आल्या. केंद्र सरकारने परवानगी दिली. त्यानंतर पुढे हया वेगवेगळया चर्चा झाल्या. वेगवेगळया चौकशा झाल्या.अनेक न्यायालयीन मॅटरर्स झालेले आहेत. त्यामुळे काही कारखान्यांमध्ये मर्चंट एक्सपोर्टरवर दोष दाखल झालेले आहेत. काही कारखान्यामध्ये कारखान्याच्या संचालक मंडळावर दोष दाखल झालेले आहेत.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी :केंद्र शासनाने परवानगी दिलेली आहे. निर्यातीची साखर देतांना इसेन्शिएल कमॉडिटी ॲक्टच्याप्रमाणे दिली जाते. पण त्याचे व्हायोलेशन झाल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी खटले दाखल करा, असे वारंवार निर्देश दिलेले आहेत. मग त्यामध्ये व्यापारी असोत किंवा कारखानदार असोत.तर याप्रमाणे किती निर्यातदार आणि कारखानदारांवर फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : एकंदर 18 कारखाने होते. 18 कारखान्यामध्ये....

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, प्रश्न राखून ठेवा.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : मी उत्तर देत आहे.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर.....

यामध्ये 18 साखर कारखाने होते त्यापैकी 5 साखर कारखान्यांच्या चौकशीचे अहवाल न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत. ज्ञानेश्वर, हुतात्मा, जयवंत....

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत किती साखर कारखान्यांविरुध्द फौजदारी खटला दाखल केला आहे असा मी प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर न देता मंत्रिमहोदय वेगळेच उत्तर देत आहेत.

(विरोधी पक्षातील अनेक मा.सदस्य उभे राहून बोलत असतात.)

**सभापती** : मंत्रिमहोदय, या साखर कारखान्यांची यादी मोठी असेल तर आपण ती पटलावर ठेवू शकता.

(विरोधी पक्षातील अनेक मा.सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, ही यादी मोठी असल्यामुळे मी ती पटलावर ठेवीन.

**सभापती** : मी सांगितल्याप्रमाणे मंत्रिमहोदय यादी पटलावर ठेवतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

**सभापती** : सॉरी. प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

( विरोधी पक्षातील काही मा.सदस्य बहिर्गमन करतात.)

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री.जी.एल.ऐनापूरे : सभापती महोदय, राष्ट्रपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे बराच काळ साता-यामध्ये रहात होते. त्यांचे राहते घर राष्ट्रीय स्मारक व्हावे म्हणून तेथील कार्यकत्यांनी बरीच वर्षे आंदोलने केली आहेत परंतु त्याची कोणीही दखल घेतली नाही म्हणून त्यांनी प्राणांतिक उपोषणाचा मार्ग पत्करला आहे. उपोषणाला बरेच दिवस होऊनही शासनाने त्यांची चौकशी केली नाही. आज उपोषणकर्त्या कार्यकर्त्यांपेकी 3-4 कार्यकर्ते अत्यवस्थ स्थितीत आहेत आणि दोघांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. हया अतिशय गंभीर प्रश्नावर शासनाने अद्याप लक्ष दिलेले नाही म्हणून मी माझ्या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत शासनाने दखल घ्यावी आणि कार्यकर्त्यांना काही आश्वासन द्यावे अशी विनंती करतो.

श्री.अजित पवार : याप्रकरणी शासनामार्फत दखल घेण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मा.सदस्य श्री.ऐनापूरे यांनी एका गंभीर प्रश्नाकडे महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधले आहे. त्याच संदर्भामध्ये मी देखील औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. सातारा याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील सुभेदार रामजीबाबा आंबेडकर रहात होते. डॉ.बाबासाहेबांचे शिक्षण व बालपण तेथे झाले. जी निवासाची वास्तू आहे तिला राष्ट्रीय स्मारक म्हणून महाराष्ट्र सरकार घोषित करील अशाप्रकारचे आश्वासन सरकारच्यावतीने समाजकल्याण विभागाने दिलेले होते. असे असताना इतके दिवस होऊनही देखील साता-याचे डॉ.आंबेडकर यांचे निवासस्थान अधिग्रहित करण्यात आलेले नाही आणि त्याचे राष्ट्रीय स्मारकामध्ये रुपांतर करण्यात आलेले नाही. या मागणीसाठी साता-यातील 11 युवकांनी आमरण उपोषण सुरु केले त्याला आठ दिवस होत आहेत. त्यापैकी 4 उपोषणकर्त्यांची प्रकृती गंभीर झाली असल्यामुळे त्यांना साता-याच्या हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आलेले आहे. सातारा जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये उपोषण करणा-या तरुणांना यापूर्वी देखील महाराष्ट्र शासनाने वारंवार आश्वासने दिलेली होती की साता-याच्या डॉ.आंबेडकरांचे जे निवास्थान आहे ते अधिग्रहित करुन त्याचे राष्ट्रीय स्मारकात रुपांतर करण्यात येईल. त्या आश्वासनाचे पालन करण्यासाठी आणि या तरुणांचे उपोषण सोडविण्यासाठी शासनाने त्वरित पुढाकार घ्यावा यासाठी आपण शासनाला निर्देश द्यावेत.

3.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मा.सदस्य श्री.ऐनापूरे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे हा विषय उपस्थित केला असता त्यांना शासनाने या विषयाची दखल घेतलेली आहे, त्यासंबंधी लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे सांगितलेले आहे.

नंतर श्री.शिगम

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, ज्या ज्या वेळी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विषय निघतो त्या त्या वेळी या स्थानिक स्वराज्य संस्थांना आपण विकेन्द्रीत स्वरुपाची मदत आणि त्यांना निर्णयामध्ये जास्तीत जास्त स्वातंत्र्य देण्याची भूमिका महाराष्ट्र राज्याने स्वीकारलेली आहे. 1994 सालापासून महाराष्ट्र राज्यामध्ये 3 वेळा महिलांविषयक धोरणे झाली आणि त्यानुसार महानगरपालिका आणि नगरपालिका यांच्या अखत्यारिमध्ये महिला व बालकल्याण समित्या स्थापन करण्याचा निर्णय झाला. या महिला व बालकल्याण समित्यांसाठी महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या असणा-या एकूण निधी पैकी किमान 5टक्के निधी मिळावा अशा प्रकारचा निर्णय सरकारने घेतलला आहे. खरे तर महिलांची संख्या आणि त्यांच्या प्रश्नांचे स्वरुप पाहिले तर स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिलेला 5 टक्के निधी हा अत्यंत अपुरा आहे. तरीही अनेक महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या ब-याचशा अडचणी लक्षात घेता महिला व बालकल्याण समित्यांसाठी सक्षम अधिकारी नसतात आणि त्या समित्यांना प्रत्यक्षात 5 टक्के निधी मिळत नाही असे चित्र दिसते. म्हणून सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे अशी मागणी करते की, सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांनी त्यांच्या एकूण बजेटच्या 5 टक्के निधी महिला व बालकल्याण समित्यांसाठी वापरला जातो की नाही हे पहावे. तसेच हा 5 टक्के निधी वापरण्याच्या संदर्भात कन्सल्टेटिव्ह असे मत देणारी बैठक घेऊन, काही मार्गदर्शक सूचना महानगरपालिका आणि नगरपालिकांना द्याव्यात. तसेच जिल्हापरिषदांना देखील महिला व बाल कल्याण समित्यांसाठी निधी अपुरा मिळत असल्याच्या तक्रारी आहेत. तेव्हा याची शासनाने दखल घेऊन या महिला व बाल कल्याण समित्यांचा दर्जा, त्यांना मिळणारा निधी आणि मनुष्यबळ याबाबतीत योग्य ती मार्गदर्शक तत्वे घालून ती अमलात आणावित अशी मी शासनाला विनंती करते.

श्री. राजेश टोपे : याठिकाणी जी चर्चा उपस्थित करण्यात आली त्याची निश्चितपणे नोंद घेऊन उचित कारवाई करण्यात येईल.

--

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी मी लोकप्रतिनिधी म्हणून महत्वाचा औचित्याचा मुद्दा मांडत आहे. सभागृहामध्ये मा.सदस्य वेगवेगळया आयुधांचा उपयोग करुन वेगवेगळे प्रश्न मांडत असतात. काही विशेष उल्लेखांना आपण परवानगी दिल्यानंतर ते विशेष उल्लेख याठिकाणी मांडले जातात. या ठिकाणी मांडलेल्या विशेष उल्लेखांच्या बाबतीत शासनाकडून एक महिन्यामध्ये उत्तर यावयास पाहिजे. परंतु मागच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये जे विशेष उल्लेख या सभागृहामध्ये मांडण्यात आले त्यांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

सभापती महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा असा आहे की, लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना सर्वसामान्य जनतेचे प्रश्न आम्ही लेखी स्वरुपामध्ये संबंधित मंत्र्यांना, सचिवांना किंवा विभागीय क्षेत्रीय अधिका-यांना देत असतो. मी अशी 81 प्रकरणे लेखी स्वरुपामध्ये दिलेली असून त्यासंदर्भात गेल्या 6 महिन्यांमध्ये, मा.मुख्यमंत्र्यांचे पत्र सोडले तर, एकही पत्र आलेले नाही. या संदर्भात सभापती महोदय, आपण आदेश दिलेले असतानाही आम्ही दिलेल्या पत्राची दखल मंत्र्यांकडून आणि अधिका-यांकडून घेतली जात नाही ही गंभीर बाब आहे. तेव्हा या संदर्भात योग्य ते निर्देश द्यावेत अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे आपणास विनंती करीत आहे.

श्री. राजेश टोपे : शासनाच्यावतीने नोंद घेतली जाईल.

**सभापती** : याठिकाणी मांडलेल्या विशेष उल्लेखासंबंधची सविस्तर उत्तरे संबंधित मंत्र्यांनी किंवा त्या विभागाने एक महिन्याच्या आत द्यावीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : आम्ही दिलेल्या पत्राची पोच देखील मिळत नाही.

श्री. राजेश टोपे : याची गांभीर्याने नोंद घेतली जाईल.

श्री. नितीन गडकरी : माझ्या 18 वर्षाच्या कारकीर्दीत हा प्रश्न 7 वेळा उपस्थित करण्यात आला आणि त्यासंदर्भात आतापर्यन्तच्या सर्व सभापतींनी सरकारला निर्देश दिले. तत्कालीन सभापती श्री. जयंतराव टिळक, श्री. रा.सु.गवई, श्री. ना.स.फरांदे आणि आता आपणही यासंदर्भात सरकारला निर्देश दिलेले आहेत. परंतु त्या निर्देशांची अंमलबजावणी होत नाही. आता माननीय राज्यमंत्री महोदय जे सांगत आहेत त्याची अंमलबजावणी होणार नाही याची मला शंभर टक्के खात्री आहे. सभापती महोदय, आपण या सभागृहामध्ये मा.सदस्यांच्या हक्कांचे रक्षण करता.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

(श्री. नितीन गडकरी ....)

मा.सदस्यांच्या पत्राला उत्तरे मिळणार नसतील तर याबाबतीत कोडीफिकेशन करुन आमच्या अधिकारांचे रक्षण करावे अशी माझी विनंती आहे. मा. राज्यमंत्री महोदयांनी आता येथे उत्तर दिले असले तरी आम्हाला फक्त टरक्यामायसीनच्या गोळ्या दिल्या जातात. आमच्या पत्रांना उत्तरे मिळत नाहीत. तेव्हा याबातीत गंभीरपणे विचार करुन शासनाला निर्देश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 14:10

श्री. मधुकर सरपोतदार : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनकडून विशेष उल्लेख उपस्थित केलेले जातात त्यास माननीय मंत्री महोदयांकडून 30 दिवसांच्या आता लेखी स्वरुपात सदस्यांना उत्तरे दिली गेली पाहिजेत. यासंबंधी मागील अधिवेशनात देखील हा मुद्दा उपस्थित झाला होता व त्या अनुषंगाने आपण शासनास निदेश दिले होते. मी पुन्हा आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या सभागृहात विशेष उल्लेख उपस्थित केला आहे. त्यास जवळपास चार महिन्याचा कालावधी होऊन गेलेला आहे. परंतु त्याचे उत्तर मला अजून माननीय मंत्री महोदयांकडून लेखी स्वरुपात आलेले नाही. मी या संदर्भात दोन मंत्र्यांची देखील नावे घेऊ शकतो. सभापती महोदय, आज जे विशेष उल्लेख सन्माननीय सदस्यांकडून उपस्थित केले गेले त्याची गांभीर्याने नोंद घेतली आहे अशा प्रकारचे सामान्य प्रशासन विभागाच्या राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले. या ठिकाणी उपस्थित केले गेलेले विशेष उल्लेखाची माननीय मंत्री महोदयांकडून दखल घेतली जात नाही . सभापती महोदय, विशेष उल्लेखाची त्याच प्रमाणे सन्माननीय मंत्र्यांनी पाठविलेल्या पत्राची साधी पोच पावती देखील सदस्यांना पाठविण्यात येत नाही ही दुर्देवाची बाब आहे. विशेष उल्लेखाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांकडून 30 दिवसांच्या आत लेखी स्वरुपात सदस्यांना उत्तर दिले जावे अशा प्रकारचे आदेश आपण पुन्हा द्यावेत अशी मी विनंती करतो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, विशेष उल्लेखास माननीय मंत्री महोदयांकडून दखल घेतली जात नाही हा विषय वारंवार या सभागृहात उपस्थित होत असतो. याबाबतीत पूर्वी माननीय सभापतीकडून अनेक वेळा शासनाला निदेश देण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य माननीय मंत्री महोदयांशी पत्रव्यवहार करतात त्यावेळी सदस्यांची अपेक्षा असते की, माननीय मंत्र्यांकडून आपल्या पत्राची नोंद घेण्यात आली आहे, उचित कार्यवाहीसाठी संबंधिताकडे पाठविण्यात आले आहे अशा प्रकारचे उत्तर येईल. परंतु सन्माननीय सदस्यांच्या पत्रास माननीय मंत्री महोदय पोच सुध्दा पाठवित नाहीत हे योग्य नाही. आपण शासनास निदेश देऊन सुध्दा यामध्ये काही सुधारणा होत नसेल तर यासंदर्भात माझी अशी सूचना आहे की, आपली नियमावली आहे. या नियमात एक नियम जास्त घालावा असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्यांकडून माननीय मंत्र्यांना जी पत्रे पाठविली जातात त्या पत्रास एका महिन्याच्या आत उत्तर दिले पाहिजे, मंत्र्यांनी निदान नोंद घेतली आहे अशा प्रकारचा उल्लेख या नियमात अंतर्भूत करावा. नियमात असा उल्लेख केला तर हा प्रश्न सुटू शकतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : मी मागे विशेष उल्लेख सभागृहात उपस्थित केले होते. त्या संदर्भात मला दोन ते अडीच महिन्यानंतर लेखी स्वरुपात पत्र मिळालेले आहे. सदर पत्र हे कक्ष अधिका-यांनी पाठविलेले आहे. सभापती महोदय, या सभागृहात आम्ही विविध आयुधांचा वापर करुन लक्षवेधी सूचना मांडतो. विशेष उल्लेख उपस्थित करीत असतो. परंतु त्या विशेष उल्लेखास माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. परंतु कक्ष अधिकारी यांच्या सहीने सदस्यांना पत्र देणे योग्य नाही. विशेष उल्लेखाच्या बाबतीत माननीय मंत्र्यांच्याच सहीने सदस्यांना लेखी स्वरुपात उत्तरे दिली गेली पाहिजेत अशा प्रकारच्या सूचना आपण शासनास द्याव्यात ही विनंती.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या सभागृहात आम्ही विशेष उल्लेख उपस्थित करीत असतो. परंतु आमच्या विशेष उल्लेखास शासनाकडून 30 दिवसांच्या आत लेखी स्वरुपात सदस्यांना उत्तरे दिली जात नाहीत. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळी देखील यासंदर्भात मुद्दा सभागृहात उपस्थित केला गेला होता. त्यावेळी देखील आपण शासनास यासंदर्भात निदेश दिले होते. परंतु शासनाकडून निदेशाचे पालन होत नाही असे मला नम्रपणे सांगावयाचे आहे. मी मागील अधिवेशनात " फोरन्सीक लॅब" संदर्भातील विशेष उल्लेख उपस्थित केला आहे. त्या विशेष उल्लेखाचे उत्तर जाणून बुजून शासनाकडून दिले जात नाही. ते उत्तर संबंधित अधिका-यांनी दडपून ठेवलेले आहे. मी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाचे उत्तर शासनाकडून का दिले जात नाही? याची विचारणा माननीय सभापती महोदय आपण करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी मागील अधिवेशनात दोन विशेष उल्लेख उपस्थित केले होते. त्याचे उत्तर मिळाले नाही म्हणून हा मुद्दा मी सभागृहात उपस्थित केला होता. मी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखास उत्तर देण्यात यावे म्हणून आपण आपल्या सहीने दोन वेळा स्मरणपत्रे पाठविलेली आहेत. नियमावलीतील नियम 101(फ) अन्वये एका महिन्याच्या आत विशेष उल्लेखास उत्तर दिले पाहिजे असे नमूद केले आहे. परंतु शासनाच्या कोणत्याही विभागाकडून एका महिन्याच्या आत विशेष उल्लेखाचे उत्तर दिले जात नाही. नियम 93 च्या सूचनेला देखील वेळेत उत्तरे दिली जात नाहीत. विशेष उल्लेखाची उत्तरे देण्यास शासन एवढे उदासीन का आहे ? शासन जर एवढे उदासीन असेल तर आम्ही या ठिकाणी बसून काय उपयोग आहे. सभापती महोदय, विशेष उल्लेखास 30 दिवसाच्या आत माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे अशा प्रकारे आदेश आपण शासनास द्यावेत अशी मी आपणास विनंती करतो.

3...



ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 14:10

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहात विशेष उल्लेख उपस्थित करण्याची प्रथा माजी सभापती माननीय श्री. ना.स.फरांदे यांनी सुरु केली. ते सभापती असताना देखील असाच प्रश्न या सभागृहात उपस्थित झाला होता. त्यावेळी देखील त्यांनी शासनास आदेश दिले होते. तरी देखील शासनाकडून त्या आदेशाचे पालन झाले नाही. म्हणून हा विषय कामकाज सल्लागार समितीमध्ये देखील उपस्थित करण्यात आला. तद्नंतर शासना बरोबर यासंदर्भात चर्चा करुन यासंबंधीचा नियम तयार करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे विशेष उल्लेखाच्या संदर्भात नियम तयार केला गेला. विशेष उल्लेखाचा नियम 101 असा आहे. नियमातील 101(फ) मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, विशेष उल्लेख म्हणून मांडल्या गेलेल्या विषयासंबंधीचे उत्तर मंत्रिमहोदयांनी लगेच दिलेले असले तरी त्या संबंधीचे लेखी उत्तर तीस दिवसांच्या आत संबंधित सदस्यास पाठविण्याचे बंधन मंत्र्यांवर राहील.

यानंतर श्री. कानडे...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 14:15

श्री. दिवाकर रावते ....

सभागृहाने नियम केलेले आहेत. मंत्रीमहोदयांना उत्तर देणे बंधनकारक आहे असे त्यात म्हटले आहे. परंतु याबाबतीत माझा स्पष्ट अनुभव असा आहे की, 30-30 दिवस काय तर 60-60 दिवस सुध्दा उत्तरच येत नाही. म्हणून गेल्या तीन अधिवेशनात मी विशेष उल्लेख मांडलाच नाही. कारण विशेष उल्लेख मांडून जर उत्तरच येणार नसेल तर मांडावा कशाला असा विचार केला. विधिमंडळाने तयार केलेली नियमावली बंधनकारक असून सुध्दा मंत्रीमहोदय त्याची दखल घेत नसतील तर हा हक्कभंग होऊ शकतो काय याचे उत्तर मला अपेक्षित आहे. 30 दिवसाच्या आत उत्तर देता येत नसेल तर सदस्यांना कळविणे आवश्यक आहे की, आपले पत्र मिळाले काही कारणामुळे उत्तर देण्यास उशीर लागत आहे. परंतु तेही केले जात नाही. नियमांचे उल्लंघन केले जात आहे. यासंदर्भात हक्कभंग होतो किंवा नाही हा माझा हरकतीचा मुद्दा आहे आणि यावर मला रुलींग अपेक्षित आहे. गेल्या चार अधिवेशनामध्ये असाच अनुभव येत आहे. मंत्रीमहोदय गंभीर प्रश्नावर सुध्दा हसत-हसत उत्तरे देत असतात. सरकार चालविण्याचे गांभीर्य मंत्रीमहोदयांना असले पाहिजे. सभापती महोदय, सदस्यांच्या पत्राला आणि विशेष उल्लेखाला मंत्रीमहोदयांनी उत्तर न देणे हा हक्कभंग होतो किंवा नाही यावर आपण रुलींग द्यावे.

**सभापती** : सदनामध्ये विशेष उल्लेखाच्या बाबतीत नियम केलेले आहेत. त्या नियमानुसार विशेष उल्लेखाच्या बाबतीत एक महिन्याच्या आत संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी सदस्यांना उत्तर देणे अपेक्षित आहे. काही सदस्यांनी याठिकाणी सूचित केले की, एक महिन्याच्या आत उत्तर देणे अडचणीचे असेल तर किमान संबंधित सदस्याला आणि मला कळविणे गरजेचे आहे की, सदस्यांना एक महिन्याच्या आत उत्तर देणे या या कारणांमुळे अडचणीचे आहे ते नंतर देण्यात येईल. याबाबतीत मा.सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे कोणत्या पध्दतीचे यासंदर्भात कोडिफिकेशन करावयाचे याचा मी स्वत: अभ्यास करतो आणि 2/3 दिवसामध्ये यासंसबंधी सूचना देतो. लोकप्रतिनिधींनी मंत्रीमहोदयांना लिहिलेल्या पत्राची फक्त पोच नव्हे तर त्यानंतर त्या पत्रामध्ये मा.सदस्यांनी जो आशय व्यक्त केला आहे त्या आशयाच्या दृष्टीने पुढे कोणती कार्यवाही झाली हे सुध्दा 15 दिवसात कळवावे. त्यानंतर पुढील 2-3 महिन्यांमध्ये त्यासंबंधात कार्यवाही व्हावी. मा.सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी लोकसभेमध्ये ही परंपरा पं.नेहरुंपासून पाळली जात आहे असे सांगितले. खासदारांनी मंत्रीमहोदयांना पाठविलेल्या पत्राची काळजी घेतली जाते.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

त्यानुसार याठिकाणी सुध्दा लोकप्रतिनिधींच्या पत्रांची काळजी घेणे जरुरीचे आहे. यासंदर्भात कोणत्या पध्दतीने निदेश द्यावयाचे याचा मी 2-3 दिवसांमध्ये मी अभ्यास करतो आणि शासनाला निदेश देण्याची व्यवस्था करतो. मा.सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हक्कभंगाविषयीचा जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबतीत मी स्वत: अभ्यास करतो आणि जर गरज वाटली तर काय करावयाचे यासंदर्भात योग्य तो निर्णय देतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, लोकसभेचा याठिकाणी उल्लेख करण्यात आला. लोकसभेच्या नियमावलीतील नियम 377 अनुसार सदस्यांनी ठराविक शब्दामध्ये आपली व्यथा पत्राद्वारे मंत्रीमहोदयांना कळवावयाची असते आणि त्याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी एक महिन्याच्या आत दिलेच पाहिजे असा दंडक आहे. त्याची अंमलबजावणी होत नाही असा प्रसंग येत नाही. त्याच पध्दतीने विशेष उल्लेखाच्या बाबतीत सुध्दा उत्तर मिळणे आवश्यक आहे.

**सभापती** : विधानपरिषदेमध्ये नियम 101(फ) अनुसार तरतूद केलेली आहे त्याचा आशय हाच आहे की कोणत्याही परिस्थितीमध्ये एक महिन्यामध्ये मंत्रीमहोदयांनी सदस्यांच्या पत्रांना उत्तर द्यावे. यासभागृहात सुध्दा त्या पध्दतीची परंपरा जतन करावी यादृष्टीने मी सूचना दिल्या आहेत. आता लेखी सूचना सुध्दा देण्याची मी व्यवस्था करतो.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.वसंत काळे : सभापती महोदय, मला एक औचित्याचा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. आठ दिवसापूर्वी महाराष्ट्र शासनाने सर्व शाळा आणि महाविद्यालयांना पत्र पाठवून असे कळविले आहे की," विद्यार्थ्यांना ई.बी.सी.ची सवलत मिळण्याकरता जो उत्पन्नाचा दाखला लागतो तो दाखला तहासीलदाराकडील असला पाहिजे. " सभापती महोदय, पूर्वी ग्रामपंचायती किंवा विशेष कार्यकारी आधिका-याच्यामार्फत हा उत्पन्नाचा दाखला मिळत होता परंतु आता उत्पन्नाचे प्रमाणपत्र हे तहसीलदाराकडील असावे असा आग्रह धरण्यात यावा असे शासनाने आदेश दिलेले आहेत. त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की ,ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी त्याच्या गावातून तहसील कार्यालयापर्यन्त जावे लागेल. त्यापूर्वी त्याला गावातील तलाठयाला शोधावे लागेल, ग्रामसेवकाला शोधावे लागेल आणि त्यांना त्यांचा सेवा शुल्क दिल्याशिवाय त्यांच्याकडून त्याला प्रमापत्र मिळणार नाही. हे प्रमाणपत्र धेतल्या नंतर त्या विद्यार्थ्याला तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या तहसील कार्यालयात जावे लागेल तेथे सुध्दा स्टॅम्प पेपरवर ॲफेडेव्हीट करुन दिल्यानंतर मग त्याला उत्पन्नाचा दाखला मिळेल. लाखो विद्यार्थ्यांच्या जीवन मरणाचा हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.उत्पन्नाचा दाखला देण्यासाठी आता तहसीलदाराची नियुक्ती करण्यात आली असल्यामुळे खेडे गावातील त्या गरीब विद्यार्थ्याला तहसील कार्यालयापर्यन्त जाण्यासाठी 500 ते 1000 हजार रुपये खर्च करावे लागणार आहेत. त्याचबरोबर जाण्या येण्याचा त्रास सहन करावा लागणार आहे.इतका त्रास सहन करुन आणि तहसीलदाराकडून उत्पन्नाचा दाखला मिळाल्यानंतर त्या विद्यार्थ्याला शाळेतून 10 रुपयापर्यन्तची सवलत मिळते, महाविद्यालयातून 50 रुपयांची सवलत मिळते.त्या विद्यार्थ्याला जो त्रास सहन करावा लागणार आहे त्या तुलनेने त्याला मिळणा-या इ.बी.सी.ची सवलती अत्यल्प आहे. तहसीलदाराकडून उत्पन्नाचा दाखला मिळविण्यासाठी या गरीब विद्यार्थ्यांना त्रास होणार आहे. त्यामुळे त्याला आर्थिक बोजा सहन करावा लागणार आहे तसेच त्याची कुचंबणा आणि कुतरओढ होणार आहे. तेव्हा हे सर्व थांबवून पूर्वी प्रमाणे गाव पातळीवर उत्पन्नाचा दाखला देण्याची व्यवस्था करण्यास सभापती महोदय,आपण शासनाला सूचना द्याव्यात अशी मी आपणास नम्र प्रार्थना करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांना मी असे सांगू इच्छितो की,सन्माननीय सदस्य श्री.वंसतराव काळे यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला औचित्याचा मुद्दा

अत्यंत महत्वाचा आहे.पूर्वी इ.बी.सी.चा दाखला स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेटकडून दिला जात होता परंतु आता या विद्यार्थ्यांना हा दाखला मिळण्यासाठी तहसीलदारांकडे जावे लागणार आहे. त्यांच्याकडे गेल्या नंतर व सर्व प्रोसिजर पूर्ण केल्या नंतरच त्यांना हा दाखला मिळणार आहे. तेव्हा ही बाब आपण तपासून घेऊन सबंधित खात्याला सूचना द्यावी.

श्री.अजित पवार : ही बाब तपासून घेऊन संबंधित विभागाला सूचना देण्यात येईल.

---

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात मला औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा आज उपस्थित न करता उद्या करावा.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.धर्मरावबाबा आत्राम ( महिला व बाल विकास राज्यमंत्री): अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने "एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत बाल विकास सेवा प्रकल्प राबविण्याबाबत " या विषयावरील प्रा.बी.टी.देशमुख, श्री. व्ही.यु.डायगव्हाणे, श्रीमती संजीवनी रायकर वि.प.स..सर्वश्री जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, पी.जी.दस्तुरकर,श्रीमती निशिगंधा मोगल, श्रीमती वीणा शर्मा,श्रीमती इंदुमती नाकाडे, सर्वश्री प्रकाश जावडेकर, धरमचंद चोरडिया व युनूस शेख, माजी.वि.प.स. यांच्या दिनांक 27 मार्च 1997 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 15576 ची अधिक माहिती मी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अधिक माहिती**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4..

पृ.शी : लेखी उत्तरे

मु.शी : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली,दुसरी,तिसरी,चौथी,पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली,दुसरी,तिसरी चौथी पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :. अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली,दुसरी,तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : सोबत जोडलेल्या याद्या येथे छापाव्यात )

नंतर श्री.सुंबरे

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

श्री. राजेश टोपे (नगरविकास व सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो -

महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (निवडणूक) नियम, 2005 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमपीसी-4200/141/प्र.क्र.24/2000/नवि-30, दिनांकित 12 एप्रिल 2005.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहा समोर ठेवतो. -

महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (सभा घेणे) नियम 2005 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमपीसी-4200/141/प्र.क्र.24(अ)/2000/नवि-30, दिनांकित 12 एप्रिल 2005.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. दयानंद मस्के (खार भूमी व बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सागरी मंडळाचा सन 2001-2002, 2002-2003, 2003-2004 चा प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर (पाटबंधारे (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खारे विकास महामंडळाचा सन 2002-03 चा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा सन 2002-03 चा महालेखापाल, महाराष्ट्र-1 यांचा लेख्यांवरील लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...... आर 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (पाटबंधारे मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळाचा (जळगाव) सन 1998-99, 1999-2000, 2000-2001 चा महालेखापाल, महाराष्ट्र-2 यांचा लेख्यांवरील लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, 7-7, 8-8 वर्षांनी हे अहवाल सभागृहासमोर येत आहेत. म्हणजे हा एक प्रकारे वेळेचो आणि कागदपत्रांचाही अपव्यय आहे. तेव्हा आपण याबाबतीत मंत्र्यांना ताकीद द्यायला पाहिजे. ..

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नवलकर यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केलेला आहे तो अगदी बरोबर आहे. पण हा अहवाल महालेखापाल,नागपूर यांचा असून तो त्यांच्या 24.4.2005 च्या पत्रान्वये आपल्याकडे आलेला आहे. तेव्हा यापुढे असे होऊ नये या दृष्टीकोनातून महालेखापालांना विनंती करण्यात येईल की, आपल्याकडून हे अहवाल आल्यानंतर आम्हाला ते सभागृहासमोर ठेवावे लागतात आणि शासन त्याला त्यानंतर मान्यता देत असते. तेव्हा आपण हे अहवाल लौकर पाठवावेत. तेव्हा यापुढे इतका विलंब यासाठी होणार नाही अशी खबरदारी विभागाकडून घेण्यात येईल इतकेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी सार्वजनिक उपक्रम समितीचा सदस्य असल्याने त्या समितीमध्ये देखील आम्हाला असाच अनुभव येतो. त्या ठिकाणी 7-8 वर्षापूर्वीचे ऑडिट पॅरा आम्हाला मिळतात. खरे तर याबाबत कायद्यानेच यांचेवर बंधन घालणे आवश्यक आहे की, 6 महिन्यामध्ये ऑडिट करून त्याचा अहवाल सभागृहासमोर आला पाहिजे. तेव्हा अशा प्रकारे कायदेशीर बंधन टाकता येईल किंवा काय याचाही आपण विचार करावा. किमान या दृष्टीने प्रिलिमिनरी ऑडिट होऊन त्याचा अहवाल आपल्याकडे आला पाहिजे आणि तो आपण सभागृहासमोर ठेवला पाहिजे. आणि बाकी अंतिम अहवाल दोन वर्षाच्या आत सभागृहासमोर सादर झाला पाहिजे अशा प्रकारचे बंधन आपल्याला टाकता येऊ शकेल किंवा काय हे आपण पहावे असे मला वाटते.

**सभापती** : त्या समितीमध्ये आपण या संबंधात चर्चा केली असेलच, नसेल तर ती आपण करावी कारण तेथे ऑडिटच्या विभागाचे लोक उपस्थित असतात. त्यामुळे त्यांचेकडून आपल्याला

..... आर 3 ..



KBS/SBT/MH. श्री. गायकवाड नंतर --- 14:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याबाबत खुलासा करून घेता येऊ शकेल. तरीही माननीय मंत्री महोदयांना मी या संदर्भात सांगेन की, सन्माननीय सदस्यांनी ही जी सूचना केली आहे ती आपण तपासून पाहण्यास काही हरकत नाही.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ही बाब तपासून घेण्यात येईल.

**सभापती** : लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा सन 2003-04 या वर्षाचा (1) विनियोजन लेखा अहवाल आणि (2) वित्तीय लेखा अहवाल सभागृहासमोर सादर करतो.

**सभापती** : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा विनियोजन लेखा अहवाल आणि वित्तीय लेखा अहवाल सभागृहासर सादर झाला आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा सन 2003-04 या वर्षाचा (1) महसुली जमा अहवाल व (2) नागरी अहवाल सभागृहास सादर करतो.

**सभापती** : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा महसुली जमा अहवाल व नागरी अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा दिनांक 31 मार्च 2004 रोजी संपणाऱ्या वर्षाचा वाणिज्यिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा वाणिज्यिक अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

***

(यानंतर श्री.जागडे ....एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>रोजगार हमी योजनेचा अहवाल सादर करणे</u>**

श्री. बळवंतराव चव्हाण ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजनेचा अहवाल पहिला सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 93 अन्वये सूचना**</u>

**सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील, श्रीमती नीलम गो-हे व इतर वि. प. स. यांनी " रायगड जिल्ह्यातील खोपोली शहरातील सुभाष नगर परिसरातील एक अतिशय मोठी दरड कोणत्याही क्षणी कोसळण्याची व त्याखाली 300 कुटुंबे सापडण्याची शक्यता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि. प. स. यांनी " मौजे सातवली, जिल्हा ठाणे येथील आदिवासींची बेकायदेशीर हस्तांतर केलेल्या जमिनीची माहिती उघडकीस येऊ नये म्हणून मंत्रालयातील महसूल विभागाच्या कक्ष अधिका-यांने दिनांक 8 जुलै 2005 रोजीच्या पत्रान्वये आमदारांना माहिती देण्यास दिलेला नकार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी व इतर वि. प. स. यांनी " खरेदी केलेल्या कपाशी बियाणांची उगवण न झाल्याने संतप्त शेतक-यांनी मोंढा जिल्हा परभणी येथील गणेश कृषी केंद्रावर केलेली दगडफेक, तसेच शेतक-यांवर पोलिसांनी केलेली लाठीमार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, श्रीमती कांता नलावडे व इतर वि. प. स. यांनी "सेंट झेविअरस्र एज्युकेशन ट्रस्ट, नवी मुंबई या संस्थेने आर्थिक गैरव्यवहार करुन पालकांची व विद्यार्थ्यांची केलेली पिळवणूक " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी व इतर वि. प. स. व इतर यांनी " मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील भविष्यकालीन प्रकल्पांद्वारे 453 अब्ज घनफूट पाण्याचे अद्यापही नियोजन करणे बाकी असल्याने भविष्यात या पाण्यावर आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश व छत्तीसगड हे राज्य हक्क

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

सांगण्याची निर्माण झालेली शक्यता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. कन्हैयालाल गिडवणी व इतर वि. प. स. व इतर यांनी "उस्मानाबाद जिल्हा बँक आर्थिक घोटाळा प्रकरणी चौकशी अधिका-यांनी सादरक केलेल्या अहवालावर कारवाई करण्यास शासन जाणीवपूर्वक करत असलेली टाळाटाळ " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर चव्हाण व इतर वि. प. स. व इतर यांनी " बाल कामगारांचे अमानुष छळ करणा-या जरी व्यावसायिकांबाबत न्यायालयाने आदेश देऊनही जिल्हाधिका-यांनी त्यांच्याकडून दंड वसूल न करणे. " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी एक नियम 93 ची सूचना दिली आहे. परभणी जिल्ह्यात बियाणांचा तुटवडा पडल्यामुळे शेतक-यांनी संतापूप दुकानदारांना पिकेटींग केले आहे. त्यामुळे परभणीतील दुकाने दुकानदारांनी बंद केली आहेत.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आधीच आपल्या राज्यामध्ये पुरेसा पाऊस पडत नाही. आणि जो पाऊस पडतो त्यामुळे हे बियाणे सुध्दा उगवत नाही. अशाप्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. या बाबतीत आपण शासनाला निवेदन करण्यास सांगावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सांगितले आहे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, मागील अधिवेशनापासून विधान भवनाच्या सुरक्षिततेबद्दल 15 सदस्यांच्या सहयांचे निवेदन देऊन आपणास वारंवार विनंती करीत आहे. गेल्या दोन-तीन महिन्यापासून आयनॉक्स थिएटरमध्ये पुरेशी सुरक्षितता बाळगली जात नाही. सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन केले जात आहे. तेव्हा हा विषय गंभीर असल्यामुळे शासनाला आपण निवेदन करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांच्या नियम 93 च्या सूचनेला मी परवानगी दिलेली नाही. विधान भवनाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न असल्यामुळे शासनाने त्याची नोंद घ्यावी. आणि या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आलेली उपाय योजना पुरेशी आहे काय याची शासनाने तपासणी करावी.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मागील आठवडयात सायन हॉस्पिटलमध्ये पेसमेकर न बसविल्यामुळे अनेक रुग्णांचा मृत्यू होत आहे याबाबत शासनाने निवेदन करावे म्हणून मी नियम 93 ची सूचना दिली होती. त्यावर आपण शासनाने दोन दिवसात निवेदन करावे असे सांगितले होते. ते निवेदन अजून आलेले नाही.

**सभापती** : ते निवेदन उद्या कसे येईल हे मी पहातो.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, माझी आपणास पुन्हा विनंती आहे की, 15 सदस्यांच्या सहयांचे निवेदन शासनाला दिले आहे व आपल्याला देखील सविस्तर पत्र दिले आहे. माननीय गृहमंत्र्यांना पत्र दिले आहे. या आयनॉक्स थिएटरमध्ये अटींचे पालन केले जात नाही ही गंभीर बाब आहे. तेव्हा एखादी गंभीर घटना घडल्यानंतर त्या बाबत विचार करावयास गेलो तर त्याला काही अर्थ उरणार नाही. तेव्हा आपण याबाबत शासनाला निवेदन करण्याचे आदेश द्यावेत अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेकडे शासनाने गांभीर्याने पहावे अशी माझी सूचना आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अमरावती विभागातील अनुकंपा तत्वावरील 22 कर्मचाऱ्यांची .
नेमणुकीची प्रकरणे अनेक वर्षे पडून असणे.

मु.शी. : अमरावती विभागातील अनुकंपा तत्वावरील 22 कर्मचाऱ्यांची .
नेमणुकीची प्रकरणे अनेक वर्षे पडून असणे
याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली
नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अजित पवार ( पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, श्री. दिवाकर रावते यांनी "अमरावती विभागातील अनुकंपा तत्वावरील 22 कर्मचाऱ्यांची नेमणुकीची प्रकरणे अनेक वर्षे पडून असणे." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. निवेदनाच्या पृष्ठ 3 वर म्हटल्याप्रमाणे "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ज्या उमेदवारांचे वडील किंवा भाऊ, जवळचे नातेवाईक हे मजीप्राच्या सेवेत असतांना मृत अथवा ज्यांना निरनिराळया आजारावरुन नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत अशा कर्मचाऱ्यांच्या बदल्यात प्राप्त झालेले अनुकंपा नियुक्तीचे प्रस्ताव वर्ग 3 साठी 129 व वर्ग 4 साठी 189 इतकी आहेत." म्हणजे कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या सहा प्रादेशिक विभागामध्ये एकूण 318 लोकांना सामावून घेण्याचा प्रस्ताव आहे. हे कर्मचारी अनुकंपा धर्तीवर भरती करण्याचा प्रश्न आहे. यासंबंधी शासनाचे म्हणणे असे की, जीवन प्राधिकरणाची कार्यालये जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आली आहेत. त्यामुळे निवेदनात म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन एकूण 3003 पदे कमी करण्यात आली आहेत. त्यामुळे ती घेता येत नाहीत. माझी शासनाला विनंती आहे की, हे लोक उपोषणाला बसले आहेत. त्यांना 3 हजार रुपये फिक्स पगारावर नोकरीत सामावून घेण्याचा प्रश्न आहे. आपण त्यांना शब्द दिला आहे, आपण वारंवार कबूल केले आहे. या 318 लोकांचा हा प्रश्न वर्षानुवर्षे रेंगाळत पडला आहे. त्यांच्या घरातील परिस्थिती अतिशय गंभीर आहे. दादा, आपण पश्चिम विदर्भाच्या दौऱ्यावर आला होता त्यावेळी ही सर्व मंडळी आपल्याला भेटली होती. आपण ही कार्यालये जिल्हा परिषदेकडे वर्ग केली असली तरी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून 318 अनुकंपा धर्तीवर भरतांना त्यांना इतर निकषामध्ये न बसविता माणुसकीच्या नात्याने त्यांना सेवेत सामावून घेण्याचा निर्णय घ्यावा अशी विनंती करतो. त्यांना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कां होईना 3 हजार रुपये कायम स्वरुपी पगारावर घेण्यासंदर्भात आपण कबूल केले आहे. त्याप्रमाणे त्यांना सेवेत घेण्यामध्ये अडचण काय आहे? याचा आपण खुलासा करावा.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, खरेतर याच विषयावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, मी आणि आमच्या विभागाचे अधिकारी आणि शिष्टमंडळातील सन्माननीय सदस्य यांची एक बैठक झाली. यापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांच्या मंडळाच्या बैठकीमध्ये संबंधितांना 3000 रुपये एकत्रित वेतनावर टप्प्याटप्प्याने कामावर घेण्याच्या दृष्टीने ठराव करुन तो शासनाकडे पाठविला होता. परंतु त्यामुळे आर्थिक भार पडणार असल्यामुळे त्याला अजून मान्यता देण्यात आलेली नाही. कालच ग्रामविकास खात्याचे माननीय मंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याबरोबर चर्चा केली आहे. सध्या जिल्हा परिषदेमध्ये ज्युनिअर इंजिनिअरची संख्या ब-याच मोठया प्रमाणात कमी आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या योजनांची देखभाल करण्यासाठी किंवा इतर कामे करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. म्हणून कालच्या चर्चेमध्ये याचाही विचार झ ाला की, ही जी 318 पदे आहेत, त्यामध्ये टेक्नीकल लोक आहेत का ? तर त्यामध्ये टेक्नीकल लोक नाहीत. हे वर्ग 3 व 4 चे लोक असल्यामुळे, आपण सूचविल्याप्रमाणे जिल्हा परिषद ज्युनिअर इंजिनिअर किंवा टेक्नीकल व्यक्ती म्हणून त्यांना घेऊ शकत नाही. अलिकडच्या काळात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अशी भूमिका घेतली आहे की, 75 लाखाच्या योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करावयाच्या आणि पिण्याच्या पाण्याच्या योजना गावाने आणि जिल्हा परिषदेने चालवावयाच्या आणि त्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात नवीन भरती देखील करण्यात आलेली नाही. म्हणून काल चर्चा करीत असताना माननीय विरोधी पक्षनेत्यांना आणि शिष्टमंडळाला सांगितले की, हा मुद्दा पुन्हा मंत्रीमंडळापुढे नेऊन, यामध्ये जसे एकत्रित पगारावर शिक्षक सेवक, ग्रामसेवक यांची भरती केली, त्यात अनुशेषाची भरती करण्याच्या निमित्ताने काही मागासवर्गीय सहका-यांना यामध्ये घेण्यात आले. परंतु ही संख्या मर्यादित होती. त्यातून सर्वांना न्याय देता आलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी हा मुद्दा मांडला, आताही वेगवेगळया भागात गेल्यानंतर हे सहकारी उपोषणाला बसतात, आंदोलने करण्याचा प्रयत्न करतो किंवा उपोषणाला बसले असताना आमच्याच मुख्य अभियंता यांनी परस्पर असे सांगितले की, आम्ही तुम्हाला एकत्रित पगारावर घेऊ. वस्तुत: त्यांना कोणत्याही प्रकारचा अधिकार नसताना त्यांनी तशा प्रकारचे उत्तर दिले आहे ही वस्तुस्थिती मी सदनापासून लपवू इच्छित नाही. पण त्यांच्या घरातील कमावती व्यक्ती कामावर असताना किंवा नोकरीत असताना घरी दु:खद निधन झालेले असल्यामुळे त्यांचे कुटुंब उघडयावर पडलेले आहे. म्हणून

. . . .यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . . .

सहानुभूतीपूर्वक विचार करुन, पुन्हा मंत्रीमंडळापुढे हा विषय ठेऊन या लोकांना एकत्रित पगारावर का होईना, टप्प्याटप्प्याने कामावर घेण्याच्या संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करुन यासंबंधातील कारवाई करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जे लोक नोकरीवर असताना अपघाताने मृत होतात, अशा व्यक्तींच्या घरातील लोकांसाठी अनुकंपाचे धोरण आहे. याबाबतीत शासनाने वेळोवेळी मंत्रीमंडळामध्ये निर्णय घेऊन स्पष्टता दिलेली आहे की, विभागाला अशा प्रकारच्या नियुक्त्या करता येतील. हे कलेक्टरकडून करावयाचे की आणखी कोणाकडून करावयाचे हा मुद्दा वेगळा. पण अशा नियुक्त्या करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, कॅबिनेट किंवा फायनान्स विभागाकडून कोणत्याही प्रकारचा स्थगनादेश नाही. आपल्या अधिकारात नियुक्त्या करु शकतात. जर तुम्हाला टाळावयाचे असेल तरी नाही म्हणता येत नाही, मग पुन्हा एकदा मंत्रीमंडळापुढे पाठवावे लागेल असे म्हटले म्हणजे एकीकडे तुमच्या भावनांचीही कदर केली आणि प्रत्यक्षात तो विषय मंत्रीमंडळापुढे येईल की नाही हे सांगता येत नाही. म्हणजे मग तो विषय आपोआप साईड ट्रॅक होऊ शकतो. तुमचा तसा उद्देश असेल की नाही हे माहिती नाही. कदाचित तसा नसेलही. पण जेव्हा घरातील 35-35 वर्षाची माणसे अपघातात मृत्यू पावतात. त्यामुळे कुटुंबे उध्वस्त होते, पत्नी विधवा होते.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी सौ.रणदिवे.... 14:45

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू..

म्हणून सरकारने अनुकंपा तत्वाचे धोरण स्वीकारले. आपण 75 लाखाच्या खालच्या योजना या जिल्हापरिषदेकडे देणार आहात, त्यासाठी मॅन पावर लागणार आहे. तुम्ही या लोकांना पुन्हा नोकरीवर घेतले आणि त्यांचे वर्गीकरण जिल्हापरिषदेकडे केले तर त्यांना सामावून घेता येईल. जिल्हापरिषदेमध्ये अनेक जागा रिक्त आहेत, त्यांना त्या जागेवर कोणाला अपॉईंट करता येत नाही अशी परिस्थिती आहे. जिल्हापरिषदेकडे रिक्त जागा आहेत. या मुलांना घेऊन जिल्हापरिषदेकडे वर्ग करावे. केवळ आपण वर्ल्ड बँकेचे नाव सांगून या 30-40 मुलांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करणे, बरोबर होणार नाही. आपल्या अधिकारामध्ये त्यांना घ्यावे. त्यांची याबाबतीतील परिस्थिती लक्षात घेंऊन, त्यांच्या परिवारावर आघात झालेला आहे, याबाबतीत संवेदनशीलतेची, सहानुभूतीची भूमिका ठेवून त्यांना आपण आपल्याकडे नियमित करावे आणि नंतर त्यांची सर्व्हीस जिल्हापरिषदेला वर्ग करावी. ग्रामविकास मंत्रालय त्यांच्या जिल्हापरिषदेच्या अनेक विभागामध्ये त्या त्या एरियामध्ये सामावून घ्यायला तयार आहेत. त्या ठिकाणी लोक जाऊ शकतात. तसे आपण का केले नाही, तसे आपण करणार आहात काय ?

श्री.अजित पवार : मी सुरुवातीलाच सांगितलेले आहे. मी काल विरोधी पक्ष नेत्यांबरोबर चर्चा केली. ही टेक्निकल माणसे नाहीत. मा.ग्रामविकास मंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याशी चर्चा केली. जिल्हापरिषदेमध्ये टेक्निकल स्टाफ कमी आहे. वर्ग 3 आणि वर्ग 4 मधील हे सहकारी आहेत. फक्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाही तर महाराष्ट्रामध्ये 25 वेगवेगळे विभाग आहेत. त्या सर्वच विभागांमध्ये अनुकंपा तत्वावरील लोकांची यादी आहे, हा आकडा खूप मोठ्याप्रमाणावर आहे. पाठीमागच्या काळामध्ये राज्याचे मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब असताना ज्यावेळेला मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्याकरिता भरती करण्यात आली, त्यावेळेस इतरांची भरती थांबवून प्राधान्याने मागासवर्गीयांची भरती करण्यात आली. त्यावेळेस इतरांची भरती थांबवून प्राधान्याने मागासवर्गीयांची भरती करण्यात यावी अशा पध्दतीचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे ओपन कॅटेगरीतील अनंकपा तत्वावरील भरती थांबविली गेली. याबाबत त्यावेळेला कॅबिनेटमध्ये चर्चा झाली त्यावेळेस मागासवर्गीयांच्या रिक्त जागा आहेत, त्या भरल्या पाहिजेत त्यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. परंतु याकरिता कोणत्याही कॅटेगरीमधील व्यक्तीचे नोकरीत असतांना दु:खद निधन झ ाले तर त्यांचे कुटुंब उघड्यावर पडते. त्या कुटुंबातील कर्त्या व्यक्तीला अनुकंपा तत्वावर घेण्यात आले पाहिजे. अशी देखील चर्चा झाली की, 55-56 पर्यन्त वय

श्री.अजित पवार (पुढे चालू....

झाल्यानंतर काही व्यक्ती काम करण्याच्या पात्रतेचा नाही, म्हणून डॉक्टरांचे सर्टिफिकेट देतात आणि त्याच्या दुसऱ्या कर्त्या माणसाला अनुकंपा तत्वावर नोकरीत लावले जाते. त्या संदर्भात कॅबिनेटमध्ये असाही निर्णय घेतला की, अशा केसेस थोड्या वेगळया प्रकारे तपासून पहाव्यात. मात्र दुर्दैवाने नोकरीमध्ये असतांना एखाद्याचा मृत्यू झाला, अशांच्याबाबतीमध्ये वेगळा विचार करण्यात यावा. सगळी माहिती घेतल्यानंतर एम.एस.ई.बी.ची यादी खूप मोठी निघाली. कलेक्टरने विचारले की, ही यादी आणि पाटबंधारे खात्याच्या इतर विभागाची यादी मोठ्याप्रमाणावर आहे त्यामुळे नक्की कोणत्या उमेदवारांना घेण्यासाठी प्रायोरिटी द्यावयाची, असे विचारले. 700 उमेदवारांची यादी असेल, त्यांची जशा दु:खद घटना झाल्या असतील त्यांचे सिनियॉरिटीप्रमाणे एम.एस.ई.बी.मध्ये घेतात. त्याबाबतीत वेगवेगळे विभ्ांग असल्यामुळे सगळ्यांची भरती करतांना कलेक्टरांना सूचना देऊन भरती करत असताना कलेक्टरनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या व्यक्तींना प्राधान्य द्यायचे की....

श्री.पांडुरंग फुंडकर : आपण आता मिक्स करत आहात.

श्री.अजित पवार : मी मिक्स करत नव्हतो, उत्तर व्यवस्थित देत होतो. परंतु सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी मुद्दा उपस्थित केला की, वेगळे उत्तर देऊन हा प्रश्न बाजूला करु नका. काल आपली चर्चा झाली. त्याबाबत मी सांगितले की, मी स्वत: कॅबिनेटसमोर प्रस्ताव नेतो. ही टेक्निकल माणसे नसली तरी ग्राम विकास विभागाला विनंती करतो की, 75 लाखाची कामे जागतिक बँकेच्या माध्यमातून चाललेली आहेत, मध्यंतरी जल स्वराज योजनेची कामे करत असतांना काही माणसे पाहिजे होती, त्याहीवेळेस प्राधान्याने निर्णय घेतलेला होता. परंतु त्यामध्ये टेक्निकली माणसे नसल्यामुळे बाहेरच्या लोकांना घेण्यात आले. म्हणून सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी फक्त टेक्निकल माणसांच्या जिल्हापरिषदेमध्ये जागा रिक्त आहेत असे नाही तर वर्ग 3, वर्ग 4 मध्ये जागा रिक्त आहेत असे लक्षात आणून दिलेले आहे, त्याबाबतीत ग्राम विकास विभागाच्या सचिवांशी चर्चा केली जाईल.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 14:50
श्री. अजित पवार...

अनुकंपा तत्वावरच्यांना प्राधान्यांना जरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून घेतले तरी त्यांना येथे न सामावून घेता ग्रामविकास विभागात सामावून घेण्याकरिता कॅबिनेटची मान्यता घेऊन त्यामध्ये कार्यवाही करण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, खरे म्हणजे अनुकंपा तत्वावर उमेदवारांना घेण्याची मानसिकता मंत्रिमहोदयांची असेल तर 5645 नियमित आस्थापना पदांची आवश्यकता आहे. त्यापैकी 457 अतिरिक्त पदे आहेत आणि 4033 कर्मचारी कार्यरत आहेत. म्हणजे फक्त 4490 कर्मचारी कार्यरत आहेत. सुधारित आकृतीबंधाप्रमाणे 5,645 नियमित पदे आहेत. म्हणजे शासन अजून 1100 पदे भरु शकत असतांना या 318 पदांना ताबडतोब रिक्रूट करण्याची काय आवश्यकता आहे?आपल्याकडे फिटरची आवश्यकता खूप मोठया प्रमाणात आहे. सगळया ठिकाणी प्रचंडप्रमाणात जीवन प्राधिकरणाच्या योजनेतील पाईप फुटल्यामुळे, मोठया प्रमाणात फिटरची गरज आहे. अनुकंपा तत्वारील महिला उमेदवार सोडून बाकी सगळया उमेदवारांना दोन वर्षात त्यांनी फिटरचा कोर्स इन सर्व्हिस पूर्ण करण्याचा त्यांच्यकाडून बॉन्ड घेऊन फिटर या पदावर घेता येऊ शकते. हे करण्यासाठी आपल्याला काय अडचण आहे.?

श्री. अजित पवार :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे ती तपासून बघण्यात येईल. आणि तसे करणे शक्य असेल तर तसे केले जाईल.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्रिमहोदयांच्या संपूर्ण निवेदनामध्ये या अनुकंपा तत्वावरील उमेदवांराकडे सहानुभूतीने पाहण्याचा दृष्टीकोन वाटतो. पण तो प्रत्यक्षात येणे अत्यंत आवश्यक आहे. मंत्रिमंडळापुढे जाण्याच्या बाबतीत मंत्रिमहोदयांनी सांगितलेले आहे.पण ही एक कॅटॅगरी अशी आहे की, यांना असे सांगण्यात आले आहे की, तीन हजार रुपये या फिक्स पे वर तुम्हाला आम्ही कुठेतरी सामावून घेऊ. माझी शासनाला विनंती आहे की, मंत्रिमंडळापुढे जाऊन टाईमबाऊन्ड मुदतीत ही कार्यवाही पूर्ण करावी. कारण आत्ताच ही मंडळी 40 ते 42 वर्षांची झालेली आहे. ते अनेक दिवसापासून शासनाच्या निर्णयाची वाट पाहात आहेत.शासनाचा निर्णय होत नाही. श्री. नितीन गडकरी साहेब म्हणाले त्याप्रमाणे मंत्रिमहोदयांनी हा विषय कॅबिनेटपुढे नेऊ असे सांगितले आहे. पण तो विषय साईडला जाईल. पण दादा आपण सांगत आहात म्हणून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आम्हाला तसे वाटत नाही. तुम्ही एकदा करतो म्हटले तर कराल, असा आम्हाला विश्वास वाटतो. म्हणून तुमच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या महाराष्ट्रात एक वेगळा मेसेज आपण द्यावा. यासाठी तुम्ही असे आश्वासन द्या की, येत्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मी याबाबतचा निर्णय निश्चित घ्यायला लावीन. मंत्रिमहोदय, आपण एकदा "होय" म्हटले की, एक चांगला संदेश जाईल. 300 लोकांना सामावून घेण्याच्या बाबतीत आपण एकदा निर्धार व्यक्त केला आहे. इतर विभागतील कर्मचारी यामध्ये येत नाहीत. या अनुकंपातत्वावरील उमेदवारांना फिक्स तीन हजार रुपयावर घेण्याचे मान्य केलेले आहे. यातील ज्या महिला आहेत त्या 40 वर्षाच्या, 42 वर्षाच्या झालेल्या आहेत. त्यां अत्यंत दुरावस्थेत आहेत याची मंत्रिमहोदयांनाही माहिती आहे. म्हणून माझी विनंती आहे की, हा एक चांगला उपक्रम आहे. या विषयाच्या बाबतीत या सभागृहात वाचा फोडीत असतांना आपण सांगावे की, येणा-या कॅबिनेट मिटिंगमध्ये किंवा दोन महिन्यात निश्चितपणे कॅबिनेटला निर्णय घ्यायला भाग पाडू आणि त्याप्रमाणे निर्णय घेतला जाईल,असे आपण सांगितले तर ते फार महत्वाचे ठरेल.

श्री. अजित पवार :सभापती महोदय, जरी त्यांनी कबूल केलेले असेल की, लमसम तीन हजार रुपये पगारावर, एकत्रित वेतनावर आम्हाला घेण्यात यावे. तरी आपल्याला सगळयांना अनुभव आहे आणि आपण सगळयांनीच प्रशासनात काम केलेले आहे.काही दिवसाकरिता हे होते. वर्ष, सहा महिने झाले की, ते सगळे एकत्र येतात आणि म्हणतात की, आम्ही इतके दिवस तीन हजार रुपयावर काम केलेले आहे. आता आम्हाला नियमित वेतन वर्ग-3, वर्ग-4 चे आहे ते द्या. त्याप्रमाणे शासन ते करते. आपण अंगणवाडी शिक्षिकाबद्दल बघितलेले आहे, शिक्षण सेवक, ग्रामसेवकांची भरती करतांना बघितलेले आहे. म्हणून पुढच्या या सगळया गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील. त्यामुळे मी काही लगेच याबाबतीत कॅबिनेटमध्ये सांगत नाही. पण सहा महिन्याच्या आत हा प्रश्न धसास लावलेला असेल, ही सभागृहाला मी खात्री देतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारती कोसळण्याच्या घडलेल्या घटना.

**मु. शी.** : मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारती कोसळण्याच्या घडलेल्या घटना याबाबत श्री विलास अवचट वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, श्री विलास अवचट यांनी "मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारती कोसळण्याच्या घडलेल्या घटना"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, शासनाने काढलेले परिपत्रक सात पानी आहे. ते परिपत्रक म्हणजे मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीमध्ये राहणा-या रहिवाशांवर अन्याय करणारे परिपत्रक आहे. मी समजू शकतो की, या उपकरप्राप्त इमारती जीर्णावस्थेत असतील, मोडकळीस आलेल्या असतील, राहण्यास धोकादायक असतील. पण अधिनियम 88 (3) प्रमाणे घरदुरुस्ती मंडळाने ताब्यात घेतल्या तर ती गोष्ट वेगळी आहे. परंतु 88(3) चे गाजर दाखवून ज्या इमारती दुरुस्तच होणार नाहीत, म्हणून त्याठिकाणी 1985 पासून आमदारांचा निधी या इमारतींना लागू आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ SBT/ MAP/ MHM/ कु.थोरातनंतर 14:55

श्री.विलास अवचट....

गेल्या 2004-05 या आर्थिक वर्षामध्ये या शहरातील 351 इमारतींसाठी आमदारांनी जवळजवळ 11 कोटी 58 लाख 85 हजार रुपये दिले आहेत त्यामुळे या घरदुरुस्ती मंडळाला आर्थिक सहाय्य झालेले आहे. परंतु असे कोणते कारण घडले की, परिपत्रक काढावे लागले ? त्या परिपत्रकामध्ये असे म्हटले आहे की, " मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींची दुरुस्ती हा उपाय नसून पुनर्बांधणी हाच उपाय आहे." म्हणजे एक वेळ अशी येईल की, या मुंबई शहरातील उपकर प्राप्त इमारतीतील सगळया जागा खाली झालेल्या असतील आणि संक्रमण शिबिरामध्ये गेलेले असतील. परंतु त्याठिकाणी अनेक वेळा कायदेशीर अडचणी निर्माण होतात. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, 1985 पासून आमदार विकास निधीचा मुंबई घरदुरुस्ती मंडळाला अर्थसहाय्य होत होते. आपण असे म्हटले आहे की, "ही बाब विचाराधीन आहे." आपण किती दिवस यावर विचार करणार आहात ? दुसरा प्रश्न असा आहे की, 88 (3) कलम लावल्यानंतर जर आपल्याकडे इमारती पडल्या तर त्यांच्यासाठी संक्रमण शिबिरामध्ये जागा आहे काय ?

श्री.दयानंद मस्के : त्या इमारती या पावसाळ्यामध्ये निश्चित केलेल्या आहेत. ज्या इमारती पडलेल्या आहेत अशा लोकांसाठी संक्रमण शिबिरामध्ये जागा त्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून एक महत्वाची गोष्ट मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देवू इच्छितो. आपल्याकडे हे अतिशय महत्वाचे खाते असल्यामुळे आपण या माहितीच्या आधारे कारभार करीत असाल तर या सगळया इमारतीतील लोकांना संक्रमण शिबिरामध्ये खितपत पाडाल. मा.सदस्य श्री.अवचट यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. पान क्र.2 वर असे म्हटले आहे की, "कार्यक्रम गतीमान करण्यासाठी सध्याच्या पध्दतीबाबत सखोल अभ्यास करुन त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाने दि.3 डिसेंबर, 2003 रोजी तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित केली. या समितीने केलेल्या विविध शिफारशींमध्ये उपकर प्राप्त इमारतीच्या दुरुस्तीचा खर्च हा मर्यादेपेक्षा अधिक होत असेल तर ही इमारत कलम 88 (3) (अ) अन्वये घोषित करण्यात यावी, आमदार निधीचा वापर पुनर्बांधणीसाठी हाती घेतलेल्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी करु नये अशी शिफारस केली आहे." मूळात आमदार निधीचा वापर पुनर्बांधणीसाठी करीत नाही. फेज एक, दोन व तीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ SBT/ MAP/ MHM/

श्री.मधुकर चव्हाण....

अशा फेजेस संपल्यानंतर 1200 रुपयाच्यावर मर्यादा गेल्यानंतर स्ट्रक्चरल रिपेअरिंग सोडून कॉस्मेटिक रिपेअर करावयाचे असेल तर त्याचे एस्टिमेट तयार केले जाते आणि मग रहिवाशांना पत्र दिले जाते की, आता तुमच्या दुरुस्तीचे 5 लाखाचे एस्टिमेट मंडळाकडे आलेले आहे. उदा. मंडळाचे 2 लाख शिल्लक असतील तर अतिरिक्त 3 लाख रुपये तुम्हाला द्यावे लागतील. मग ते पैसे रहिवासी किंवा आमदार देतात. आमदार निधी हा पुनर्बांधणीसाठी नाही. जी स्ट्रक्चरल रिपेअर सुध्दा आपण करु शकत नाही, जी बियाँड रिपेअरेबल आहे त्याचीच 88(3) खाली दुरुस्ती करु शकतो. आपण असे म्हटले आहे की, "मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींची दुरुस्ती हा उपाय नसून पुनर्बांधणी हाच उपाय आहे." हे मान्य आहे. ज्या इमारतीचा दुरुस्तीचा खर्च 1200 च्या वर गेलेला आहे त्याचा जास्तीचा निधी भाडेकरुंनी करावा किंवा इतर मार्गांनी न घेता अशा इमारती दुरुस्तीच्या पलिकडे 88 (3) खाली घोषित करण्यात याव्यात. अशाप्रकारच्या माझ्या माहितीप्रमाणे 8 हजार इमारती आहेत, ज्यांची 1200 रुपयांची मर्यादा संपलेली आहे. या इमारतीतील भाडेकरुंना संक्रमण शिबिरामध्ये आता जागा आहे काय ? ज्या इमारती 88 (3) च्या पुढे आहेत अशा सर्व इमारतींसाठी साधारणपणे 400 कोटी रुपये लागणार आहेत ते तुमच्याकडे आता उपलब्ध आहेत काय ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, धोकादायक इमारतींबाबत शासनाने संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत आणि ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत, ज्यांना धोका निर्माण झालेला आहे अशाच इमारतीतील लोकांना संक्रमण शिबिरामध्ये पाठविले जाते आणि त्यांची तेथे सोय केली जाते.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझ्या मूळ प्रश्नाला उत्तर दिले नाही. 88 (3) च्या पलिकडे म्हणजे 1200 रुपयांची मर्यादा संपली आहे अशी किती इमारती आहेत त्याचे उत्तर दिले नाही. ज्या तुम्ही आमदार फंडातून दुरुस्तीसाठी घेणार नाही आणि त्यांच्या दुरुस्तीसाठी लागणारा अतिरिक्त पैसा रहिवाशांकडून घेणार आहात त्याचे उत्तर दिले नाही. सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मंत्रिमहोदय तुम्ही उत्तर टाळू शकत नाही. अशा किती इमारती आहेत ? आज धोकादायक इमारती खाली कराव्या लागतील, ज्या इमारती खाली केल्या त्यांच्यासाठी संक्रमण शिबिरामध्ये जागा आहे काय ?

नंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ MHM/ KGS/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 15:00

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांना खाली केल्यानंतर त्यांना ट्रॅन्झीट कॅम्पमध्ये जागा उपलब्ध आहेत काय ? त्या इमारती त्वरित बांधण्यासाठी आपल्याकडे 400 कोटी रु. आहेत काय?

श्री. दयानंद मस्के : यासंबंधीची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : कशासाठी माहिती पटलावर ठेवता ? तेथील लोक मरतील... सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : मी निवेदन क्रमांक 2 राखून ठेवीत आहे. दिनांक 23.7.2005 रोजी मंत्री महोदयांनी पूर्ण तयारीनिशी या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : साऊथ इंडियन को.ऑप.बँक डबघाईस येणे

**मु.श** : साऊथ इंडियन को.ऑप.बँक डबघाईस येणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे व मधुकर चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे व मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी "साऊथ इंडियन को.ऑप.बँक डबघाईस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MAP/ MHM/ KGS/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 15:00

श्री. नितीन गडकरी : या साऊथ इंडियन को.ऑप. बँकेचे 70 हजार भागधारक आहेत. त्यांची फसवणूक झालेली आहे. प्रशासक नियुक्त केलेला आहे असे शासनाने सांगितलेले आहे. त्या बँकेचे अध्यक्ष श्री. राघवन सारथी यांनी स्वत: या बँकेतून बेकायदेशीर कर्ज घेतलेले आहे. दोन फ्लॅट त्यांनी मिळविलेले आहेत. या प्रकरणी बँकेचे जे संचालक आणि अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर गुन्हेगारी स्वरुपाचे खटले भरुन शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : या बँकेचे जवळपास 34 हजार सभासद आहेत. बँकेच्या अध्यक्षांनी स्वत: 50 लाख रुपये आणि त्यांच्या पत्नीच्या नावे 15 लाख रुपयांचे कर्ज घेतलेले आहे. रिझर्व्ह बँकेच्या तपासणीनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960च्या कलम 110 अे(III) अन्वये प्रशासकाची नियुक्ती केलेली असून सहकारी संस्था अधिनियम 1960च्या कलम 83 अन्वये चौकशी सुरु केलेली आहे. चौकशीमध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामधून या प्रकरणातील काही गोष्टी पुढे आलेल्या आहेत. सहकार कायद्याचे उल्लंघन करुन ज्या संचालकांनी गैरव्यवहार केला, अवैध मार्गाने प्रापर्टी जमा केली, बँकेला बुडविले त्यांच्यावर सीआरपीसी कोड प्रमाणे फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960च्या कलम 83 अन्वये चौकशी चालू आहे. चौकशीमध्ये जे निष्कर्ष निघतील आणि त्यानुसार जे दोषी आढळतील त्यांच्यावर नियमाप्रमाणे कडक कारवाई करण्यात येईल. जे दोषी आहेत त्यांना कोणीही पाठीशी घालणार नाही.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांनी अदा केलेल्या रकमेची

रिकव्हरी काढण्याचे आदेश निर्गमित करणे

**मु. शी** : समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांनी अदा केलेल्या रकमेची रिकव्हरी काढण्याचे आदेश निर्गमित करणे यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते व जी.एल.ऐनापुरे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.व्ही. यू. डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 19 जुलै,2004च्या एकाच शासन निर्णयान्वये राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना 50 टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करण्याचे शासन आदेश निर्गमित होणे, त्यानुसार विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना या शासन आदेशानुसार गेले 11-12 महिने वेतन अदा होणे, मात्र समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक 6 जून 2005 च्या पत्रान्वये अशा रीतीने अदा केलेल्या रकमेची रिकव्हरी काढण्याचे आदेश निर्गमित करणे, "पेन्शन योजना लागू नसल्याने त्यांच्या मूळ वेतनात 50 टक्के महागाई भत्ता समाविष्ट करु नये" अशी शासन निर्णयात नसलेली भूमिका विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी घेणे व ती फक्त नागपूर विभागालाच लागू करणे, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) उपाध्यक्षांनी दिनांक 4 जून 2005 रोजी किंवा त्या दरम्यान मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचेकडे ( विभागीय समाजकल्याण अधिकारी नागपूर यांचेमार्फत) सादर करुन सुध्दा याबाबत कोणतीही कारवाई न होणे, त्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

....5 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचा प्रश्न आहे. खरे म्हणजे मी माननीय मंत्री महोदयांचे आभार मानतो. हे आभार मानण्याबरोबरच त्या अधिका-यांच्याबद्दल तुमच्या काय भावना असायला पाहिजेत ? त्यांना जरा लाथाडा. 19 जुलै 2004ला राज्यातील सर्व कर्मचा-यांसाठी डीपी योजना लागू केली. ती लागू केल्यानंतर नागपूर विभागाच्या समाजकल्याण अधिका-यांनी अदा केलेल्या रकमेची रिकव्हरी करण्याचे आदेश काढले. खरे म्हणजे हे समाजकल्याण अधिकारी समाजाचे कल्याण न करता वैयक्तिक लाभ घेणारे झालेले आहेत.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे...
या विभागाचे नाव बदलवून टाकले पाहिजे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या समाजकल्याण अधिका-याने असा निर्णय घेतला की, या कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू नाही म्हणून ही डी.पी. योजना लागू करता येत नाही. समाजकल्याण अधिकारी शासनाचे जी.आर. वाचत नाहीत, पहात नाहीत. 19 जुलै, 2004 रोजी शासनाने सर्व शासकीय कर्मचा-यांसाठी जी.आर. काढला. त्यामध्ये सेवानिवृत्त कर्मचा-यांचा कुठेही उल्लेख नाही. हा जी.आर. सर्वांना लागू आहे. परंतु समाजकल्याण खात्याने ज्यांना महागाई भत्ता दिला असेल त्यांच्याकडून तो भत्ता वसूल करा. ज्या कर्मचा-यांना दिला नसेल त्यांना हा भत्ता देऊ नका. असा एका अधिका-याने फतवा काढला आणि विभागातील सर्व अधिका-यांना तो पाठवून दिला. समाजकल्याण अधिकारी हे वसुली अधिकारी झालेले आहेत. समाजकल्याण अधिकारी म्हणून राहिलेले नाहीत. 6 जून रोजी निर्णय घेतला होता त्यास आपण स्थगिती दिलेली आहे. म्हणजे आपण ही गोष्ट मान्य केलेली आहे. माझे असे म्हणणे आहे की, या समाजकल्याण अधिका-यांना विनाकारण पोसू नका. या समाजकल्याण अधिका-यांवर काही तरी कारवाई होणे आवश्यक आहे. या अधिका-यांची डिपार्टमेंटच्या माध्यमातून किंवा सी.आय.डी. मार्फत चौकशी करा. या समाजकल्याण अधिका-याने बरीच संपत्ती जमविली आहे. सदर समाजकल्याण अधिका-यांनी हा निर्णय का रद्द केला याबाबतीत समाजकल्याण अधिका-यांची विभागीय चौकशी किंवा सी.आय.डी. मार्फत चौकशी केली जाईल काय व ही कारवाई किती दिवसात पूर्ण केली जाईल ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, या ठिकाणी काही भ्रष्टाचार झाला असेल तर त्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यात येईल. परंतु आज त्या अधिका-यांची बदली करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे संबंधित अधिका-याविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, सदर अधिका-याच्या बदलीने हा प्रश्न सुटणार नाही. बदली ही काही शिक्षा होऊ शकत नाही. त्या अधिका-याने जे कृत्य केले त्याबाबतीत त्याला काही तरी शिक्षा द्या. आपण या अधिका-याची विभागीय चौकशी करणार की सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार व ही चौकशी कधी पर्यन्त पूर्ण केली जाईल? याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, संबंधित अधिका-याची डिपार्टमेंटल इन्कायरी करु आणि एका महिन्यात आत कारवाई करु. 2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रस्तुत प्रकरणामध्ये दिनांक 6 जून, 2005 च्या पत्रान्वये अशा रितीने अदा केलेली रक्कम होती ती रिकव्हरी करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. पेन्शन योजना लागू नसल्याने त्यांच्या मूळ वेतनात 50 टक्के महागाई भत्ता समाविष्ट करु नये अशी शासन निर्णयात नसलेली स्वत:च्या मतानी विक्षिप्तपणाची भूमिका समाजकल्याण विभागाच्या अधिका-याने घेतलेली आहे. आणि ती भूमिका नागपूर विभागासाठीच लागू केलेली आहे. नागपूर विभागाकरिता सरकारच्या बाहेर जाऊन, स्वत:च्या मर्जीने सरकारचे नियम असताना देखील अशा प्रकारे अधिकारी वागले आहेत हे खरे आहे काय ? अशा प्रकारे अधिकारी वागले असतील तर त्यांची केवळ बदली करुन उपयोग नाही. त्यांनी गैरकारभार केलेला आहे हे सिध्द झालेले आहे. चार गोष्टींचे इव्हीडन्सेस काढावे लागतात त्यावेळी चौकशी केली जात असते. या ठिकाणी अधिकारी अशा पध्दतीने वागले आहे हे सिध्द झालेले आहे. जर ही बाब सिध्द झालेली असेल तर अशा अधिका-यांना सर्व्हीसमध्ये ठेवणे बरोबर नाही. अशा प्रकारे वागणा-या अधिका-यांवर निलंबनाची कारवाई केली पाहिजे. ती कारवाई आपण करणार आहात काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : संबंधित अधिका-यांची सगळी माहिती विभागाकडे उपलब्ध आहे. या अधिका-यांच्या विरुध्द डिपार्टमेंल इन्क्वायरी करु आणि त्या अनुषंगाने पुढे कारवाई करु.

--------------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 15:05

**पृ. शी.** : राज्यात चोरटया प्रवासी वाहतूकीमुळे एस.टी.महामंडळास होत असलेला तोटा.

**मु. शी.** : राज्यात चोरटया प्रवासी वाहतूकीमुळे एस.टी.महामंडळास होत असलेला तोटा यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे,श्रीमती कांता नलावडे,श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यात चोरटी प्रवासी वाहतूक उघडपणे चालू असणे,राज्य सरकारने प्रत्येक खाजगी व साध्या बसगाडीमागे वर्षाकाठी 1 लाख 40 हजार रुपये कर घेऊन त्यांना सवलत देणे, परंतु एस.टी.ला मात्र प्रत्येक बससाठी शासनाला वर्षाला 2 लाख 40 हजार रुपये कर द्यावा लागणे,राज्यातील अवैध वाहतूक रोखण्याऐवजी,अवैध वाहतूकदारांना परवाने देऊन अधिकृत करण्याचे शासनाने धोरण स्वीकारणे, मोटर वाहन अधिनिकयम,1998 च्या नियम 66 व 192 (अ) अन्वये अवैध प्रवासी वाहतूक करणा-या विरुध्द गुन्हे दाखल करण्यात दिरंगाई होणे,खाजगी बस वाहतुकदारांनी एका परवान्यावर (परमीटवर) चार-चार,पाच-पाच बस चालवणे, एस.टी.महामंडळाच्या बसगाडया जेथून सुटतात तेथील दोनशे मीटर परिसरात खाजगी बस वाहतुकदारांची प्रवासी आरक्षणाची कार्यालये असणे व त्यांनी एस.टी.च्या प्रवासभाडयापेक्षा कमी भाडे आकारणे यामुळे प्रवाशांची ओढ एस.टी.ऐवजी खाजगी बसकडे असणे, परिणामत: एस.टी.महामंडळ आर्थिक तोटयात चालून अडचणीत येणे, कर्मचा-यांची कपात करावी लागणे, यामुळे एस.टी.महामंडळाचे कर्मचारी व प्रवाशांच्या मनात निर्माण झालेला संताप, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची तातडीची उपाययोजना. "

श्री.धर्मरावबाबा आत्राम ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सभागृहात निवेदन वितरीत करण्यात आलेले आहे त्यात माननीय मंत्री महोदयांना काही सुधारणा करावयाच्या आहेत काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये मी दोन-तीन प्रश्न विचारले होते ते त्या प्रश्नांची उत्तरे हेतूपुरःस्सर देण्याचे टाळण्यात आलेले आहे. महाराष्ट्रात साधारणत: 90 हजार वाहनांच्या माध्यमातून चोरटी वाहतूक होते. त्यामुळे एस.टी.महामंडळास 5 कोटी रुपयांचा भूर्दंड पडतो. खाजगी बस वाहतूकदार हे एका परवान्यावर चार-चार, पाच-पाच बसेस चालवितात या प्रश्नाचे उत्तर दिले गेलेले नाही. जेथे एस.टी. थांबा असेल किंवा आगार असेल तेथे 200 मीटरच्या परिसरात खाजगी बसेसचे कार्यालय असेल, आरक्षणाचे कार्यालय असेल अशा ठिकाणाहून खाजगी बसेसची वाहतूक होता कामा नये यासंबंधीचा खुलासा निवेदनात कुठेही केलेला नाही..

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कानडे. 3.10 वा.

लक्षवेधी सूचना क्र.2 पुढे सुरु ...

श्री. मधुकर चव्हाण ..

सभापती महोदय, खाजगी बसगाडीमागे वर्षाला 1 लाख 40 हजार रु. कर घेतला जातो मात्र एस.टी.महामंडळाला वर्षाला प्रत्येक बसमागे 2 लाख 40 हजार रु. कर द्यावा लागतो हे बरोबर नाही. दरवर्षी एस.टी.450 कोटी रुपयांचा प्रवासी कर देत आहे आणि डिझेलसाठी 350 कोटी रु. लागतात. 100 कोटी रु. चुकीच्या कर आकारणीमुळे जात आहेत. तिकीट 100 रु. असेल तर त्यावर 17.50 पै. कर आकारला जातो. म्हणजे प्रवासी 117.50 पैशाला तिकीट खरेदी करतो. माझा प्रश्न असा आहे की, एस.टी.थांब्यापासून 200 मीटरच्या परिसरात जेथे जेथे खाजगी बसेसची कार्यालये आहेत ती हटविण्याबाबत शासन त्वरित कारवाई करणार काय ? खाजगी बसेसना करामध्ये सवलत देण्याचे कारण काय ? त्याचप्रमाणे एका परमिटवर 5-5 बसेस चालविल्या जातात अशा परमिटधारकांविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, बसथांब्यापासून 200 मीटरच्या परिसरात कोणतीही वाहने उभी राहणार नाहीत. मागील दोन महिन्यापूर्वी मी स्वत: भेट देऊन 11 खाजगी गाडया पकडल्या होत्या. आता मुंबई सेंट्रल येथे खाजगी गाडया थांबत नाहीत आणि दादर येथील खाजगी बसेसचा थांबा सुध्दा हटविण्यात आला आहे. त्याठिकाणी असलेली बुकींग कार्यालये हटविण्याची कार्यवाही करु. एका परमिटवर 5-5 खाजगी बसेस चालविल्या जातात याबाबतीत शासनाकडे सूचना मिळाल्यास योग्य ती कारवाई करु. अशा प्रकारे अवैधपणे गाडया चालविल्या जात असतील तर त्या बंद करण्यास सरकार मागेपुढे पाहणार नाही. खाजगी बसेसना 1 लाख 40 हजार आणि एस.टी.बसेसना 2 लाख 40 हजार रु. कर आकारणी केली जाते असे मा.सदस्यांनी सांगितले. ही कर आकारणी राज्य सरकारच्या माध्यमातून केली जाते.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, एस.टी.ची वाहतूक आणि खाजगी वाहतूक यामध्ये फरक आहे. एस.टी.ही टप्पा वाहतूक करणारी यंत्रणा आहे. तर खाजगी वाहतूक ही अवैध वाहतूक असून टूरीझम क्लॅन्डेरस्टाईल आहे. खाजगी वाहतूकदार सुध्दा पूर्णपणे टप्पा वाहतूक करतात. चोरटी आणि अवैध वाहतूक हा वेगळा विषय आहे. एस.टी.महामंडळाची वाहतुकीमध्ये मक्तेदारी आहे. परंतु लक्षवेधी सूचनेवरील निवेदन पाहिले तर त्यामध्ये शासनाने कबूल केले आहे की राज्यामध्ये अवैध वाहतूक दिवसेंदिवस वाढते आहे. सोलापूर जिल्हयामध्ये 500 खाजगी गाडया आहेत आणि

.....2



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 2 पुढे सुरु...

श्री. अरविंद सावंत ....

5000 रुपयांचा हप्ता आहे. खाजगी वाहतूकीवर मात करावयाची असेल तर महामंडळातील गाडयांचा ताफा वाढविणे आवश्यक आहे. सध्या महामंडळाकडे एकूण बसेस किती आहेत ? गाडयांचा ताफा वाढविण्यास कोणाची मनाई आहे काय ? सभापती महोदय, अवैध वाहतुकीच्या बाबतीत बुलढाणा जिल्हयामध्ये जिल्हाधिकारी,पोलीस आणि एस.टी.महामंडळ यांच्या माध्यमातून कारवाई केली गेली. त्यामुळे एस.टी.महामंडळाचा हा विभाग कोटयवधी रुपयांच्या फायद्यामध्ये आला. म्हणजे अवैध वाहतूक थांबविली तर एस.टी.फायद्यात येईल. बुलढाणा जिल्हयामध्ये ज्याप्रमाणे अवैध वाहतूकीच्या बाबतीत कारवाई केली गेली तशीच कारवाई महाराष्ट्रातील इतर जिल्हयांमध्ये शासन करणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम : या राज्यात जवळजवळ पाच अशा प्रकारचे डेपो आहेत की त्या ठिकाणी आपण सांगितल्याप्रमाणे कारवाई करण्यात आली असून त्यामुळे आपला निश्चितपणे फायदा झाला आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे त्याबाबतीत मी त्यांना असे सांगू इच्छितो की, एस.टी.महामंडळाच्या एकूण 16 हजार गाडया आहेत.त्यापैकी ज्या गाडयाना दहा बारा वर्षे झालेली आहेत अशा गाडयांऐवजी दुस-या नवीन गाडया खरेदी करण्यात येतात.

**(सभापती स्थानी : माननीय उपसभापती )**

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराला माझी हरकत आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयानी उत्तर देतांना आताच असे सागितले की एस.टी.महामंडळाकडे एकूण 16 हजार गाडया आहेत त्यातील दहा बारा वर्षे झालेल्या गाडयांऐवजी दुस-या नवीन गाडया खरेदी करण्यात येतात. केन्द्र सरकारच्या आर.टी.ओ. कार्यालयाकडून आपल्याला असे सांगण्यात आलेले आहे की, नवीन गाडयाचा ताफा वाढविण्यात येऊ नये .या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की एस.टी.महामंडळ मिनी बसेस घेऊन प्रवाशांची वाहतूक करु शकते. ब-याच वेळा असे दिसून येते की 50.-60 सीटसच्या गाड्यांमध्ये प्रत्यक्षात 10-12 प्रवाशी बसलेले असतात तेव्हा त्या ठिकाणी मिनी बसेस आपण सुरु ठेवू शकतो तसेच काही ठिकाणी कंडक्टर्सशिवाय बस वाहतूक चालू ठेवू शकतो.तेव्हा प्रयोग म्हणून अशी बस सेवा चालू करण्यात येणार आहे काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : गाड्यांचा ताफा वाढविण्याच्या संदर्भात मी काहीच बोललो नाही.एस.टी.महामंडळाकडे एकूण 16 हजार गाडया आहेत . सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केन्द्र सरकारच्या आर.टी.ओ. कार्यालयाचा उल्लेख केलेला आहे. तेव्हा त्याबाबतीत मी आणखी काय उत्तर देणार ? एस.टी.महा मंडळाकडील ज्या गाडयांना दहा - पंधरा वर्षे झाली आहेत त्या गाडया राईट ऑफ करुन त्या ऐवजी नवीन गाडया खरेदी करण्याचा राज्य सरकार व एस.टी.महामंडळ विचार करीत आहे.

श्री.विनोद तावडे :एस.टी.महामंडळ वेगवेगळया प्रकारचे कर आकारत असते. महाराष्ट्रामध्ये 17.5 टक्के कर आकारला जातो. बाकीच्या राज्यामध्ये फक्त 10 टक्के कर आकारण्यात येत असतो. या संदर्भात महाराट्र टाईम्समध्ये एक बातमी आली होती ती आपण वाचली असेल असे मला वाटते. या बाबतीत मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

की, जो कर आकारला जातो तो प्रवासी भाडे वाढवून एस.टी.महामंडळ घेत असते हे खरे आहे काय ? त्यामुळे हा कर 17.5 टक्के एवढा न आकारता 21 टक्के आकारला जातो हे खरे आहे काय ? आणि हा कर कमी करण्यात येणार आहे काय ? सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले प्रश्न महत्वाचे आहेत. कोकणामध्ये प्रवासी वाहतूकीचा भार असतांनासुध्दा ते रुटस बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्या भागातील विद्यार्थ्याचे नोकरदार व्यक्तीचे, बाजारासाठी दुस-या गावाला जाणा-यांचे हाल होत आहेत .तेव्हा या संदर्भात तपासणी करुन हे बंद करण्यात आलेले रुटस पुन्हा चालू करण्यात येणार आहेत काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : आज 17.5 टक्के कर घेण्यात येत असून त्यामध्ये सुधारणा करता येणार नाही.

श्री.अरविंद सावंत : त्यात सुधारणा का करता येणार नाही ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : एस.टी.महामंडळाकडून राज्य शासनाला महसूल मिळत असल्यामुळे हा कर कमी करण्यास राज्य सरकार तयार नाही. सिंधुदूर्ग जिल्हयातील काही गाडया बंद करण्यात आल्याचे सन्माननीय सदस्यांनी सागितले आहे. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, एकूण 1500 शेडयूल तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आलेले आहेत. पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोबर महिन्यापासून तातडीने हे रुटस पुन्हा सुरु करण्यात येणार आहेत . हे रुटस सुरु करण्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर हे रुटस सुरु करण्याच्या बाबतीत एखाद्या भागात पाठपुरावा करण्यात येईल.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा होता की, प्रवासी करा पोटी प्रत्येक प्रवाशाकडून साडेसतरा टक्के कर वसूल होतो., म्हणजे 100 रुपये तिकीट असेल तर त्यावर साडेसतरा टक्के कर याप्रमाणे एकूण 117.50 रुपये इतके प्रवाशांकडून भाड्यापोटी घेतले गेले पाहिजेत त्याऐवजी ते तिकीट 117.50 रुपये आहे असे समजून त्यावर कर आकारला जातो आणि त्यामुळे प्रत्यक्षात 21 टक्के पेक्षाही जास्त कर होतो. ही वस्तुस्थिती आहे काय ? ही वस्तुस्थिती आहे हे मान्य असेल तर अशा प्रकारे कर आकारणी न करता केवळ तिकीटाच्या 100 रुपयावरच कर आकारला जाईल का ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आपण एकंदर बसचे उत्पन्न आहे त्याप्रमाणे साडेसतरा टक्के कर आकारतो, 21 टक्के प्रमाणे आपण कर आकारीत नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आताच या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, 16 हजार गाड्या राईट ऑफ वगैरे करून रिप्लेस केल्या जाणार आहेत. ...

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मी असे सांगितले आहे की, आपल्याकडे एकंदर 16 हजार गाड्या आहेत आणि त्यापैकी ज्या गाड्या 10-15 वर्षे जुन्या झालेल्या आहेत त्या रिप्लेस केल्या जाणार आहेत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी एक चिंता व्यक्त केली आहे की, खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या ज्या काही प्रवासी-गाड्या आहेत त्यांचे प्रमाण वाढल्यामुळे एस.टी.चे उत्पन्न कमी होऊन एसटी महामंडळ तोट्यामध्ये आले. अशा परिस्थितीमध्ये खाजगी बस वाहतूक करणारे जे वाहतूकदार आहेत वा वाहतूकदार संस्था आहेत त्यांच्यामध्ये स्पर्धा निर्माण झालेली आहे. त्या स्पर्धेमध्ये आमची एसटी देखील चांगल्या प्रकारे मुकाबला करू शकेल या दृष्टीने आपल्या एसटी मध्ये काही सुधारणा करण्याच्या योजना महामंडळाकडे आहे का? कारण आपल्यापैकी किती सदस्य एसटी तून प्रवास करतात याची मला माहिती नाही, पण जेथे रेल्वे जात नाही तेथे मी एसटी मधूनच प्रवास करीत असतो. तेव्हाचा माझा अनुभव असा आहे की, एसटीच्या हॉर्न व्यतिरिक्त एसटी बसेसच्या इतर भागांचाच आवाज अधिक असतो. शिवाय प्रवाशांनाही आरामदायी आसने नसतात. तेव्हा एकूणच प्रवाशांच्या दृष्टीने चांगल्या सोयींनी युक्त अशा बसेस महामंडळाकडून रस्त्यावर येतील या दृष्टीने एसटी महामंडळामध्ये सुधारणा होणार आहे का ?

..... सीसी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आपण ज्या 10-12-15 वर्षांच्या जुन्या गाड्या काढून नवीन गाड्या घेणार आहोत त्यामध्ये वॉल्व्हो सारख्या तसेच ए.सी.गाड्या देखील महामंडळ खरेदी करणार आहे. त्या गाड्या महामंडळाकडून जेव्हा रस्त्यावर येतील तेव्हा आज एसटी संबंधातील आपल्या ज्या भावना आहेत त्या तशा न राहता एस.टी.मध्ये चांगला बदल झालेला आपणास पहावयास मिळेल हे मी खात्रीने सांगू इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एसटी म्हणजे महाराष्ट्राच्या श्वासनलिका आहेत तेव्हा आपण अशा प्रकारे त्यांना गुदमरून मारू नका. सभापती महोदय, माझे या ठिकाणी दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत. एक म्हणजे आपण या ठिकाणी जे निवेदन केलेले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, 'राज्यातील अवैध प्रवासी वाहतुकीस आळा घालण्याकरिता ...' म्हणजे निदान या अवैध वाहतुकीस आळा घालण्याची आपली मानसिकता तरी आहे., तर पुढे म्हटले आहे की, '....व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे बुडणारे उत्पन्न वाचविण्याच्यादृष्टीने शासनाने क्रमांक : एसटीसी-3498/27/1/परि.1., दिनांक 20.3.1999 च्या निर्णयान्वये मोटार वाहन विभाग व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे अधिकारी असलेल्या संयुक्त तपासणी पथकांची निर्मिती करून त्या नुसार तपासणीची कार्यवाही चालू केलेली आहे.' म्हणजे ही अवैध प्रवासी वाहतूक बंद करावी म्हणून हे परिपत्रक काढलेले आहे आणि मागील पानावर आपण असे म्हटले आहे की, '... राज्य परिवहन प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या डेपो पासून 200 मीटरच्या परिसरात राज्य परिवहन उपक्रमाची वाहने वगळता इतर खाजगी वाहने प्रवासी घेण्यास व उतरविण्याकरिता उभी करण्यास मनाई केलेली आहे.' म्हणजे डेपो पासून 200 मीटरच्या बाहेर आपण हे करू शकता. तेव्हा नेमके कोणते वाक्य यातून घालवायचे आहे ते आपण ठरवा. नवीन उपाध्यक्ष आल्यानंतर अनेक रूटस् बंद केले. आता एसटी तोट्यामध्ये जाते आहे ती परिस्थिती सुधारावयाची कशी ? अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांबरोबर हातमिळवणी करून काही रूट बंद करण्याने काही आपली परिस्थिती सुधारणार आहे का ? आपले नवीन उपाध्यक्ष जे कोणी आलेले आहेत त्यांच्या मेंदूतून हा नवीन प्रकार आलेला आहे. ....

( यानंतर श्री.जागडे ..... डीडी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

या संबंधात माननीय मंत्रिमहोदय कोणती दक्षता घेणार आहेत ? अशा प्रकारे रुट बंद करणार असाल तर ते बरोबर नाही. अवैध वाहतूक बंद केल्यानंतरच एस.टी. चा महसूल वाढणार आहे. तेव्हा हा जो महमद तुघलकी कारभार चालला आहे, त्याबद्दल माननीय मंत्रिमहोदयांना काय म्हणावयाचे आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, एस. टी. स्टँडच्या 200 मीटरच्या परिसरात कोणत्याही खाजगी गाड्या उभ्या राहणार नाहीत. ज्यांच्याकडे परमीट आहे, अशा गाड्या 200 मीटरच्या पुढील परिसरात उभ्या राहतील. एस. टी. स्टँडच्या 200 मीटरच्या परिसरात कोणत्याही खाजगी गाड्या उभ्या राहणार नाहीत, याबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. आता आपण 1503 शेंड्युल्स तात्पुरत्या स्वरुपात बंद केले आहेत. जसजशी मागणी येईल, त्याप्रमाणे हे मार्ग सुरु करण्यात येतील.

**उपसभापती** : ठीक आहे. ही लक्षवेधी सूचना संपली आहे. लक्षवेधी सूचना क्र. 3 पुढे ढकलण्यात आली आहे.

--

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शहरी भागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना प्रतिवर्षी 500 रुपयाचा लावलेला व्यवसाय कर.

मु. शी : शहरी भागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना प्रतिवर्षी 500 रुपयाचा लावलेला व्यवसाय कर यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, दीपक सावंत, विलास अवचट, अरविंद सावंत, रणजितसिंह मोहिते-पाटील, विनायक मेटे, प्रा. फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.सदाशिवराव पोळ, वि.प.स. यां-ी दिलेली लजवेधी सूच-ा.

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वा निर्वाचित ) : अध्यज महोदय, मी आपल्या अ-ुमती-े -ियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वज-िज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-ीय. वित्त मंत्र्यांचे लज वेधू इक्च्छतो आजि त्याबाबत त्यां-ी -िवेद-ा ज्रावे, अशी वि-ंती ज्रतो.

" राज्याच्या मुंबई,पुणे, नाशिक, नागपूर, अकोला, अमरावती, औरंगाबाद आदि शहरी भागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना प्रतिवर्षी ५०० रुपयांचा लावलेला व्यवसाय कर, सदर व्यवसाय कर भरण्याबाबत विक्रीकर विभागाने काढलेले आदेश, गृहनिर्माण संस्थामधील सदनिकाधारक सदनिका खरेदी करण्यासाठी वित्त संस्थाकडून कर्ज घेत असून त्यांचे पगारातून हप्ते कापले जाणे, गृहनिर्माण संस्था हा व्यवसाय अथवा उद्योग नसून देखभालीकरिता ठराविक रक्कम सभासदाकडून वसूल करुन साफसफाई, छोटी दुरुस्ती पालिकेचा मालमत्ता कर, विज बिल, इत्यादी कर सेवाकरांत भागवित असणे, विक्रिकर विभाग सहकारी गृहनिर्माण संस्था फ्लॅट विक्रिद्वारे ट्रान्सफर फी घेत असल्याचा करीत असलेला दावा, गृहनिर्माण संस्थामधील गाळयाची विक्री ५-१० वर्षातून एखादेवेळी होत असता त्या आधारे ५०० रुपयांचा लावलेला कर, परिणामी आधीच डबघाईस आलेल्या गृहनिर्माण संस्थांमधील गाळेधारकांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, शासनाने सदर व्यवसाय कर तात्काळ मागे घेण्याबाबत होत असलेली मागणी, शासनाने याबाबत केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ( वित्त मंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूच-नेसंबंधीच्या निवेद-नाच्या प्रती मा-न-नीय सदस्यां-ना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेद-न आपल्या अ-नुमती-ने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेद-न सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेद-न

( प्रेस : येथे सोबतचे निवेद-न छापावे. )

.... 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात जवळ जवळ 27 हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. सरकारने या बाबत जी कायद्यात तरतूद केली आहे, त्यामुळे या सर्व सहकारी संस्थांच्या पदाधिका-यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या सर्व गृहनिर्माण सहकारी संस्थांकडून प्रतिवर्षी 500 रुपये व्यवसाय कर घेण्यात येणार आहे काय ? मी माझ्या लक्षवेधी सूचनेमध्ये असा उल्लेख केला आहे की, गृहनिर्माण संस्थामधील सदनिजाधारज सदनिजा जरेदी करण्यासाठी वित्त संस्थाकडून कर्ज घेत असून त्यांचे पगारातून हप्ते कापले जाणे, गृहनिर्माण संस्था हा व्यवसाय अथवा उद्योग नसून देखभालीकरिता ठराविक रक्कम सभासदाकडून वसूल करुन साफसफाई, छोटी दुरुस्ती पालिकेचा मालमत्ता कर, विज बिल, इत्यादी कर सेवाकरांत भागवित असणे, विक्रिकर विभाग सहकारी गृहनिर्माण संस्था फ्लॅट विक्रिद्वारे ट्रान्सफर फी घेत असल्याचा करीत असलेला दावा, गृहनिर्माण संस्थामधील गाळयाची विक्री ५-१० वर्षातून एखादेवेळी होत असता त्या आधारे ५०० रुपयांचा लावलेला कर हा यामध्ये महत्वाचा मुद्दा आहे. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले आहे, ते " नरो वा कुंजरोवा " असे आहे. तरी माननीय मंत्रिमहोदययाबाबतचे स्पष्टीकरण करतील काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, ज्या गृहनिर्माण संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत त्यातील ज्या संस्था या संस्थेचा लाभ बाहेरच्या लोकांना देत आहेत, अशा सहकारी गृहनिर्माण संस्था हा व्यवसाय कर लागणार आहे. एखाद्या गृहनिर्माण संस्थेने एखादा व्यवसाय सुरु केला आहे आणि तो व्यवसाय स्वत:साठी वापरत आहे, त्यांना हा व्यवसाय कर लावलेला नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी मोघम उत्तर दिले आहे. या बाबत अधिक खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी केला तर बरे होईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी या बाबत एक उदाहरण देणार आहे. आमदारांची वरळीला सोसायटी आहे. त्या सोसायटीने शॉपिंग सेंटर सुरु केले, तर त्या सोसायटीला हा कर लागेल, परंतु प्लॅट धारकांना हा कर लागणार नाही, असे माननीय मंत्रिमहोदयांना म्हणावयाचे आहे काय ?

श्री. जयंत पाटील : गृहमिर्माण संस्थेने बाहेरच्यांना आपली जागा व्यवसाय करण्यासाठी वापरण्यास दिली तर त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला हा व्यवसाय कर लागणार आहे. मी या बाबत उदाहरण देतो. एखाद्या सोसायटीने स्विमींग पूल बांधला आणि त्याचा वापर सोसायटीच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

बाहेरील लोकांना करण्यास दिला, तसेच बाहेरच्या लोकांकडून काही सर्विस चार्ज घेतला तर अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेला हा व्यवसाय कर लागणार आहे. ज्या संस्था व्यवसाय करणार नाहीत, त्यांना व्यवसाय कर लावलेला नाही. अशा संस्थांना हा व्यवसाय कर लावण्यात येणार नाही.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

अलिकडच्या काळात सोसायटयांना काढलेल्या नोटीसांबाबत त्यांनी स्पष्टीकरण दिले की, आम्ही कोणत्याही बिझिनेसमध्ये इन्व्हॉल्व्ह नाही. तसे असेल तर त्याची शहानिशा केल्यानंतर या सर्व केसेस क्लिअर होतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एखादी सहकारी संस्था निर्माण होत असतांना त्या ठिकाणी एखाद्या बँकेला गाळा दिला जातो. कारण मराठी माणसाची ती सोसायटी असेल व त्यांच्याकडे आवश्यक तो निधी नसेल तर त्या निधीची व्यवस्था करण्यासाठी त्या सोसायटीमध्ये सहकारी बँकेला गाळा देऊन ती बँक त्या ठिकाणी कार्यरत केली जाते. व बँकेने केलेल्या मदतीवर ती सोसायटी उभी केली जाते. तेव्हा संस्थेला आर्थिक मदत व्हावी म्हणून त्या ठिकाणी बँक चालू केली जात असेल तर त्या संस्थेलाही व्यवसाय कर लागू होईल काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, असे जे व्यवहार होत असतात त्यामध्ये बँकेकडून अगोदर भाडयाचे पैसे ॲडव्हान्समध्ये घेऊन व ती मालमत्ता उभी करुन त्यातील काही भाग कायम स्वरुपी बँकेला द्यायचा. तेव्हा भाडे घेणे हा कमर्शिअल ट्रँझॅक्शनचा भाग आहे. त्या ठिकाणी टॅक्स इमिजिएट एक्झिस्टन्सेसमध्ये येतो. Commercial activities done by the Society comes under the purview of the Professional Tax.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी चांगले उत्तर दिले आहे. परंतु मला एक शंका आहे त्याबाबत मी विचारतो. एखाद्या महिलेने सोसायटीमध्ये ब्युटी पार्लर सुरु केला किंवा एखादा गृह उद्योग सुरु केला तर ती बाब व्यवसाय करामध्ये येईल काय?

श्री. जयंत पाटील : तो त्या महिलेचा व्यवसाय असेल, सोसायटीचा नाही.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचनेसंबंधी.**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आजच्या कामकाजाच्या क्रमातील तिसऱ्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचनेबाबत आपण कोणता निर्णय घेतला आहे?

**उपसभापती** : संबंधित मंत्रिमहोदयांनी केलेल्या विनंतीनुसार सदरची लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील खाजगी, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, आश्रमशाळा, माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची पूर्तता न होणे.

**मु.शी.**: राज्यातील खाजगी, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, आश्रमशाळा, माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची पूर्तता न होणे यासंबंधी स□मा□□□य सदस्य सर्वश्री. व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल. अैनापुरे, वि.प.स. यां□ दिलेली लजवेधी सूच□.

श्री. व्ही. यु.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ □ियम 101 अ□वये पुढील तातडीच्या व सार्वज□ि ज महत्वाच्या बाबीज डे स□मा□□□य शालेय शिक्षण मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां□ □िवेद□ ज रावे, अशी वि□ंती ज रतो.

"राज्यातील जाजजी, जिल्हा परिषद, □जर पालिज ा, महा□जर पालिज ा, आश्रमशाळा, माध्यमिज /उच्च माध्यमिज शिजज व शिजजेत्तर ज र्मचाऱ्यांच्या माजज्याबाबत परिपूर्ती □ होजे,मिडलस्जूल शिजज ांची सुधारित वेत□श्रेजी, वि□ अ□ुदा□ित शाळेतील सेवाज ाळ वरिष्ठश्रेजीसाठी ज्राहय धरजे, थजीत वेत□तर अ□ुदा□, आदिवासी विभाजातील □िज षपात्र शाळा व वर्ज 5 ते 12 वी च्या वर्ज तुज डयांचे अ□ुदा□,24 □ोव्हेंबर,2003 चा शास□ □िर्जय रद्द ज रजे, चिपळूजज र अहवालाप्रमाजे शिजजेतर ज र्मचारी संज्या □िर्धारज ज रजे व शिजजेतर ज र्मचारी भरतीबंदी उठविजे, जिल्हा परिषदेज डील उच्च माध्यमिज शिजज ां□ शालेय शिजज ांप्रमाजे सुधारित वेत□श्रेजी मंजूर ज रजे, □जर परिषद व महा□जर पालिज ातील शिजज ां□ वैद्यजीय जर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास सवलत योज□ लाजू ज रजे, आश्रमशाळांतील शिजज ांच्या विविध माजज्यांची पुर्तता झ ालेली □सजे, यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिज शिजज महामंडळा□ दि□ांज 2 जुलै,2005 रोजी राज्यातील सर्व शिजजाधिज ारी ज ार्यालयासमोर ज ेलेले धरजे आंदोल□, शास□च्या अडेल धोरजामुळे राज्यातील शिजज ात □िर्माज झालेला असंतोष, याबाबत शास□□ ज ेलेली वा ज रावयाची ज ारवाई."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यु. डायगव्हाणे : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात व संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षक, विद्यार्थी आणि मॅनेजमेंटच्या दृष्टीकोनातून ही लक्षवेधी सूचना विचारण्यात आली आहे. त्यादृष्टीने या लक्षवेधी सूचनेमध्ये अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत.आणि त्या संदर्भात शासनाने घेतलेल्या चांगल्या निर्णयाबद्दल शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. यामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाने दिनांक 2 जुलै 2005 रोजी राज्यव्यापी आंदोलन केले आहे. प्रश्न असा आहे की, या नॉन सॅलरी ग्रँटच्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे? याठिकाणी सन 2004-05 या आर्थिक वर्षात रु. 242 कोटी एवढे नॉन सॅलरी अनुदान वितरीत करण्यात आले आहेत...

**उपसभापती** : शासनाने आपणास आज गुरुदक्षिणा दिलेली आहे.

श्री. व्ही. यु. डायगव्हाणे : सभापती महोदय, आज गुरुपोर्णिमा आहे.आपण आम्हाला गुरुस्थानी आहात. तेव्हा प्रश्न असा आहे की, वेतनेतर अनुदान दिले नाहीतर ग्रामीण भागामध्ये व शहरी भागामध्ये शाळा उभ्या रहाणार नाहीत. गेल्या तीन वर्षापासून नॉन सॅलरी ग्रँट किती थकित आहे? या वर्षी आपण 42.91 कोटी दिले आहेत, एवढयाने भागणार नाही. तीन वर्षाचे 233 कोटी रुपये थकित आहेत, त्यामध्ये 42.91 कोटी वजा करुन उरलेला निधी या वर्षी देणार काय? देणार असाल तर कोणत्या पध्दतीने देणार आहात, त्याचे नियोजन केले आहे काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, आज गुरुपोर्णिमा आहे. आणि आपण जाणीवपूर्वक उल्लेख केल्याप्रमाणे गुरुदक्षिणा देणे गरजेचे आहे. मी आपणास नम्रपणे सांगतो की, ही लक्षवेधी सूचना पूर्ण राज्याच्या दृष्टीने व्यापक अशी आहे. जवळ जवळ पाऊण डझन प्रश्न या लक्षवेधी सूचनेमध्ये आहेत. अशाप्रकारे सर्व समावेशक लक्षवेधी सूचना आहे. मी माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी दररोज अनेक लक्षवेधी सूचना किंवा प्रश्न आणण्यापेक्षा अशाप्रकारे अडीच तासाची चर्चा घेतली तर सर्व प्रश्न सुटतील. त्यांची पहिली मागणी सुधारीत वेतनश्रेणी व निवड श्रेणी बाबतची आहे. परंतु त्यांचा मुख्य प्रश्न हा वेतनेतर अनुदान देण्याबाबतचा आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके . . . .

तर 276 कोटी वेतनेतर अनुदान देणे बाकी आहे. आपल्या म्हणण्याप्रमाणे हे अनुदान 233 कोटी रुपये आहे, त्यापैकी 42 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. बाकीचे देणे बाकी आहे. वेतनेतर अनुदान निश्चितपणे टप्याटप्याने देणार आहात का ? यासाठी टाईम बाऊंड प्रोग्रॅम करणार करणार आहात का ? असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. याबाबतीत स्पष्ट बोलावयाचे तर शासनाने यापूर्वीच निर्णय घेतला आहे की, वेंतनेतर अनुदान देणे योग्य होईल किंवा कसे ? याबद्दल शासन निश्चितच विचाराधीन आहे. तरीही वेतनेतर अनुदान नाकारणे म्हणजे त्या शैक्षणिक संस्था इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हल्पमेंटच्या दृष्टीकोनातून डबघाईस येऊ नयेत, कारण तेथे शाळेची इमारत ग्राऊंड,लॅबोरेटरीज, लायब्ररी,स्टाफ इ.गोष्टी असावयास पाहिजे आणि या गोष्टी म्हणजे शिक्षणाच्या युनिक पार्टस् आहेत. म्हणून याबाबतीत शासन निश्चितपच योग्य तो विचार करणार आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, शासन योग्य तो विचार करणार आहे म्हणजे हे अनुदान न देण्यासारखाच भाग आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, याबाबतीत सन्माननीय सदस्यांच्या बरोबर विचार करुनच निर्णय घेऊ.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, तीन वर्षापासून थकीत रक्कम द्यावयाची आहे हे मान्य केले आहे. आपण हे देखील मान्य केले की, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून हे आवश्यक आहे. हे सर्व मान्य करुनही आपण 276 कोटी रुपयांपैकी 42 कोटीची प्रोव्हीजर करणे योग्य नाही. तेव्हा हिवाळी अधिवेशनामध्ये यातील 50 टक्के रकमेची तरतूद केली जाईल का ? याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी ठोसपणे सांगावे. सभापती महोदय, आपण संरक्षण द्यावे. माननीय सभापतींनी सांगितले, त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांनी फक्त भाषण केले. पण यासंबंधात ठोस उत्तर दिलेले नाही. गुरुपोर्णिमेच्या निमित्ताने मी सर्व गुरुंना नमन करतो. माननीय मंत्री महोदय, आपणही प्राध्यापक आहात, होते. तेव्हा आपण प्राध्यापकांच्या, विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी काहीतरी गुरुदक्षिणा द्यावी अशी आपल्याला विनंती आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, ज्ञानेश्वरीच्या 12 व्या अध्यायातील 8 व्या ओळीमध्ये सांगितले आहे की,"ही गुरुची कल्पकता, गुरुची क्रिएटीव्हीटी, गुरुची प्रतिभा . . . . जो साधक तोच माऊली, इथे सारस्वत तुझ्या पाऊली." मुलांच्या विविध कल्पनांना, गुणवत्तेला ख-या

. . . .2 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके . . . .

अर्थाने चालना देणे, प्रेरणा देणे हे गुरुचे काम आहे. याबाबतीत ज्या ज्या योजना हाती घेतल्या, त्याला संपूर्ण महाराष्ट्राने हातभार लावला. यामध्ये गुरुजनांचा फार मोठा वाटा आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांचा आदर बाळगून सांगेन की, 276 कोटी पैकी यावर्षी 42-43 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब म्हणाले होते. संपूर्ण राज्याच्या इतिहासात पहिल्यांदा साडेअडीचशे कोटीची तरतूद, सन्माननीय सदस्यांनी 28 तारखेला प्रश्न विचारला होता की, आपण शब्द दिलेला आहे, तो पाळाल की नाही ? तेव्हा माननीय वित्तमंत्र्यां सोबत अक्षरश: . . .

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय, गुरुदक्षिणेचे काय ते सांगा.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, 98 पासूनची रक्कम दिली .

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, 276 कोटी पैकी 43 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबाबतीत टाईम बाऊंड प्रोग्रॅम कसा आखावा याचे निश्चितपणे नियोजन केले जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, निवेदनात म्हटल्याप्रमाणे शिक्षकेतर कर्मचा-यांचा सुधारीत आकृतीबंध विहित करण्याबाबतचा प्रस्ताव उच्चस्तर सचिव समितीच्या मान्यते साठी सादर करण्यात आला होता. हा जो आकृतीबंध लादला आहे, त्यामुळे महाराष्ट्रातील 40 हजार शिक्षकेतर कर्मचारी बेकार होणार आहेत. त्यामुळे हा सुधारीत आकृतीबंध रद्द करावा आणि पूर्वीप्रमाणे चिपळूणकर आयोगाप्रमाणे ठेवण्यात यावा. तसे ठेवण्यात येणार आहे का ? असा माझा प्रश्न आहे. तसेच मिडल स्कूल शिक्षकांना केंद्र शासनाच्या शिक्षकांना सुधारीत वेतन लागू करण्याचा प्रश्न होता. त्याबाबतीत वेतन समितीच्या निर्णयाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे उत्तर दिले आहे. ही कारवाई किती दिवसात पूर्ण करण्यात येईल ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी शिक्षकेतर कर्मचा-यांचा सुधारीत आकृतीबंधांच्या संबंधातील पहिली शिफारस चिपळूणकर समितीची आणि कोकणे समिती. सन्माननीय सदस्यांना अशी भीती आहे की, या सुधारीत आकृतीबंधामुळे 40 हजार कर्मचारी घरी बसणार आहेत. पण जे नोकरीत आहेत, त्यांना 100 टक्के संरक्षण राहील. पण चिपळूणकर समिती आपल्याला मान्य आहे. कोकणे समितीने दिलेला अहवाल आपल्याला मान्य नाही आणि चिपळूणकर समितीने दिलेला अहवाल अतिरिक्त आहे. यामध्ये सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्यांदा तो अमान्य केला होता, पण आम्ही आग्रही भूमिका घेऊन तो मान्य केला आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.वसंत पुर्के (पुढे सुरु...

माझी विनंती आहे की, आकृतीबंध खरेच अन्यायकारक वाटत असेल तर सनदशीर मार्गाने त्याबाबत भूमिका मांडायला हरकत नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्याबाबत आकृतीबंध सादर झालेला आहे, तो स्वीकारावा, त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या तर त्याबाबतीत आग्रही भूमिका घेऊन त्या त्रुटी दूर करता येतील.

श्री.शरद पाटील : मंत्री महोदयांनी अशी अपेक्षा व्यक्त केली की, संस्थाचालकांनी शाळांसाठी इमारती सुसज्ज अशा बांधव्यात, 5 एकर क्रिडांगणासाठी जागा ठेवावी, प्रयोग शाळा असावी, संगणक लॅब, ग्रंथालय असावे अशाप्रकारे सुविधा संस्था चालकांनी निर्माण कराव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संस्था चालकांची ही जबाबदारी असेल तर शासनाने हे थकित वेतनेतर अनुदान देण्याबाबत शासनाचीही जबाबदारी आहे ती पार पाडली जाणार आहे काय ? थकित अनुदानाची रक्कम रक्कम मार्च 2006 पर्यन्त तरी दिली जाईल काय ?

प्रा.वसंत पुर्के : थकित वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात मी स्वतःच गव्हर्नमेंटच्या वतीने जबाबदारी म्हणून हा विषय कॅबिनेटसमोरदेखील मांडणार आहे. परवा सांगलीला एन.डी.पाटील साहेबांबरोबर एक बैठक झाली. त्यावेळेस वेतनेतर अनुदान नाकारता येत नाही. याबाबत तोडगा काढण्याच्यादृष्टीने आपल्याबरोबर एक बैठक घेऊन निश्चित निर्णय घेऊ.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : मंत्री महोदयांनी एकाही प्रश्नाचे उत्तर पॉझिटिव्ह दिलेले नाही. शाळांच्या निकषाच्या संबंधातील यादी 15 ऑगस्टपर्यन्त तपासणार आहात, ती यादी तरी 30 सप्टेंबरपर्यन्त जाहीर करणार आहात काय ?

प्रा.वसंत पुर्के : मी लेखीच मान्य केलेले आहे. कधी नव्हे तेव्हा 5,500 तुकडया दिल्यानंतर मूल्यांकन होत नाही, ते निश्चित केलेले आहे. त्यांच्याबाबतीत 15 ऑगस्टपर्यन्त सगळी यादी मागवून मान्यता देण्याच्यासंबंधात, 15 दिवसामध्ये ती यादी जाहीर करु.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ. शी.** :मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची क्षमता वाढविणे.

**मु. शी** :मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची क्षमता वाढविणे यासंबंधी श्री.मुझफ्फर हुसेन, डॉ.एम.ए.अझिज, डॉ.एन.पी.हिराणी, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती सुधा जोशी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील अल्पसंज्यांजांच्या उन्नतीसाठी व विजासासाठी मौला-ा आझाद अल्पसंज्यांज आर्थिज विजास महामंडळ स्थाप-ा जरज्यात येजे, या महामंडळामार्फत बेरोजजार युवजां-ा व्यवसायासाठी जर्जाची उपलब्ध जरु-ा देज्यात आलेली योज-ा, या योज-ेला 2002 ते 2005 या जालावधीत शास-ा-े महामंडळाला सुमारे 32 जोटी रुपये तसेच जेंद्र शास-ाच्या राष्ट्रीय अल्पसंज्यांज विजास व वित्त महामंडळाजडू-ा सुमारे 23 जोटी रुपये मिळू-ा हया महामंडळाजडे सुमारे 55 जोटी रुपये जर्ज उपलब्ध असता-ाही सुमारे 16 जोटी रुपये वाटप जरज्यात येजे, बाजी असलेले 39 जोटी रुपये वाटप जरज्यात -ा येजे, लाभार्थींचे अर्ज प्रलंबित असता-ाही जर्ज वाटप -ा होजे, जर्ज वाटप -ा होज्यामाजे जर लाभार्थींच्या अर्जामधील त्रुटी असतील तर त्यां-ा जाही -िजष बदलज्याबाबतची आवश्यजता, तसेच वाटप जेलेले जर्ज वसूल होत -ासल्याचे -िर्देश-ास येजे, सदर जर्जवाटपाच्या जर्जाच्या वसुलीची जबाबदारी ही जिल्हा रोजजार अधिजारी जार्यालयाजडे असू-ा संपूर्ज राज्याच्या जर्जाची वसुलीची टक्जेवारी अल्प असल्याचे दिसू-ा येजे, जर्जवसूली जरीता शास-ा-े जिल्हा रोजजार अधिजारी हयां-ा त्रैमासिज वसूलीबाबत लज्य देज्याची सक्ती जरज्याची आवश्यजता, सदर जर्जाचे परतफेडीचे हप्ते ती-ा महि-यां-ातर सुरु होत असल्या-े वसुलीची टक्जेवारी वाढविज्याची जरज, मौला-ा आझाद अल्पसंज्यांज आर्थिज विजास महामंडळाजडे शिल्लज असलेले 39 जोटी रुपये त्वरीत लाभार्थीं-ा वितरीत जरज्याबाबत तसेच मौला-ा आझाद अल्पसंज्याज महामंडळास जेंद्र शास-ाच्या राष्ट्रीय अल्पसंज्यांज विजास व वित्तसंस्थेजडू-ा अधिजाअधिज जर्ज मिळवू-ा देज्याबाबत राज्य शास-ा-े जरावयाची आवश्यजता व उपाययोज-ा व याबाबतची राज्य शास-ाची प्रतिज्रिया. "

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील (रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला पैसे प्राप्त झालेले आहेत. पैसे देताना राज्य सरकारने त्या मंडळाला काही गॅरंटी दिलेली आहे काय, ती किती रक्कमेची आहे, ती कमी असेल तर वाढविण्यासाठी राज्य शासनाच्या विचाराधीन आहे काय ? दुसरे असे की, प्राप्त झालेल्या पैशापैकी आपण आतापर्यन्त फक्त 15.87 कोटी रुपयाचे वाटप केलेले आहे. बाकीची रक्कम लाभार्थींना देण्यात आलेली नाही, ती किती महिन्यात आपण देणार आहात ? तिसरा प्रश्न असा की, लाभार्थींना कर्ज देत असतांना त्यांचकडून पैसे वसूल करण्याचे काम जिल्हा रोजगार अधिकारी यांचे असते. त्यांच्याकडून वसुलीचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने दिनांक 17-1-2005 रोजी त्यांना जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याच्या सूचना परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत. त्यांना क्वॉर्टरली वसुलीचे टारगेट ठरवून देण्यात आलेले आहे काय ?

**उपसभापती** : आपण एकदम अनेक प्रश्न विचारत आहात.

श्री.मुझफ्फर हुसेन : निवेदनातच त्यांनी उल्लेख केलेला आहे, त्या संबंधातीलच माझे प्रश्न आहेत म्हणून मी एकदम विचारत आहे, एकदमच मंत्री महोदयांनी त्याचे उत्तर द्यावे, म्हणजे इतर सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारता येतील. महामंडळाच्या माध्यमातून पैसे लाभार्थ्यांना दिले जातात, त्यामध्ये महामंडळाकडून कर्ज हमीवर 2 टक्के गॅरंटी फी घेण्यात येते, हे खरे आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जवळजवळ पाच ते सहा प्रश्न विचारलेले आहेत. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाकडून 23 कोटी रुपयाचे लोन दिलेले आहे. त्याच्या अगेन्स्ट जवळजवळ 20 कोटीची आपण गॅरंटी दिलेली आहे. हे साडेतीन टक्के व्याजाने पैसे मिळालेले आहेत.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदार..... 15:45

श्री. राणा जगजितसिंह पाटील..

दुसरा प्रश्न लोन अमाऊंन्ट वाढविण्याच्या बाबतीत होता. लोन अमाऊंट 20 कोटीवरुन 50 कोटी रुपयापर्यंत नेण्याचा आपला मानस आहे. त्यासाठी प्रयत्न चालू आहेत. तिसरा प्रश्न असा होता की, 15.87 कोटी रुपये एवढयाच लोनचे वितरण कां झाले? 61 कोटी रुपये ही पूर्ण रक्कम आपल्याकडे उपलब्ध आहे. त्यापैकी जवळ जवळ 34 कोटी रुपये मार्च 2005 ला उपलब्ध झालेले आहेत. आधी आपल्याकडे जवळ जवळ 27 कोटी रुपये उपलब्ध होते. त्यातून जवळ जवळ 16 कोटी रुपये वितरित करु शकलेलो आहोत. त्यानंतर 2 टक्के फीच्या बाबतीत विचारले आहे. 2 टक्क्यावरुन .5 टक्क्यापर्यंत ती न्यावी यासाठी प्रस्ताव तयार करीत आहोत. त्याच बरोबर वसुलीच्या बाबतीत दिनांक 17.1.2005 च्या पत्राचा उल्लेख करण्यात आला. 3 महिन्याच्या टारगेटच्या बाबतीत आपण कारवाई करीत आहोत. त्याचबरोबर प्रायोगिक तत्वावर रिकव्हरी ऑफिसर्स आणि रिकव्हरी एजन्ट नेमण्याचा विचार आहे. जेणेकरुन ही रिकव्हरी 46,47 टक्क्यापर्यंत आहे, ती वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, 1999 मध्ये आघाडी सरकार सत्तेवर आले, ते पोस्ट अलायन्स झालेले आहे. कॉन्ग्रेस व राष्ट्रवदी कॉन्ग्रेस हया दोन्ही पक्षांनी एकमेकाविरुध्द निवडणूक लढविली. आणि मग पोस्ट अलायन्स होऊन लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. त्यावेळी राष्ट्रवादी कॉन्ग्रेपक्षाचें राष्टीय अध्यक्ष माननीय श्री. शरद पवारसाहेब यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते आणि समान कार्यक्रमावर आधारित राष्ट्रवादी कॉन्ग्रेस पक्षाचा पाठिंबा लोकशाही आघाडी सरकारला राहील असे म्हटले होते. त्या कार्यक्रमातील जवळ जवळ 7/8 कार्यक्रम हे अल्पसंख्यांकाच्या संदर्भात होते. त्याठिकाणी मागणी होती की, प्रामुख्याने अल्पसंख्यांक समाजामध्ये अशिक्षितपणा, त्यांना संधी उपलब्ध न होणे, आर्थिक सुबत्ता, यासाठी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे. यादृष्टीकोनातून हे महामंडळ स्थापन झाले. त्यानंतर 32 कोटी रुपये राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने 23 कोटी रुपये त्यांना दिले. हा जो निधी त्या महामंडळाला उपलब्ध करुन दिलेला आहे, त्याचे संपूर्णपणे वाटप अल्पसंख्याक समाजातील जे होतकरु आणि गरजू आहेत, त्यांना उपलब्ध करुन दिला पाहिजे, ही त्याच्यामागची भूमिका होती. हा निधी उपलब्ध करुन दिला असतांना सुध्दा त्या निधीचे वाटप कां करु शकलो नाही हे या ठिकाणी सांगावे?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील :सभापती महोदय, मी आत्ताच सांगितल्याप्रमाणे 61 कोटी पैकी जवळ जवळ 34 कोटी रुपये मार्च 2005 ला मिळालेले आहेत.......

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 201 लाभार्थींच्या बाबतीत आतापर्यंत जे वाटप --- झालेले आहे. त्यामध्ये कर्ज वसुलीची टक्केवारी 47 टक्के आहे. म्हणजे इथे बुडवे जास्त दिसतात.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सगळया महामंडळांबद्दल बद्दल विचारा.

श्री. दिवाकर रावते : हे तुम्हाला कां झोंबत आहे? आम्ही काय मुसलमानांच्या विरोधात उभे आहोत काय? यांना काय झोंबते ते मला कळत नाही. हे सगळे तुमचे कोण लागतात? तुम्ही सुंता केला आहे काय?

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तो शब्द पवित्र आहे. आपल्यात बारसे करतात, त्यांच्यात सुंता करतात.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या हक्कावर गदा येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना यामध्ये एवढे वाईट का वाटले हे मला कळत नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो शब्द वापरलेला आहे तो बरोबर नाही.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जातीवाचक शब्द वापरलेला आहे.

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. पहिली गोष्ट अशी की, एखादा सन्माननीय सदस्य बोलत असताना दुसऱ्या सन्माननीय सदस्यांनी मध्येच बोलू नये. सन्माननीय सदस्यांच्या वक्तव्याने भावना दुखावल्या असतील तर तो शब्द गाळावा. या प्रश्नावर सभागृहामध्ये वादळ निर्माण करु नये.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा शब्द मागे घेण्यासारखा नाही. तो पवित्र शब्द आहे. या देशामध्ये राहणाऱ्या देशनिष्ठ मुस्लीम समाजाबद्दल आपण चांगले करण्याकरिता उभे राहिलो तर आपणच बोलले पाहिजे, दुसऱ्याने बोलू नये असे सन्माननीय सदस्यांना का वाटते ? मला या सभागृहामध्ये स्पष्ट केले पाहिजे की, या ठिकाणी आलेली जी लक्षवेधी सूचना आहे ती अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात आहे आणि त्यावरच चर्चा होणार आहे. बाहेरच्या इतर बाबींवर चर्चा करावयाची असेल तर तो प्रश्न आपण सभागृहापुढे आणावा. त्यावर आपण चर्चा करु. सन्माननीय सदस्यांना ही बाब का झोंबत आहे. श्री. शरद पवार साहेबांनी हे केले असे सन्माननीय सदस्य कशाला सांगतात ? कॉंग्रेसवाल्यांनी काहीच केले नाही आणि राष्ट्रवादीने मुस्लीम समाजासाठी केले असा आव आणून सन्माननीय सदस्य बोलले.

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कोणत्या प्रश्नाला किती राजकीय स्वरुप द्यावयाचे याला मर्यादा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अल्पसंख्यांकामध्ये मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन यांचा उल्लेख आहे. या समाजाला न्याय कोण देणार ? हे 201 लाभार्थी कोण आहेत ? मला सगळयांची नावे नकोत. या 201 लाभार्थ्यांमध्ये मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या समाजातील लाभार्थ्यांची संख्या किती आहे ? बौध्द समाजावर अन्याय करण्याचा या शासनाला अधिकार नाही. ख्रिश्चन समाजावर अन्याय करण्याचा या शासनाला अधिकार नाही. आम्हाला असे समजले आहे की, यामध्ये राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. श्रीमती सोनिया गांधी यांच्यावर अन्याय झालेला कसा चालेल ? त्या ख्रिश्चन आहेत. सभापती महोदय, आम्हाला हे कळले पाहिजे...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे हे वाक्य कामकाजातून काढून टाकले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : श्रीमती सोनिया गांधी या ख्रिश्चन नाहीत काय ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : तुम्ही हे सर्व महाराष्ट्राला सांगितले आहे त्यामुळेच तुम्ही त्या बाजूला बसलेला आहात.

श्री. दिवाकर रावते : मी याच ठिकाणी बसून बोलत आहे. सभापती महोदय, आम्हाला यादी पाहिजे. 47 टक्के रिकव्हरी आहे. हा रिकव्हरीचा निचांक आहे. यामध्ये बुडविणारे कोण आहेत ?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता दुपारी 4.00 वाजता कामकाज सल्लागार समितीची बैठक आहे. माझी अशी सूचना आहे की, या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा थोडा वेळ थांबवावी.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता कामकाज सल्लागार समितीची बैठक आहे ही वस्तुस्थिती आहे. ही महत्वपूर्ण लक्षवेधी असल्यामुळे मी स्वत: किंवा मा.सभापती याठिकाणी उपस्थित असणे आवश्यक आहे. त्यामुळे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीकरिता सभागृहाची बैठक दुपारी 4.30 पर्यंत मी स्थगित करतो. त्यानंतर आपण पुन्हा ही लक्षवेधी सूचना घेऊ.

( सभागृहाची बैठक दुपारी 3.55 ते 4.30 पर्यंत स्थगित झाली.)

------

नंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**स्थगितीनंतर**</u>

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**:मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची आर्थिक क्षमता वाढविणे.

**मु.शी.** :मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची आर्थिक क्षमता वाढविणे याबाबत श्री. मुझफ्फर हुसेन,डॉ.एन.पी.हिराणी, श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती सुधा जोशी,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( लक्षवेधी सूचना पुढे सुरु...)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी आपल्या निर्णयाच्या विरोधात मी हा मुद्दा उपस्थित करीत नाही हे प्रथम स्पष्ट करतो. मघाशी मी सभागृहामध्ये मुस्लिम धर्मातल्या एका पवित्र कृतीविषयी, पवित्र कार्याविषयी शब्द वापरला होता. केवळ सभागृहाने दबाव टाकला म्हणून एखादी गोष्ट घडणे हे गैर आहे. तो धर्माचा अपमान आहे. एखादी चांगली धार्मिक गोष्ट असेल तर तर तो शब्द सभागृहाच्या पटलावरुन काढणे हे अयोग्य आहे असे मला वाटते. एका चांगल्या पवित्र शब्द असेल, धार्मिक शब्द असेल, व तो शब्द रेकॉर्डमधून काढून टाकला तर तो शब्द बदनामकारक आहे असा समाजामध्ये गैरसमज होऊ शकतो....

**उपसभापती** : मी मघाशी या संदर्भात स्पष्टपणे म्हटले आहे की, कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर..... असा शब्दप्रयोग केलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना आपण विचारावे की, हा शब्द गैर आहे काय ? हा शब्द आयोग्य आहे काय ? हा पवित्र शब्द आहे आणि तो शब्द सभागृहाच्या रेकॉर्डमधून काढला तर तो शब्द अपवित्र होईल. तो शब्द रेकॉर्डमधून काढणे चुकीचे आहे असे मला वाटते. मी अतिशय गांभीर्याने हा विषय येथे मांडतो आहे.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, या शब्दामुळे विशिष्ट समाजामध्ये वेगळा संदेश जाईल...

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी या ठिकाणी सांगावे की, हा शब्द गैर आहे. हा शब्द गैर आहे असे त्यांनी सांगितले तर तो शब्द मी मागे घेईन. सन्माननीय सदस्य श्री. शिंदे यांना सांगू इच्छितो की, आपण मध्येच कशाला बोलता आहात. आपला त्या विषयाशी काही संबंध नाही. आपण सभापतींवर विनाकारण दबाव आणता. सन्माननीय सदस्य श्री. हुसेन यांनी दबाव आणला असता तर त्यांचे म्हणणे मी मान्य केले असते. दुसरेच सदस्य दबाव आणत आहेत ही गोष्ट बरोबर नाही. अशा प्रकारे कुठल्याही धर्माला अशा पध्दतीने वागविणे आणि अपमानीत करणे हे गैर आहे असे माझे मत आहे. मी या ठिकाणी कोणाच्या भावना दुखावण्यासाठी उभा राहिलेलो नाही. या ठिकाणी त्या धर्माच्या भावना दुखावण्याकरिता तुम्ही वेगळा मार्ग दाखविला हे बरोबर नाही. परंतु आपण असे केले, तसे केले, असे सांगून तुम्ही विषयाला कलाटणी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणी कोणी श्रेय घेण्याचा प्रश्न नव्हता.ते हिंदुस्थानी आहेत नां ? ते भारतीय आहेत नां ? ज्यांना या महामंडळाकडून लाभ दिला गेला ते या राज्यातील लाभार्थी आहेत नां ? या लोकांना न्याय मिळावा म्हणून सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी ही लक्षवेधी सूचना सभागृहासमोर मांडलेली आहे. आम्ही या चर्चेत सहभाग घेत आहोत. आम्ही अतिशय गंभीरपणे चर्चा करीत असताना तुम्ही चुकीचे वळण दिले...

श्री.विलासराव शिंदे : एखाद्या समाजाच्या प्रथे बाबत कशाला बोलावे असा माझा मुद्दा आहे..

**उपसभापती** : हा विषय मी येथे संपविलेला आहे. कृपया सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मुस्लीम,ख्रिश्चन,शिख,बौध्द,पारशी आणि जैन अशा समाजातील 201 लाभार्थ्यांना ही रक्कम देण्यात आलेली आहे काय ? असल्यास यासंबंधीची वर्गवारी देण्यात यावी ? वर्गवारीप्रमाणे कर्ज बुडविणा-यांची संख्या किती आहे ?

श्री. सतीश चतुर्वेदी : 201 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. परंतु त्याच्या वर्गवारीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना लाभार्थ्यांची वर्गवारी माहिती नाही म्हणून ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

3...



ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 16:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चतुर्वेदी : प्रत्येक समाजाच्या लाभार्थ्यांच्या वर्गवारीचा ब्रेकअप सभागृहाला द्यावयाचा आहे. त्यामुळे मला ही माहिती घेण्यास वेळ लागेल.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांना साधा ब्रेकअप देता येत नाही. मुस्लिम,ख्रिश्चन,शिख,बौध्द,पारशी आणि जैन या समाजातील किती लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला याची माहिती सांगता आली पाहिजे. आपण मघाशी 15 मिनिटांसाठी सभागृह स्थगित केले होते. त्या वेळेत ही माहिती त्यांनी घ्यावयास पाहिजे होती.

श्री. सतीश चतुर्वेदी : सन्माननीय सदस्यांनी विचारलेली माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 16:35

लक्षवेधी सूचना क्र.6 पुढे सुरु...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात बरेच गैरसमज पसरविण्याचा पध्दतशीर प्रयत्न केला जात आहे. हा गैरसमज दूर करण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय ? या महामंडळामध्ये अल्पसंख्याक समाजातील शीख,बौध्द,मुस्लीम,पारशी आणि जैन या धर्मियांचा समावेश होतो. या महामंडळाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजातील जी गरजू आणि होतकरु मंडळी आहेत मग आमचा मुस्लीम बांधव असो,जैन बांधव असो,पारशी बांधव असो,शीख बांधव असो वा बौध्द बांधव असो या सर्वांना कर्जाचे वाटप केले जाते. आतापर्यंत 2654 लाभार्थीना कर्ज वाटप करण्यात आले. हे कर्ज वाटप कसे करण्यात आले याची माहिती शासनाने सभागृहाला द्यावी. कर्ज वाटपाचा ब्रेकअप शासन देईल काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मागील वेळी यासंदर्भात चर्चा उपस्थित करण्यात आली होती त्यावेळी इतर मागासवर्गीयांसाठी महात्मा फुले महामंडळ,अण्णाभाऊ साठे महामंडळ आहेत असे सांगितले होते. कर्ज वाटपाची आकडेवारी सभागृहाला दिली पाहिजे.

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ हे बौध्द,शीख,पारशी,मुस्लीम आणि जैन समाजातील गरजू लोकांना कर्ज पुरवठा करण्यासाठी स्थापन करण्यात आले आहे. मा.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याचा मी आदर करतो. मा.सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी सांगितल्याप्रमाणे ही गोष्ट खरी आहे की, गेल्या 7-8 महिन्यांमध्ये कर्ज वाटपाची गती मंद होती. मा.सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी सांगितल्याप्रमाणे कर्ज वाटपाचा स्पीड कमी होता. तो वाढविण्याच्या दृष्टीने आम्ही निश्चित प्रयत्न करु. अल्पसंख्याक समाजातील विविध धटकांच्या भावना लक्षात घेऊन आणि त्यांच्यामध्ये समन्वय साधून कर्ज वाटप करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करील.

डॉ. एन्.पी.हिराणी : सभापती महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ याची स्थापना का केली याचा थोडासा शोध घेतला तर अल्पसंख्याक समाजाची स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पाहिजे तशी प्रगती झालेली नाही. शिक्षणाच्या बाबतीत आणि आर्थिक बाबतीत हा समाज मागासलेला राहिला. म्हणून या महामंडळाची स्थापना करण्यात आली. महामंडळ स्थापन झाल्यानंतर राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने आतापर्यंत 61 कोटी रु. दिले आहेत. परंतु

....2

SSK/ MHM/ SBT/ 16:35

लक्षवेधी सूचना क्र. 6 पुढे सुरु..

डॉ. एन्.पी.हिराणी ....

त्यातील फक्त 15 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. याचाच अर्थ असा आहे की, हा पैसा खर्च करण्यामध्ये महामंडळ कुठे तरी कमी पडले आहे. याचा शोध घेतल्यावर असे लक्षात आले की, कर्ज मिळविण्याकरिता ज्या अटी आणि शर्ती आहेत त्या अतिशय किचकट आणि जाचक आहेत. अल्पसंख्याक समाजातील जे लाभार्थी आहेत त्यांना विविध प्रकारचे फॉर्म भरणे,दोन-दोन जामिनदार देणे आवश्यक आहे आणि दोन-दोन नोकरदार जामिनदार मिळत नाहीत.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ..एन.पी.हिरानी ...

त्यांना गॅरन्टर्स मिळत नाहीत त्यामुळे त्यांचे अर्ज मंजूर होत नाहीत. तसेच ज्यांचे अर्ज येतात त्यातील काही जणांचे अर्ज हे अपूर्ण असतात. त्यामुळे त्यांचे अर्ज मंजूर होत नाहीत .काही अर्जाच्या बाबतीत कागदपत्रांची पूर्तता होत नाही म्हणून त्यांचे अर्ज मंजूर होत नाहीत. काही व्यक्तींचा व्यवसाय हा वर्धनक्षम नसल्यामुळे त्यांचा अर्ज मंजूर होत नाही..अशा प्रकारे अर्ज मंजूर न होण्याची अनेक कारणे आहेत. तेव्हा मला या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांना एक विनंती करावयाची आहे की, यासाठी सबंधित लोकांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. तेव्हा हे प्रशिक्षण त्यांना देण्यात यावे व त्यांचे प्रबोधन करण्यात यावे. त्यासाठी शिबिर आयोजित करण्यात यावे .या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना एकूण तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, शिल्लक राहिलेले पैसे किती दिवसात वाटण्यात येणार आहेत? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, लाभधारकांचे जास्तीत जास्त फॉर्म्स कसे मंजूर होतील यासाठी लाभधारकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे काय व त्याकरता शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत काय ? आणि माझा तिसरा प्रश्न असा आहे की, कर्ज मजूर करीत असतांना ज्या जाचक अटी घालण्यात आल्या आहेत त्या शिथिल करण्यात येणार आहेत काय ? राज्य सरकारने केन्द्र सरकारला फक्त 20 कोटी रुपयाची हमी दिलेली आहे. केन्द्र सरकारने मागच्या वर्षी या योजनेकरता 150 कोटी रपयांची प्रोव्हीजन केली होती आणि या वर्षी 650 कोटी रुपयांची प्रोव्हीजन केलेली आहे असे असतांना आपण केन्द्र सरकारला फक्त 20 कोटी रुपयांची हमी दिलेली आहे .तेव्हा या हमीमध्ये वाढ करुन केन्द्र सरकारला 50 कोटी रुपयाची हमी देण्यात येणार आहे काय ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, जी शिल्लक रक्कम आहे तिचे वाटप करण्यासाठी 30 ऑगस्ट 2005 पर्यन्तचे टारगेट ठरवून देण्यात आलेले आहे. प्रत्येक जिल्हयात 75 लाख रुपयाचे वाटप करावे असे टारगेट एम्प्लायमेन्ट एक्सचेंजच्या ऑफिसर्सना ठरवून देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी मी हे सांगू इच्छितो की, शिल्लक राशी जी आहे त्यापैकी 34 कोटी रुपये हे मार्च 2005 मध्ये जमा झालेले आहेत. 65 कोटी रुपये हे 2-3 वर्षात जमा झालेले

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चतुर्वेदी ....

नाहीत. हे 34 कोटी रुपये मार्च 2005 मध्ये जमा झालेले आहेत आणि हे पैसे वाटप करण्यासाठी सहा महिन्याचे टारगेट निश्चित करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर यासाठी मेळावे घेण्यात यावेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, मोठया शहरामध्ये कार्यकर्त्याचे मेळावे घेण्यात येतील आणि एम्प्लायमेन्ट एक्सचेंजच्या ऑफिसर त्या मेळाव्याला उपस्थित राहतील. तसेच तेथील लोकप्रतिनिधींना या मेळाव्यासाठी निमंत्रित केले जाईल. सर्वाच्या उपस्थितीत हे मेळावे घेऊन लोकांचे प्रबोधन करण्यात येईल.त्यानंतर मला असे सांगावयाचे आहे की, शासन या लोकांना डायरेक्ट मदत करणार आहे. या मदतीशी बॅन्काचा काहीही सबंध नाही. बॅन्काकडून कर्ज घेत असतांना किती त्रास होतो याची आपणा सर्वाना कल्पना आहेच. त्यामुळे या तरुणांना कर्जासाठी बॅन्काकडे जावे लागणार नाही तर शासन डायरेक्ट मदत देणार आहे. हे कर्ज मंजूर करण्यापूर्वी मेळावे घेण्यात येतील तसेच आपले सर्वाचे सहकार्य सुध्दा घेण्यात येईल.एम्प्लॅायमेन्ट एक्सचेंजचा ऑफिसर त्या मेळाव्याला उपस्थित राहील आणि अल्पसंख्याक समाजाची जशी लोकसंख्या असेल त्या प्रमाणे ठिक ठिकाणी या लोकांचे मेळावे घेऊन या पैशाचे वाटप करण्याच्या सूचना देऊन येत्या सहा महिन्यात या पैशाचे वाटप केले जाईल.सन्माननीय सदस्यांनी अटीच्या बाबतीत एक प्रश्न विचारला. आहे. आपल्या अटी जाचक असल्यामुळे कर्ज वाटप कमी होत असते असे त्यांचे मत आहे. त्या संदर्भात शासनाकडे काही निवेदने आलेली आहेत. अल्पसंख्याक समाजातील काही तरुण कार्यकर्त्यानीसुध्दा शासनाकडे निवेदने दिली आहेत. त्याचबरोबर काही आमदारांनीसुध्दा पत्र दिलेले आहे व त्यांनी असे सागितले आहे की या अटी थोडयाशा शिथिल करण्यात याव्यात.आज आपल्या अटी जाचक असल्यामुळे वाटपाच्या वेळी त्रास होत असतो .

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चतुर्वेदी ....

म्हणून त्यामध्ये ज्या अटी आहेत, उदा. दोन जामीनदार सांगितले आहेत तेथे एक जामीनदार देखील आपण करू शकतो. तेव्हा अशा ज्या अटी आहेत त्या शिथिल करण्याच्या दृष्टीने आपण एक उच्च स्तरीय बैठक घेऊन त्यामध्ये संबंधित लोकांना, संस्था-संघटनांना बोलावून घेऊन, चर्चा करून प्रयत्न करू. जेणे करून हे वाटप 100 टक्के झाले पाहिजे या भावनेतून शासन याचा जरूर विचार करील. सभापती महोदय, त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या तिसऱ्या प्रश्नाबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, केवळ 20 कोटीची हमी महाराष्ट्र शासनाने घेतलेली आहे आणि यूपीए सरकार केंद्रामध्ये सत्तेमध्ये आल्यानंतर अल्पसंख्यांक समाजासाठी आपल्याला आता साडेसहाशे कोटीची राशी उपलब्ध झाली आहे. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मघाशी जे सांगितले त्यात चूक राहू नये म्हणून मी मध्ये हरकत घेत आहे. मंत्री महोदयांनी मघाशी बोलताना सांगितले की, मुस्लिम समाज, बौद्ध समाज, भटक्या व विमुक्त जातींचा समाज ... तर यामध्ये भटक्या व विमुक्त जातीचा समाज येते नाही...

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, मी भटक्या विमुक्त जातीचा समाज असे बोललो नाही. परंतु तसा उल्लेख कदाचित माझ्या तोंडून आला असेल तर तो रेकॉर्डवरून काढून टाकण्यात यावा. तर मी असे सांगत होतो की, आता साडेसहाशे कोटीची तरतूद आपल्याला झालेली आहे आणि आपल्या शासनाची हमी 20 कोटीची आहे. तेव्हा यामध्ये जास्त कर्ज वाटप झाले पाहिजे या भावनेतून ती सुद्धा राशी वाढविण्याचा शासन जरूर प्रयत्न करील.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे वक्तव्य ऐकल्यानंतर मला एक वेगळीच भीती यामध्ये वाटू लागली आहे. मुळात 200 लाभार्थ्यांपैकी 95 जणांनी कर्ज परत केलेले नाही असे आपण यामध्ये सांगितलेले आहे आणि त्यामागील चार कारणेही आपण येथे सांगितली आहेत. त्यातील शेवटचे कारण महत्त्वाचे आहे. शेवटी आपण म्हटले आहे की, स्थळ पाहणीमध्ये लाभार्थी तेथे आढळून न येणे. म्हणजे आपण येईल त्याला कर्ज देत गेलात तर त्यातून कर्ज बुडविणाऱ्यांचे प्रमाण वाढणारच आहे. म्हणून याचाही आपण गंभीरपणे विचार करावा. मी सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांचे अभिनंदन करीन कारण त्यांनीही याबाबत चिंता व्यक्त केलेली आहे. अशा प्रकारे दोनशे पैकी 95 लाभार्थी कर्ज बुडविणारे असतील तर माझा प्रश्न असा

...... एनएन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. मोडक .....

आहे की, आपण आपली लोकप्रियता वाढविण्याची ही खेळी कृपया बाजूला ठेवावी. कारण शेवटी हा महाराष्ट्र सरकारचा पैसा आहे म्हणून ज्यांनी कर्ज वाटप करताना ही कर्जाची उधळपट्टी केलेली आहे त्यांच्या विरूद्ध आपण काय कारवाई करणार आहात ? आपणच येथे सांगितले आहे की, अर्जदारांकडून अपूर्ण अर्ज प्राप्त, आवश्यक ती कागदपत्रे नसणे, वर्धनक्षम उद्योग आहे की नाही हे न पाहता कर्ज देणे इतकेच नव्हे तर जो कर्जदार आहे त्याचाही आपल्याला पत्ता नाही. असे असेल तर आपण दिलेले कर्ज बुडणारच आहे, म्हणून अशा प्रकारे कर्ज वाटप करणाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री. राण जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यामध्ये थोडासा गैरसमज झाला आहे असे वाटते. थकित प्रकरणांची जी कारणे आहेत त्यातील ते एक कारण आहे. किंबहुना मी आपणास असे सांगू इच्छितो की, अशा लोकांना कर्जाचे वितरण केलेलेच नाही. ही जी कारणे वा माहिती येथे दिलेली आहे ती प्रलंबित अर्जांबद्दलची माहिती दिलेली आहे. ...

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मी माझा प्रश्न पुन्हा विचारतो. ज्यांनी अशा प्रकारे कोठल्याही निकष वा अटींचा विचार न करता कर्ज वाटण्याचे उद्योग केलेले आहेत त्यांच्या विरूद्ध आपण काय कारवाई करणार आहात ?

( यानंतर श्री. जागडे .... ओओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी पुन्हा ही बाब स्पष्ट करतो.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय,.....

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे माननीय मंत्रिमहोदयांची वकिली का करीत आहेत ? माननीय मंत्रिमहोदय उत्तर द्यावयाला सक्षम आहेत. मी माझा प्रश्न पुन्हा या ठिकाणी सांगू इच्छितो.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना किती वेळ चालणार आहे ?

**उपसभापती** : मी ही लक्षवेधी सूचना संपविली होती. परंतु काही सदस्यांना प्रश्न विचारावयाचे असल्यामुळे माझा नाईलाज झाला.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मी जो प्रश्न विचारला आहे, त्याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले नाही.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, निवेदनात थकीत कर्ज प्रकरणांची कारणे दिली आहेत. थकीत कर्जाची प्रकरणे असे म्हटले आहे. ही सर्व प्रकरणे पेंडीग आहेत. या प्रपोजल्सना मान्यता देण्यात आलेली नाही.

श्री. विनोद तावडे : मग कर्जाची थकीत प्रकरणे असे म्हणा ना.

**उपसभापती** : ही लक्षवेधी सूचना आता संपली आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 101 च्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.**

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " ऐन बारावीच्या निकालाच्या वेळी तंत्र शिक्षण संचालनालयाने विनाअनुदानित खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयातील बी. ई. प्रथम वर्षाच्या जागांमध्ये केलेली कपात " या विषयावरील श्रीमत फौजिया खान व इतर वि. प. स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वयेच्या सूचनेबाबत दि. 12 जुलै 2005 रोजी केलेल्या निवेदनावरील अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती :** अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया अधिक माहिती छापावी. )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

पृ.शी. :अंधेरी ( पू. ) व विलेपार्ले ( पू.) भागात वाढलेले घरफोडीचे प्रकार.

मु.शी. :अंधेरी ( पू. ) व विलेपार्ले ( पू.) भागात वाढलेले घरफोडीचे प्रकार याबाबत मा.सदस्य डॉ. दीपक सावंत यां-ी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मुंबईत अनेक घरफोड्या होण्याचे, दुकान फोडण्याचे प्रकार विशेषत: उन्हाळ्यात घडतात. पण अंधेरी ( पू.) व विलेपार्ले ( पू. ) यांना दुंभागणा-या सहार रोडवर हा प्रकार सर्रास वर्षभर चालू असतो. यामध्ये दोन्ही पोलीस स्टेशन्सचे पोलीस हातावर हात ठेऊन शांतपण डुलक्या देत असतात. कारण ह्या रस्त्यावर दुतर्फा असलेल्या दुकानाच्या वरुन घरफोडी करणारे लुटारु जाऊन घरफोड्या करतात. हे गेले 3-4 वर्षापासून चालू आहे. पण आजपर्यनत विलेपार्ले ( पू. ) किंवा अंधेरी ( पू. ) पोलीस स्टेशन्स यांनी कोणतीच उपाययोजना केली नाही. त्याचप्रमाणे या दुकानदारांनी अनेकदा आपली शिष्टमंडळे या पोलीस स्टेशन्सवर नेऊनही याचा काहीही परिणाम झाला नाही. मी स्वत: अनेकदा तक्रार केली असतानाही याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही. याबाबत माननीय गृहमंत्र्यांना मी स्वत: मे 2005 मध्ये पत्र लिहिले आहे. सर्व वस्तुस्थिती विशद करुनही आज या सभागृहात विशेष उल्लेखाच्या आयुधाचा आधार घेऊन ही गोष्ट मला पुन्हा सभागृहात उपस्थित करावी लागत आहे. तसेच या भागातील मार्च 2005 ते मे 2005 या कालावधीत 18 वाहने चोरीला गेली असून त्याचाही छडा अजूनही लागला नाही. सदरहू भागात चो-या व घरफोड्यांच्या गुन्ह्यात झ ालेल्या वाढीबाबत पोलिसांनी कोणती उपाययोजना केली आहे, या बाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे, ही विनंती. "



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

सभापती महोदय, सहार रोडवर हा प्रकार सतत सुरु आहे. गेल्या तीन वर्षात 17 ते 18 दुकाने फोडण्यात आली आहेत. ही दुकान वरुन फोडली जातात. खालून पोलीस पेट्रोलिंग करीत असतानाही त्यांना याचा पत्ता लागत नाही. या बाबत चोरांच्या फिंगर प्रिंटस्‌सुध्दा उपलब्ध होत नाहीत. या ठिकाणी गेल्या वर्षात 18 वाहने चोरीला गेली आहेत. या बाबत अनेक शिष्टमंडळे पोलिसांनी भेटली आहेत. या विभागाचे एसीपी तसेच डीसीपी यांनी कोणत्याही गुन्हेगारांना अजूनपावेतो पकडलेले नाही. या विभागातील चोरट्यांना पोलिसांनी ताबडतोब पकडावे, अशी ह्या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे.

-

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शाळांमध्ये अग्निशामक यंत्रणा बसविणे

मु.शी. : शाळांमध्ये अग्निशामक यंत्रणा बसविण्याबाबत

श्री.सुरेश जेथलिया, वि.प.स. यां□ दिलेली विशेष उल्लेजाची सूच□

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सुरेश जेथलिया (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, तामिळनाडूतील कुंभकोणमधील शाळेला लागलेल्या आगीच्या दुर्घटनेला एक वर्ष पूर्ण होत आहे. अशी घटना आपल्या राज्यातील शाळांमध्ये होऊ नये याकरिता उपाय योजना म्हणून शाळेमध्ये अग्निशामक उपकरण बसविण्याचे आदेशही जारी करण्यात आले, अनेक शाळांमध्ये अग्निशामक दलातर्फे प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. मात्र, वर्षभरानंतरही शाळांमधील सुरक्षा उपायांना परत दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. खाजगी व महापालिकेच्या शाळेमध्ये अग्निशमन उपकरण बसविण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद न केल्याने अद्यापपर्यंत उपलब्ध झालेले नाही. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता प्रत्येक शाळांमध्ये अग्निशामक यंत्रणा बसविण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता. याबाबत शासनाने निवेदन करावे. अशी या विशेष उल्लेखाव्दारे मागणी करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सरळ सेवा भरतीमध्ये झालेला गैरप्रकार

मु.शी. :यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सरळ सेवा भरतीमध्ये झालेला गैरप्रकार याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यां□ दिलेली विशेष उल्लेजाची सूच□.

**उपसभापती** : माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे, यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सरळ सेवा भरतीमध्ये झालेल्या गैरप्रकारासंबंधी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

"सभापती महोदय, यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि हॉस्पिटलमध्ये शासनाकडून मंजूर व रिक्त होणारी पदे पदोन्नतीने व सरळसेवा भरतीने भरावयाची असतांना येथील सर्व पदे नियमांना डावलून भरण्यात आलेली आहेत. सभापती महोदय, एवढेच नव्हेतर जी पदे रिक्तच नाहीत अशी पदे सुध्दा भरण्यात आलेली आहेत. ऑक्टोबर 2005 मध्ये काही कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता यादीनुसार पदोन्नती मिळणार होती. प्रयोगशाळा सहाय्यक पदी काम करीत असलेल्या काहींना प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून पदोन्नती मिळणार असल्याने पदोन्नतीनंतर ऑक्टोबर 2005 मध्ये ही पदे रिक्त होणार असतांना महाविद्यालयाचे अधिष्ठाता श्री. पाठक यांनी पाच महिन्यापूर्वीच फेब्रुवारी 2005 मध्ये काही लोकांना नियुक्तीपत्रे देऊन टाकली. दैनिक लोकमतच्या या अंकामध्ये ते जाहीरपणे प्रसिध्द करण्यात आले आहे. व त्यांना 9 ऑक्टोबर 2005 पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात आणि त्यानंतर कायम स्वरुपी नियुक्ती करण्यात येत असल्याचे एकाच नियुक्ती आदेशामध्ये तशी नोंद करण्यात आली. विशेष म्हणजे नियमित स्वरुपाच्या नियुक्ती संदर्भात वेगवेगळे आदेश निर्गमित करण्यात येणार नाहीत असेही नियुक्ती आदेशात नमूद करण्यात आले. कोणत्याही विभागात पदोन्नतीची किंवा सरळ सेवा भरतीने भरावयाची पदे शासनाने ठरवून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

दिलेल्या विहित प्रक्रियेने भरावयाची असतात. परंतु येथे मात्र रिक्त पदे होण्यापूर्वीच नियुक्त्या दिल्या ती पदे सरळ सेवा भरती प्रक्रियेने भरावयाची होती. सरळ सेवा भरतीने पदे भरावयाची झ ााल्यास वृत्तपत्रात प्रथम रिक्त जागेबाबत जाहीरात द्यावी लागते. त्यानंतर प्राधान्यक्रमाने ती पदे भरली जातात. परंतु या ठिकाणी सर्व बाबींना डावलण्यात आले आहे. या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये अनेक पदे रिक्त आहेत. रिक्त पदांवर महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना तात्पुरती पदोन्नती देता येऊ शकते तशी ज्येष्ठता यादीसुध्दा त्यांच्याकडे आहे. असे असतांना देखील रिक्त जागेवर महाविद्यालयाबाहेरील लोकांना तात्पुरती नियुक्ती देण्याचा प्रकार या ठिकाणी अनेक वर्षापासून सुरु आहे. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली ते सर्व काही महिन्यापासून काम करीत असलेले तात्पुरते कर्मचारी आहेत. अशाप्रकारे नियुक्तीच्या संदर्भात अधिष्ठाता पाठक यांनी शासनाची दिशाभूल करुन गैरप्रकार केलेले आहेत. या गैरप्रकाराबद्दल शासनाने वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करुन कठोर कारवाई करावी अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी मागणी करतो.

धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : क्रांतिसिंह नानासाहेब पुरोहित हुतात्मा स्मारकाची झालेली दुरावस्था.

मु.शी. : क्रांतिसिंह नानासाहेब पुरोहित हुतात्मा स्मारकाची झालेली दुरावस्था याबाबत श्री.विलास अवचट,वि.प.स.यां□ दिलेली विशेष उल्लेजाची सूच□.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.विलास अवचट, वि.प.स. यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विलास अवचट (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील महाड येथे क्रांतिसिंह नानासाहेब पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या लढयात हुतात्मा झालेल्या वीरांच्या हुतात्मा स्मारकाची दुरावस्था झाली आहे. या शहिदांच्या स्मृतींना उजाळा मिळावा म्हणून 1980 साली महाड नांगलवाडी, वीरवाडी आणि शिरटोली या गावात हुतात्मा स्मारकांची उभारणी करण्यात आली. परंतु शासनाने आणि नागरिकांनी दाखविलेल्या अनास्थेपायी हुतात्मा स्मारकांना गुरांच्या गोठयाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. कित्येक वर्षापासून या स्मारकांची रंगरंगोटी, देखभाल, डागडुजी केली जात नसून स्मारकांच्या आवारात जंगली झाडे-झूडपे काटेरी झाडे वाढली आहेत. . इमारतीचे सिलिंग तुटून लोखंडी जाळया गंजल्या आहेत. यामुळे या स्मारकांच्या देखभाल व दुरुस्ती बाबत शासनाने तातडीने कारवाई करावी ही या विशेष उल्लेखाव्दारे मी विनंती करतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महाबीज कंपनीमार्फत लातूर व उस्मानाबाद जिल्हया-
तील शेतक-यांना सोयाबीन पिकाचे मूल्य देत असताना
होणारा पक्षपात.

मु.शी.: महाबीज कंपनीमार्फत लातूर व उस्मानाबाद जिल्हया-
तील शेतक-यांना सोयाबीन पिकाचे मूल्य देत असताना
होणारा पक्षपात याबाबत श्री.वसंतराव काळे वि.प.स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.वसंत काळे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.वसंतराव काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाबीज कंपनीमार्फत बीजोत्पादक शेतक-यांनी लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील शेतक-यांना सोयाबीन या पिकांचे मूल्य देत असताना शंभर रुपयाचा फरक असतो. लातूर जिल्हया तील शेतक-यांना 1650 रु.तर उस्मानाबाद जिल्हयातील शेतक-यांना 1550 रु.प्रति क्विंटल दर दिला जातो. हा पक्षपात दूर करण्यासाठी तातडीने लक्ष घालून महाबीजला आदेश देण्याची आवश्यकता," याबाबत चर्चा करण्यासाठी ही बाब विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे.

सभापती महोदय, लातूर व उस्मानाबाद जिल्हयात बीजोत्पादन करणा-या शेतक-यां मध्ये महाबीजच्या मार्फत ते बी खरेदी करीत असताना दोन्ही जिल्हयातील बीजोत्पादक शेतक-यांना जो भाव दिला जातो, त्यामध्ये 100 रुपयांचा फरक ठेवलेला आहे. वास्तविक त्या दोन्ही जिल्हया मध्ये बी विकत असताना विक्रीचा दर सारखा आहे, पण खरेदीच्या दरामध्ये 100 रुपयांचा फरक ठेवलेला आहे. जेव्हा शेतकरी चौकशीसाठी गेले, तेव्हा त्यांना असे सांगितले गेले की, लातूर बाजारपेठेमध्ये असलेला जो भाव आहे, त्या भावाचा आधार घेऊन आम्ही लातूर जिल्हयाचा भाव काढतो आणि उस्मानाबाद जिल्हयाचा बाजारपेठेचा भाव काढतो. वास्तविक त्या पाच-सहा जिल्हयातील प्रमुख बाजारपेठ ही लातूरच आहे. त्यामुळे लातूर बाजारपेठेचा भाव सर्वांना मिळाला पाहिजे. सोयाबीनच्या उत्पादक शेतक-यांवर हा महाबीजने केलेला जो अन्याय आहे,तो दुरुस्त करुन सर्व जिल्हयामध्ये शेतक-यांना सारखा उत्पादक भाव मिळाला पाहिजे कारण विक्रीचा भाव

. . . .2 क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत काळे . . . .

विक्रीचा भाव सारखा असल्यामुळे उत्पादक शेतक-यांना दिला जाणारा भाव सुध्दा सारखा असला पाहिजे. अशी मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी आपल्यामार्फत शासनाला करीत आहे. तेव्हा ताबडतोब यासंबंधात कार्यवाही करावी अशी प्रार्थना आहे.

. . . .2 क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: दिल्ली (सिरमूर)येथे नवीन महाराष्ट्र सदन इमारतीच्या बांधकामाबाबत.

मु.शी.: दिल्ली (सिरमूर) येथे नवीन महाराष्ट्र सदन इमारतीच्या बांधकामाबाबत यासंबंधात श्री.कन्हैयालाल गिडवाणी वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी एक विशेष उल्लेखा-संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखसंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्रातील आमदारांना देशाच्या राजधानीत दिल्ली येथे गेल्यानंतर त्यांच्या निवासासाठी बांधण्यात आलेल्या "महाराष्ट्र सदनामध्य" जागा उपलब्ध होत नसल्याच्या वारंवार उघडकीस येत असलेल्या घटना. दिल्ली येथील महाराष्ट्र सदनाकडे एकूण 1 लाख 68 हजार स्वे.फू.जागा आहे. परंतु त्यापैकी केवळ 67 हजार स्वे.फू.जागाच वापरली गेली असून इतर सर्व म्हणजे सुमारे 1 लाख स्वे.फू.इतकी जागा रिकामी आहे. महाराष्ट्र सदनाचे विस्तारीत बांधकाम करण्यासाठी त्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे. परंतु दिल्ली प्रशासनाकडून त्यांना परवानगी मिळालेली नाही. तसेच नवीन सदनाचे बांधकाम देखील अजून सुरु झालेले नाही. परिणामी दिल्ली येथे गेल्यानंतर आमदारांना राहण्यासाठी जागा अपूरी पडत आहे ही वस्तुस्थिती निदर्शनास येत असून सुध्दा शासन मात्र हा प्रश्न सोडविण्याबाबत उदासीन असल्याचे दिसते. आज देशात जी छोटी छोटी राज्ये आहेत, त्या राज्यांच्या दिल्लीमध्ये अत्यंत चांगल्या इमारती आहे. हिमाचल प्रदेश, छत्तीसगड यासारख्या राज्यांच्या देखील तेथे आमदारांना निवासाठी पंचतारांकित इमारती आहेत. आज आपण महाराष्ट्राला देशातील अत्यंत प्रगत राज्य समजतो. तथापि दिल्लीतील महाराष्ट्र सदना कडे पाहिले असता काही वेगळेच चित्र उभे राहते. सध्या त्याठिकाणी असलेल्या महाराष्ट्र सदनाच्या इमारतीची वारंवार दुरुस्ती करावी लागत आहे. तसेच तेथे उपलब्ध असलेल्या कक्षबंधांची संख्या देखील अत्यंत तुटपुंजी आहे. महाराष्ट्रामध्ये विधानसभेचे 289 व विधानपरिषदेचे 78 मिळून एकूण 367 आमदार आहेत. परंतु त्या तुलनेत महाराष्ट्र सदनामध्ये केवळ 30 कक्षबंध निवासासाठी उपलब्ध आहेत. परिणामी अनेक वेळेला तेथे कामानिमित्त गेले असता विद्यमान तसेच माजी

. . . .2 क्यु-4



श्री.कन्हैयालाल गिडवाणी . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आमदारांना निवासासाठी जागा उपलब्ध होत नाही व त्यांची प्रचंड गैरसोय होते. त्याठिकाणी नवीन महाराष्ट्र सदन उभारण्यासाठी शासनाला सिरमूर येथे 6 एकराचा मोठा प्लॉट उपलब्ध झालेला आहे. एवढया मोठया जागेत किमान 1600 लोक राहू शकतील एवढी सेव्हन्थ स्टार इमारत बांधून सर्व आजी माजी आमदारांची तसेच खासदारांची सोय करता येणे शक्य आहे. सिरमूरच्या प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी बो.ओ.टी.तत्वावर एका विकासकाला अगोदरच कंत्राट देण्यात आलेले आहे. तथापि 6 महिने उलटून सुध्दा त्याठिकाणी कसलेच बांधकाम सुरु झालेले नाही. याबाबीची चौकशी करणे आवश्यक वाटते. नवीन महाराष्ट्र सदनाच्या इमारतीच्या उभारणीस विलंब होत असल्याने जुन्या महाराष्ट्र सदनाच्या इमारतीवर वारंवार खर्च करावा लागत आहे. त्यामुळे शासनाचा निधी अनावश्यकरित्या वाया जात आहे. शासनाने लवकरात लवकर नवीन महाराष्ट्र सदन उभारल्यास लोकप्रतिनिधींची सोय होईलच, शिवाय सध्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र सदनाची इमारत पाडून त्याठिकाणी नवीन दुसरा प्रकल्प उभारणे देखील सोयीस्कर होईल. यासंदर्भात आमदारांची एक उच्चस्तरीय समिती नेमण्याबाबत मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी गत सत्रात सभागृहात घोषणा केलेली आहे. परंतु त्याबाबत अजून कोणतीच कार्यवाही झालेली नसून ती घोषणा केवळ पोकळ आश्वासनच होते की काय असे वाटू लागले आहे. सबब, महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींची दिल्ली येथे निवासाची होणारी गैरसोय लवकरात लवकर दूर करण्यासाठी मा.मंत्र्यांनी केलेल्या घोषणेनुसार आमदारांची उच्चस्तरीय समिती नेमावी व तेथील नवीन महाराष्ट्र सदनाचा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करावा. त्याचप्रमाणे अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र सदनाच्या रिकाम्या जागेचा पुरेपूर वापर होण्याच्या दृष्टीने नवीन प्रकल्प हाती घ्यावा अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

आपण विशेष उल्लेखाव्दारे मला उपरोक्त विषय सभागृहात उपस्थित करण्यास परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद."

सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने एक मिनिटात बोलतो. महाराष्ट्र सदनाच्या विषय आपल्याला सर्वांना माहिती आहे. महाराष्ट्र सदनामध्ये सर्व लोकप्रतिनिधींची जी गैरसोय होते आणि त्याबाबतीत गेल्या अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेच्या व्दारे याकडे शासनाचे लक्ष वेधले होते आणि त्यामध्ये दिल्ली येथे सिरमूर भागात जो नवीन प्लॉट मिळालेला आहे, त्याठिकाणी

. . . .2 क्यु-5



श्री.कन्हैयालाल गिडवाणी . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लोकप्रतिनिधींसाठी व्यवस्था करण्याच्या संबंधात आश्वासन दिलेले होते. याठिकाणी विशेष उल्लेखाच्या सूचनेमध्ये मी याबाबतीत सविस्तर उल्लेख केलेला आहे. त्यावेळी नव्याने आश्वासन देण्यात आले होते की, यासाठी आमदारांची एक कमिटी नेमावयाची आहे, अशी इतर बरीच आश्वासने लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून देण्यात आली होती. त्या आश्वासनांची पूर्तता करण्यात यावी, तसेच त्याबाबतीत दखल घ्यावी अशी मी विशेष उल्लेखाव्दारे शासनाला विनंती करतो.

----

. . . .2 क्यु-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी.: राज्य व राष्ट्रीय महामार्गावर होणारे अपघात

मु.शी.: राज्य व राष्ट्रीय महामार्गावर होणारे अपघात

याबाबत श्री.मधुकर चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्य व राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक करणा-या मालवाहनातून धोकादायक स्थितीत बाहेर आलेल्या लोखंडी सळया, मोठे पाईप, लाकडी वासे-बांबू, अवजड वाहने धोकादायक वळणावर पार्किंग लाईट न लावता उभी राहण्याने होणारे अपघात, महामार्गावर अनेक अवजड वाहने पार्किंग लाईट न लावता धावणे, अनेक अवजड वाहनातून प्रवाशांची अवैध वाहतूक करणे, वाहने रस्त्यामध्ये उभी राहून प्रवाशांची चढ-उतार करणे, नादुरुस्त गाडी पार्किंग लाईट न लावता महामार्गावर उभी केल्याने होणारे अपघात, महाराष्ट्रातील मोठया शहरांच्या जकात नाक्याजवळ अवजड वाहनांसाठी राखीव असलेल्या वाहन स्थळांवर वाहने उभी न करता ती रस्त्याच्या मधोमध उभी केल्याने घडणारे अपघात व वाहतूक पोलिसांनी हया सर्व बाबींमध्ये केलेले अर्थपूर्ण दुर्लक्ष व शासनाने त्वरीत या सर्वांची गंभीर दखल घेऊन होणारे अपघात, प्राणहानी व वित्तहानी टाळणे आवश्यक आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा व सार्वजनिक हिताच्यादृष्टीने महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे मांडू इच्छितो."

सभापती महोदया, आपल्याला माहिती आहे की, हल्ली राष्ट्रीय महामार्ग आणि विशेषत: एक्सप्रेस हायवेवर फार मोठया प्रमाणात अपघात होऊन प्राणहानी आणि वित्तहानी होत असते आणि त्याला तेथील पोलिसांचे पेट्रोलींग कारणीभूत आहे, त्याबाबतीत मी आपल्या परवानगीने विशेष उल्लेख मांडत आहे. राज्य व राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक करणा-या मालवाहतूक, ट्रक्स, अवजड वाहने यांच्यामध्ये ज्या ट्रक्समधून लोखंडी सळया, मोठे पाईप, लाकडी वासे इ.कुठल्याही प्रकारचे वाहतुकीच्या नियमांचे पालन न करता ते बाहेर आलेले असतात. अवजड वाहने धोकादायक वळणावर पार्किंग लाईट न लावता उभी राहील्यामुळे मोठया प्रमाणावर

. . . .2 क्यु-7



श्री.मधुकर चव्हाण . . . .

अपघात होत असतात. महामार्गावर अनेक अवजड वाहने पार्किंग लाईट न लावता धावत असतात. अनेक अवजड वाहनातून प्रवाशांची अवैध वाहतूक चालू असते व वाहने मध्येच उभी करुन प्रवाशांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चढ-उतार होत असते. नादुरुस्त गाडया पार्किंग लाईट न लावता महामार्गावर उभ्या असतात आणि परिणामत: भरधाव येणा-या गाडया त्यांच्यावर आपटून मोठया प्रमाणात अपघात होत असतात आणि त्याठिकाणी प्राणहानी आणि वित्तहानी होत असते. महाराष्ट्रातील मोठया शहरांच्या जकात नाक्याजवळ अवजड वाहनांसाठी राखीव असलेल्या वाहनस्थळावर वाहने उभी न करता, ती रस्त्याच्या मधोमध उभी केल्याने घडणारे अपघात व वाहतूक पोलिसांनी या सर्व बाबींकडे केलेले अर्थपूर्ण दुर्लक्ष. शासनाने या सर्वांची त्वरित गंभीर दखल घेऊन, तेथे होणारे अपघात आणि त्यात होणारी प्राणीहानी व वित्तहानी टाळणे अत्यंत आवश्यक आहे. वाहतुकीच्या संबंधातील सर्व नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी याठिकाणी करण्यासाठी शासनाने वाहतूक विभागाला अतिशय योग्य प्रकारे व त्वरित आदेश द्यावेत. सदर विषय सार्वजनिक हिताच्यादृष्टीने अतिशय महत्वाचा असल्याने मी तो विषय आज सभागृहामध्ये विशेष उल्लेखाव्दारे मांडू इच्छितो. धन्यवाद.

----

. . . .2 क्यु-8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी.: इयत्ता 1 ली ते 4 थीच्या विद्यार्थ्यांच्या बुध्दीप्रमाणे अभ्यासक्रम ठरविणे.

मु.शी.: इयत्ता 1 ली ते 4 थीच्या विद्यार्थ्यांच्या बुध्दीप्रमाणे अभ्यासक्रम ठरविण्याबाबत श्रीमती संजीवनी रायकर

वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे.

श्रीमती संजीवनी रायकर(मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"इयत्ता 1 ली ते 4 थीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या बुध्दीच्या मानाने अभ्यासक्रम असावा. बालमनाचा व मानसिकतेचा विचार करुन दप्तराच्या अनावश्यक ओझ्यामुळे विद्यार्थ्यांच्या शरीरावर व मनावर होणारे परिणाम, मुलांच्या वजनाच्या निम्मे दप्तराचे ओझे पाठीवर घ्यावे लागणे, त्यामुळे पालकांना वाटणारी चिंता, याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर विषय अत्यंत महत्वाचा व सार्वजनिक हिताचा असल्यामुळे तो मी आज सभागृहात "विशेष उल्लेखाव्दारे" मांडू इच्छिते.

सभापती महोदय, पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या दप्तरांचे ओझे वाढत आहे आणि याबाबतीत शासनाने विचार करावा असे मी या विशेष उल्लेखाव्दारे माझे मत व्यक्त करीत आहे.

(**सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी**)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (पुढे चालू...

चार-पाच वर्षापूर्वी दप्तरांचे ओझे कमी व्हावे म्हणून आदेश काढले होते. त्यावेळचे शिक्षण राज्यमंत्री यांनी एकेका शाळेमध्ये जाऊन स्प्रींगच्या काटयावर दप्तरांचे ओझे करुन पाहिले. ज्या शाळा अधिक ओझे लादतात, त्यांच्यावर कारवाई वगैरे करण्यात आली. हे थोड्याच दिवसापुरते झाले. ती नवी नवलाईच ठरली आणि पुन्हा येरे माझ्या मागल्या असेच घडत गेले. सध्या असे आढळते की, मुलाचे वजन 10 ते 12 किलो आणि त्याच्या पाठीवर किंवा खांद्यावरचे दप्तराचे ओझे तीन ते पाच किलो असते. जगभरातील सर्व अध्ययन सर्वेक्षण, शासकीय समित्यांचे अहवाल हे सगळे बासनात गुंडाळून ठेवलले आहेत. या दप्तरांच्या ओझ्यामुळे मुलांची खूप प्रगती झाली असेही नाही. कारण दप्तरातील जी पुस्तके असतात, त्यातील विषय सगळेच्या सगळे त्यांच्या डोक्यात शिरलेले असतात असे मला वाटत नाही. पुस्तके आणि वह्या किती आणाव्यात, किती असाव्यात, याचे कोठेतरी नियोजन नक्कीच केले पाहिजे. वाचन, लेखन आणि गणित हे मुख्य विषय आले पाहिजेत. परंतु आता दिवसेंदिवस पहिली ते चौथीच्या मुलांना सुध्दा विषय लादले जातात. बाहेरचे प्रकाशक हे एकेक पुस्तके देत असतातच, त्यामुळे कार्यानुभव, वर्कबुक, क्लास बुक वर्क, चित्रकला अशी पुस्तके असतील ती मुलांनी शाळेमध्येच ठेवावीत, यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. पूर्वी पाटी आणि पेन्सिलचा उपयोग मोठ्याप्रमाणावर केला जात असे. आता पाटीचा उपयोग करत नाहीत परंतु गणिताचा सराव करण्यासाठी तरी या पाटीचा उपयोग करण्यात यावा. तज्ज्ञ डॉक्टरांचे असे मत आहे की, मुलांना असे ओझे दिल्यामुळे खांदे दुखी, पाठ दुखी, मणक्यांचा त्रास होऊ शकतो, मुलांना अपघातही येऊ शकतो. शिक्षक आमदार हे केवळ शिक्षकांच्या वेतन वाढीपुरतेच बोलत नाही तर विद्यार्थ्यांचाही आम्हाला विचारा करावा लागतो, हे ध्यानात ठेवावे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृशी.** : सहारा वृत्त वाहिनीने आंबेजोगाई,जि.बीड पोलीस स्टेशनमध्ये सुरु असलेल्या मद्यपानाबाबतचे वृत्त दाखविणे.

**मु.शी.** : सहारा वृत्त वाहिनीने आंबेजोगाई,जि.बीड पोलीस स्टेशनमध्ये सुरु असलेल्या मद्यपानाबाबतचे वृत्त दाखविणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : मा-ा-ीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यां-ी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा मांडते :-

"ज्याअर्थी, दि.17 व 18 जुलै, 2005 रोजी वा त्यासुमारास बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई पोलीस स्टेशनमध्ये सुरु असलेल्या मद्यपानाची "सहारा समय" या वृत्तवाहिनीने प्रसारित केलेले दृश्य, उपमुख्यमंत्री (गृह) यांनी पोलीस दलातील मद्यपींवर कडक कारवाई करण्याची अलीकडेच केलेली घोषणा, सदर घोषणेचा पोलिसांवर काही परिणाम न होणे, अंबेजोगाईमधील पोलीस स्टेशनमध्ये दारु पीत बसलेले पोलीस ही घटना अतिशय चीड आणणारी असणे, अशाप्रकारे पोलीस स्थानकांमध्ये तेथील पोलीस अधिकारी व शिपाई राजरोस दारु पिऊन बसलेले असता अशा मद्यपी पोलिसांवर शासनाने तातडीने कडक कारवाई करण्याबाबत दाखविलेली अक्षम्य दिरंगाई आणि त्याअर्थी, या गंभीर विषयी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करते."

सभापती महोदया, अतिशय गंभीर अशा विषयाकडे आपले लक्ष वेधत आहे. दिनांक 17 आणि 18 तारखेला 'सहारा समय' वाहिनी, मुंबई यांनी बीड येथील पोलीस स्टेशनमधील लाईव्ह रेकॉर्डींग दाखविले. त्यावेळेला पोलीस उप निरीक्षक श्री.अधटराव दारु प्यायलेल्या अवस्थेत श्री.विश्वनाथ जटाळे यांच्याशी अडखळत बोलत होते, त्याबद्दल 'सहारा' वाहिनीचे श्री.व्यंकटेश पाटील यांनी त्यांना विचारणा केली की, पोलीस ठाण्यामध्ये दारु पिऊन येणे, हे गृह मंत्र्यांच्या आदेशाचा अवमान करणारे आहे, यावर आपण काय कारवाई करणार आहात ? त्यावेळी उप निरीक्षक श्री. जटाळे यांनी श्री.पाटील यांना आपणच तक्रार करा, असा मानभावी सल्ला दिला. इतकेच नव्हे तर एकटे श्री.अधटरावच नाही तर माझ्या पोलीस ठाण्यातील तीन पोलीस कर्मचारी

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु....

रोज तर्र होऊन येतात, असे त्यांनी सांगितले. दोन दिवस सतत 'सहारा समय' वाहिनीवर लाईव्ह दृश्य दाखविले जात होते. या संदर्भामध्ये कॅमेऱ्यामध्ये सगळे संवाद टेप झाले आणि 17, 18 जुलै रोजी राज्यभर यावर खळबळ उडाली. मी या विशेष उल्लेखामार्फत श्री.सुनील मोरे यांनी दारु पिऊन बलात्कार केला, असा प्रश्न उपस्थित केल्यानंतर मा.उप मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, जे पोलीस डयुटीवर दारु प्यायलेल्या अवस्थेमध्ये आढळतील त्यांच्यावर आम्ही कारवाई करु.

सभापती महोदया, मला स्वत:ला बीड जिल्ह्यामध्ये गेवराई पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अपघात झाला, त्यावेळेस आमचे वकील जेव्हा तक्रार नोंदवावयास गेले, त्यावेळेस निम्मे पोलीस स्टेशनमधील लोक दारु प्यायलेल्या अवस्थेत होते. मी हा प्रश्न नागपूरच्या अधिवेशनामध्ये उपस्थित करुन ॲफीडेव्हीटद्वारे म्हणणे मांडलेले होते. त्यानंतर देखील त्या पोलिसांनी वकिलांना परत बोलावून विचारले की, आम्ही दारु प्यायलेलो असलो तरी तुम्ही आक्षेप घेणारे कोण ? या दुसऱ्या घटनेमध्ये लाईव्ह रेकॉर्डिंग दाखवून देखील अजूनही याबद्दल काहीही कारवाई झालेली नाही, म्हणून विशेष उल्लेखाद्वारे हे बीड पोलीस स्टेशनचे उप निरीक्षक श्री.अधटराव आणि त्यांचे तीन दारु पिऊन असलेले सहाय्यक यांच्यावर दारु न पिलेल्या अधिकाऱ्यांकडून कारवाई व्हावी अशी मी मागणी करते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, माझा औचित्याचा मुद्दा आहे. विशेष उल्लेखाच्या संबंधात अशी तरतूद आहे की, एक महिन्याच्या आत संबंधित मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. लगेच उत्तर देणे शक्य असेल तर सभागृहात ते देण्यात यावे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी लाईव्हच्या संदर्भातील मुद्दा मांडलेला आहे. माझी अशी विनंती आहे की, मोरे प्रकरणानंतर या राज्याच्या गृहमंत्र्यांनी असे जाहीर केलेले आहे की, एकही पोलीस डयुटीवर असताना दारु प्यायलेल्या अवस्थेत असेल तर त्याच्यावर कारवाई करु. मी आपल्याला विनंती करतो की, सरकारला या संदर्भातील निवेदन उद्यापर्यन्त करावे, असे आपण सांगावे. बाकीचे लांबचे विषय असतात. सरकारचे त्याबाबतील धोरण नक्की आहे.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : विशेष उल्लेखाच्या संबंधात आपण निवेदन करत नाही.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : विशेष उल्लेखाच्या सूचनांवर मा.मंत्रिमहोदयांनी ताबडतोब उत्तर द्यावयाची नियमात प्रोव्हिजन आहे.संबंधित मंत्रिमहोदय, आता सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून सभापती महोदया,सरकारने यावर उद्या निवेदन करावे असे निदेश आपण द्यावेत.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदया, हा अत्यंत महत्वाचा मुद्या आहे.आपण निदेश द्यावेत.आम्ही एक महिना उत्तरासाठी वाट बघावयाची काय?

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्या, श्रीमती नीलम गो-हे यांनी या ठिकाणी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाच्यासंदर्भात शासनाने निवेदन करावे असे सदस्यांचे म्हणणे आहे काय?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी :सभापती महोदया, विशेष उल्लेखाच्या संदर्भात नियम आहे. विशेष उल्लेख या ठिकाणी मांडल्यानंतर, त्यावर चर्चा होत नाही. नियम 101- क मध्ये असे म्हटले आहे की,"एका सदस्यास एका बैठकीत एकापेक्षा अधिक विषय मांडता येणार नाहीत."

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदया, श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे दारु पिणा-या पोलिसांची बाजू घेत आहेत काय?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी :मी विशेष उल्लेखासंबंधीचा नियम या ठिकाणी वाचून दाखवित आहे. " कोणत्या सूचना सभागृहात मांडू द्यावयाच्या याबाबत माननीय सभापतींचा निर्णय अंतिम राहील."...

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदया, श्री. गुरुनाथ कुलकर्णी दारु प्यायलेल्या, बलात्कार केलेल्या पोलिसांची बाजू घेत आहेत आणि ॲड. श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे अनैतिकता निर्माण करीत आहेत व ते त्यांचा डिफेन्स करीत आहेत काय ?

**तालिका सभापती** :नियम 101-फ मध्ये असे म्हटले आहे की,"विशेष उल्लेख म्हणून मांडल्या गेलेल्या विषयासंबंधीचे उत्तर मंत्रिमहोदयांनी लगेच दिलेले असले तरी त्या संबंधीचे लेखी उत्तर तीस दिवसांच्या आत संबंधित सदस्यास पाठविण्याचे बंधन मंत्र्यांवर राहील." हा विषय अतिशय गंभीर आहे, याबद्दल मुळीच शंका नाही. याबाबत मंत्रिमहोदयांना निवेदन करता येत नसले तरी स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, या नियमाचा अर्थ फार महत्वाचा आहे. त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "विशेष उल्लेख उपस्थित केल्यानंतर मंत्रिमहोदयांनी लगेच उत्तर दिल्यास" म्हणजे मंत्रिमहोदय, लगेच उत्तर देऊ शकतात. असा त्याचा अर्थ आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी विनंती केलेली आहे, त्याप्रमाणे आता येथे मंत्रीमहोदय उपस्थिती नाहीत पण शक्यतो लवकर उत्तर द्यावे हा त्यातील उद्देश आहे.

**तालिका सभापती** :त्यासंदर्भातील निर्णय मी आता देत आहे. त्यासंदर्भातील स्पष्टीकरण मंत्रिमहोदयांनी उद्यापर्यंत करावे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, या सभागृहात स्पष्टीकरण कोण करु शकतात? ज्यांनी चूक केली आहे, ते स्पष्टीकरण करु शकतात. ज्यांनी चूक केलेली नाही,ते कसे काय स्पष्टीकरण करणार. म्हणून मंत्रिमहोदयांनी "स्पष्टीकरण"करावे असे म्हणण्यापेक्षा "निवेदन" करावे असे म्हणावे.

**तालिका सभापती** :निवेदनात्मक स्पष्टीकरण करावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, आपण नियम 101 चा उल्लेख केला. तो लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात आहे. विशेष उल्लेखाच्या संदर्भात नियम 101-ड मध्ये उल्लेख आहे. आपण तो वाचावा आणि त्यानंतर निर्णय द्यावा,अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** :विशेष उल्लेखाच्या संदर्भात नियम 101-फ आहे. आणि त्याचे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे. शासनाने उद्या या संदर्भात स्पष्टीकरणात्मक-निवेदन करावयाचे आहे आणि ते माननीय गृह मंत्रिमहोदयांनी करावे.

यानंतर श्री.बरवड.....

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आता आम्हाला जी यादी मिळाली आहे त्यामध्ये मराठवाडयातील ज्या संस्थांची प्रवेश क्षमता कमी झाली आहे त्यांची यादी आहे. या महाराष्ट्रामध्ये इंजिनिअरींग आणि मेडिकल कॉलेजमधील प्रवेशाचा घोळ गेल्या अनेक दिवसांपासून चालू आहे. हा घोळ चालू असतानाच आणि विद्यार्थ्यांच्या ॲडमिशन्स झालेल्या नसताना काल या राज्यामध्ये मोठमोठया शिक्षण महर्षींवर आयकर विभागाने धाडी घातलेल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये एक मोठी खळबळ माजलेली आहे. हाच विषय काल विधानसभेमध्ये आला होता. आज सकाळी आम्ही याबाबत प्रयत्न केला पण सकाळी औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची संधी मिळाली नाही. विधानसभेमध्ये यासंदर्भात निवेदन करण्यास सांगण्यात आले आहे. या सभागृहामध्ये सुध्दा हे निवेदन झाले पाहिजे. शिक्षण क्षेत्रासंबंधी जो संभ्रम निर्माण झाला आहे, जी खळबळ माजलेली आहे त्यासंबंधी शासनाने या ठिकाणी स्पष्ट व सविस्तर निवेदन केले पाहिजे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, दोन दिवसांपूर्वी या ठिकाणी एका औचित्याच्या मुद्दयावर चर्चा झाल्यानंतर विधानसभेमध्ये जे निवेदन होईल ते निवेदन या सभागृहामध्ये करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. आता आजच्या दिवसाचे कामकाज संपावयास आले आहे तरी गृह खात्याचे निवेदन या ठिकाणी आलेले नाही.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : आपण सलमान खान यांच्यासंबंधीच्या मुद्दयाबाबत बोलत आहात काय ? जर आपला मुद्दा सलमान खान यांच्यासंबंधीचा असेल तर त्यासंबंधीचे निवेदन काल झालेले आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, विधान परिषदेच्या सदस्यांची नावे असलेले निवेदन आलेले नाही. त्याप्रमाणे सुधारित निवेदन यावयास पाहिजे.

**तालिका सभापती** : विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांची नावे असलेले सुधारित निवेदन आले पाहिजे असे आपले म्हणणे आहे काय ?

डॉ. नीलम गोऱ्हे : होय.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, काल आयकर विभागाने ज्या धाडी टाकलेल्या आहेत त्यामुळे खळबळ माजलेली आहे. शिक्षणसम्राटांच्या कॉलेजेसवर काल धाडी टाकण्यात आल्या. महाराष्ट्रातील अनेक कॉलेजेसवर धाडी पडलेल्या आहेत. त्यासंबंधीचे निवेदन या ठिकाणी झाले पाहिजे.

**तालिका सभापती** : सलमान खान यांच्यासंदर्भातील जो मुद्दा होता त्याबाबतीत विधान परिषद सदस्यांची नावे असलेले सुधारित निवेदन या सभागृहात यावे असा सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. ते निवेदन योग्य वेळी येणारच आहे. कॉलेजेसच्या धाडीसंबंधीचा जो विषय सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर यांनी मांडलेला आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना काही सांगावयाचे आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : त्यासंदर्भात विधानसभेमध्ये निवेदन करण्यास सांगितले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : यासंदर्भात विधानसभेमध्ये आज निवेदन होणार आहे. ते निवेदन या सभागृहात सुध्दा झाले पाहिजे.

**तालिका सभापती** : विधानसभेमध्ये निवेदन झाले तर विधान परिषदेमध्येही ते निवेदन सादर करावे असे मी शासनाला निदेश देत आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : ठीक आहे.

-----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सहकारी संस्था ( सुधारणा ) विधेयक.

**मु. शी.** :

L.C. BILL NO. XVIII OF 2005

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदया, सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 18- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 18 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक.

**मु.शी.**: **L.A.BILL NO. LXVI OF 2005.**

**(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH,2006.)**

डॉ.सुनील देशमुख ( वित्त व नियोजन राज्यमंत्री ) : महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 66 दिनांक 31 मार्च, 2006 रोजी संपणा-या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करते. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 ते 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही. )

**तालिका सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येत आहे.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

डॉ.सुनील देशमुख ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक 21 जुलै, 2005 रोजी भरलेल्या बैठकीत शुक्रवार, दिनांक 22 व शनिवार दिनांक 23 जुलै, 2005 पर्यंतचा विधानपरिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

**<u>जुलै, 2005</u>**

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार, दिनांक 22 | 1) | शासकीय विधेयके |
| | 2) | अंतिम आठवडा प्रस्ताव |
| | 3) | अशासकीय कामकाज ( विधेयके - गतसत्रातील प्रलंबित ) |
| शनिवार, दिनांक 23 | | शासकीय विधेयके |

-----

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, शनिवार दिनांक 23 जुलै रोजी फक्त शासकीय विधेयके होणार आहेत. मागील अधिवेशनाचा अनुभव लक्षात घेता, एकाच दिवशी 5-6 विधेयके आणून चर्चेविना ती मंजूर केली जातात. गेल्या वेळी मी यासंदर्भातील आमच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. कायदे करणारे आपले हे विधिमंडळ आहे आणि या विधिमंडळामध्ये प्रत्येक विधेयकावर संपूर्ण चर्चा करण्याची आवश्यकता असते. या अधिवेशनामध्ये एखादे विधेयक पास इ ाले नाही तर ते पुढील अधिवेशनामध्ये येईल. आपल्या माध्यमातून आम्हाला संरक्षण मिळावे.

**तालिका सभापती** : विधेयकावर संपूर्णपणे चर्चा करण्याचा मा.सदस्यांचा जो अधिकार आहे तो निश्चितपणे अबाधित राहील.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----- नंतर श्री.गिते....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 17:25

**पृ.शी.व मु.शी.** : विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (समिती प्रमुख ) : सभापती महोदया, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, महाराष्ट्र विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या तत्कालिन गृह राज्यमंत्री (ग्रामीण), यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या विशेषाधिकारभंगाच्या व अवमानाच्या प्रकारणावरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प.नियम 178 (1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--------------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) VV -2

**पृ.शी.** : राज्यातील मध्यवर्ती सहकारी बँका,नागरी बँका यांची कमकुवत झालेली आर्थिक परिस्थिती.

**मु.शी.** : राज्यातील मध्यवर्ती सहकारी बँका,नागरी बँका यांची कमकुवत झालेली आर्थिक परिस्थिती या विषयावर सर्वश्री. जयंत प्र.पाटील,पांडुरंग फुंडकर,यशवंतराव गडाख,नितीन गडकरी,दिवाकर रावते, शरद पाटील,उल्हास पवार, विनोद तावडे,सदाशिवराव पोळ, विलासराव शिंदे,मधुकर चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे,सर्वश्री. गुरुनाथ कुलकर्णी,संजय दत्त,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : आता आपण अल्पकालीन चर्चेस सुरुवात करु या.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, या अल्पकालीन चर्चेवर अडीच तास विचार मांडले जाणार आहेत. या विषयाशी संबंधित सहकार मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. गेल्या अधिवेशनात देखील ही चर्चा पुढे ढकलण्यात आली होती. आज चर्चेला आली, परंतु सहकार मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. राज्यातील शेतक-यांच्या दृष्टीने ही चर्चा अतिशय महत्वाची आहे. राज्यातील सहकारी बँकेचा तसेच नागरी बँकेचा प्रश्न आहे. या संदर्भात राज्य शासनाला ठोस निर्णय घ्यावा लागणार आहे. माननीय राज्यमंत्री तो निर्णय घेऊ शकणार नाहीत. सहकार मंत्र्यांनी या चर्चेस उपस्थित रहाण्याची आवश्यकता आहे. म्हणून माझी विनंती आहे की, ही चर्चा आज ठेवू नये. आजच्या ऐवजी उद्या ही चर्चा घ्यावी. परंतु या चर्चेच्या वेळी सहकार मंत्र्यांना उपस्थित रहावयास सांगावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राच्या दृष्टीने हा विषय अतिशय महत्वाचा आहे. जवळपास 650 नागरी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती बँका यांच्या संदर्भातील हा विषय आहे. या सर्व सहकारी बँका भयानक अडचणीत आलेल्या आहेत. त्या बँकाची आर्थिक परिस्थिती अतिशय दयनीय झालेली आहे. राज्यातील 25 लाख शेतक-यांचा जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे. त्यामुळे या प्रश्नावर शासनाला काही धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. म्हणून या चर्चेस सहकार मंत्र्यांची उपस्थिती आवश्यक आहे. ही चर्चा आज न घेता उद्या सकाळी घेण्यात यावी.

3...



ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 17:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : ही चर्चा अतिशय महत्वाची आहे याबद्दल मुळीच शंका नाही. या ठिकाणी त्या विभागाचे कॅबिनेट मंत्री उपस्थित नसले तरी राज्यमंत्री सभागृहात हजर आहेत. तसेच या ठिकाणी कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत. ते उत्तर देण्यासाठी सक्षम आहेत. ते आपल्या सूचना लिहून घेतील...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, राज्यातील 25 लाख शेतक-यांचा जीवन मरणाचा हा प्रश्न आहे. या चर्चेस खात्याचे कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. या विषयावर धोरणात्मक निर्णय शासनाला घ्यावा लागणार असल्यामुळे सहकार मंत्रीच तो घेऊ शकतात. माननीय सहकार मंत्र्यांच्या अनुपस्थित चर्चा करण्यामध्ये काहीही स्वारस्य नाही. नुसती मते मांडून मनोरंजन करण्यामध्ये काही अर्थ नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, श्री. यशवंतराव गडाख यांना या विषयाची चांगली कल्पना आहे. हा विषय सगळयांच्या दृष्टीने महत्वाचा आहे...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

सभापती महोदया, राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये 1200 कोटी रुपयांच्या कर्जाची 400 कोटी रुपयांमध्ये सेटलमेंट होते आणि या राज्यामध्ये 4000 रु. कर्ज घेतलेल्या शेतक-याला 40 हजार रु. व्याज भरावे लागत आहे आणि त्याच्या घरावर जप्ती येत आहे. सहकार मंत्री सभागृहात असतील तेव्हाच या विषयावर चर्चा करु. अन्यथा या विषयाला न्याय मिळणार नाही.

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : मंत्रीमहोदयांना सभागृहात उपस्थित राहण्याविषयी निरोप पाठवू या. तोपर्यंत कामकाजपत्रिकेवरील पुढील कामकाजाला सुरुवात करु या.

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदया, या खात्याचे मंत्री बाहेर गावी गेलेले आहेत. सदनामध्ये मा.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी मी सहमत आहे. या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे. नुसती या विषयावर चर्चा होऊन चालणार नाही कारण सहकार चळवळीसमोर आज अनेक अडचणी आहेत. ब-याच धोरणात्मक बाबींवर निर्णय घ्यावयाचा आहे त्यामुळे चर्चा उद्या किंवा परवा ठेवण्यास माझी हरकत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, मी सहकार राज्यमंत्र्यांना धन्यवाद देतो. अतिशय महत्वाच्या विषयावर त्यांनी नम्रतापूर्वक आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यांना मनापासून धन्यवाद देतो. पण मला एका गोष्टीचे दुःख आहे की, एवढया महत्वाच्या विषयावर चर्चा असताना सहकार मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक होते. त्यांचे काही महत्वाचे काम असेल त्यावर मी भाष्य करीत नाही. ते सभागृहात उपस्थित राहतील त्यावेळी ही चर्चा घ्यावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, मा.सहकार मंत्रीमहोदयांशी चर्चा करुन या विषयावर चर्चा ठेवा.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, या अधिवेशनापूर्वी ही चर्चा झाली पाहिजे.

**तालिका सभापती** : सभागृहातील सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या खात्याचे मंत्री उपस्थित असल्याशिवाय चर्चा घेणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे ही चर्चा पुढे ढकलून आता ही चर्चा उद्या घेण्यात येईल. सहकार मंत्री ज्यावेळी उपस्थित असतील त्यावेळीच ही चर्चा घेऊ. आता अर्धा-तास चर्चा सुरु करु.

----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पूर्णकालीन मान्यता व वेतनश्रेणी देणे

**मु.शी.**: कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पूर्णकालीन मान्यता व व वेतनश्रेणी देणे यासंबंधी श्री. वसंत काळे,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. वसंत काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा पदव्युत्तर परीक्षेचे विषय व पदवी परीक्षेचे विषय या दोन्हीही विषयांचा मिळून उच्च माध्यमिककडील कार्यभार 17 ते 18 घडयाळी तासाच्या 3,4 अशा शिक्षकांना उच्च माध्यमिक शिक्षकांची पूर्ण वेतनश्रेणी अटी आदेश शासनाने दिलेले असल्यामुळे शैक्षणिक वर्ष 2002-03 पर्यंत पदव्युत्तर पदवी व पदवी विषयाचा कार्यभार ग्राहय धरुन कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पूर्णकालीन मान्यता व वेतनश्रेणी दिलेली आहे. परंतु शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून 2003-04 व 2004-05 या शैक्षणिक वर्षात अनेक कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना अर्धवेळ/घडयाळी तासिकांवर मान्यता दिली जात आहे. याचा फटका भाषेच्या शिक्षकांना व ज्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इ. 11 वी व 12 वीचे एकएक वर्ग चालू आहेत अशा महाविद्यालयीन शिक्षकांना बसत आहे. परिणामी शिक्षकांत स्थिरता प्राप्त होत नाही व त्याचा अध्यापनावर परिणाम होत आहे व क.म.वि.विद्यार्थ्यांच्या परीक्षा,हजेरीपट,हजेरी पटाची जबाबदारी कोणावर द्यावी असे प्रश्न निर्माण होत आहेत व त्यामुळे शैक्षणिक अस्थिरता प्राप्त होत आहे. म्हणून शासनाने दि. 10 डिसेंबर 1987 चे पत्र क्रमांक 1383 उमाशि-1 रद्द करण्याची आवश्यकता आहे त्याबाबत शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना."

सभापती महोदया, गेल्या अनेक वर्षापासून कनिष्ठ महाविद्यालये किंवा उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये काम करणा-या शिक्षकांचा कार्यभार हिशोबात घेऊन त्यांना मान्यता दिली जात होती. त्यामुळे पदव्युत्तर पदवी विषयाचा कार्यभार आणि पदवी पातळीवरील विषयाचा कार्यभार 50-50 टक्के गृहीत धरुन त्यांना पूर्णवेळ मान्यता दिली जाण्याची पध्दत आतापर्यंत चालू होती. 2003 पासून 2000 सालातील शासन परिपत्रकाचा आधार घेऊन 2000-01,2001-02,2002-03 या वर्षामध्ये ज्यांना पूर्ण वेळ शिक्षक म्हणून मान्यता मिळालेली आहे अशा शिक्षकांना आता तासिका तत्वावर किंवा अर्धवेळ मान्यता दिली जात आहे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत काळे ...

त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिकविणा-या शिक्षकांच्या भवितव्याची चिंता निर्माण झाली आहे त्याचबरोबर ग्रामीण भागातील झोपडट्टीमध्ये, गरीब वस्तीमध्ये ज्या अकरावी आणि बारावीच्या शाळा चालतात किंवा कनिष्ठ महाविद्यालये चालतात त्या शाळांना किंवा त्या महाविद्यालयांना बंद करण्यासाठी केलेली ही उपाययोजना आहे असे माझे मत झाले आहे. सभापती महोदया, आज पर्यन्त एक तुकडी असलेला अकरावीचा वर्ग ज्या शाळेत किंवा महाविद्यालयात आहे आणि त्या शाळेत किंवा त्या महाविद्यालयात या तुकडीमध्ये इंग्रजी,गणित,भूगोल,वाणिज्य असे विषय शिकविणारे जे शिक्षक असतात त्यांना पूर्णवेळ किंवा 17-18 घडयाळी तासाचा 75 टक्के कार्यभार उपलब्ध होऊ शकत नाही. इंग्रजी सारखा विषय घेतला तर त्या विषयाला 3/4 म्हणजे 75 टक्के कार्यभार उपलब्ध न झाल्यामुळे अकरावीच्या वर्गास या पुढे इंग्रजीचे शिक्षक मिळणार नाहीत.एखाद्या शाळेमध्ये इंग्रजी विषय शिकविण्यासाठी शिक्षक नाही असे जर विद्यार्थ्यांना कळले तर त्या शाळेत किंवा त्या महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश घेणार नाहीत. अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यामुळे, व तेथील विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे आपोआपच त्या शाळेतील किंवा त्या महाविद्यालयातील अकरावीची एकच तुकडी बंद पडणार आहे. त्यामुळे अशा शाळेत जे इतर विषयाचे शिक्षक किंवा प्राध्यापक कायम स्वरुपी नोकरी करतात त्या शिक्षकांना किंवा त्या प्राध्यापकांना घरी जावे लागेल व त्यांना आपल्या नोकरीस मुकावे लागेल. दुसरी दुर्देवाची बाब अशी आहे की,झोपडपट्टीत राहणारी गरीब मुले, शेतक-यांची वा शेतमजुरांची गरीब मुले ज्या उच्च माध्यमिक शाळेत शिक्षण घेतात त्या शाळाना हे वर्ग बंद केल्या शिवाय दुसरा कोणताही पर्याय राहणार नाही. तेव्हा हे शासन कोणत्या दिशेने चालले आहे ? हे मला तरी समजत नाही.घडयाळाचे काटे उलटे फिरविण्याचा कार्यक्रम कशासाठी चालविण्यात येत आहे? कोणाच्या तल्लख मेंदूतून ही कल्पना बाहेर आली ? "3/4 वर्क लोड "अशा प्रकारचा शब्द प्रयोग वापरुन नोकरीमध्ये पूर्णवेळ काम करणा-या व असा विषय शिकविणा-या प्राध्यापकांना विस्थापित करणे आणि पर्यायाने हे वर्ग बंद करण्याची योजना आखणे म्हणजे जणू काही अलिखित पध्दतीने कटाचा तो एक भाग आहे असे म्हणावेसे वाटते.म्हणून शिक्षणाचा प्रसार व्हावयास नको असे वाटत असलेल्या काही लोकांच्या मेंदूतून निघालेली ही कल्पना असू शकते असे मला वाटते.

2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत काळे...

उच्च माध्यमिक शाळेतील अकरावीचे वर्ग बंद करावयाचे कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग बंद करावयाचे असे म्हटले तर त्यावर लोक तीव्र प्रतिक्रिया देतील. त्या ऐवजी गणित, इंग्रजी,भूगोल वाणिज्य हे विषय शिकविण्यासाठी शिक्षक दिले नाही तर हे वर्ग आपोआपच बंद पडतील असा विचार करण्यात आला असावा. या संदर्भात 1987 साली एक परिपत्रक काढण्यात आले होते व त्यासाठी 1987 च्या परिपत्रकाचा आधार घेण्यात येत आहे परंतु त्यानंतर 2000 साली पुन्हा नवीन परिपत्रक काढण्यात आले होते . या अर्धा ताच चर्चेच्या निमित्ताने माझी शासनाकडे अशी मागणी आहे की, 50:50 टक्के हा कार्यभार एकत्र करुन या शिक्षकांना किंवा प्राध्यापकांना पूर्ण वेळ शिक्षक वा प्राध्यापक म्हणून मान्यता दिली पाहिजे.तरच आपण शिक्षकांच्या भवितव्याला सुरक्षितता देऊ शकू.तसे केले तर शिक्षकांना सुरक्षितता देणे हा प्रश्नातील पहिल्या भागाला न्याय मिळू शकेल.त्यानंतर प्रश्नातील दुसरा महत्वाचा भाग असा आहे की, ग्रामीण भागातील झोपडट्टीत किंवा शहरातील स्लम एरियात असलेल्या ज्या उच्च माध्यमिक शाळा आहेत

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत काळे ...

किंवा कनिष्ठ महाविद्यालये आहेत की ज्यांच्याकडे एक तुकडी आहे त्यांच्याकडे हा प्रश्न नेहमीच उपस्थित राहणार आहे. ज्यायोगे एखाद्या विषयाचा प्राध्यापक मिळाला नाही तर त्या विषयाच्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागणार आहे. ही बाब लक्षात घेतली तर महाविद्यालय असूनही त्या विद्यार्थ्याला शिक्षणाचे दार बंद होणार आहे. कारण डीएडला जाण्यासाठी 12वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे आणि गरीब घरातील, दरिद्री वर्गातील मुलगाच या डीएडला जात असतो. श्रीमंत वर्गातील, अभिजित वर्गातील कोणीही मुलगा 11वी, 12वी करून डीएड ला प्रवेश घेत नाही. तेव्हा गरीब घरातील गुणवान मुलाला शिक्षणासाठी सर्व विषयासाठी प्राध्यापक मिळाले पाहिजेत. ही आमची मागणी असल्याने हे वर्गही बंद होता कामा नयेत आणि या प्राध्यापकांनाही न्याय मिळाला पाहिजे. यासाठी 1987 चे आणि 2000 चे परिपत्रक सरकारने रद्द करावे आणि 50-50 टक्के कार्यभार, पदव्युत्तर आणि पदवी विषयाचा असा एकत्र करून त्यांना पूर्णवेळ म्हणून मान्यता द्यावी अशा स्वरूपाची मागणी सभापती महोदया, आपल्या मार्फत मी शासनाला करीत आहे तिचा विचार व्हावा ही विनंती.

****

...... वायवाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य प्रा. वसंत काळे यांनी या ठिकाणी महत्त्वाचा मुद्दा या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम केला असेल तर त्याचा 50 टक्के कार्यभार आणि पदव्युत्तर पाठ्यक्रमाचा अभ्यास पूर्ण केला असेल तर त्याचा 50 टक्के कार्यभार करावा. ही पध्दत काही वर्षापूर्वी निश्चितपणे होती. परंतु आपली शिक्षण पध्दती ही केवळ शिक्षक केंद्रित नसून ती विद्यार्थी केंद्रित आहे. सन्माननीय सदस्य प्रा.काळे आणि डॉ.मोडक यांना याची कल्पना असेलच. फक्त ग्रॅज्युएशन पर्यंत मला मिळालेले ज्ञान, एका ठराविक विषयामध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन पर्यंत मिळालेले ज्ञान, मग तो कोठलाही विषय असो, इंग्रजी, मराठी, पोलिटिकल सायन्स, असे जे कोणते विषय असतील, पण त्या विषयामध्ये प्रचंड तफावत असते आणि म्हणूनच किमान 75 टक्के त्या पदव्युत्तर विषयाचे वर्कलोड आणि 25 टक्के पदवीपर्यंतचे वर्कलोड अशा प्रकारचा हा कार्यभार ठरविलेला असल्यामुळे सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे की, यामुळे सर्वसामान्य मुलांना नोकरी मिळणार नाही आणि खेड्यातील मुलांचे जे शैक्षणिक द्वार आहे तेही बंद झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु मी नम्रपणे आपल्याला सांगेन की, अशा प्रकारचा निकष लावणे हे निश्चितच सोयीचे होणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यातून एक गोष्ट चर्चेमध्ये आली होती. ती अशी की, 10 वी पर्यंत शिकविला गेलेला अभ्यासक्रम जो असेल त्याचे 50 टक्के वर्कलोड आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे 50 टक्के वर्कलोड असे 100 टक्के व्हावे. अर्थात हे आज आपल्या बोलण्यामध्ये आलेले नसले तरी आपल्या बोलण्याचा मुख्य रोख तोच होता असे मला वाटते. मी आपल्याला या संदर्भात नम्रपणे सांगेन की, एमएस्सी, एम.कॉम., एम.ए. या पदव्युत्तर किंवा स्नातकोत्तर परीक्षेमध्ये मिळालेल्या ज्ञान प्राप्तीच्या संदर्भात मुलांना मिळणारे ज्ञान हे निश्चितच सर्वमान्य असेल, साधारणपणे सखोल असेल. म्हणून ज्युनिअर कॉलेजच्या संदर्भात हे वर्कलोड 75 टक्के असलेच पाहिजे आणि त्यामध्ये 25 टक्के अधिक 75 टक्के अशा प्रकारचा कार्यभार असल्याशिवाय 100 टक्के पूर्णवेळ कनिष्ठ महाविद्यालयात लेक्चरर म्हणून त्यांना ट्रीट करता येणार नाही. म्हणूनच 1987 आणि 2000 सालची परिपत्रके रद्द करण्यात यावी अशी जी आपली मागणी आहे त्याप्रमाणे ही परिपत्रके किंवा जीआर रद्द करणे सोयीचे होणार नाही. तेव्हा माझी पुन्हा आपल्याला विनंती आहे, अलिकडेच आपण काढले की, दोन्हीही विषयामध्ये वर्कलोड पूर्ण करावयाचा असेल तर त्या दोन्ही विषयामध्ये तो पोस्ट ग्रॅज्युएट असावा. एखाद्या विषयात तो सेकंड क्लास असावा, बी प्लस असावा आणि

...... वायवाय 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. पुरके ....

दुसऱ्या विषयामध्ये ए प्लस किंवा फर्स्ट क्लास नसेल तरी देखील पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केलेलाच उमेदवार असावा, हेच बरोबर आहे. यामुळे खऱ्या अर्थाने सर्वसामान्य माणसाच्या शिक्षणाचा स्तर मुळापासून उन्नत करावयाचा असेल, खेड्यातील मुलांना देखील सखोल ज्ञान द्यावयाचे असेल, त्यांना जागतिक स्पर्धेमध्ये टिकावयाचे असेल तर या दोन्ही विषयांमध्ये पदव्युत्तर परीक्षा देणे आवश्यक आहे. तरच कनिष्ठ महाविद्यालयातील मुलांना निश्चितपणे चांगले ज्ञान मिळेल अशी माझी धारणा आहे. तरी माझ्या या खुलाशामुळे आपले समाधान झाले असेल असे मी समजतो.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदया, खरे म्हणजे या प्रश्नाकडे सन्माननीय सदस्य श्री.वसंत काळे यांनी सांगितल्याप्रमाणे सरकारचे दुर्लक्षच झालेले आहे. त्याचे कारण काय आहे हे मात्र मला समजत नाही. 11वी आणि 12वी हे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सगळ्यात मोठा टर्निंग पॉईट आहे. त्यातून त्याचे आयुष्य आणि करिअर घडणार आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील हे शिक्षक पदवीलाही शिकवितात आणि पदव्युत्तर विषयाचे देखील प्रॅक्टिकली पिरिएड घेतात. त्यांना वर्कलोड होत नाही म्हणून 11वी 12वी साठी तासिका पध्दतीवर पेमेंट करणे, त्यांना कायम स्वरूपी, पूर्णवेळ पगार न देणे हा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी येथे मांडला. ...

( यानंतर श्री.जागडे .... झेडझेड 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ KGS/ MAP/ 17:45

श्री. श्रीकांत जोशी...

याबाबत 17 ते 18 तास शिकविणा-या शिक्षकांना पूर्ण वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाने आदेश दिलेले आहेत. सभापती महोदय, माझ्याकडे अनेक संघटनांची निवेदने आलेली आहेत. तेवहा अशा शिक्षकांची संख्या किती ? त्यामुळे शासनावर वेतनाचा किती भार येत आहे ? तेव्हा या शिक्षकांना कायमस्वरुपी वेतनश्रेणी देण्यात येणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या ठिकाणी वेतनाचा भार किती हा महत्वाचा मुद्दा नाही. ज्युनिअर कॉलेजचा व्याख्याता हा स्वत:च्या विषयावर पारंगतच असावा. ही त्यामागील भूमिका आहे. म्हणून त्याचे वर्कलोड हे किमान तीन चतुर्थांश असलेच पाहिजे. एखाद्या विषयात तो एम.ए. असेल तर त्याचे वर्कलोड तीन चतुर्थांश असलेच पाहिजे. म्हणून आपण हा निर्बंध घातला आहे. आता हा व्याख्याता दुस-या विषयातील असला तरी चालेल. परंतु तो दोन्ही विषयात एम.ए. किंवा पोस्ट ग्रॅज्युएट असला पाहिजे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. काळेसाहेबांनी यांनी एक तुकडी असलेल्या जुनीअर कॉलेजचा शिक्षकांचा मुद्दा मांडला आहे. त्यामुळे ज्या कनिष्ठ महाविद्यालयात एक तुकडी असते त्या कॉलेजमध्ये एका विषयाला पूर्ण वर्कलोड असत नाही. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकाला वर्षानुवर्षे सीएचबीवर काम करावे लागते. माननीय सदस्या श्री.काळेसाहेबांच्या मागणीप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत वेगवेगळे विषय असले तरी त्याचा कार्यभार त्यांना दिला तर त्या प्राध्यापकाला पूर्ण वेळ काम करता येईल आणि विद्यार्थ्यांना न्याय देता येईल. माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, ते प्राध्यापक त्या विषयात पारंगत असले पाहिजेत. जो पदवीधारक असतो, तो त्या विषयात पारंगत असतो. दोन्ही विषय वेगवेगळे असले तरी माध्यमिक स्तरावर तसेच उच्च माध्यमिक स्तरावर त्या प्राधापकांना काम करण्यास नियुक्त केले जाते. त्याप्रमाणे त्यांना नियुक्त केले जावे आणि त्यांचे वेतन त्यांना मिळावे. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना योग्य प्रकारची शिक्षणाची संधी यामुळे मिळणार आहे. त्यामुळे याचा विचार माननीय मंत्रिमहोदयांनी करावा.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, 10 पर्यन्तचा 50 वर्कलोड आणि ज्युनिअर कॉलेजचे 50 टक्के वर्कलोड असा वर्कलोड धरुन 100 टक्के वर्कलोड आपणाला करता येणार नाही. आता एखादा प्राध्यापक इंग्रजी विषयासाठी नियुक्त झाला असेल आणि त्याचा वर्कलोड त्या विषयात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके....

पूर्ण होणार नसेल तर समाजशास्त्रचा विषय असेल, इतिहासाचा विषय असेल तर त्याचे 50 टक्के वर्कलोड आपणाला गृहीत धरता येईल. परंतु हायस्कुलला दिलेले 50 टक्के वर्कलोड आणि ज्युनिअर कॉलेजला दिलेले 50 टक्के वर्कलोड असे 100 टक्के आपणाला गृहीत धरता येणार नाही.

श्री. वसंत काळे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी योग्य वळणावर येऊन या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानीत आहे. हा विषय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. माननीय मंत्रिमहोदय जुनिअर कॉलेजला प्राध्यापक होते. त्यामुळे त्या प्राध्यापकाच्या वेदना त्यांना माहिती आहे. ते डबल एम. ए. आहेत काय ? याची मला माहिती नाही. ते सिंगल एम. ए. आहेत, अशी माझी माहिती आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी कृपया वाईट वाटून घेऊ नये. या ठिकाणी अधिका-यांनी तयार करुन दिलेली उत्तरे त्यांनी कृपया सांगू नयेत. त्यांनी आपले मन मोठे आणि मोकळे ठेऊन या ठिकाणी उत्तर द्यावे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून या ठिकाणी उत्तर दिले पाहिजे.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसत काळे...

अशी 11 वी आणि 12 वीची कनिष्ठ महाविद्यालये अनेक आहेत ज्या महाविद्यालयांमध्ये एक तुकडी असेल तर त्या तुकडीचे काय होणार हे मी सांगितले आहे. हायस्कूलचा 50 टक्के आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचा 50 टक्के करा अशी माझी मागणी नाही. तुम्ही जे आता सांगितले तीच माझ ी मागणी आहे. तो प्राध्यापक जर पदव्युत्तर विषय कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिकवित असेल उदा. तो इंग्रजी एम.ए. आहे. परंतु इंग्रजी एम.ए. ला एक तुकडी असल्यामुळे त्याचा वर्कलोड पूर्ण होत नाही म्हणून त्याच्या वर्कलोडला मान्यता मिळाली नाही. त्याला तासिका तत्वावर रहाण्याची पाळी आली तर तो शाळेत मरायला कशाला जाईल? तो टयुशन घेईल, त्यामध्ये त्याला जास्त पैसे मिळतील, कारण तो आपल्या पोटाचे बघेल. त्यामुळे उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये इंग्रजी शिकविणारा शिक्षक मिळणार नाही, गणिताचा शिक्षक मिळणार नाही हे मी तुम्हाला सांगितले. तेव्हा त्याबाबत आपण आता उपाय जरी सांगितले असलेतरी त्याबाबतचे शासनाचे धोरण निश्चित स्वरुपामध्ये जाहीर करु असा आम्हाला शब्द द्या. आणि त्याप्रमाणे आपण दुरुस्तीचा आदेश काढावा. कनिष्ठ महाविद्यालयात वर्षानुवर्षे पदव्युत्तर विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांचा त्या विषयांचा वर्कलोड जर पूर्ण होत नसेल तर कनिष्ठ महाविद्यालयात इतर पदवी परिक्षांचे विषय शिकविल्यामुळे पूर्ण होणारा 50 टक्के वर्कलोड गृहीत धरुन त्याला कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक म्हणून मान्यता द्यावी ही आमची मागणी आपण मान्य केली आहे. तिच्या बाबत आपण जाहीरपणे सभागृहामध्ये घोषणा करावी. व तशाप्रकारचे आदेश 15 दिवसामध्ये आपण निर्गमित करावेत अशी विनंती करतो.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, ही अडचण निश्चितपणे रास्त आहे. माझी अशी विनंती आहे की, एम.ए. इंग्लिश हा विषय असेल व वर्कलोड पूर्ण होत नसेलतर त्यामध्ये 50 टक्के गृहीत धरावे. वास्तविक लँग्वेज विषय असलेल्या प्राध्यापकांचा वर्कलोड पूर्ण होतो. परंतु सेक्शन एकच असेल तर वर्कलोड पूर्ण होत नाही. म्हणून दुसऱ्या विषयाचे पदवीपर्यंतचे जे वर्कलोड आहे त्याचे 50 टक्के गृहीत धरावे अशी आपली मागणी आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, 50 टक्के वर्कलोड मान्य करायला हरकत नाही. परंतु त्याचवेळी त्याच्या नेमणुकीनंतर किमान तीन वर्षामध्ये त्याला क्लास जरी मिळाला नाहीतरी नॉलेज इंम्प्रुव्ह करावे लागेल. त्यामध्ये फक्त अडचण अशी असेल की, आमच्या काही लोकांना त्यामध्ये प्रॅक्टिकल सब्जेक्ट करता येणार नाहीत. परंतु थिअरॉटीकल सब्जेक्ट असेल तर किमान तीन वर्षाच्या आत दुसऱ्याही संबंधित विषयामध्ये 50



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके....

टक्के वर्कलोड करावे लागेल. आणि जे पदवीधर झाले आहेत व जे तो विषय विषय घेणार आहेत त्यांना किमान तीन वर्षात पी.जी. करावे लागेल. जेणेकरुन दोन्ही वर्षाचे वर्कलोड किमान 50 टक्के धरायला काही हरकत नाही.

श्री. वसंत काळे : प्रॅक्टिकली इतर विषय आहेत त्यांना दुसरा पदव्युत्तर विषय घेता येणार नाही असे तुम्हाला करायला हरकत नाही. संबंधित विषयाची एकच तुकडी असलेल्या कनिष्ठ महाविद्यालय, किंवा उच्च माध्यमिक शाळेत ही अट शिथिल करुन पदव्युत्तर विषयाच्या 50 टक्के आणि त्यांनी प्राप्त केलेल्या पदवी विषयातील 50 टक्के वर्कलोड गृहीत धरुन त्यांना पूर्ण वेळ मान्यता द्यावी. ज्यायोगे कनिष्ठ महाविद्यालयांना पूर्णवेळ प्राध्यापक मिळेल असा त्यामध्ये आमचा मुख्य हेतू असून तो आपण मान्य करायला हरकत नाही. तेव्हा आपण त्यामध्ये अटी घालू नका.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, माझी पुन्हा विनंती आहे की, जगामध्ये एकप्रकारचा ज्ञानयज्ञ सुरु झालेला असतांना वर्षानुवर्षे फक्त पदवीचाच एखादा विषय घेऊन शिकविणे बरोबर नाही. माझी आपणास कळकळीची विनंती आहे की, एखाद्या प्रॅक्टिकल सब्जेक्टमध्ये, मॅथेमॅटिक्समध्ये किंवा फिजिक्समध्ये एखाद्या वेळी वर्कलोड पूर्ण होत नसेल. तरीही माझी आपणास विनंती आहे की, पी.जी. च्या विषयातील तीन चतुर्थांश वर्कलोड असावा अशी माझी आग्रहाची भूमिका असली तरी 50 टक्के पदव्युत्तर परिक्षेचे वर्कलोड आणि 50 टक्के पदवीपर्यंतच्या विषयाचे वर्कलोड हे जरी 100 टक्के मान्य केले तरी किमान 3 वर्षामध्ये पासिंग मार्क मिळवून ग्रॅज्युएशन झालेला असला तरी चालेल परंतु त्या विषयामध्ये त्यांनी स्नातकोत्तर परिक्षा दिली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

---

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/MHM पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:55

पृ.शी.: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शासकीय विद्यानिकेतनात प्रवेश न मिळणे.

मु.शी.: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शासकीय विद्यानिकेतनात प्रवेश न मिळणे यासंबंधी प्रा.शरद पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो :----

"राज्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत प्रत्येक वर्षी 4थी व 7वी ची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. यात ग्रामीण व शहरी अशा दोन गुणवत्ता याद्या बनवल्या जातात. मा.शिक्षण मंत्र्यांनी 10 हजार लोकसंख्येवरील गावांना दिलेला शहरी दर्जा रद्द करुन शिष्यवृत्तीच्या रकमेत दुप्पट वाढ करण्याचे आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी न केल्याने, शिष्यवृत्ती गुणवत्ता यादी तून शासकीय विद्यानिकेतनामध्ये प्रवेश मिळत होता. परंतु या वर्षी शहरी विभागात ग्रामीण विभागाचा समावेश केल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी गुणवत्ता धारक असून सुध्दा शासकीय विद्यानिकेतनात प्रवेश मिळणार नसल्याने ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये व त्यांच्या पालकांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, तसेच शासनाच्या सन 2004-2005 सालातील जाचक अटींमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करणे शक्य नसल्याने व शासनाकडून गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना वार्षिक 250 रुपये इतकी तुटपूंजी शिष्यवृत्ती दिली जाते, त्यात वाढ करणे आवश्यक आहे. त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, राज्यात गेली अनेक वर्षे परीक्षा मंडळाच्यावतीने इयत्ता चौथी व इयत्ता सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा घेतल्या जातात आणि या परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांमध्ये शहरी व ग्रामीण असे दोन भाग केले जातात. 2004-2005 सालापर्यंत शहरी आणि ग्रामीण अशा दोन गटात विद्यार्थ्यांची विभागणी करुन त्यांची परीक्षा घेतली जात असे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना असा वेगळा दर्जा देण्यामागचे कारण असे की, हे विद्यार्थी शहरी भागातील विद्यार्थ्यां-बरोबर स्पर्धा करु शकणार नाहीत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे सुविधा उपलब्ध नसतात. त्यामुळे त्यांना या शिष्यवृत्ती परीक्षेत वेगळा दर्जा देऊन, त्यांच्यासाठी एक वेगळी व्यवस्था करुन, नवोदय विद्यालयामध्ये त्यांना प्रवेश मिळण्यासाठी त्यांची स्वतंत्र गुणवत्ता

. . . .3 बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील . . . .

यादी तयार केली जात असे.2004-2005 मध्ये या शिष्यवृत्ती परीक्षांचे फॉर्म भरुन घेत असताना शिक्षणाधिका-यांनी ज्या गावांची लोकसंख्या दहा हजाराहून अधिक आहे, अशा ग्राम पंचायती असलेल्या गावातील विद्यार्थ्यांचे फॉर्म भरुन घेत असताना त्यांना "शहरी" असा दर्जा दिला. त्यामुळे महाराष्ट्रातील दहा हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये राहणा-या विद्यार्थ्यांना "शहरी विद्यार्थी" म्हणून मानले गेले. त्यांना नवोदय विद्यालयामध्ये प्रवेश मिळण्यासाठी यापूर्वी जी संधी उपलब्ध होत होती, ती एक प्रकारे नाकारण्यात आली. या अन्यायाच्या विरोधात अनेकांनी शासनाकडे तक्रारी केल्या. अंदाजपत्रकीय अधिवेशनामध्ये यासंबंधी मी विशेष उल्लेखा व्दारे शासनाचे लक्ष वेधले होते. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी, ही तफावत दूर करु अशा प्रकारचे आश्वासनही दिलेले होते. तथापि ही परीक्षा झाली. त्याचे निकाल जाहीर झाले आणि दहा हजार लोकवस्तीपेक्षा अधिक लोकवस्ती असलेल्या गावातील विद्यार्थ्यांना शहरी दर्जा मिळालेला असल्यामुळे त्यांना शहरातील विद्यार्थ्यांच्या बरोबरच त्यांचे निकाल लावले गेले. त्यामुळे त्यांच्यावर हा जो गेल्या वर्षी अन्याय झाला, तशा प्रकारचा अन्याय यापुढे होता कामा नये म्हणून माझी अशी मागणी आहे की, पूर्वीप्रमाणेच जरी लोकसंख्या दहा हजाराच्यावर असली तरी देखील ज्या गावात ग्रामपंचायती आहेत, त्या गावातील विद्यार्थ्यांना ग्रामीण दर्जाच यापुढे दिला जावा. खरे म्हणजे शिक्षण विभागाकडून दहा हजार लोकसंख्येच्या गावांना शहरी दर्जा कशाच्या आधारे दिला गेला हे कोडेच आहे. वास्तविक पाहता हा नागरी दर्जा देण्याचा अधिकार नगरविकास विभागाचा आहे. शिक्षण विभागाने हा अधिकार आपल्याकडे कसा घेतला ? याचे उत्तर मिळावे. तसेच दहा हजार, पंधरा हजार, वीस हजार जरी लोकसंख्या असली आणि त्या गावात ग्रामपंचायत असेल तर त्या गावाला ग्रामीण असाच दर्जा असावा आणि त्या गावातील शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बसणा-या विद्यार्थ्यांना ग्रामीण म्हणूनच मानले जावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून माझी दुसरी मागणी अशी आहे की, शिष्यवृत्ती परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांना जी शिष्यवृत्ती दिली जाते, ती अत्यंत तुटपूंजी आहे. ही रक्कम गेल्या दहा-पंधरा वर्षामध्ये होती, तेवढीच आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ झालेली नाही. त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे प्रोत्साहन मिळावे आणि भरीव अशा स्वरुपाची रक्कम त्यांना देण्यात यावी. जेणेकरुन त्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या

. . . .3बी-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील . . . .

पालकांना आपल्याला शासनाकडून चांगल्या प्रकारची मदत मिळाली आहे किंवा प्रोत्साहन मिळाले असे वाटले पाहिजे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा..शरद पाटील (पुढे चालू...

त्यादृष्टीने शिष्यवृत्तीच्या रक्कमेमध्ये वाढ करुन ती तिप्पट करण्यात यावी, अशी या निमित्ताने मागणी करतो. दुसरी अडचण अशी आहे की, शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर करुन देखील विद्यार्थ्यांना ती तीन-तीन वर्षे पैसे मिळत नाहीत. ज्या वर्षी शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर होते त्याच वर्षी त्या विद्यार्थ्यांना ती मिळाली पाहिजे,याची दक्षता शासनाने घ्यावी, अशी या निमित्ताने मागणी करतो. तिन्ही मागण्यांचा गांभीर्याने विचार करुन त्याबद्दल शासन ठोस अशाप्रकारचा निर्णय घेईल काय ? अशी विचारणा करुन मी येथेच थांबतो.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदया, शहरी आणि ग्रामीण भागातील शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्या संबंधाने अर्धातास चर्चा सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील साहेबांनी उपस्थित केलेली आहे. दिनांक 22-04-1976 रोजी शासनाने शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला. 10 हजार लोकसंख्येवरील शहरी भाग समजावा आणि 10 हजार लोकसंख्येच्या खालील ग्रामीण समजावा, असा फरक करण्यात आलेला होता, त्याचे उल्लंघन केल्याचा मुद्या उपस्थित केला. शहरी विद्यार्थ्यांच्या बरोबरी करणे ग्रामीण विद्यार्थ्यांना शक्य नसते. कारण शहरी विभागातील विद्यार्थ्यांना सोयीसवलती देऊन दर्जेदार शिक्षण दिले जाते, ग्रामीण भागात याचा अभाव असल्यामुळे असा फरक करण्याचा निर्णय झाला. सभापती महोदया, त्या काळामध्ये सातवी आणि चौथीची परीक्षा घेतल्या जात होत्या. शिष्यवृत्ती परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यावेळेला कमी होती. त्यानंतर चौथी आणि सातवीची परीक्षा बंद केली. त्यामुळे अकौंटिबिलीटी राहिली नाही. आता एकदम दहावीची परीक्षा द्यावयाची अशी पध्दती आहे. शिक्षणाच्या दर्जाचा विचारच कधी झाला नाही. सन्माननीय सदस्यांनी या निमित्ताने नव्याने शिष्यवृत्ती परीक्षेच्या दर्जाबद्दल प्रश्न उपस्थित केला. इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेला 7 लाख 39 हजार 910 विद्यार्थी बसलेले होते आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेला 3 लाख 47 हजार 318 विद्यार्थी बसलेले होते. असे ठरविलेले होते की, सगळया विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या परीक्षेला बसावे. आता दिवसेंदिवस ही संख्या वाढत गेली. पूर्वी शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सगळयाच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळायचा नाही. शासनाची 5 शासकीय विद्यानिकेतने आहेत, त्या ठिकाणी अग्रक्रमाने प्रवेश मिळत होता. एक हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी अशी अपेक्षा होती. त्या काळामध्ये शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर बहुमान मिळत होता. ही कल्पना आता लोप पावत चाललेली आहे. अनेक विषयांमध्ये महत्व येत चाललेले आहे. शहरी आणि ग्रामीण ही व्याख्या बदलावयास सांगण्यात आले. जिथे ग्रामपंचायत आहे, तो ग्रामीण भाग समजावा. परंतु अकलूज ग्रामपंचायत पाहिली तर त्या ठिकाणी 30 हजार लोकसंख्या आहे. म्हणजे 'क' वर्ग नगरपालिका झाली. यावर चर्चा होणे आवश्यक आहे. 'ब' आणि 'क' वर्ग महानगरपालिका शहरी भागात मोडतात, त्यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता आहे. नगरपालिका शहरी भागात आहेत त्यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता आहे. 'क' वर्ग नगरपालिकेमध्ये लोकसंख्या कमी आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .......

ग्रामपंचायत मी तत्वत: येथे मान्य केलेले आहे. अनेक "क"वर्ग नगरपालिका आहेत. ज्यांची लोकसंख्या कमी आहे, तेथे ताबडतोब फारसा फरक पडलेला नाही. त्यांचा सुध्दा आपल्याला अंतर्भाव करावा लागेल. "क" वर्ग नगरपालिकांबद्दल आत्ताच आमचे मंत्रिमहोदय, म्हणाले की, आपण एकत्र बसू आणि शासन त्याबद्दल निर्णय घेईल. पण सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली की, ग्रामपंचायतीचा ग्रामीण म्हणून उल्लेख करावा. ते तत्व आम्ही मान्य करीत आहोत. त्यासंबंधीची दुरुस्ती करण्यात येईल आणि लगेच आदेश निर्गमित करण्यात येतील. इयत्ता चौथीसाठी 250 रुपये शिष्यवृत्ती दिली जाते, म्हणजे महिन्याला 25 रुपये, ही अतिशय तुटपुंजी शिष्यवृत्ती आहे.इयत्ता सातवीसाठी दर वर्षाला 400 रुपये म्हणजे महिन्याला 40 रुपये शिष्यवृत्ती दिली जाते, ही अतिशय तुटपुंजी आहे. म्हणून ती दुप्पट करण्यात येईल. इयत्ता चौथीला 750 रुपये आणि इयत्ता सातवीला 100 रुपये करण्याचा निर्णय आम्ही याठिकाणी जाहीर करतो. पण शिक्षणाच्या दर्जाबद्दल एक दिवस विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू माणून शिक्षण आणि त्याचा दर्जा याबद्दल कधी तरी एकत्र बसून चर्चा होणार आहे की नाही? मी त्याबाबतची अपेक्षा व्यक्त करतो. जे हुशार विद्यार्थी आहेत त्यांना दुप्पट शिष्यवृत्ती करण्याचा निर्णय आहे. तसेच ती वेळेवर मिळाली पाहिजे. आमच्या अर्थ मंत्रिमहोदयांनी फिस्कल बजेट मांडलेले आहे. म्हणजे दाईत्व आणि महिन्या महिन्याला कॅश फ्लो. त्यामुळे पैशाची काहीही अडचण नाही. वेळेवर शिष्यवृत्ती त्यांना मिळेल. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येईल. शासकीय विद्यानिकेतनबद्दल आज आम्ही निर्णय घेतलेला नाही, पण तो विषय सुध्दाशासनाने निश्चितपणाने विचाराधिन ठेवेल. एका चांगल्या प्रश्नाबद्दल या ठिकणी अर्धा-तास चर्चा उपस्थित केल्या, बद्दल मी सनमाननीय सदस्यांना धन्यवाद देतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, आदरणीय शिक्षण मंत्रीमहोदयांनी अत्यंत चांगला निर्णय या ठिकाणी जाहीर केलेला आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो. या शिष्यवृत्तीच्या संदर्भात तांत्रिक अडिचण निर्माण झालेली आहे. त्यासंदर्भात विचार होणे गरजेचे आहे. लोकसंख्येच्या आधारे किंवा ग्रामपंचायतीच्या आधारे ग्रामीण आणि शहरी भाग असे वर्गीकरण करण्याचे ठरविलेले आहे. तथापी डी.एड.च्या संदर्भात डोंगरी भागातील विद्यार्थ्यांना डी.एड.साठी आरक्षण आहे. डोंगरी विभागातील विद्यार्थी आहे, हे कसे गृहीत धरावयचे तर तो डोंगरी भागात शिकलेला आहे काय? तर तसे अजिबात नाही. त्याचे मूळ गाव] त्याचे निवासाचे ठिकाणी जर डोंगरी भागामध्ये असेल आणि तो शहरी भागात जरी शिकला असला तरी सुध्दा त्याला डोंगरी भागातील समजून डी.एड.साठी आरक्षण मिळते. मी शहापूरचे एक उदाहरण या ठिकाणी सांगतो.आज परिस्थिती अशी निर्माण झ ालेली आहे की, त्या तालुक्याच्या ठिकाणी चार टोकाला चार शाळा आहेत. "अ" शाळेमध्ये शिकणारा विद्यार्थी आहे. शासनाने तो ग्रामीण भाग समजला आहे. त्यामुळे त्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती देण्यात येते. "ब" शाळेमध्ये शिकणारा विद्यार्थी आहे. शासनाने तो शहरी भाग समजला आहे, म्हणून त्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती देण्यात येत नाही. एकाच गावातील मुले या दोन शाळेमध्ये शिकत आहेत. दोन्ही शाळांमध्ये शिकणारी मुले तिस-या गावातील ग्रामीण भागातून येणारी आहेत. खेडयातून येणारी आहेत. फक्त अडचण एवढीच आहे की, एका विर्थ्याला "अ" शाळेत प्रवेश मिळाला आणि दुस-या विद्यार्थ्याला "ब" शाळेत प्रवेश मिळाला. "अ" शाळेमध्ये प्रवेश मिळाला. त्याला 87 टक्के गुण मिळाले आहेत आणि त्याला शिष्यवृत्ती मिळाली आहे. पण दुसरा विद्यार्थी आहे, त्याला 88 टक्के गुण मिळाले आहेत. पण केवळ तो त्या "ब" शाळेत शिकत आहे म्हणून त्याला ती शिष्यवृत्ती मिळत नाही. अशा प्रकारचा जो तांत्रिक मुद्दा निर्माण झालेला आहे, यासंदर्भात शासनाने विचार करावा, अशा प्रकारची मी नम्रपणे विनंती करतो.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे ती तपासून बघण्यात येईल आणि मी त्याबद्दल त्यांच्याशी दालनात चर्चा करीन.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदया, मला मंत्रिमहोदयांना एकच विचारावयाचे आहे की, महाराष्ट्राचा शिष्यवृत्ती परीक्षेचा दर्जा भारतातील सगळया राज्यांच्या मानाने सी.बी.एस.सी.च्या लेव्हलमध्ये शालेय शिक्षणामध्ये घसरत चाललेला दर्जा आहे. त्यादृष्टीकोनातून शिष्यवृत्ती परीक्षेचा दर्जा अधिकाधिक उंचावण्याचा काही प्रयत्न करण्यात येणार आहे काय?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी तुलनात्मक उल्लेख केलेला आहे. राज्य शासन आणि सी.बी.एस.सी. लेव्हलमध्ये फारसा फारक राहणार नाही. याची निश्चित शासन काळजी घेईल आणि त्यासाठी तर शासनाची सारखी तळमळ आहे.

**तालिका सभापती** : या विषयावरील चर्चा आता संपली आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चेंबूर येथील आगरी सहकारी पतपेढीतील अफरातफर प्रकरणी अटक केलेल्या व्यक्तीचा पोलीस कोठडीत झालेला मृत्यू

**मु. शी.** : चेंबूर येथील आगरी सहकारी पतपेढीतील फरातफर प्रकरणी अटक केलेल्या व्यक्तीचा पोलीस कोठडीत झालेला मृत्यू या विषयावरील तारांज्ति प्रश्□ ज्रमांज 1836 ला दि□ांज 18 मार्च, 2005 रोजी शास□□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यां□ उपस्थित ज्ेलेली अर्धा-तास चर्चा

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, "चेंबूर येथील आगरी सहकारी पतपेढीतील अफरातफर प्रकरणी अटक केलेल्या व्यक्तीचा पोलीस कोठडीत झालेला मृत्यू" या विषयावरील तारांज्ति प्रश्□ ज्रमांज 1836 ला दि□ांज 18 मार्च, 2005 रोजी शास□□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अ□ुमती□ □ि□म 92 अ□वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित ज्रीत आहे.

सभापती महोदया, चेंबूर येथील आगरी सहकारी पतसंस्था मर्यादित येथे व्यवस्थापक म्हणून काम करणारे श्री. विजय गोंधळी यांच्यावर अफरातफरीची खोटी फियाद दाखल करण्यात आली आणि त्यांना अटक करण्यात आली. अटकेत असताना त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला अशी तक्रार त्यांच्या पत्नीने केलेली आहे. यामध्ये संशय येण्याचे कारण म्हणजे दिनांक 29.6.2004 रोजी त्यांचा जामीन हायकोर्टाने मंजूर केला होता. ज्यावेळेला कोर्टामध्ये केस चालली त्यावेळी पोलिसांकडून त्याचा मृत्यू झाला असे कोर्टामध्ये सांगण्यात आलेले नाही. या पतपेढीमध्ये झालेली अफरातफर तेथील संचालकांनी केलेली आहे आणि ती अफरातफर श्री. विजय गोंधळी यांच्या नावावर यावी म्हणून पोलिसांना खास सुपारी देऊन त्यांना अटक करुन घेतली आणि त्या ठिकाणी त्यांना मारहाण केली. पोलिसांनी त्याला एवढी बेदम मारहाण केली की, त्यामुळे त्याला हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले. हॉस्पिटलमध्ये त्याचा मृत्यू झाला असे दाखविण्यात आले. प्रत्यक्षात पोलिसांनी त्याला मारलेले आहे. ही अफरातफर मिटविण्याचे काम पोलिसांकडून होत आहे. अफरातफरीची चौकशी सहकार खात्याकडून चालूच आहे परंतु त्याचा जो मृत्यू झालेला आहे त्या मृत्यूची चौकशी सी.आय.डी. मार्फत करावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी त्यांच्या पतसंस्थेतील व्यवस्थापकाच्या मृत्यूबद्दलची कारणे सांगितली. पण त्यांनी यासंबंधी सी.आय.डी. चौकशीची मागणी केलेली आहे. ही घटना ज्यावेळी घडली ती घडल्यानंतर त्या संस्थेचे सरचिटणीस यांनी तक्रार दिल्यावर त्यांना अटक करण्यात आली होती. नंतर त्यांना पोलीस कस्टडीमध्ये ठेवण्यात आले होते. ज्यावेळी पोलीस कस्टडीमध्ये ठेवण्यात आले होते त्यावेळी तीन चार वेळा त्यांच्या घरच्या मंडळींनी त्यांची भेट घेतली होती. तीन चार वेळा निरनिराळया तारखांना त्यांना कोर्टासमोर हजर करण्यात आले होते. त्यावेळी श्री. गोंधळी यांनी कोर्टासमोर तक्रार केली नाही किंवा त्यांच्या वकिलांनी सुध्दा मारहाण झाल्याची तक्रार न्यायालयासमोर केली नाही. नंतर त्यांना न्यायालयीन कोठडी मिळाली. न्यायालयीन कोठडीमध्ये असताना त्यांच्या पत्नीने जवळजवळ तीन वेळा त्यांची भेट घेतली. त्यांनी भेट घेतली असताना त्यांच्यासमोर सुध्दा त्यांनी तक्रार केलेली नाही. न्यायालयीन कोठडीमध्ये असताना न्यायालयामध्ये तारखांना गेल्यावर सुध्दा त्यांनी न्यायालयाकडे तक्रार केलेली नाही. त्यामुळे पोलिसांनी मारहाण केली आणि पोलिसांच्या कोठडीमध्ये मृत्यू झाला असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 29 तारखेला त्यांचा जामीन झाला. त्यावेळी ते दवाखान्यामध्ये होते. त्यांना टी.बी.चा गंभीर आजार होता. त्यामुळे त्यांना दवाखान्यामध्ये ॲडमिट केले होते. त्या दिवशी सकाळी 6.00 वाजता त्यांचा मृत्यू झाला आणि त्याच दिवशी साडेअकरा वाजता कोर्टाने त्यांना जामीन दिला. वास्तविक पाहता त्यांनी न्यायालयाला कळवावयास पाहिजे होते. हॉस्पिटलमध्ये डयुटीवर श्री. जाधव नावाचे हवालदार होते. त्यांना कळल्यावर त्यांनी 7.00 वाजता नजीकच्या पोलीस स्टेशनला कळविले. त्या ठिकाणी कळविल्यानंतर त्यांनी ठाणे जेलमध्ये फोन केला पण फोनवर त्यांचा संपर्क होऊ शकला नाही. नंतर दुसरे हवालदार डयुटीवर आले. डयुटी चेंज करीत असताना त्यांनी आलेल्या हवालदाराला याबाबत सांगितले. त्यांनीही ठाणे जेलमध्ये फोन लावला. पण त्यांचा फोनवर संपर्क होऊ शकला नाही. नंतर प्रेत ताब्यात घेणे, पझेशन देणे, पंचनामा करणे वगैरे गोष्टी करावयाच्या होत्या त्यासाठी ते त्या ठिकाणी गेले. त्यामध्ये वेळ झाला. तिथून त्यांनी परत ठाणे जेलला फोन लावला. त्यानंतर श्री. बुरुडे नावाचे एक हवालदार यांनी स्वत: जाऊन ठाणे जेलला माहिती दिली. तेथील जेलर कोर्टाला कळविण्यासाठी गेले. तोपर्यन्त कोर्टाची वेळ

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. सिध्दाराम म्हेत्रे .....

संपली होती. त्यामुळे जाणुनबुजून ते झालेले नाही. दवाखान्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. न्यायालयाला ते माहीत नव्हते. त्याला जामीन देऊ नये असे पोलिसांनी म्हटले होते. तरीही न्यायालयाने त्यांना जामीन दिला. अशा प्रकारची ही गुंतागुंत पाहिल्यानंतर आणि सन्माननीय सदस्यांच्या भावना पाहिल्यानंतर मी या घटनेचा तपास सी.आय.डी.कडे वर्ग करण्यास संमती देत आहे.

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी ) : ही अर्धा-तास चर्चा संपलेली आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोयना जलाशयातील पाण्याचा वापर पाचव्या टप्प्यामध्ये वीज निर्मितीसाठी करुन पुन्हा कोयना धरणात सोडणे.

**मु. शी.** : कोयना जलाशयातील पाण्याचा वापर पाचव्या टप्प्यामध्ये वीज निर्मितीसाठी करुन पुन्हा कोयना धरणात सोडणे यासंबंधी डॉ. अशोक मोडक, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. अशोक मोडक ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, मी आपल्या अ□ुमती□ □ियम 92 अ□वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित जरतो :-

"सहयाद्री पर्वतामध्ये पूर्वेजडील बाजूला हेळवाज येथे जोय□ □दीवर बांधलेल्या जोय□ जलविद्युत प्रजल्पाद्वारे पाजीसाठा □िर्माज जरज्यात आला. जमलेले पाजी सुमारे 650 मीटर उंची पासू□ सह्याद्रीच्या पोटातू□ बोगद्याद्वारे पश्चिमेजडे सुमारे 130 मीटर तलावांपर्यंत आजू□ पोजळी हाऊसमध्ये टप्पा एज व टप्पा दो□द्वारे विद्युत □िर्मिती जरज्यात येते. विद्युत □िर्मिती झाल्या□ंतर □ि□र्गमित होजारे पाजी पु□हा जोळजवाडी येथील धरजात (टप्पा-3) आजू□ तेथू□ पु□हा अधिजल बोजद्याद्वारे सुमारे 110 मीटर उंचीवरु□ जाली □ऊ□ पु□हा वीज □िर्मिती जरता येते. प्रजल्पाच्या चौथ्या टप्प्यामध्ये जोय□ जलाशयाच्या दुमुजी विवराजडील झटजे भुयारा□ दाबवाहज वाहि□ीतू□ विद्युतजृहात पाजी □ऊ□ वीज □िर्मिती जेली जाते व त्यांचे अवजल □िर्गमित जेले जाते. चारही टप्प्यामध्ये जोय□ जलाशयातील पाज्याचा वापर प्रवाह उताराच्या दबावाचा फायदा घेऊ□ वीज □िर्मिती जरज्यात येते व उताराचा दबाव संपल्या□ंतर ते अवजल म्हजू□ समुद्रात सोडज्यात येते. त्याऐवजी पाचव्या टप्प्यामध्ये हे पाजी वापरज्यासाठी वेजळी पध्दत अवलंबित आहे. या प्रजारामध्ये जोय□ जलाशयातील पाजी प्रथम उदंचित जरु□ (लिफ्ट) जरु□ 320 मीटर उंचीवरील वझर्डे □ाल्यावर उर्ध्व जलाशयात साठवले जाते व □ंतर ते पाजी भूजर्भातील जलवह□ यंत्रजेद्वारे विद्युत जृहातू□ वीज □िर्मिती जरु□ पु□हा जोय□ धरजात सोडता येईल, याबाबत शास□ाची भूमिजा व तद्-□ुषंजा□ जरावयाची जार्यवाही."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक .....

सभापती महोदया, एका अत्यंत महत्वाच्या विषयावर मी या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांना माहीत आहे की, मागील एका अधिवेशनामध्ये मी कोयना अवजलाचा वापर या विषयावर चर्चा उपस्थित केली होती. त्याच विषयाशी संबंधित पण वेगळया विषयावर मला आता या निमित्ताने वक्तव्य करावयाचे आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/ श्री.बरवडनंतर 18:15

डॉ.अशोक मोडक.....

सदनाला आणि आपल्याला हे माहीत आहे की, सहयाद्री पर्वतामध्ये पूर्वेकडील बाजूला हेळवाक याठिकाणी कोयना नदीवर बांधलेल्या कोयना जलविद्युत प्रकल्पाद्वारे पाणीसाठा निर्माण करण्यात आला आणि ते पाणी सुमारे 650 मीटर उंचीपासून सहयाद्रीच्या पोटातून बोगद्याद्वारे पश्चिमेकडे सुमारे 130 मीटर तलावापर्यंत आणून पोकळी हाऊसमध्ये टप्पा एक, टप्पा दोनद्वारे विद्युत निर्मिती सुरु झाली. आता पोकळीला टप्पा एक आणि टप्पा दोन अनुभवाला आहे. तेथून तेच पाणी कोळकेवाडीला आणण्यात आले म्हणजे टप्पा तीन पूर्ण झाला. त्यानंतर मात्र कोयनेचे हे पाणी समुद्रात सोडले जाते. टप्पा चौथा आहे त्याकडे मला मा.मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधून घ्यावयाचे आहे. अर्थात ते त्यांना ठावूक असणार. कोयना जलाशयाच्या दुमुखी विवराकडील इन्टेक भुयाराने दाबवाहक वाहिनीतून विद्युतगृहात पाणी नेऊन वीज निर्मिती केली जाते व त्याचे अवजल निर्गमित केले जाते. टप्पा एक असेल, टप्पा दोन असेल, टप्पा तीन असेल अथवा चार असेल या चारही टप्प्यांमध्ये एक कॉमन फॅक्टर आहे तो आपल्याला बीज गणिताप्रमाणे कंसाच्या बाहेर काढता येईल की, सर्व ठिकाणी पाणी गुरुत्वाकर्षणाचा लाभ घेण्यासाठी वरतून धबधब्याद्वारे सोडले जाते आणि त्यातून जल विजनिर्मिती केली जाते. मी चर्चा उपस्थित करीत आहे ती पाचव्या टप्प्याची, ज्याला आता नाव मिळालेले आहे "हुंबरली उदंचन जलविद्युत प्रकल्प" या पाचव्या टप्प्यात मात्र कोयना जलाशयातील पाणी उदंचित करावे आणि 320 मीटर उंचीवरील वझर्डे नाल्यावर उर्ध्व जलाशयात साठवले जावे व नंतर ते पाणी भूगर्भातील जलवहन यंत्रणेद्वारे विद्युतगृहातून विजनिर्मती करुन पुन्हा कोयना धरणात सोडावे अशाप्रकारचा तो प्लॅन आहे. सभापती महोदया, सगळयांना माहीत आहे त्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. विद्युत निर्मितीचे वेगवेगळे पर्याय आहेत. थर्मल पॉवर, हायड्रो पॉवर आणि न्यूक्लीअर पॉवर असे हे पर्याय आहेत. मी हायड्रो पॉवरसंबंधी बोलत आहे. हा जो जल विद्युतनिर्मितीचा प्रकार आहे त्याच्यावर चार प्रकारच्या मर्यादा आहेत. अखेर आकाशातून पाणी पडले तर पाण्याचा साठा उपलब्ध होणार आणि त्याच्यातून विजनिर्मिती करता येणार आहे. मुळात ते जे पाणी आकाशातून पडणार ते त्या जलाशयात पडणार आहे. जलाशयाच्या मर्यादेवरही आपल्याला लक्ष द्यावे लागेल. तिसरा विषय म्हणजे विजनिर्मितीपेक्षा पेयजलासाठी पाणी उपलब्ध होणे हे महत्वाचे आहे. या तीन बाबतीत पुरेसा फटका आपण

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक.....

अनुभवला आहे. मुळात पाऊसच कमी पडला, जलाशयामध्ये साठा कमी असेल आणि पेयजलाची मागणी वाढत्या लोकसंख्येमुळे वाढली आणि या व्यतिरिक्त आता तर कोयनेची भीती अनुभवाला आली. जे पाणी समुद्र तळाशी येऊन पोहोचले आहे. जवळजवळ समुद्राच्या तळावर ते आले असल्याने आता उतार संपलेला आहे म्हणून माझी या सदनाला आपल्यामार्फत विनंती आहे की, ते पाणी पुन्हा लिफ्ट करण्यात आले आणि त्याठिकाणी उंचीवर नेऊन तेथे साठवून पुन्हा त्या पाण्याचा पुनर्वापर करुन विद्युतनिर्मिती करता आली तर कदाचित महाराष्ट्राला ही विजनिर्मिती परवडेल. आता माझ्या माहितीप्रमाणे मंत्रिमहोदय नंतर कन्फर्म करतील. याचे प्रकल्पाच्या अन्वेषणाचे काम 1980 पासून सुरु झालेले आहे. या प्रकल्पाच्या मूळ आराखडयानुसार वझर्डे टप्प्याच्या वरच्या बाजूला हुंबरली गावाच्या परिसरामध्ये वझर्डे नाल्यावर 7.21 द.ल.घ.मी. क्षमतेचे उर्ध्व जलाशय बांधून त्याच्यातून पुन्हा विजगृहातून 400 मे.वॅ.विजनिर्मिती करुन पुढे कोयनेच्या जलाशयामध्ये सोडावयाचे अशाप्रकारचा एकूण प्लॅन आहे. सभापती महोदया, आपल्या सगळयांचे दुर्दैव असे की, ऑगस्ट, 1999 मध्ये जेव्हा महाराष्ट्रातून केंद्राकडून अनुमतीसाठी हा प्रस्ताव पाठविला त्याबाबत जे उत्तर आले आहे त्याची प्रत माझ्याजवळ आहे आणि मा.मंत्रिमहोदयांकडे ती नक्कीच असेल. आपल्या दुर्दैवाने अभयारण्याची अडचण सांगण्यात आली आहे आणि पर्यावरण व वन खात्याने त्याविषयी हरकत घेतली असल्याचे नमूद केलेले आहे. आता स्वाभाविकपणे जर अशारितीने हरकती घेतली असेल आणि वाढत्या लोकसंख्येला विजेची आवश्यकता आहे हे ध्यानात घेऊन या नव्या पर्यायाचा विचार करुन विजनिर्मितीची गरज आपल्या सगळयांना मान्य असेल तर मी पुढची कोणती कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे त्याचा उल्लेख करतो.

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 18:20

डॉ. अशोक मोडक...

क्रमांक एक प्रकल्पाच्या जागेला ना हरकत प्रमाणपत्र केंद्र सरकारकडून मिळविले पाहिजे. क्रमांक दोन- प्रकल्पक्षेत्रात पर्यावरणाचा अभ्यास केला पाहिजे. क्रमांक तीन- प्रस्तावित कोयना अभयारण्यामध्ये जाणारे प्रकल्पाचे जे क्षेत्र आहे ते वगळून काही दुस-या ठिकाणी आपल्याला खेडयात, गावात, परिसरात त्याचा काही उपयोग करता येईल काय त्याचा विचार केला गेला पाहिजे. शेवटचा मुद्दा असा आहे की, प्रकल्प क्षेत्रात सविस्तर सर्व्हेक्षण आणि अन्वेषण करुन एक डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला पाहिजे. सभापती महोदया, माझी अशी विनंती आहे की, एकूणच महाराष्ट्रातली, देशातली लोकसंख्या आणि गरज लक्षात घेऊन जर वीज निर्मितीसाठी याही ठिकाणी कोयनेच्याच पाण्याच्या फेर वापराचा, ते पाणी उंच नेऊन मग पुन्हा धबधब्याच्या रुपाने सोडण्याचा विचार अनुकूल पध्दतीने झाला तर, हा विचार पूर्णपणे पुढे जावा यादृष्टीने काही तज्ज्ञ व्यक्तींची बैठक झाली व त्यास शासनाकडून हिरवा कंदील मिळाला तर एक नवीन पाऊल उचलले जाईल अशी मला आशा वाटते. मी मंत्री महोदयांकडून स्वाभाविकपणे योग्य ती अपेक्षा करतो आणि माझे बोलणे संपवितो.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (पाटबंधारे (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळता) लाभक्षेत्र विकास मंत्री) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी हॅड्रोच्या संदर्भामध्ये हुंबरली उदंचन जलविद्युत प्रकल्प, हा कोयना प्रकल्पाचा पाचवा टप्पा म्हणून ओळखला जातो तसेच त्याच्या संदर्भातील बरीचशी माहिती सभागृहाला दिलेली आहे. एक गोष्ट मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अशा प्रकारचे प्रकल्प ज्या ठिकाणी असतील त्या प्रकल्पाला प्रोत्साहन देण्याचे, ते प्रकल्प बी.ओ.टी. तत्वावर करणे शक्य असेल तर बी.ओ.टी.तत्वाच्या माध्यमातून करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. घाटघरच्या प्रकल्पास जपान सरकारने निधी उपलब्ध करुन दिला. तशा प्रकारे निधी उपलब्ध करुन देण्याचे काम आपण करीत आहोत. घाटघरचा प्रकल्प हा कमी क्षमतेचा आहे. आपण ज्याचा उल्लेख केला तो प्रकल्प 400 मेगावॅट क्षमतेचा आहे. जलसंपदा विभागाने अशा प्रकारची कामे केलेली आहेत ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे सांगितले ते वस्तुस्थितीला धरुन आहेत. आम्हाला एक मोठी अडचण आलेली आहे, त्यामुळे आम्ही थोडे थांबण्याचा निर्णय घेतलेला आहे. कारण या पंपींगसाठी ऑफ -पीक वीज सध्या राज्याकडे अजिबात उपलब्ध नाही. सभापती महोदया, या सदनातील सर्व सदस्यांना विजेच्या बाबतची कल्पना आहे. जवळपास अडीच ते तीन हजार मेगावॅट विजेचे शॉर्टेज आहे. राज्यात काही ठिकाणी पाऊस पडला आहे तर काही ठिकाणी अजून पाऊस पडलेला नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाबरोबर चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगितले की, आजच्या धडीला सरप्लस वीज उपलब्ध नाही. सभापती महोदया, हे सगळे करीत असताना आपण काही नवीन एम.ओ.यू. साईन केलेले आहेत. काही नवीन प्रकल्प हाती घेण्याचे प्रयत्न करीत आहोत. परवाच माननीय ऊर्जा मंत्र्यांनी विजेच्या संदर्भातील राज्य शासनाचे पुढील चार वर्षाचे धोरण सभागृहात सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. आम्ही अडीच हजार कोटी रुपयांची तरतूद करुन वीज निर्मितीचे नवीन प्रकल्प हाती घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. गॅसवर आधारित प्रकल्प असेल, चार वेगवेगळया विंगमधील प्रकल्प असतील, हायड्रोवरील प्रकल्प असेल, तेथील भौगोलिक परिस्थिती बघून प्रकल्पांची कामे हाती घेत आहोत. परंतु सभागृहाला आवर्जून लक्षात आणून द्यावयाचे आहे की, डॉ. मोडक साहेबांनी जी योजना सुचविली आहे त्या योजने बाबतचा अभ्यास 1980 या वर्षापासून चालू आहे. अभयारण्याच्या बाबतीत, व्याघ्र प्रकल्पाच्या बाबतीत, राष्ट्रीय उद्यानाच्या बाबतीत सुप्रीम

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/

श्री. अजित पवार..

कोर्टाने निर्णय दिलेला असल्यामुळे नवीन मोठे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्या बाबतचा देखील उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला आहे. याच्यामध्ये 15.07 हेक्टर क्षेत्र कोयना अभयारण्यात येते. ते क्षेत्र कसे वगळता येईल त्यासंदर्भात देखील अभ्यास करता येईल.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 18:25

श्री. अजित पवार ...

मला एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, या प्रकल्पातून वार्षिक वीज निर्मिती 747 दशलक्ष युनिट होणार आहे आणि पंपिंगसाठी आपल्याला वार्षिक 1067 दशलक्ष युनिट वीज लागणार आहे म्हणजे पंपिंगसाठी जास्तीची वीज लागणार आहे. आपण सुचविल्याप्रमाणे ऑफ पिरेडमध्ये ती वीज आपल्याला मिळाली आणि पीक पिरेडमध्ये 747 दशलक्ष युनिट वीज मिळणार असेल तरी देखील करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे त्यासाठी 1239 कोटी रुपये लागणार आहेत. साधारणत: 3.10 कोटी रुपये पर मेगॅवॅट अशा पध्दतीचा आजच्या घडीला खर्च येणार आहे. वीज निर्मितीचा खर्च 3 रुपपे 45 पै पर युनिट येणार आहे. आपणाला माहीतच आहे की शासनाने भूमिका ठरविली आहे की,मध्यल्या काळात झालेला रत्नागिरी जिल्हयातील एनरॉन प्रकल्प आहे त्यातील ब-याच गोष्टी सर्वांच्या निदर्शनास आणलेल्या आहेत. गॅसवर चालणारा हा प्रकल्प आहे. त्यामध्ये नाफत्यासंदर्भात सुध्दा बरेच काम होऊ शकते. हा जवळपास 2000 मे.वॅ.पेक्षा जास्त वीज निर्मिती करणारा प्रकल्प आहे. 2.30 पै.दराने वीज खरेदी करण्याबाबत मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. केंद्र शासनाने सुध्दा यामध्ये आता लक्ष घातलेले आहे. त्यामुळे या वीजेचा दर पण 3.45 पै. पर युनिट आहे आणि सध्या आपल्याकडे सरप्लस वीज नसल्यामुळे वार्षिक वीज निर्मिती 747 दशलक्ष युनिट करण्यासाठी 1067 दशलक्ष युनिट वीज पंपिंगसाठी खर्च करावयाची शिवाय त्यासाठी 1239 कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत असे या प्रकल्पासंबंधीचे संपूर्ण चित्र समोर आले आहे. हा प्रकल्प सरकार करणार नाही ही राज्य शासनाची भूमिका अजिबात नाही. पण आजच्या परिस्थितीमध्ये एकंदरीत वीजेची परिस्थिती लक्षात घेता हा प्रकल्प राज्य शासन ताबडतोब हातामध्ये घेऊ इच्छित नाही. मा.सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी 1,2,3,4 असे जे मुद्दे सांगितले . त्याचप्रमाणे पर्यावरणाच्या संदर्भात आणि काही बाबतीत ना हरकत प्रमाणपत्रे मिळविण्याच्या बाबतीत टप्पाटप्प्याने या गोष्टी पूर्ण करा. याबाबतीत शासनाची भूमिका आपण सांगितली तशीच आहे आणि त्याच पध्दतीने जलसंपदा विभागाचे कामकाज चालू राहील. हा संपूर्ण प्रकल्प हा विषय राज्य शासनाच्या समोर आहे. परंतु सध्याच्या एकंदर परिस्थितीत या प्रकल्पाला गती देण्याच्या मनस्थितीत राज्य शासन आजच्या घडीला नाही. पुढे भविष्यात मात्र हा प्रकल्प शासन निश्चितपणाने करणार आहे. त्याबद्दल मनामध्ये तिळमात्र शंका ठेवू नये असे मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदया, पहिल्यांदा मी मंत्रीमहोदयांचे आभार मानतो. त्यांनी आश्वासन दिले आहे की,यासंबंधात कदाचित विद्युत निर्मितीला उशीर होईल परंतु त्या अगोदरच्या म्हणजे प्रिव्हीयस् स्टेजेस् आपण नक्की पूर्ण करणार आहात. तज्ञांची बैठक घेणार आहेत. दुसरा मुद्दा जो तुम्ही सांगितला तो अधिक पटला आहे. तो म्हणजे इनपुट आणि आऊटपुट रेषो मांडला आहे की, वीज निर्माण होईल तेव्हा होईल पण प्रत्यक्षात जी वीज वापरावी लागणार आहे म्हणजे पाणी उचलण्यासाठी वापरावी लागणार आहे ती जास्त असणार आहे. प्रकल्पातून उपलब्ध होणारी वीज कमी असणार आहे. याच्याशी मी 100 टक्के सहमत आहे पुढे जो उल्लेख केला त्याचीच पुनरावृत्ती करणे मला अगत्याचे वाटते. मुद्दा असा आहे की, सदरचा प्रकल्प उदंचन जल विद्युत प्रकल्प असल्यामुळे दिवसातील कमी मागणीच्या काळामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून कोयना जलाशयातील पाणी पंपाद्वारे उचलण्याकरिता वीज ऑफ पीक एनर्जी उपलब्ध करुन घेणे गरजेचे आहे अन्यथा वीज वाया जाण्याची शक्यता आहे. ...दुसरा विषय अभयारण्याचा आहे. त्याबाबतीत जर हे अभयारण्याचे क्षेत्र बाजूला ठेवता आले आणि त्याचा मूळ राखीव वनक्षेत्र दर्जा काय ठेवून वेगळया पर्यायाचा विचार केला तर कदाचित केंद्र शासनाची अनुमती मिळविणे सोपे होईल. याबाबतीत शासनाने खुलासा करावा.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदया, मी सुरुवातीलाच सांगितले की, या संदर्भातील राज्य सरकारची भूमिका ही फार पॉझिटीव्ह आहे. आपल्याला जी ऑफ पीक वीज लागणार आहे ती वीज आजच्या घडीला आपल्याकडे उपलब्ध नाही. विद्युत मंडळाचे सुध्दा असेच म्हणणे आहे की,.पीक पिरियडमध्ये 3000 मेगॅवॅटसच्या विजेचे शॉर्टेज आहे.तेव्हा आज ऑफ पीक वीज आपल्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे विजेच्या पुरवठयात सुधारणा झाली असल्याची आज तरी परिस्थिती नाही परंतु पुढे कधी तरी तशी परिस्थिती निर्माण होईल आणि विजेच्या पुरवठयात सुधारणा होईल.डिमान्ड आणि सप्लाय या दोन्हीचा विचार करीत असतांना दर वर्षी डिमान्ड ही वाढतच राहणार आहे व ही बाब कोणीही नाकारु शकणार नाही.परंतु जशी डिमान्ड वाढेल तसा सप्लायसुध्दा वाढविण्याचे काम त्या त्या वेळच्या राज्यकर्त्यानी करावयास पाहिजे.मधल्या काळात नाही म्हटले तरी युतीच्या काळात एन्रॉनची वीज घेण्याच्या संदर्भात पाच वर्षे वाया गेली होती.त्यानंतर लोकशाही आघाडी सरकारचीसुध्दा पाच वर्षे वाया गेली होती.एन्रॉनचे पुनरुज्जीवन होईल किंवा नाही याचा विचार करीत असतांना नवीन वीज प्रकल्प थोडेसेच घेण्यात आले होते नवीन वीज प्रकल्प जास्त घ्यावयास पाहिजे होते.त्या मागच्या कालावधीमध्ये मात्र दरवर्षी राज्याची विजेची गरज लक्षात घेऊन थर्मल,हायड्रो,विंड मिल असे नवीन नवीन प्रकल्प घेण्याचा आपण प्रयत्न केला होता. इतकेच नव्हे तर को-जनरेशनच्या संदर्भातसुध्दा मोठया प्रमाणावर प्रोत्साहन देण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. अशा विविध माध्यमातून वीज निर्मिती करण्याचा आपला प्रयत्न चालू आहे.सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी 15.60 हेक्टर जमिनीचा मुद्दा उपस्थित केला. तेव्हा हे क्षेत्र वगळून हा प्रकल्प त्या ठिकाणी घेता येतो किंवा काय या दृष्टीनेसुध्दा प्रयत्न केला जाईल. या संदर्भातील सगळया टेक्नीकल बाबी तपासून पहाव्या लागतील . आपण ज्या ठिकाणी हे पाणी उचलून वर आणणार आहोत तेथे आपल्याला एक छोटे धरण बांधावे लागणार आहे व या धरणात पाणी स्टोअर करावे लागणार आहे आणि पीक पिरियडच्या वेळी ते पाणी खाली आणून त्या पाण्यापासून वीज निर्मिती करावयाची आहे. हा प्रस्ताव आमच्या समोर आल्यानंतर असे दिसून आले की, त्या ठिकाणी 15.60 हेक्टर जमीन ही अभयारण्यातील आहे आणि .त्या संदर्भात उच्च न्यायालयाचा मनाईचा आदेश झालेला आहे.त्या बाबतीत दुसरा एक पर्याय आहे.यामध्ये केन्द्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडून सर्व्हेक्षणाकरता काही परवानगी मिळाली नाही. मात्र सदर प्रकरणी राज्य सरकारचे सचिव,मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ...

स्तरावर आतापर्यन्त बराच पाठपुरावा करण्यात आला आहे. राज्याचे प्रतिनिधित्व करणा-या संसद सदस्यांपुढे सुध्दा हा मुद्दा संसदेच्या अधिवेशनापूर्वी दरवर्षी आम्ही जाणीवपूर्वक मांडत असतो., आपल्या राज्यातील सर्व पक्षाचे मिळून जे 48 खासदार आहेत तसेच राज्यसभेमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करणारे जे खासदार आहेत ते आम्हाला असे विचारतात की , आमच्या विभागातील कोणते प्रश्न केन्द्रामध्ये प्रलंबित आहेत की ज्या प्रश्नाच्या बाबतीत आम्ही अधिवेशनाच्या निमित्ताने त्याचा पाठपुराव करु शकू. त्यावेळी हा मुद्दा त्यांच्या समोर मांडण्यात आलेला आहे की, उच्च न्यायालयाच्या मनाई आदेशामुळे यामध्ये कोणतीही प्रगती करता येत नाही. तेव्हा या बाबतीत केन्द्राची परवानगी आपल्याला मिळाली पाहिजे.आणि ही परवानगी मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे. सन्माननीय सदस्य डॉ.मोडक यांनी सांगितले की, यासाठी तज्ञांची समिती नेमण्यात आली पाहिजे. त्या ठिकाणी घनदाट जंगल आहे हे आपल्यालासुध्दा माहीत आहे. या प्रकल्पाचे काम करीत असतांना तेथे कोणतीही अडचण न येता आहे त्या पाण्याचा वापर करता आला पाहिजे. ज्याप्रमाणे कोयना टप्पा क्रमांक 1,2,3 व 4 आपण पूर्ण केला आणि त्यावेळी कोणत्याही टप्यामध्ये आपण अशात-हेचा प्रयत्न केला नव्हता. परंतु पाचव्या टप्यामध्ये आपण हा प्रयत्न करु पाहत आहोत.ऑफ पिरियडमध्ये वीज वापरावयाची आणि तळाचे पाणी वर उचलावयाचे आणि त्यातून पीक पिरियडच्या वेळी वीज निर्मिती करावयाची असा प्रयत्न आपण करणार आहोत. परंतु अशा प्रकारचे प्रकल्प राज्यातील ठिकठिकाणी राबविण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र,विदर्भ, कोकण, मराठवाडा,खानदेश या परिसरातील साईटचीसुध्दा पाहणी आम्ही करीत आहोत व त्याचा अभ्यास करीत आहोत. आताच्या विजेच्या बाबतीतील परिस्थिती विचारात घेता जरी हे प्रकल्प लगेच हातामध्ये घेण्यासारखी परिस्थिती नसली तरी पुढे भविष्यकाळात हे प्रकल्प आपल्याला घ्यावेच लागणार आहेत. त्याबाबतीत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे किंवा त्यांच्या अध्यक्षांचे आणि उर्जा खात्याचे देखील दुमत नाही आणि त्यामुळे त्यांच्याशी विचार विनिमय करून जलसंपदा विभाग अशा प्रकारची प्रकल्प परिस्थिती सुधारील., त्याप्रमाणे निधी उपलब्ध करूनहे मार्गी लावण्यासाठी निश्चितपणे प्रयत्नशील राहील याची खात्री मी आपल्याला देतो.

**( सभापतीस्थानी - माननीय उपसभापती )**

****

नंतर श्री.सुंबरे

अध्यक्षित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता पाणी वाटप आणि पाणी वापरावर बंधने घालण्याची आवश्यकता.

**मु.शी.** : मुंबईतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता पाणी वाटप आणि पाणी वापरावर बंधने घालण्याची आवश्यकता याबाबत श्री. मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

---

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो.

" मुंबईला पाणीपुरवठा करण्यासाठी ब्रिटीश काळापासून ठाणे जिल्ह्यात वैतरणा, तानसा, भातसा तसेच मुंबई उपनगरात विहार, पवई, तुळशी तलावांची निर्मिती केली असणे., गेल्या 25-30 वर्षांमध्ये मुंबई व उपनगरातील लोकसंख्या झपाट्याने वाढणे, यामुळे तलावातील उपलब्ध पाणी न पुरणे, तसेच दररोज दर माणसी 140 लीटर होणारा पाणी पुरवठा प्रथम 90 आणि आता 50 लीटर करण्यात येत असल्याच्या हालचाली, तसेच मुंबईत प्रचंड प्रमाणात सुरू असलेल्या बांधकामांना पाणी पुरवठा करताना घालण्यात आलेली बंधने, तसेच भूगर्भातील पाण्याची घटती पातळी पाहता पाणी वाटप, पाणी वापर यावर बंधने घालण्याची आवश्यकता व शासनाने याबाबतीत करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

सभापती महोदया, या ठिकाणी मुंबईमध्ये अतिशय कठोरपणे पाणी पुरवठ्याच्या बाबतीत विचार करण्याची स्थिती आलेली आहे. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेचे असे मत आहे की, 1995 पूर्वी जी स्थिती होती ती आणि आज 2005 साली जी पाणी पुरवठ्याची स्थिती आहे ती लक्षात घेता मुंबईतील वाढत्या लोकसंख्येवर कठोरपणे नियंत्रण ठेवले नाही तर भविष्यात पाणी पुरवठ्याचा प्रश्न पेट घेतल्याशिवाय राहणार नाही. 1995 साली मुंबई शहरामध्ये सुमारे 2960 दशलक्ष लीटर पाणी पुरवठा होत होता आणि त्या ठिकाणी त्यावेळेस जी आवश्यकता होती ती 3750 द.ल.लीटर पाणी पुरवठ्याची. पण जाणीव पूर्वक मुंबईतील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन मुंबई महापालिकेने आपले एक वेगळे जी बजेट सुरू केले, एक वेगळे हेड यासाठी सुरू केले आणि जागतिक बँकेकडून कर्ज घेऊन मुंबई शहरासाठी पाणी पुरवठा आणि मलनिस्सारणाची योजना आखली. परंतु मुंबईतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सध्या पाणी पुरवठ्याची स्थिती भयानक झ ाालेली आहे. सध्या मुंबईमध्ये दररोज 3100 द.ल.लीटर पाणी पुरवठा केला जात आहे

...... 3जे 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ....

पण प्रत्यक्षात तेथे 4,200 द.ल.लीटर पाण्याची आवश्यकता आहे. मध्य वैतरणा हा पाणी पुरवठ्यासाठीचा प्रकल्प सुरू आहे त्यातून आपल्याला जवळपास 2011 साली 477 द.ल. लीटर पाणी मिळणार आहे आणि त्यासाठी 1600 कोटी रुपये खर्च येणार आहे. तसेच मुंबईसाठी भातसा नदीवर पाणी पुरवठ्यासाठीचा एक प्रकल्प सुरू आहे आणि त्यातून 2007 साली मुंबईला पाणी मिळणार आहे. या प्रकल्पावर 738 कोटी रुपये खर्च येणार असून त्यातून केवळ 350 द.ल.लीटर पाणी मिळणार आहे आणि तिसरी जी योजना आहे त्यासाठी 217 कोटी रुपये खर्च येणार आहे पण ही योजना पेपरवर आहे. 2003 पूर्वी मुंबईमध्ये प्रतिदिन प्रति माणशी 135 लीटर पाणी पुरवठा केला जात होता. पण महापालिकेकडून मी जी माहिती घेतली आहे, माहिती मिळविण्याच्या अधिकाराच्या माध्यमातून, त्यानुसार आज मुंबई शहरात केवळ दर दिन दर माणशी 90 लीटर पाणी चाळीमध्ये राहणाऱ्यांना आणि झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्यांना मात्र 45 लीटर पाणी दिले जाते आणि चोरून, म्हणजे पेपरवर दाखविले जात असले, असे सांगितले जात असले की, 90 लीटर पाणी दिले जाते तरी प्रत्यक्षात 140 लीटर पाणी गगनचुंबी इमारतीत राहणाऱ्यांना दिले जाते. महापालिकेचे एक अधिकारी श्री.कुंटे यांनी प्रेस कॉन्फरन्समध्ये अधिकृतपणे असे सांगितले होते की, आम्ही 135 लीटर प्रतिदिन प्रति माणशी पाणी 2003 सालापूर्वी देत होतो. परंतु आज आम्ही 90 लीटरच पाणी देतो आहोत आणि आणखी काही काळानंतर म्हणजे 2-3 वर्षांनी या मुंबई शहरामध्ये प्रतिदिन प्रति माणशी 50 लीटरच पाणी आम्हाला द्यावे लागेल वा देता येऊ शकेल. कारण वाढती लोकसंख्या आणि अनधिकृत बांधकामे वगैरे मुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेव्हा यावर नियंत्रण ठेवले नाही तर पाण्याचा प्रश्न भयानक स्वरूप धारण करील. या पाणी पुरवठ्याची एक योजना आहे. आज मुंबई शहरातील लोकसंख्या 1 कोटी 25 लाख आहे. 1995 मध्ये जेवढ्या पाण्याची आवश्यकता होती त्यावेळी 1995 च्या सेन्सस प्रमाणे मुंबईची लोकसंख्या ही जवळपास 78 ते 80 लाख होती म्हणजे 10 वर्षामध्ये त्यामध्ये 25 लाखांनी वाढ झाली आहे. त्यावेळेस 3750 द.ल.पाण्याची आवश्यकता होती परंतु आज 2005 साली देखील तेवढे पाणी मिळत नाही. ठाणे जिल्ह्यामध्ये यासाठी काही योजनांना शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यात गारगळी नावाची नदी आहे. ....

( यानंतर श्री.जागडे .... 3के 1 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

गारगाई नावाच्या नदीवर एक योजना कार्यान्वीत करावयाची आहे. परंतु ती योजना फक्त पेपरवर आहे. या योजनेपासून 455 द.ल.लीटर पाणी मिळणार आहे. तसेच काळू नावाच्या नदीवर प्रकल्प झाला तर त्यापासून 590 द.ल.लीटर पाणी मिळणार आहे. या योजना फक्त पेपरवर आहेत. शासनाने या योजनांना तत्वत: मान्यता दिली आहे. आता या योजना कार्यान्वीत करावयाच्या ठरविल्या तर त्यासाठी एक हजार कोटी रुपये लागणार आहेत. यासाठी आपण जागतिक बँकेकडून डॉलरच्या स्वरुपात कर्ज घेतले आहे आणि त्याचे व्याज आपणाला द्यावे लागणार आहे. तसेच या योजना 2020 साली पूर्ण होणार आहेत. आजच्या लोकसंख्येचा विचार केला तर आपणाला किती पाण्याची गरज आहे ? आज आपणाला 4100 द.ल.लीटर प्रतिदिन पाण्याची आवश्यकता आहे. परंतु मी आता सांगितलेल्या दोन्ही योजना आपण पूर्ण केल्या तरी आपणाला 2020 साली केवळ 3927 द.ल.लीटर पाणी मिळणार आहे. तसेच येत्या 15 वर्षात अजून 30 लाख लोकसंख्या वाढेल असे मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांनी गृहीत धरले आहे. म्हणजे 2020 साली दीड कोटी लोकसंख्या होईल त्यावेळी पाणी अतिशय कमी उपलब्ध होणार आहे. 2005 साली आपणाला जेवढ्या पाण्याच्या आवश्यकता लागणार आहे, ते पाणी आपणाला 2020 साली मिळणार आहे. या शासनाच्या सवंग लोकप्रियतेमुळे ज्यावेळी अनधिकृत बांधकामे तोडण्याची वेळ येते, तेव्हा आम्हाला घटनेची चौकट सांगितली जाते. मुंबई हे बेट आहे, या बेटाची आपण जमीनीचे आकारमान वाढवू शकत नाही. मुंबई बेटाची क्षमता फक्त 60 ते 65 लाख लोकसंख्येची आहे. विरोधी पक्षाने आपल्याला असे सांगितले होते की, 1995 नंतरच्या कोणत्याही अनधिकृत बांधकामाला शासनाने पाठींबा देता कामा नये. आपली सत्ता येईल, परंतु आपण भविष्यात जनतेसमोर काय वाढून ठेवले आहे, हे आज आपण राज्यकर्ते म्हणून लक्षात घेतले नाही तर आपणाला पुढील पिढी कधीच माफ करणार नाही. आपला कोणताही निर्णय 10,जनपथ घेणार आहे काय ? डान्सबारचा निर्णय सुध्दा तेथेच होतो.

सभापती महोदय, मुंबईच्या पाणी पुरवठ्यासाठी आपण जागतिक बँकेकडून कर्ज घेत आहोत. जवळ जवळ 90 टक्के पैसे मुंबई 1, मुंबई 2, मुंबई 3 या प्रकल्पावर खर्च होत आहेत. यासाठी लागणारा सर्व पैसा जागतिक बँकेडून कर्जरुपाने घेत आहोत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी असेल, जागतिक बँक असेल, त्यांच्या माध्यमातून केंद्र शासन, महाराष्ट्र शासन आणि मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरीत हा पैसा जात आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

सभापती महोदय, मुंबईमध्ये पाण्याच्या लाईनमध्ये खूप गळती आहे. एखाद्या सोसायटीला ऑन पेपर एक इंचाचे कनेक्शन दिलेले असते, परंतु प्रत्यक्षात पाणी पुरवठा दीड ते दोन इंचाचा होत असतो. आता यामध्ये असे निकष आहेत की, मुंबई तसेच उपनगरात ज्या इमारती 2000 सालानंतर बांधलेल्या असतील, ज्या मल्टीस्टोअरेज इमारती आहेत, त्यांना प्रतिदिनी 135 लीटर पाणी द्यावयाचे. चाळीत राहणा-या लोकांना 90 लीटर पाणी द्यावयाचे आणि झोपडपट्टीत राहणा-या माणसाला 45 लीटर पाणी द्यावयाचे. आता या बाबत महागनरपलिकेच्या अधिका-यांना विचारले असता ते असे सांगतात की, झोपडपट्टीत किती माणसे राहतात, याची माहिती नसल्यामुळे आम्ही हा निकष त्यांच्यासाठी ठेवलेला आहे. चाळीत राहणा-या माणसाकडे घरात संडास नसतो, शॉवर नसतो. म्हणून त्याला जास्त पाण्याची आवश्यकता वाटत नाही. परंतु जो माणूस टू बेड रुम किचन मध्ये राहतो, त्यांना पाण्याची जास्त आवश्यकता आहे. कोणाला किती पाण्याची आवश्यकता आहे, महानगरपालिकेचे अधिकारी ठरविणार. आता चाळीत आणि झोपडपट्टीत राहणा-या माणसाला वाटत नाही की, शॉवरखाली दररोज आंघोळ करावी, रोज कपडे धुवावेत. संडासमध्ये एक चैन खेचली तर पाच ते दहा लीटर पाणी निघून जाते. आता ज्या ग्रामीण भागातील जनतेला पाण्यासाठी वणवण भटकावे लागते, त्यांनी हे पाहिले तर ती माणसे या ठिकाणी येऊन दंगा करतील. फ्लॅटमध्ये राहणा-या माणसाना आपण पेपरवर 90 लीटर पाणी देता आणि प्रत्यक्षात 135 लीटर पाणी देता. याबाबत मी शासनाला सांगू इच्छितो की, सत्ता मिळेल किंवा मिळणार नाही. आईच्या पोटातून डोक्यावर मुकूट घेऊन कोणी जन्माला येत नाही. जनतेच्या आशीर्वादाने आपण सत्तेवर येत असतो.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

आणि आपल्याला लोकांनी निवडून दिले तर... परंतु राज्यकर्ता म्हणून निवडून आल्यानंतर शहरांची रचना, पाणीपुरवठा, नागरी सुविधा या बाबतीत परवा याच मंत्रिमहोदयांनी शासनाचे धोरण जाहीर केले. मी त्याबाबत माझे स्वतःचे मत जाहीर करीत नाही. मुंबईमध्ये आज फक्त 2.5 एफ.एस.आय. हा फक्त पुर्नरचित इमारतींसाठी आहे. ज्या इमारती पूर्वी लहान भूखंडावर होत्या त्याठिकाणी नवीन डी.सी. रुलप्रमाणे 225 चौरस फूटाची जागा दिली पाहिजे. आणि शासन म्हणते की, त्या ठिकाणी एक तृतियांश जमीन आम्ही घेतली, एक तृतियांश जमीन म्हाडाला दिली, एक तृतियांश जमीन महानगरपालिकेला दिली तर त्यांचे नुकसान होईल. राजा उदार झाला, शासन उदार झाले व त्यांनी 4 चा एफ.एस.आय. देण्याची घोषणा सभागृहात केली. ते सभागृहाच्या इतिवृत्तामध्ये आले आहे. त्या ठिकाणी 4 चा एफ.एस.आय. दिला तर मल्टिस्टोअरेज बिल्डिंग बांधतील. ज्यांच्याकडे दोन नंबरचा पैसा आहे अशीच माणसे या मोठया इमारतीमध्ये फ्लॅट्स घेतील. मुंबई शहरामध्ये कुणी 40 हजार सांगतात, कुणी 1 लाख सांगतात, कुणी दीड लाख सांगतात. फ्लॅट्स घेतलेले आहेत, त्यांचे रजिस्ट्रेशन झालेले आहे, कुणीतरी नावाला त्याचे मालक आहेत परंतु त्यामध्ये कुणीही रहात नाही. आज मुंबई शहरामध्ये 1.33 हा एफ.एस. आय. आहे तो सुध्दा आपण कमी करावा. एक एफ.एस.आय. ठेवा. आपण किती बांधकामे करणार आहात? मुबईमध्ये पूर्वी मिल्स होत्या, त्या मिल्समध्ये काम करणारा कामगार दिवसभरामध्ये एकदा शौचाला गेला तर तेवढेच त्याला पाणी लागायचे, आणि संध्याकाळी तो आपली मजूरी करुन घरी जायचा. त्या मिल्समध्ये पाणी जास्त लागत नव्हते. परंतु आता त्या मिल्सच्या ठिकाणी मोठ मोठया इमारती आल्या. त्या ठिकाणी माणसे रहायला आली. एका कुटुंबात पाच-सहा माणसे धरली तरी त्यांना पाणी लागणार आहे. ज्या पूर्वीच्या मिल्स आता विकायला काढल्या आहेत, त्यांना दहा वर्षापूर्वी जो पाणी पुरवठा होत होता. त्या जागेवर मल्टिस्टोअरेज इमारती झाल्यामुळे त्यामध्ये लोक रहायला येणार, शासनाच्या निकषाप्रमाणे त्यांना जगण्यासाठी पाण्याची आवश्यकता लागेल, व त्यांना द्यावे लागणारे पाणी वाढणार, पाण्याची आवश्यकता वाढणार. आज आपल्याकडे असलेले पाणी अपूरे आहे. आज मुंबई शहरामध्ये लोक पाईप फोडून पाणी घेत असल्यामुळे त्या ठिकाणी गळती आहे. व जे लोक पाणीपट्टी देतात, आपल्या भाडयाच्या बिलातून पाण्याचे पैसे देतात त्यांना टँकरव्दारे आपल्या सोसायटीमध्ये पाणी आणावे लागते. मी व माझा भारतीय जनता पक्ष हा झोपडपट्टीच्या विरोधात नाही. आम्ही फार मोठे मानवतावादी नाही. मुंबईमध्ये कुणालाही येण्याचा अधिकार आहे,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

मला जसा येण्याचा अधिकार आहे तसा मी मुंबई शहरात आल्यामुळे दुसऱ्याचा जो जगण्याचा अधिकार आहे तो हिरावून घेण्याचा अधिकार मला नाही. मला फूटपाथवर व्यवसाय करण्याचा अधिकार आहे, मी फूटपाथवर व्यवसाय करण्याच्या निमित्ताने सर्व फूटपाथ व्यापली तर ज्याला फूटपाथवरुन चालण्याचा अधिकार आहे त्याचा अधिकार हिरावून घेतला जातो त्याचे काय? म्हणून या मुंबई शहरातील लोकसंख्येवर आपण नियंत्रण ठेवणार आहात की नाही? पैसे कोठून आणणार आहात? मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये सांगावे की, मुंबई महानगरपालिकेला जागतिक बँकेकडून जे कर्ज मिळते त्याच्या व्याजाचा दर काय आहे? 1974 साली मुंबई महानगरपालिकेमध्ये मी त्यावेळी नगरसेवक होतो 1974 ते आतापर्यंत पाण्यासाठी करोडो रुपये खर्च झाले. जगाच्या निकषाप्रमाणे व्यवस्थित स्वच्छता ठेवायची असेलतर किमान 150 ते 175 लिटर प्रतिदिनी प्रतिमाणशी पाण्याची आवश्यकता शहरामध्ये आहे. आपल्या शहरामध्ये कमी निकष आहेत. बंगलोर सारख्या शहरामध्ये पाणी पुरवठा जास्त आहे त्या ठिकाणी जास्त निकष असतील. मुंबई शहराचा आपण विचार करणार आहोत की नाही? प्रत्येक जण माझ्या पक्षाला किती मते मिळतील, माझे किती आमदार निवडून येतील? राजकारणामध्ये केवळ सत्ता डोळयासमोर ठेवून आपण राज्यकर्ते झालो तर नियती आपल्याला कधीही माफ करणार नाही असे मला वाटते. मुंबई शहरामध्ये चांगल्या प्रकारे पाणी पुरवठा होण्यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी चांगले प्रयत्न करीत आहेत. मुंबईमध्ये असलेल्या सर्व अंडरग्राऊंड सेवा आहेत त्यामध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन किती कौशल्याने टाकलेल्या आहेत हे पाहून परदेशामधील आलेली मंडळी आश्चर्य चकीत होतात. आपल्या इंजिनिअर्सची ते वाहवा करतात. आपले इंजिनिअर्स म्हणतात की, आम्ही सगळे करतो परंतु पुरेसा पाणी पुरवठा आम्ही करु शकत नाही. आणि म्हणून मला वाटते की, अर्ध्या तासाच्या चर्चेच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करतो की, मुंबई शहराला आज जो पाणीपुरवठा होत आहे तो अपूरा आहे, आवश्यक तेवढा नाही. आणि मुंबई महानगरपालिकेने जे प्रकल्प तयार केले आहे व त्याचे जे बजेट तयार केले आहे, त्यांनी जो अहवाल तयार केला आहे तो आपण मागवा. आपण त्यांच्याशी चर्चा करा. ते तुम्हाला सांगतील की,आज आपल्याकडे असलेले पाणी 2020 सालापर्यंत आपल्याला पुरणार नाही. आणि तुम्ही तर घटनेप्रमाणे सांगत आहात की, कुणीही मुंबई शहरात

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

या. मुंबई म्हणजे धर्मशाळा आहे. कुठूनही कसेही पाणी घ्या, त्या ठिकाणी बेकायदेशीर जोडण्या करुन घ्या. म्हणून या मुंबई शहरामध्ये भविष्याचा वेध घेऊन अतिशय कठोरपणे पाणीपुरवठयाच्या योजना राबविल्या जात आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 18:50

श्री.मधुकर चव्हाण . . . .

भविष्याचा वेध घेऊन लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे अतिशय आवश्यक आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यामध्ये काही फरक करु नका अशी आपल्याला माझी आग्रहाची विनंती आहे. म्हणून मला पूर्ण विश्वास आहे की, या अर्ध्या तासाच्या चर्चेच्या माध्यमातून मुंबई शहरामध्ये पाणीपुरवठयाचा जो प्रश्न आज ऐरणीवर आलेला आहे आणि कालांतराने मुंबई शहरामध्ये पाणी पेटल्याशिवाय राहणार नाही. येथे पाण्यासाठी दंगे होऊ नयेत आणि पाण्यासाठी लोक मल्टीस्टोअरेज इमारतीत राहणा-या लोकांच्या घरामध्ये जाऊन पिण्यासाठी हंडाभर पाणी घेण्याची स्थिती त्यांच्यावर येऊ नये यासाठी मला विनंती करावयाची आहे. या शहराचे नीट नियोजन व्हावे. भविष्यामध्ये लोकसंख्येच्या अनुरुप पाणी पुरवठा व्हावा यासाठी लोकसंख्येवर कठोरपणे नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे आणि हे नियंत्रण ठेवावयाचे असेल तर पहिल्यांदा या शहरामध्ये येणारे लोंढे कठोरपणे थांबविणे आणि त्यासाठी शासनाने कठोरपणे निर्णय घेणे आवश्यक आहे एवढे बोलून मी माझे वक्तव्य येथे थांबवितो आणि आपण मला परवानगी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. नमस्कार.

-----

. . . .3 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे(नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण साहेबांनी मुंबईच्या अतिशय महत्वाच्या प्रश्नावर अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे आणि या आयुधाच्या माध्यमातून शासनाला अनेक चांगल्या सूचना देण्याचा प्रयत्न केला आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सभापती महोदया, ही वस्तुस्थिती आहे की, आज 2005 मध्ये मुंबईची लोकसंख्या 1 कोटी 26 लाख असून यासाठी लागणारे पाणी 3986 एम.एल.डी. दशलक्ष लि.प्रतिदिन आहे. पण आज आपण 3100 एम.एल.डी.पाणी पुरवित आहोत. याचा अर्थ आपण 886 एम.एल.डी. इतके कमी पाणी पुरवित आहोत. आज आपण जर पुढील सहा वर्षानंतरचा वेध घेतला म्हणजे 2011 मध्ये मुंबईची लोकसंख्या काय होईल ? ज्याप्रमाणात लोकसंख्या वाढत आहे, त्याचा विचार केला तर त्यावेळी अंदाजे 1 कोटी 38 लाख इतकी लोकसंख्या होईल असे गृहीत धरले तर त्यासाठी लागणारी जी रिक्वायरमेंट आहे ती 4539 एम.एल.डी. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कोणकोणते प्रोजेक्ट आज कार्यान्वित आहेत. ते प्रोजेक्टस पूर्ण होऊन ज्यावेळी त्यांची सप्लायची परिस्थिती येईल 3905 लि.,त्यावेळी देखील 600 एम.एल.डी.पाणी डेफीशिट राहणार आहे, कमी राहणार आहे. 2021 मध्ये साधारणपणे दीड कोटी लोकसंख्या गृहीत धरुन तेवढया लोकसंख्येला लागणारे पाणी 5000 एम.एल.डी. असेल. परंतु याठिकाणी ज्या काही उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत, त्या कार्यान्वित होण्याच्या दृष्टीकोनातून प्रामाणिकपणे प्रयत्न सुरु आहेत आणि त्यामुळे त्यावेळी आपल्याकडे निश्चितपणे सरप्लस पाणी उपलब्ध होईल अशी परिस्थिती आहे. याठिकाणी ज्या 5 मोठया पाणीपुरवठयाच्या योजना सुरु आहेत, त्यामध्ये तानसा, अप्पर वैतरणा, भातसा 1,2,3, विहार व तुलसी अशा योजनांमधून मुंबई शहराला पाणी पुरवठा होत आहे. मी आतापर्यंत यासंबंधातील प्रश्न सांगितले. आता याबाबतीत शासनाने काय-काय उपाय केलेले आहेत, त्याबाबतीत सभागृहाला थोडक्यात माहिती सांगू इच्छितो. मुंबई 3 (अ) हा अत्यंत महत्वाचा प्रकल्प जो साडेतीनशे दशलक्ष एम.एल.डी.पाणी उपलब्ध करु शकणार आहे, तो 2007 साली निश्चितपणे पूर्ण होणार आहे. आजच्या 3100 एम.एल.डी.मध्ये 350 एम.एल.डी. पाणी वाढण्याच्या दृष्टीकोनातून एक महत्वाचे पाऊल पडणार आहे. मध्य वैतरणा हा 455 एम.एल.डी.चा प्रकल्प असून तो 2011 मध्ये पूर्ण होणार आहे. जे वर्कींग शेडयुल आहे, जो बार चार्ट असतो, टाईम बाऊंड कार्यक्रम असतो त्या दृष्टीकोनातून आजमितीला जी-जी काही कामे होणे अपेक्षित होते, ती

. . . .3 एम-3



APR/MHM/SBT 18:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

सर्व कामे निश्चितपणे टाईम शेडयुल नुसार सुरु आहेत. त्यामुळे दिलेल्या तारखेमध्ये हे प्रकल्प निश्चितपणे पूर्ण होतील याबद्दल माझ्या मनात तीळमात्र शंका नाही.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ पूर्वी सौ.रणदिवे.... 18:55

श्री.राजेश टोपे (पुढे सुरु...

त्यामुळे दोन प्रकल्प पूर्ण केल्यानंतर देखील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन,त्याचा वेध घेऊन, गारगई आणि पिंजाळ हे दोन मोठे प्रकल्प देखील नियोजित केलेले आहेत. जे अनुक्रमे 455 एम.एल.डी. आणि 865 एम.एल.डी. इतक्या क्षमतेचे आहेत. साधरणत : गारगई 495 एम.एल.डी.चा प्रकल्प आहे आणि पिंजाळ 865 एम.एल.डी.चा आहे. सभापती महोदय, या ठिकाणी मुद्दाम होऊन माहिती सांगू इच्छितो की, यासाठी कन्सल्टंटची देखील नेमणूक झालेली आहे. त्यांचा जो प्री फिजिबिलिटी रिपोर्ट आहे, तो देखील आता जवळजवळ 10-15 दिवसामध्ये तयार होत आहे, त्यामुळे त्याची देखील टेंडर प्रक्रिया महिन्या-दीड महिन्यामध्ये सुरु करण्याच्या दृष्टीकोनातून अडचण रहाणार नाही. त्यामुळे पुढच्या वाढत्या लोकसंख्येचा वेध घेऊन, कोणकोणते प्रकल्प आपण करु शकतो आणि कोणते प्रकल्प करत आहोत, याबाबत मी मुद्दाम माहिती देऊ इच्छितों. आज मुंबईतील तीन-अ आणि मध्य वैतरणा या प्रकल्पांना हे एमएमआरडीए आणि बीएमसीच्या स्व-निधीतून पूर्ण पैसे दिले जात आहेत. त्यामुळे पैशाची काही अडचण नाही आणि वेळेवर हे प्रकल्प पूर्ण होतील, हे पुन्हा एकदा सांगू इच्छितो. या माहितीच्या व्यतिरिक्त आता खरा प्रश्न उपस्थित होतो की, आजमितीला मी सांगितलेल्या पध्दतीने 800 एमएलडीची कमतरता जरुर आहे. ती भरुन काढण्याच्या दृष्टीकोनातून निश्चितच 135 लिटर जे दरडोई पाणी देणे अपेक्षित आहे त्यावरुन 90 लिटर दरडोई पाणी आपण देत आहोत. हा निर्णय आपण नोव्हेंबर 2002 पासून घेतलेला आहे. एवढ्याने याची भरपाई होणार नाही .आपण नवीन होऊ घातलेल्या इमारती आहेत, त्यांच्यावर देखील काही निर्बंध आणण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. सगळयात महत्वाचे म्हणजे पाण्याचे महत्व निश्चितच तुम्हा-आम्हा सगळयांना आहे. म्हणून जे मुंबई महानगरपालिकेचे डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन आहे, त्या कायद्यामध्ये देखील दुरुस्ती केली आणि रेन वॉटर हार्वेस्टींगच्या दृष्टीकोनातून 1 हजार स्क्वे. मीटरच्या वर बांधकाम असेल तर त्या ठिकाणी रेन वॉटर हार्वेस्टींग कम्पल्सरी करण्यात आलेले आहे. त्याशिवाय इंटीमेशन ऑफ डिस ॲप्रुव्हल यामध्ये ज्या अटी घालण्यात येतात. सन्माननीय सदस्य श्री.चव्हाण साहेबांनी नगरसेवक म्हणून काम केलेले आहे. त्यामुळे आयओडी महानगरपालिकेचे असते. त्यामध्ये ज्या अटी आहेत, त्यानुसार त्यामध्ये हजार स्क्वे. मीटरच्या वरचे बांधकाम असेल तर त्याला रेन वॉटर हार्वेस्टींग कम्पल्सरी करण्यात आलेले आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (पुढे सुरु...

त्याचबरोबर ही वस्तुस्थिती आहे की, जी माहिती सन्माननीय सदस्यांनी सांगितली त्याप्रमाणे फ्लशींगच्या पध्दतीने पाण्याचा खूप मोठया प्रमाणात अपव्यय होतो. अलिकडे माणसांची लिव्हींग स्टॅंडर्ड वाढलेले आहे. या सगळया लिव्हींग स्टॅन्डर्डला मिट-आऊट करण्याच्या दृष्टीकोनातून खऱ्या अर्थाने पाहिले पाहिजे. तेवढे पाणी लिव्हींग स्टॅडर्डच्या दृष्टीने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून मोठयाप्रमाणात पाण्याची आवश्यकता भासते.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.नीलम गोऱ्हे)**

म्हणून ड्युवेल फ्लशिंग सिस्टीम सारख्या ज्या लहान लहान गोष्टी पाणी वाचविण्याच्या आहेत, त्या देखील या निमित्ताने आता कम्पल्सरी करण्यात आलेल्या आहेत. परंतु एवढयानेच हे भागणार आहे काय? खऱ्या अर्थाने सन्माननीय श्री.चव्हाण साहेबांनी या ठिकाणी मुख्य प्रश्न उपस्थित केला की, लोकांचे लोंढे थांबले पाहिजेत. लोकांचे लोंढे थांबले पाहिजेत, ही वस्तुस्थिती आहे. मुंबईची लोकसंख्या कंट्रोल झाली तर जेवढा म्हणून इन्फ्रास्ट्रक्चरचा भाग आहे मग तो रस्त्याचा असेल, पाणीपुरवठ्याचा असेल त्यावर निश्चितप्रकारे ताण कमी होईल, तेवढा भार पडणार नाही. म्हणून लोकसंख्येचे लोंढे कंट्रोल करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाच्या वतीने, ज्या ज्या काही उपायात्मक बाबी आहेत त्या आपण नियमित करण्याचे ठरविले आहे. जसे आपण 1995 नंतर 2000 पर्यन्त झ ोपड्या रेग्युलर करण्याच्यादृष्टीने निर्णय घेतला. परंतु येथून पुढे कोणीही यायचे आणि कोठेही बसायचे, अतिक्रमण करुन झोपडी बांधायची आणि आपले वास्तव्य करायचे,यावर निश्चितच निर्बंध या नियमामुळे आता आलेला आहे. त्यामुळे ज्या काही शासनाच्या जागा असतील पब्लिक सेक्टर अंडरटेकिंच्या जागा असतील, केंद्र शासनाच्या काही जागा असतील, या सगळयाच जागेवर झोपडपट्टया वसण्याचे काम होत होते. त्यावर शासनाच्या या नवीन धोरणामुळे निर्बंध आणण्याच्या दृष्टीकोनातून जाणीवपूर्वक प्रयत्न झालेला आहे. अनधिकृत बांधकामे थांबविणे हा देखील एक महत्वाचा भाग आहे. त्यामध्ये देखील शासनाच्यावतीने पावले उचलण्यात आलेली आहेत. आज अस्तित्वात असलेली पाणीपुरवठा योजना त्याची गळती थांबविणे, हा देखील एक पाणी बचतीचाच भाग आहे. त्यामुळे जेथे जेथे अशी मोठी योजना, एवढया मोठया सव्वा कोटी जनतेला पाणी पुरविणे अशा योजनेत नेहमीच लिकेजस होतात आणि पाणी वाया जाते. 18 टक्के लिकेजस आजही आपण कंट्रोल करु शकलो, तर खूप मोठी पाण्याची बचत होईल. याबाबतीच्या सूचना

यानंतर कु.थोरात.....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार..... 19:00

श्री. राजेश टोपे....

महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा खात्याला आणि कमिशनरनां देण्यात आलेल्या आहेत की, कुठल्याही परिस्थितीत अशा पध्दतीचे जे लिकेजस आहेत ते तातडीने थांबविले पाहिजेत आणि पाण्याची बचत करण्यात आली पाहिजे. त्यामुळे या ठिकाणी ज्या तातडीच्या आणि दूरच्या उपाययोजना आहेत, शॉर्टटम प्लॅन आणि लाँगटर्म प्लॅन, या दोन्हीच्या बाबतीत शासनाने निश्चितप्रकारे गांभीर्याने विचार करुनच धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत. त्यामुळे पाणी टंचाईच्या परिस्थितीवर मात करण्याच्या दृष्टीकोनातून दूरगामी चांगले परिणाम करणा-या ज्या गोष्टी आहेत, त्या शासनाच्या विचाराधीन असून आता एवढाच विचार करण्याची गरज आहे की, द्रुतगतीने त्या वेळेत कशा पूर्ण होतील व याबाबत शासन निश्चितप्रकारे प्रयत्नशील राहील. म्हणून मुंबई शहराच्या दृष्टीकोनातून या पाणी टंचाईबाबत तातडीच्या आणि दूरगामी अशा दोन्ही उपाययोजना या ठिकाणी करण्यात आलेल्या आहेत, एवढेच मी या सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबईत झोपडपट्टी वाढू नये, लोंढे येऊ नयेत तसेच अधिकृत बांधकाम किती करावे? आपण या मुंबई शहराची व्हर्टिकल हॉरिझंटल वाढ करु शकतो काय? त्यामुळे सध्या जो एफ.एस.आय.देण्यात येतो तो कमी करण्याच्या स्थितीत शासन आहे काय? याचे कारण असे की, हा एफ.एस.आय. कमी केला नाही तर मुंबई शहरात उंचउंच इमारती बांधण्यात येतील. अनधिकृत बांधकामावर जसे नियंत्रण ठेवले पाहिजे तसे अधिकृत बांधकामसुध्दा वारेमाप होता कामा नये. शासनाने या शहराचे सुध्दा नियोजन केले पाहिजे. पूर्वी चेंबूरला उपनगरामध्ये .75 एफ.एस.आय. होता तो आता 1 झाला आहे. मुंबई शहरामध्ये आता 1.33 एफ.एस.आय. आहे. शासन रिपेअर बोर्डाला 2.5 एफ.एस.आय. देते. मिल्स वगैरे ठिकाणी 4 एफ.एस.आय. देण्याची गरज आहे कां? या मुंबई शहरावर फ्लोटिंग एफ.एस.आय. हे फार मोठे संकट शासनकर्त्यांनी आणले आहे.कोणी तरी वसईच्या खाडीमध्ये जमीन विकत घ्यावयची आणि तेथील फ्लोटिंग एफ.एस.आय. मुंबई शहरात वापरायचा. एवढयाशा जमिनीच्या तुकडयावर 20/20 मजल्याच्या इमारती मुंबई शहरात उभ्या राहणार आहेत. आपण नगरविकास खात्याचे राज्यमंत्री आहात. मी आपल्याला व्यक्तिगत बोलत नाही. आपण अभ्यास करता, प्रामाणिक आहात.आपण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार..... 19:00

श्री. मधुकर चव्हाण....

याचा कठोरपणे विचार करावा. आपण हा एफ.एस.आय. कमी करणार आहात काय? गरिबांनी बांधलेली घरे शासन तोडणार काय? 1995 नंतरच्या झोपडपट्टीच्या संदर्भात निर्णय घ्या,एकदा. तळयात की मळयात करु नका. आता सुध्दा उत्तर देतांना मंत्रिमहोदयांनी तळ्यात की मळ्यात असेच केले. 1995 की 2000 पर्यंतच्या झोपडया?नेमके काय ते जाहीर करा. आणि 2000 पर्यंतच्या झोपडयांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयाचे भान ठेवून योजना आखा. भानठेवून आखलेल्या योजनेवर बेभान होऊन अंमलबजावणी करणार आहात काय? तुम्ही बेभान होऊन वचन देता. आणि मग भान ठेवून कारभार करता. इथे कसे देऊ, तिथे कसे देऊ, पैसे नाहीत, असे करीत बसता. शासन एफ.एस.आय.वर बंधन आणणार आहे की नाही? जगात सगळीकडे माणसे पाठीमागे चाललेली आहेत की, पुढे चालली आहेत? शहरे किती वाढवावयाची? नागरीकरण वाढत चाललेले आहे. 40 टक्के नागरीकरण झालेले आहे. शासनाने दिलेल्या आकडेवारी नुसार 10 कोटी 80 लाख लोकसंख्येपैकी, सुमारे पाच कोटीच्या आसपास जनता शहरात राहते. मुंबई शहरात एकदशांश लोक राहतात. त्यामुळे सभापती महोदया, एफ.एस.आय. बद्दल कठोर उपाय करण्यात येणार आहेत की नाही? कां, बिल्डरच्या तिजोरीत पैसे भरण्यासाठी एफ.एस.आय. वाढवून देणार आणि घरे बांधणार? मग तेथे रस्ता नसला तरी चालेल, ॲप्रोच रोड नसला तरी चालेल. पाणी नसले तरी चालेल, सांडपाण्याची व्यवस्था नसली तरी चालेल. काही नसले तरी चालेल. घर बांध, पैसै दे. पर्सेंटेज दे. संपला विषय. त्यामुळे शासन याचा निर्णय करणार आहे काय? एफ.एस.आय.चा निर्णय करणार आहात काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, फ्लोटींग एफ.एसफ.आय. म्हणजे सन्माननीय सदस्य टी.डी.आर. बाबत बोलत आहेत. मुंबईच्या टी.डी.आर. योजनेवर ख-या अर्थाने व्यापक चर्चा होणे आवश्यक आहे. आज मुंबईची टी.डी.आर. योजना कदाचित दिल्लीमध्ये सुध्दा लागू करता येईल काय? औरंगाबादला लागू करता येईल काय? पुण्याला लागू करता येईल काय? अशा पध्दतीचा विचार चालू आहे. परंतु फक्त मुंबईमध्येच ही टी.डी.आर.योजना सक्सेसफूल झालेली आहे. त्याचे कारण असे की, मुंबईमध्ये जमिनीची किंमत कन्स्ट्रक्शन कॉस्टपेक्षा अधिक जास्त आहे.यामुळेच कदाचित या टी.डी.आर. योजनेला मुंबईमध्ये प्रतिसाद मिळाला आहे.या टी.डी.आर. किंवा फ्लोटिंग एफ.एस. आय. ला इतर शहरात प्रतिसाद मिळाला आहे, अशातला प्रकार अजिबात नाही.

यानंतर श्री.बरवड.....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

वास्तविक पाहता देशामध्ये सगळीकडे ही टीडीआर योजना लागू करावी असा प्रयत्न त्या त्या ठिकाणचे शासन करीत आहे परंतु दुर्दैवाने त्या ठिकाणी ही योजना यशस्वी होत नाही. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना मी एवढेच सांगेन की, आपण जे म्हणत आहात तीही गोष्ट योग्य आहे की, यामुळे मूलभूत सुविधांवर ताण पडत आहे. मुळात असलेल्या छोटया आयलँड सिटीमध्ये आपण तो टीडीआर देत नाही. आयलँड सिटीचा टीडीआर आपण उपनगरांमध्ये देतो. सन्माननीय सदस्यांनी मांडलेली बाजू काही प्रमाणात निश्चितपणे महत्वाची आहे. त्यामुळे याबाबतीत निश्चितपणे विचार करण्यात येईल आणि विचार करुन सजेशन फॉर ॲक्शन म्हणून मला एवढे म्हणता येईल की, आपण याबाबतीत विचार करु आणि त्यानंतर निर्णय घेऊ.

**तालिका सभापती (डॉ. नीलम गोऱ्हे)** : ही अर्धा-तास चर्चा संपलेली आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

ज रीत आहे.

**पू. शी.** : ठाणे जिल्हयाचे विभाजन करणे.

**मु. शी.** : ठाणे जिल्हयाचे विभाजन करणे यासंबंधी श्री. मुझफ्फर हुसेन यांनी उपस्थित जेलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : अध्यज महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित ज रतो :-

"ठाजे हा जिल्हा सर्व बाजूने मोक्याचा आहे, ठाजे लजत संपूर्ज जिनारपट्टी, जुजरात राज्य व मुंबई शहर यामुळे संपूर्ज देशातून येजाऱ्यांचा व वेजवेजळया ठिज ाजाहून प्रस्तापित झालेल्या लोज ांचा मुंबई जिंवा ठाजे जिल्ह्यात येज्याचा ज ल मोठया प्रमाजात वाढला आहे व शासनाच्या धोरजामुळे मुंबईतील जनता मोठया प्रमाजात ठाजे व ठाजे ग्रामीज भाजात स्थलांतर ज रीत आहे. त्यामुळे ठाज्याची लोज संज्या 90 लाजाच्या वर जेलेली असून तेथील लोज ांना पायाभूत सोयी सुविधांपासून वंचित रहावे लाजत आहे. अपुरी पालीस यंत्रजा यामुळे या जिल्ह्यात जुन्हेजारीच्या प्रमाजात दिवसेंदिवस वाढ होत असून परिजामी ज ायदा व सुव्यवस्थेचा निर्माज झालेला प्रश्न, यासाठी या जिल्ह्याचे विभाजन ज रज्यात आल्यास संपूर्ज भाजाचा विज ास ज रजे सुलभ होऊन तेथील जनतेच्या मुलभूत जरजांवर नियंत्रज ज रजे प्रशासनाला शक्य होईल. या विषयाबाबत शासनाने ज रावयाची उपाययोजना व ज ार्यवाही."

सभापती महोदया, ठाणे जिल्हयाचे विभाजन वर्षानुवर्षे काही कारणांमुळे प्रलंबित आहे. साधारणत: 1990 साली या जिल्हयाचे विभाजन झाले पाहिजे या चर्चेला आणि या कार्यवाहीला सुरुवात झाली. त्यावेळी ठाणे जिल्हयाची लोकसंख्या साधारणत: 50 लाख होती आणि सन 2001 च्या जनगणनेनुसार या जिल्हयाची लोकसंख्या साधारणत: 90 लाखापर्यन्त पोहोचलेली आहे. या विषयाच्या संदर्भात दोन्ही सभागृहांमध्ये वेळोवेळी चर्चा होत असताना, शासनाबरोबर वेळोवळी पत्रव्यवहार होत असताना आणि आजही शासनाची अशी भूमिका राहील की, डिलिमिटेशनच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन .....

कारणामुळे, निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे जोपर्यन्त डिलिमिटेशनचे काम पूर्ण होत नाही तोपर्यन्त कोणत्याही जिल्हयाची, कोणत्याही तालुक्याची निर्मिती करता येणार नाही. असे शासनाचे धोरण असणार आहे. हे असून सुध्दा या चर्चेच्या माध्यमातून ठाणे जिल्हयावर होणारा अत्याचार, मग तो प्रशासकीय माध्यमातून असेल, वाढत्या लोकसंख्येच्या माध्यमातून असेल, तो निदर्शनास आणून शासनाने त्यावर उपाययोजना करावी अशा प्रकारची माझी भूमिका मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. मी आपल्याला सांगितले की, 2001 च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्हयाची लोकसंख्या 90 लाखापर्यन्त पोहोचलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेबांनी उल्लेख केला की, मुंबईची लोकसंख्या साधारणत: सव्वा कोटीपर्यन्त आहे. ठाण्याची लोकसंख्या 90 लाखापर्यन्त आहे. ठाणे आणि मुंबई ही दोन्ही शहरे एकमेकास लागून आहेत आणि संपूर्ण मुंबई शहराचा वर्कींग पाप्युलेशनचा जो लोड आहे तो ठाणे जिल्हयावर आहे. विशेषत: कल्याण, डोंबिवली, मिरा भाईंदर, नालासोपारा, वसई, विरार, नवी मुंबई या भागावर त्याचा लोड आहे. ठाणे जिल्हयातील एकच ठाणे तालुका जर पाहिला तर संपूर्ण आशिया खंडामध्येच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये कोणत्याही तालुक्याची जेवढी लोकसंख्या नसेल तेवढी लोकसंख्या म्हणजे 25 लाख एवढी लोकसंख्या एका तालुक्यामध्ये आहे आणि त्या ठिकाणी एक तहसिलदार आहे. त्या एका तालुक्यामध्ये मिरा-भाईंदर, नवी मुंबई आणि ठाणे अशा तीन महानगरपालिका आहेत. त्या ठिकाणी एकच तहसिलदार आहे. अशी एकूण परिस्थिती एका तालुक्याची आहे. तशीच परिस्थिती वसईची आहे. वसईची लोकसंख्या साधारणत: 9 लाख झालेली आहे. तशीच परिस्थिती भिवंडीची आहे. कल्याण-डोंबिवलीची तीच परिस्थिती आहे. त्या ठिकाणी 12 ते 15 लाखापर्यन्त लोकसंख्या पोहोचलेली आहे. ही सर्व परिस्थिती पाहिली आणि वाढत्या लोकसंख्येचे प्रमाण पाहिले तर 1990 पासून 2001 पर्यन्त साधारणत: 150 टक्क्याने मायग्रेटींग पाप्युलेशन वाढलेली आहे. संपूर्ण देशामध्ये मायग्रेटींग पॉप्युलेशन जास्तीत जास्त परसेंटेजने जर कोणत्या जिल्हयात वाढली असेल तर ती ठाणे जिल्ह्यामध्ये वाढलेली आहे. बाहेरुन येणाऱ्या लोंढ्याचा विषय नेहमी या सभागृहामध्ये आणि विधानसभेमध्ये गाजत असतो. या विषयाच्या संदर्भात जर खरोखर विचार केला नाही तर येणाऱ्या 2010 च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्हयाची लोकसंख्या पावणेदोन कोटीपर्यन्त पोहोचणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन.....

आहे. आज शासनाची जी भूमिका आहे आणि ज्या काही अडचणी आहेत त्यामध्ये पैशाची अडचण आहे तसेच निवडणूक आयोगाचे नॉर्म्स आहेत. जोपर्यन्त डिलिमिटेशनचा मुद्दा आहे तोपर्यन्त या विषयाला हात घालता येत नाही. तोपर्यन्त नवीन जिल्हयाची निर्मिती करता येणार नाही. तहसिलदार नेमता येणार नाहीत. याचा अर्थ येणाऱ्या दहा वर्षानंतर या नवीन जिल्हयाची निर्मिती शासन करील असे चित्र दिसते. प्रत्यक्षात जर असे चित्र असेल तर आज जे प्रशासन त्या ठिकाणी काम करीत आहे त्या प्रशासनाची परिस्थिती येत्या पाच वर्षामध्ये काय होणार आहे, लॉ अँड ज्युडिशिअरीची काय परिस्थिती होणार आहे, आज कोर्टामध्ये प्रलंबित असलेल्या केसेस किती आहेत याचा विचार केला पाहिजे. गुन्हेगारीच्या संदर्भात ठाणे शहर आणि ठाणे ग्रामीणच्या संदर्भातील आकडेवारी माझ्याकडे आहे पण मी त्याबाबत सविस्तर सांगत नाही. पोलीस बलाची संख्या किती आहे याचा विचार केला तर आज मुंबई शहराची लोकसंख्या सव्वा कोटी आहे आणि ठाणे जिल्हयाची लोकसंख्या 90 लाख आहे आणि पोलिसांची संख्या पाहिली तर त्यामध्ये जमीन अस्मानची तफावत आहे. माझे असे म्हणणे आहे की, जोपर्यन्त जिल्हयाची निर्मिती होत नाही तोपर्यन्त ॲडमिनिस्ट्रेशनसाठी अल्टरनेट व्यवस्था करावी. ते शासनाला करता येते. अशी मागणी आहे की, कोकण किनारपट्टीसाठी वेगळा कमिशनरेट एरिया करावा.. तुम्हाला त्या ठिकाणी ॲडिशनल एस.पी. नेमता येईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन...

याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, पोलीस स्टेशन्स युध्द पातळीवर करण्यात येतात. ज्याठिकाणी पोलीस स्टेशन्सची मागणी आहे त्याठिकाणी तुम्ही पोलीस स्टेशन्स देऊ शकता. पोलिसांची संख्या वाढवू शकता. ठाणे जिल्हयातील उदाहरणच सांगावयाचे झाले तर 10 लाख लोकसंख्येमागे एक कॉन्स्टेबल, एक पीएसआय आहे अशी स्थिती येथील पोलीस दलाची आहे. सत्र न्यायालयाची स्थिती तशीच आहे. त्याच्यासाठी बजेटमध्ये काहीच तरतूद करण्यात आलेली नाही. संरक्षण दलाचा मुद्दा या सभागृहात मी उपस्थित केला होता आणि आताही करीत आहे. या जिल्हयामध्ये शहरीकरण वाढत आहे, जंगल वाढत आहे, जिल्हा वाढत आहे, किनारपट्टी आहे, डोंगरपट्टी आहे, प्रत्येक तालुक्याचे शहरीकरण झालेले आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये संरक्षण दल झाले पाहिजे. ठाणे जिल्हयातील वाडा, मोखाडा, जव्हार, तलासरी, डहाणू याठिकाणी दुर्गम भाग आहे, आदिवासी भाग आहे. मागील आठवडयामध्ये मी चर्चा उपस्थित केल्यानंतर मी रविवारी तलासरीला गेलो होतो. त्याठिकाणाहून ठाण्याला फॅक्स लावण्याचा प्रयत्न केला तर तो लागला नाही. फोन लावण्याचा प्रयत्न केला तर फोन लागत नाही, मोबाईल लावला तर मोबाईल लागला नाही अशी परिस्थिती या जिल्हयाची आहे. आपण नाशिकला दोन तासामध्ये जाऊ शकतो. परंतु ठाण्याहून जव्हार, मोखाडा येथून मात्र साडेतीन, चार तास लागतात. कुपोषणाच्या केसेस जास्त कोठे होत असतील तर त्या ठाणे जिल्हयात आहेत. जव्हारला अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी दिलेले आहेत. पण इतर कोणतीही प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात नाही. सीआरझेडचा प्रश्नामुळे मुंबई असेल रायगड, ठाणे जिल्हा असेल, ठाणे जिल्हयातील नगरपालिका आणि महानगरपालिका असेल, या सीआरझेडमुळे सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचे प्रश्न प्रलंबित आहेत. डम्पींग ग्राऊंड नाही, लाखो टन कचरा जिल्हयातून निघतो त्याची विल्हेवाट लावण्याची सोय नाही. अशा परिस्थितीत सध्या जे प्रशासन तेथे त्याच्यात वाढ करुन येणा-या बजेटमध्ये तरतूद करावी, मी शासनाचे अभिनंदन करतो. मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख, मा.उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील आणि मा.मंत्री श्री.गणेश नाईक यांनी इनिशिएटिव्ह घेऊन भूमिका घेतली आहे की, मुंबईप्रमाणे ठाणे जिल्हयासाठी एमएमआरडीएची रचना करावी. तशाप्रकारची ॲथोरिटी ठाणे जिल्हयासाठी निर्माण करावी व त्यासाठी वेगळया बजेटची तरतूद केली पाहिजे. जेणे करुन या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.मुझफ्फर हुसेन.....

जिल्हयाचे वाढत्या लोकसंख्येमुळे जे प्रश्न निर्माण झालेले आहेत आहेत ते सोडविण्यासाठी जिल्हयाचे विभाजन होईपर्यंत थांबू नये. सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशासनामध्ये वाढ केली तर हे प्रश्न मार्गी लागण्यास सुरुवात होईल. ते प्रश्न सुटू शकतील. त्याठिकाणी फास्ट ट्रॅक कोर्टची निर्मिती झाली पाहिजे. नवी मुंबई, मिरा-भाईंदर येथे अतिरिक्त तहसीलदारांची नेमणूक झाली पाहिजे. त्याठिकाणी ते 3 दिवस बसू शकतील. 10 लाख लोकांनी ठाण्याला जाण्यापेक्षा एका तहसीलदारांनी तेथे 3 दिवस बसून लोकांची गा-हाणी ऐकली तर त्यांचे प्रश्न सुटतील, लोकांची सोय होईल. त्याचप्रमाणे तेथे पोलीस स्टेशनची आवश्यकता आहे. 100 जणांचे पोलीस बल असेल तर त्यापेकी 30-40 जण सुट्टीवर किंवा बंदोबस्तासाठी गेलेले असतात. जिल्हयाची लोकसंख्या 8-10 लाख झालेली असल्यामुळे तेथे क्राईमचा रेट वाढलेला आहे. म्हणून अतिरिक्त पोलीस स्टेशन्सच्या माध्यमातून, अतिरिक्त एस.पी, अतिरिक्त डीवायएसपी, अतिरिक्त न्यायाधीश यांच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याची भूमिका घेऊन जोपर्यंत वेगळया जिल्हयाची निर्मिती होत नाही तोपर्यंत अशाप्रकारची उपाययोजना करावी अशी भूमिका मी माझ्या या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून मांडतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 19:15

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदया, या सदनाचे आमचे तरुण सहकारी मा.सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी नियम 92 अन्वये अर्धा-तास चर्चेद्वारे ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाची चर्चा याठिकाणी उपस्थित केलेली आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन आणखी एक नवीन जिल्हा निर्माण झाला पाहिजे अशी मागणी मा.सदस्यांनी या चर्चेतून केलेली आहे. ठाणे जिल्हा हा अतिशय मोठा असल्यामुळे त्या जिल्ह्यातील नागरिकांना येणा-या अडचणी, प्रशासकीय अडचणी आणि अन्य अडचणी यांचा उहापोह मा.सदस्यांनी थोडक्यात परंतु अतिशय चांगल्या त-हेने केलेला आहे. खरे म्हटले तर मागच्या काळामध्ये अनेक नवीन जिल्ह्यांची आणि तालुक्यांची निर्मिती महाराष्ट्र शासनाने केली. विदर्भामध्ये गोंदिया, वाशिम आणि खानदेशामध्ये नंदूरबार अशा नवीन जिल्ह्याची मागच्या काळात निर्मिती करण्यात आली. परंतु ज्या जिल्ह्याचे विभाजन ख-या अर्थाने करणे आवश्यक होते अशा ठाणे जिल्ह्याचे विभाजन मात्र आपण करु शकलो नाही. मागच्या काळामध्ये तशा प्रकारचा तत्वत: निर्णय घेण्यात आलेला होता. परंतु आपण त्याबाबतीत कुठे कमी पडलो, राजकीय दबाव कुठे कमी पडला, इच्छाशक्ती कुठे कमी पडली हे मला याठिकाणी सांगता येणार नाही. परंतु मी पाहिले आहे की, युतीच्या शासनाने आणि आमच्या देखील शासनाने काही तालुके निर्माण केले. 42 गावांचे, 48 गावांचे तालुके निर्माण केले. काही जिल्हे, काही तालुके मोठे झाले. काही जिल्ह्यामध्ये तर 6 तालुके आहेत. माझ्या स्वत:च्या बुलढाणा जिल्ह्यामध्ये 13 तालुके आहेत आणि वाशिम जिल्ह्यामध्ये फक्त 6 तालुके आहेत. हे जिल्हे आणि तालुके केवळ नागरिकांच्या अडचणी, प्रशासकीय अडचणी डोळ्यासमोर ठेवून निर्माण केले जातात असे मी म्हणणार नाही. परंतु नेटाचे प्रयत्न, दबाव आणि आणखी काही गोष्टी जरी असल्या तरी तो आजचा विषय नाही. मा.सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी ठाण्याचे विभाजन होऊन एक नवीन जिल्हा निर्माण झाला पाहिजे अशी जुनीच मागणी या अर्धा-ताच चर्चेद्वारे केलेली आहे. ठाणे जिल्हा हा लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने फार मोठा आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये 15 तालुके आणि 13 पंचायत समित्या अस्तित्वात आहेत. ठाणे जिल्ह्याच्या लोकसंख्येची 1951 पासूनची आकडेवारी माझ्याकडे आहे. 1951मध्ये ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या 12,83,000इतकी होती. 1961मध्ये ती 16,52,678 इतकी झाली. ही लोकसंख्या 1971मध्ये 22,81,664, 1981मध्ये 33,51,562, 1991मध्ये 52,49,126, आणि 2001मध्ये 81,31,849 अशी वाढत गेली. साधारणत: 1971 ते

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 19:15

(डॉ. राजेंद्र शिंगणे पुढे सुरु...)

2001 या 30 वर्षाच्या कालावधीत ठाणे जिल्ह्याच्या लोकसंख्येमध्ये दर 10 वर्षांनी कधी 10 लाख, कधी 20 लाख तर कधी 30 लाख असा फरक पडलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे...

आणि आज जवळपास मला वाटते की, ठाणे जिल्हयाची लोकसंख्या ही 1 कोटीच्या आसपास गेलेली आहे. अतिशय मोठया लोकसंख्येचा हा जिल्हा आहे. ज्यावेळी विधानसभेच्या निवडणूका येतात त्यावेळी लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही चर्चा करीत असतो की, विधानसभेचे कोणते मतदार संघ मोठे आहेत. ठाणे जिल्हा हा मतदार संघाच्या बाबतीत आघाडीवर आहे.ठाणे विधानसभेमध्ये 13 मतदार संघ आहेत. ठाणे, बेलापूर, उल्हासनगर, अंबरनाथ, कल्याण, मुरबाड, वाडा, भिवंडी, वसई, पालघर, डहाणू, जव्हार, शहापूर या मतदार संघातील मतदार संख्या देखील मोठी आहे. मोठया लोकसंख्येचे मतदार संघ लोकप्रतिनिधींना काम करण्यासाठीसुध्दा अवघड असतात. त्यातल्या त्यात एकच समाधानाची गोष्ट या ठिकाणी सांगता येईल आणि वृत्तपत्रातून वाचावयास मिळते आहे की, विधानसभेच्या मतदार संघाचे विभाजन होणार आहे. पर्यायाने मतदार संघ वाढणार आहे. मी काही अधिकृतपणे सांगू शकत नाही. परंतु माझ्या माहिती प्रमाणे सध्या ठाणे जिल्हयात 13 विधानसभा मतदार संघ आहेत. मला वाटते ते पुढच्या काळात 24 मतदार संघ होण्याची शक्यता आहे. सन्माननीय सदस्य श्री. हुसेन साहेबांना सांगतो की, ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्यासाठी 13 आमदारांचे बळ कमी पडले असावे असे वाटते. परंतु भविष्यात 24 आमदार या जिल्हयातून निवडून येणार आहेत. 24 लोकांचा मोठा दबाव गट झाल्यानंतर निश्चितपणे हा प्रश्न सुटू शकतो. या ठिकाणी अर्धा तास चर्चा उपस्थित करुन अनेक प्रश्न उपस्थित केले. ठाणे जिल्हयातील पोलिसांचा प्रश्न मांडला, पोलीस यंत्रणेवर पडत असलेला ताण, या ठिकाणी कमी पडत असलेले पोलीस शिपाई, या जिल्हयात ज्या गोष्टी कमी आहेत त्याचा उल्लेख केला गेला. नवीन मुंबई पोलीस आयुक्तालय येथे 202 अधिकारी आहेत, 1787 कर्मचारी आहेत. ठाणे पोलीस आयुक्तालयात 569 अधिकारी आहेत, तसेच 5607 कर्मचारी आहेत. ठाणे ग्रामीण पोलीस आयुक्तालयामध्ये 200 अधिकारी आहेत. 2765 कर्मचारी त्या ठिकाणी कार्यरत आहेत. खरे म्हटले तर आज पोलीस विभागाचा विषय चर्चेचा नाही. या ठिकाणी सांगितले पाहिजे की, 1994 मध्ये एकूण 31650 गुन्हे नोंदविले गेले होते. 2004 मध्ये गुन्हयाची नोंद 27152 एवढी झालेली आहे. या दहा वर्षाच्या कालावधीत गुन्हयांची संख्या 25.09 टक्क्यांनी कमी झालेली आहे. 1991 ते 2001 यामध्ये ठाणे जिल्हयाची लोकसंख्या 55 टक्क्यांनी वाढली. गुन्हयांचे वाढीव प्रमाण पाहिले तर लोकसंख्येच्या वाढीव प्रमाणात निम्म्याने कमी झालेले आहे. ठाणे येथे 8 पोलीस उप-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे...

विभाग कार्यरत आहेत. मिरा रोड, वसई,पालघर,डहाणू, जव्हार, गणेशपुरी, शहापूर, मुरबाड, या ठिकाणी ही कार्यालये कार्यरत आहेत. या ठिकाणी पुढच्या काळात पोलीस वाढविले गेले पाहिजे याबाबतीत या राज्याचे उप मुख्यमंत्री यांनी मागच्या काळातच सुतोवाच केलेले आहे. ठाणे जिल्हयात जेवढे पोलीस हवे आहेत तेवढे पोलीस उपलब्ध करुन देण्यासाठी आपल्या माध्यमातून गृह विभागास, माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी विनंती करीन. सभापती महोदया, या ठिकाणी प्रामुख्याने सांगितले पाहिजे की, या ठिकाणच्या लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून शासनाने अतिशय चांगली पाऊले उचलली आहेत. त्यासंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केलेला आहे. अपर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय स्थलांतर करुन जव्हार येथे 1993 पासून सुरु करण्यात आलेले आहे.जव्हार यांच्याकडे डहाणू, पालघर, तलासरी, जव्हार, मोखाडा, वाडा असे सहा तालुके आहेत. या ठिकाणच्या अपर आयुक्तांना जिल्हाधिकारी यांचे पूर्ण अधिकार शासनाने दिलेले आहेत. महाराष्ट्रात असा पहिलाच जिल्हा आहे की तेथे अशा पध्दतीने त्या ठिकाणी काम सुरु आहे. त्याच बरोबर जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे कार्यालय जव्हार येथे कार्यरत आहे व त्या कार्यालयामार्फत पुणे जिल्हयाच्या पुरवठया बाबतचा सुध्दा कार्यभार सांभाळला जातो. ठाणे जिल्हयाच्या रोजगार हमी योजनेचे कामकाज जव्हार येथून चालविले जाते. उप जिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना, ठाणे यांचे कार्यालय सुध्दा जव्हार येथे स्थलांतरीत करण्यात आलेले आहे....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 19:25

डॉ. राजेंद्र शिंगणे ..

जव्हार येथे अतिरिक्त निवासी उपजिल्हाधिकारी असे पद निर्माण करण्यात आले आहे. असे करीत असताना ठाणे येथील रजा राखीव उपजिल्हाधिकारी या पदाचे नामांतर सुध्दा करण्यात आलेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने महसूल खात्याचा राज्यमंत्री या नात्याने मा.सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यातील काही सूचना मी स्वीकारीत आहे. तहसीलदारांच्या बाबतीत याठिकाणी सांगण्यात आले की,प्रत्येक तालुक्याची लोकसंख्या जवळजवळ 9 ते 10 लाख असल्यामुळे एक तहसीलदार एवढया लोकांचे प्रश्न सोडवू शकत नाही. अनेक लोकांची कामे तहसीलदाराकडे सातत्याने येत असल्यामुळे तहसीलदार कार्यालयामध्ये मोठी गर्दी असते. आमच्याकडे ग्रामीण भागात सुध्दा तहसीलदार कार्यालयामध्ये दिवसभर गर्दी असते. ठाणे जिल्हयातील प्रत्येक तालुका हा जवळजवळ 9-10 लाख लोकसंख्येचा आहे त्यामुळे तेथील तहसीलदार कार्यालयामध्ये मोठया प्रमाणावर लोकांची गर्दी असणे स्वाभाविक आहे. मा.सदस्यांनी नायब तहसीलदार आणि अतिरिक्त तहसीलदार तालुक्याला द्यावेत अशा प्रकारची सूचना केली आहे. ठाणे जिल्हयातील प्रत्येक तहसील कार्यालयात आवश्यकतेपेक्षा दीडपट पदे भरण्यास आज या चर्चेच्या निमित्ताने मी सभागृहामध्ये आश्वासन देतो जेणेकरुन तहसील कार्यालयामध्ये कामाच्या माध्यमातून पडणारा ताण आणि त्यातून जनतेची होणारी गैरसोय दूर होईल यासाठीच या चर्चेच्या निमित्ताने मी आश्वासन देऊ इच्छितो. त्याचप्रमाणे जलदगती न्यायालयाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आला. यासंदर्भात संबंधित विभाग तसेच विधी व न्याय विभागाच्या अधिका-यांशी मी चर्चा केली. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अशा प्रकारची जलदगती न्यायालये निर्माण केलेली आहेत. आज न्यायालयांमधून अनेक केसेस पेंडींग आहेत. वर्षानुवर्षे निकाल न लागल्यामुळे न्याय नाकारण्यात येत आहे अशा प्रकारचे चित्र उभे रहात आहे. अशा प्रकारची जलदगती न्यायालये ठाणे जिल्हयात उघडण्याच्या दृष्टीने प्रयत्न करु आणि ताबडतोबीने त्याच्यामध्ये कारवाई करण्याच्या दृष्टीने मी व्यक्तिश: प्रयत्नशील राहीन. सत्र न्यायालये वाढविणे आणि एमएमआआरडीएच्या धर्तीवर मंडळ सुरु करणे याबाबतीत मुख्यमंत्री महोदयांनी विचार सुरु केलेला आहे. ठाणे जिल्हयासाठी नवीन पदांची निर्मिती करीत असताना अतिक्रमणांची संख्या सुध्दा वाढते आहे ही गोष्ट निदर्शनास आणून देण्यात आली. दुपारी ठाणे जिल्हयाचे जिल्हाधिकारी आणि इतर अधिकारी यांच्याशी चर्चा करीत असताना मी त्यांना तुमच्या अडचणी काय आहेत असे विचारले होते. एवढा मोठा ठाणे जिल्हा एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

SSK/ MAP/ KGS/ 19:25

डॉ. राजेंद्र शिंगणे ...

जिल्हाधिकारी कसा काय सांभाळू शकतो कारण कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न असेल जनतेचे दैनंदिन प्रश्न असतील जिल्हाधिका-याला सोडवावे लागतात. परवाच ठाणे जिल्हयातील अलिकडच्या काळामध्ये वाढत चाललेल्या भूकंपाच्या धक्क्याबद्दल याच सभागृहामध्ये चर्चा झाली होती. उत्तर देताना यंत्रणा वाढविणे आवश्यक आहे असे सांगितले होते. एवढी मोठी लोकसंख्या वाढत असताना एका जिल्हाधिका-याच्या माध्यमातून ही कामे होऊ शकत नाहीत. त्यासाठी अतिरिक्त अधिकारी वर्ग लागणार आहे. ठाणे जिल्हयाचे वाढते नागरीकरण आणि लोकसंख्या विचारात घेऊन तसेच शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे थांबविण्यासाठी आणि दूर करण्यासाठी ठाणे येथे अतिरिक्त जिल्हाधिका-याचे पद निर्माण करणे आवश्यक आहे अशा प्रकारची सूचना करण्यात आली. मी नम्रपणे सांगू इच्छितो की अशा प्रकारचे पद सुध्दा ठाणे जिल्हयाकरिता मुद्दामहून निर्माण केले जाईल. अतिक्रमणे वाढत आहेत ती रोखण्यासाठी आणि त्यादृष्टीने काम करण्यासाठी या पदाचा उपयोग होईल. अनेक प्रकारचे कामे करीत असताना ठाणे जिल्हयातील महानगरपालिका आहेत म्हणजे ठाणे,नवघर-माणिकपूर,नवी मुंबई,कल्याण-डोंबिवली,निजामपूर तसेच उल्हासनगर,वसई,इ. नगरपरिषदा आहेत यांच्या माध्यमातून पाणी,रस्ते,गटारे आदी नागरी सुविधा आवश्यक त्या ठिकाणी पुरविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. परंतु 1991-01 मधील जनगणनेची आकडेवारी पाहता मागील 10 वर्षामध्ये ठाणे जिल्हयात नागरी लोकसंख्येत 74 टक्के वाढ झालेली असल्यामुळे निश्चितपणाने या महानगरपालिकांवर आणि नगरपरिषदांवर मोठा ताण येऊ लागला आहे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.शिंगणे ..

13 पंचायत समित्यांच्या माध्यमतून ,959 ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून, त्या ठिकाणच्या ग्रामीण भागात शिक्षण,आरोग्य,दळणवळण, पाणीपुरवठा इत्यादी सुविधा देण्याचा प्रयत्न केला जात आहे.ठाणे जिल्हयाचा विकास झालाच नाही, असे नाही.ठाणे जिल्हयाचा विकास झाला आहे .त्या जिल्हयात अनेक धरणे झाली आहेत . त्या जिल्हयात आदिवासी भाग सुध्दा आहे आणि कुपोषणाचे प्रमाणसुध्दा तेथे दिसून आलेले आहे.त्या संदर्भात या सभागृहात अनेकदा चर्चासुध्दा झालेली आहे.ठाणे जिल्हा हा मोठा असल्यामुळे, त्या जिल्हयावर ताण येत असतो.सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, ठाणे जिल्हयाचे विभाजन व्हावयास पाहिजे, ही गोष्ट मला देखील मान्य आहे.एक जिल्हा निर्माण करावयाचा असेल तर 150 कोटी रुपये खर्च येत असतो.ठाणे जिल्हयासारख्या मोठया जिल्हयाचे विभाजन झाले पाहिजे. डी लिमिटेशनचे काम संपल्यानतर 1 ऑगस्ट 2002 मध्ये महाराष्ट्र शासनाने नवीन तालुका आणि नवीन जिल्हा निर्माण करु नये, असा निर्णय घेतलेला आहे. या अगोदर जे तालुके आणि जिल्हे निर्माण करण्यात आलेले आहेत, त्या ठिकाणी सर्व सुविधा देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही ? त्या ठिकाणी कार्यालय आहे किंवा नाही,हे तपासून पहावेत असे ठरविण्यात आलेले आहे. असे जरी असले तरी भविष्यात महाराष्ट्रात नवीन जिल्हा आणि नवीन तालुका निर्माण करण्याची परिस्थिती निर्माण होईल, तेव्हा ठाणे जिल्हयाचे विभाजन प्राधान्याने केले जाईल, एवढेच मी आपल्याला या निमित्ताने सांगू इच्छितो.तूर्त या जिल्हयाचे विभाजन करणे शक्य नसल्यामुळे, ठाणे जिल्हयाचे विभाजन आपण करु शकत नाही, ही गोष्ट खरी आहे.सन्माननीय सदस्यांच्या माहितीकरीता आज मी एवढेच सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी माझ्या अर्धा तास चर्चेला जे उत्तर दिले आहे, त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. ठाणे जिल्हयासबंधीचे प्रश्न त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे समजावून घेतले आहेत.ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्यात यावे एवढाच माझा हेतू नव्हता. ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्यास उशीर होत आहे आणि मधल्या काळात तेथील प्रशासनावर ताण पडत आहे, हा सुध्दा माझा मुद्दा होता. माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात हे सर्व मुद्दे आलेले आहेत.त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. ठाणे तालुक्यासाठी अतिरिक्त तहसीलदार देण्यात यावे, असाही मुद्दा मी मांडलेला आहे. ठाणे तालुक्याची लोकसंख्या 25 लाख एवढी

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन ...

आहे.ठाणे जिल्हयात तीन महानगरपालिका आहेत मिरा भाईदर, नवीन मुंबई आणि कल्याण डोंबिवली अशा तीन महानगरपालिका ठाणे जिल्हयात आहेत.तीनही महानगरपालिकेकडे पुरेशी जागा उपलब्ध आहे आणि कार्यालयासाठी त्या जागा उपलब्ध करुन देऊ शकतात.कार्यालय निर्माण केल्यानतर तेथे सर्व अधिकारी बसू शकतील.तेव्हा मिरा भाईदर आणि नवीन मुंबई येथे अतिरिक्त तहसीलदाराचे पद निर्माण् करण्यात यावे, तसेच त्यांना लागणाऱ्या सर्व कर्मचा-यांची व्यवस्था करण्यात यावी अशी माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करावयाची आहे.पोलीस दलाच्या बाबतीत सुध्दा मी एक मुद्दा मांडला होता. तेव्हा त्याबाबतीत सुध्दा लवकरात लवकर जी उपाययोजना करता येईल, ती माननीय मंत्रिमहोदयांनी करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.ठाणे जिल्हयाचे विभाजन आता न करता नंतर करण्यात येणार आहे. त्यावेळी काही पदांची आपल्याला आवश्यकता लागणार आहे. तेव्हा पुढच्या काळात लागणा-या पदाची गरज लक्षात घेऊन, त्या पदांची आता प्रोव्हीजन केली तर अधिक बरे होईल, असे मला माननीय मत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे.एम.एम.आर.डी.ए.च्या मार्फत काही कामे करण्यात येणार आहेत. तेव्हा त्या कामासाठी बजेटमध्ये योग्य ती तरतूद करण्यासाठी,त्या कामाचे प्लॅन आणि एस्टिमेटस तयार करण्यात यावे अशी मी मंत्रिमहोदयांना विनंती करतो.

डॉ.राजेन्द्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना विचारात घेऊन महसूल खात्याच्या माध्यमातून त्या ठिकाणी तहसीलदार किंवा नायब तहसीलदार पदाची जास्त आवश्यकता असेल तर त्या सगळया ठिकाणी जास्तीत जास्त पदे देण्याचा मी प्रयत्न करीन. तसेच चांगले अधिकारी देण्याचासुध्दा मी प्रयत्न करीन.

डॉ.अशोक मोडक : सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी एक अतिशय चांगला विषय आणि चांगला आशय या सदनामध्ये मांडलेला आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो त्याचबरोबर या अर्धा तास चर्चेला माननीय मंत्रिमहोदयानी अतिशय समाधानकारक उत्तर दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. मंत्रिमहोदयांनी समाधानकारक उत्तर दिलेले असले तरी सुध्दा दोन तीन विषयांना स्पर्श करावयाचे राहून गेलेले आहे. ठाणे जिल्हयात अनेक धरणे आहेत असा उल्लेख मंत्रिमहोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात केला आहे.दांडेकर कमिटी पासून आतापर्यन्तच्या सगळयांनी हा विषय घेऊन, या जिल्हयावर अन्यायच केलेला आहे.दांडेकर

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.मोडक .....

कमिटीच्या अहवालात असे म्हटलेले आहे की, "ठाणे जिल्हयात अनेक धरणे आहेत. या जिल्हयात धरणाची कमतरता नाही." परंतु या धरणातील पाणी मात्र मुंबईला जाते. ठाणे जिल्हयात तानसा वैतरणा ही धरणे आहेत...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. मोडक ....

तो एरिया उपाशी, तहानलेलाच आहे. त्यातील सारे पाणी मुंबईला मिळते आहे. म्हणूनच ठाणे जिल्ह्यामध्ये धरणे आहेत असे जे वाक्य आपण म्हटले ते त्या दृष्टीकोनातून मला उचित वाटले नाही. अर्थात आपल्या मनामध्ये तसे नाही याची मला कल्पना आहे. वास्तविक पाहता पोशीर धरणाची मागणी अजूनही प्रलंबित आहे. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनीही सांगितले की, आज ठाण्याची लोकसंख्या एक कोटीच्या घरामध्ये गेली आहे. त्याचा परिणाम असा घडला आहे की, ज्याला स्पील ओव्हर इफेक्ट आपण म्हणतो, म्हणजे ज्याप्रमाणे दूध चुलीवर ठेवून आपण चूल पेटविल्यानंतर त्या दुधाचा प्रवाह ज्याप्रमाणे भांड्यातून बाहेर वाहू लागतो त्याला स्पील ओव्हर इफेक्ट आपण म्हणतो., तर असाच परिणामाचा अनुभव आम्ही ठाणेकर घेत आहोत. मुंबईतील गुन्हेगार हे ठाण्याच्या आश्रयाला येऊन राहताहेत. तेव्हा याचाही आपण विचार केला पाहिजे. प्रशासनाच्या बाबतीत तहसिल कचेरी कार्यक्षम करणे हा जसा विचार केला आहे त्याप्रमाणे ठाण्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न विचारात घेऊन ठाण्यातील पोलीस विभाग सबळ करण्याची गरज आहे. सभापती महोदया, माननीय राज्यमंत्री यापूर्वी शिक्षण राज्यमंत्री म्हणून देखील राहिलेले आहेत. ठाणे जिल्ह्याचा या दृष्टीकोनातून आपण जरा विचार करावा. ठाणे जिल्ह्याचा एवढा मोठा व्याप पाहता ठाणे जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यावर तेथील विद्यार्थी संख्या, शिक्षक, प्राध्यापकांची संख्या वगैरेंचे जे प्रेशर आहे ते सारे लक्षात घेता That job and work is manned by a single person. म्हणून ठीक आहे. आता आपण जवळ जवळ हिंट देऊन टाकली आहे की 13 चे 22 आमदार होतील तेव्हाच हे प्रेशर वाढेल. परंतु तत्पूर्वी शिक्षण अधिकाऱ्यांच्या प्रश्नाच्या बाबतीत देखील आपण काही दिलासा द्यावा ही विनंती.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.मोडक यांनी सांगितल्या प्रमाणे निश्चितपणे तेथील शिक्षणाच्या बाबतीत निश्चितपणे लक्ष घालून त्याबाबत अधिक काय चांगले करता येईल, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांवर एवढ्या मोठ्या जिल्ह्याचा जो बोजा आहे .. अर्थात हा बोजा सर्वच विभागातील अधिकाऱ्यांवर आहे, तेव्हा शिक्षणाच्या बाबतीत देखील अतिरिक्त शिक्षणाधिकारी, ज्याप्रमाणे अतिरिक्त जिल्हाधिकारी आहे त्याप्रमाणे, हे पद निर्माण करण्याच्या दृष्टीने शिक्षण मंत्र्यांशी किंवा सचिवांशी बोलून याबाबत निर्णय घेण्यात येईल.

..... 3व्ही 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ. मोडक यांनी जो मुद्दा मांडला आहे तोच मुद्दा मी देखील येथे मांडणार होतो. ज्या पध्दतीने इतर विभागांमध्ये उदा. गृह विभाग असेल वा महसूल विभाग असेल, तेथे आपण पदे वाढविण्याचा निर्णय घेतला त्याच पध्दतीने शिक्षण विभागाच्या बाबतीत देखील हा विचार आपण केला पाहिजे. ठाणे जिल्ह्यामध्ये सुरूवातीस 400 शाळा होत्या त्यांची संख्या आता 1600 वर गेली आहे तरीही तेथील स्टाफिंग पॅटर्न तोच आहे, त्यामध्ये कोठेही बदल वा वाढ केली गेलेली नाही. त्याचे अनेक दुष्परिणाम ठाणे जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रामध्ये दिसून येत आहेत. आमचे शिक्षणाधिकारी एकाही शाळेमध्ये जाऊन इन्स्पेक्शन करू शकत नाहीत. त्यांची इन्स्पेक्शन करण्याची इच्छा नसते म्हणून ते करू शकत नाहीत असे नाही तर त्यांच्या पाठीमागे अगोदरच कामाचा इतका मोठा व्याप आहे की इच्छा असूनही ते शाळांमध्ये जाऊन इन्स्पेक्शन करू शकत नाहीत. म्हणूनच अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय ज्याप्रमाणे आपण जव्हारला निर्माण केलेले आहे त्याच पध्दतीने अतिरिक्त शिक्षणाधिकारी हे पद आणि कार्यालय देखील आपण निर्माण करावे हा एक भाग आणि तेथील स्टाफिंग पॅटर्नमध्ये देखील वाढ होणे आवश्यक आहे तरी त्या दृष्टीने शासनातर्फे आपण काही करणार आहात काय ? मला माहित आहे की, हा विषय आपल्या अखत्यारीतील नाही. तथापि, आपण माननीय मुख्यमंत्री व माननीय शिक्षण मंत्री महोदयांशी चर्चा करून हा विषय गांभीर्याने घ्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षणाच्या बाबतीत ज्या काही सूचना येथे केल्या गेल्या आहेत., सन्माननीय सदस्य डॉ.मोडक यांनी प्रश्न उपस्थित केला असता अतिरिक्त शिक्षणाधिकाऱ्याबद्दल मी सांगितलेच आहे, त्याच बरोबर तेथे जो स्टाफ कमी पडतो आहे त्या बाबतीत देखील शिक्षण मंत्र्यांशी आणि शिक्षण खात्याच्या इतर अधिकाऱ्यां बरोबर चर्चा करून तेथे जास्तीचा स्टाफ कसा देता येईल याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल एवढेच मी या निमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो.

**तालिका सभापती (डॉ.नीलम गोऱ्हे)** : आजचे सभागृहापुढील कामकाज संपले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, उद्या शुक्रवार, दिनांक 22 जुलै 2005 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 40 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक
22 जुलै 2005 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही